3533

पंडित
सेतुमाधवराव पगडी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय .. निबंध
सं. क्र. 3533

# अशी माणसे येती



तू अशी जवळी राहा
नेपाळची दुमाकुमारी
धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रे
माझे दूरदर्शन
अये लेखनिके !
इतिहासातील खरे-खोटे
आमची पानिपत मोहीम
सत्तेच्या खुर्चीखालची
प्रकरणे

REFBK-0026923

परचुरे

उप.

संदर्भ
निबंध
3533
२६८२३
२६/४/९३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3533
२६८२३
२६/४/९३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 JUN 1993
3 - JUL 1993
13 JUL 1993
JUL 1993
JUL 1993
JUL 1993

7 NOV 1
25 MAY 1994
13 DEC 1995
27 DEC 1995

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

अशी माणसे येती...

# अशी माणसे येती...

लेखक

सेतु माधवराव पगडी

REFBK-0026923

परचुरे प्रकाशन मंदिर
गिरगाव, मुंबई-४०० ००४

आवृत्ती पहिली
२४ डिसेंबर १९९२

प्रकाशक
सौ. शुभदा विष्णू परचुरे
परचुरे प्रकाशन मंदिर
३११ – राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.

अक्षरजुळणी
अक्षय फोटोटाइपसेटर्स
'कुलदीपक', सुभाष पथ,
जुन्या महानगरपालिकेजवळ,
ठाणे-४०० ६०१.

मुद्रक
श्री. अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप प्रा. लि.
२०१ – इंडिया हाउस,
४२ – आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई-४०० ०३१.

मूल्य : पंच्याहत्तर रुपये

ज्यांच्या सहवासातून आणि असंख्य मैफिलींतून
पुढील लेखांच्या रांगोळ्या उमटत गेल्या
ते माझे जिवाभावाचे मित्र

**श्री. अरुण आठल्ये**

यांस

# अनुक्रमणिका


अंतरंग ..... ५
तू अशी जवळी राहा ..... ९
कर्नाटकात भेटलेली शामा ..... १३
अये लेखनिके! ..... १७
प्रात:संध्या ..... २२
सत्यवती ..... २७
नेपाळची दुनाकुमारी ..... ३३
माझे दूरदर्शन ..... ४०
– आणि जोगळेकरांनी मिशा ठेवल्या! ..... ४६
इतिहासातील खरे-खोटे ..... ५४
प्रकाशाचा नवा किरण ..... ५९
दुरावलेली वेल परत मांडवाकडे ..... ६४
त्याने सूर्यमंडळ भेदिले! ..... ६९
ग्यानी प्रतापसिंग ..... ७४
इतिहास-ब्रह्मर्षि पोतदार ..... ७७
योगी कृष्णप्रेम ऊर्फ रोनाल्ड निक्सन ..... ८२
महाभारतातील दोन तेजस्वी स्त्रिया ..... ८८
महाभारताच्या मूळ रूपाचा शोध ..... ९४
धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ..... १०२
द्वारका-मथुरा ..... ११२
सोमनाथ ..... १२३
'शैले शैले न माणिक्यम्' ..... १२९
मन विचलित करणारे अचलपूर ..... १३६
पानिपतची माती ..... १४१
आमची पानिपत मोहीम ..... १४७
कोस्लरच्या जीवनातील स्त्रिया ..... १५३
फ्रँक सिनाट्रा ..... १६७
इव्हलिन वॉ ..... १७४
सत्तेच्या खुर्चीखालची प्रकरणे ..... १८२
अर्नाल्ड ब्रेख्टचे आत्मचरित्र ..... १८९
पाश्चात्य कादंबऱ्यांची झेप ..... १९६
इबान्स्क देशातील नवलकथा ..... २०३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. ३५३३
२६९२३
२६।४।०३
शाखा (स्थळ प्रत)

# अंतरंग

इतिहास-महर्षी सेतुमाधवराव पगडी यांची त्र्याऐंशीव्या वर्षीही चाललेली इतिहासाची तपश्चर्या पाहून मला अलीकडे पुराणकालातील तपस्वी ऋषिमुनींची आठवण येते. गेली दहा वर्षे ते अक्षरश: डोळे मिटून ध्यानस्थ बसले आहेत! पण तरीही त्यांच्या या बंद डोळ्यांना दिसत नाही असे या जगात काही नाही. आपली दृष्टी मंद होता होता बंद झाली, तशी कुठून कोण जाणे, इतरांच्या डोळ्यांनी जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी त्यांनी मिळवली, आणि 'बचेंगे तो और भी लडेंगे' या शर्थीने ते इतिहासाचे नवे नवे प्रदेश काबीज करू लागले.

सेतुमाधवरावांच्या प्रस्तुत पुस्तकाचे नाव आहे 'अशी माणसे येती...' इतिहास-संशोधनासाठी त्यांनी अभ्यास केला, बखरी वाचल्या, पुस्तके वाचली, तसा हा इतिहास जिथे घडला अशी अनेक ठिकाणेही त्यांनी पालथी घातली. यासाठी आयुष्यात त्यांनी दीड लाख किलोमीटर प्रवास केला आहे. इतिहासाची ही वाटचाल किती बिकट वा खडतर असेल याची कल्पना त्यांच्या एलिचपूरदर्शनावरून यायला हरकत नाही. हे एलिचपूर म्हणजे आजचे अचलपूर. येथील इस्माइलखानाचा दरबार हॉल पाहायला ते गेले तर त्याची आजची अवस्था काय असावी? या दरबारचा आज सार्वजनिक संडास बनलेला आहे. सेतुमाधवराव तिथे गेले (अर्थात अंधत्व येण्यापूर्वी) तेव्हा या दरबार हॉलपलीकडच्या आयनेमहालात एक खानसाहेब बहिर्दिशेला बसलेले होते. अशा वेळी स्वत:ची कुचंबणा दडपून सेतुमाधवराव त्या खानसाहेबाला म्हणाले, ''किब्ला, कोई कबाहत नहीं – आप इतमिनानसे फारिग हो जाइये.'' (काही हरकत नाही, आपण सावकाशीने मोकळे व्हा!)

या वाटचालीत अनेक माणसे त्यांच्या आयुष्यात आली. त्यांच्यापैकी 'स्मृती ठेवुनी गेली' अशी काही माणसे या पुस्तकात पाहायला मिळतात. यांतील पहिले माणूस म्हणजे त्यांची अर्धांगिनी. ज्यांनी आपले डोळे पुढे करून त्यांची दृष्टी शाबूत ठेवली आहे त्यात अग्रभागी आहे ती त्यांची धर्मपत्नी. इथे त्यांची पत्नीही सर्वार्थाने त्यांचे सर्वस्व बनली आहे. म्हणूनच पहाटे जाग आल्यावर प्रथम ती जवळ आहे याची ते खात्री करून घेतात आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघतो – ''तू अशी जवळी राहा.''

पुढे या वाटचालीत कर्नाटकातील इतिहास संशोधनाच्या कार्यात डोळ्यांची उणीव भरून काढणारी शामा भेटते. मुंबईत हेच काम करून देणाऱ्या ताराबाई आपटे यांची ओळख ते करून देतात. या ताराबाई म्हणजे तर 'समसमां संयोग की जाहला' अशा तोडीच्या. तशीच कुणी एक संध्या करमरकर. हिला तर काही येत नव्हते, पण सेतुमाधवरावांनी आपले काम तिच्याकडून करवून घेताना तिला शिकवून इतकी शहाणी केली की शेवटी ती त्यांची प्रातःसंध्या बनली! सत्यवती नावाची एक आंध्र युवती त्यांच्याकडे मराठी इतिहासावरील प्रबंधाच्या मार्गदर्शनासाठी म्हणून आली, आणि पाहता पाहता शिष्यवृत्ती मिळवून परदेशी जाण्याइतकी ज्ञानोपासक बनली. या प्रत्येकीला सेतुमाधवरावांनी भरभरून ज्ञान दिले, पण त्या प्रत्येकीने आपल्यालाही बरेच काही दिल्याची जाणीव ते दाखवतात, तेव्हा त्यांच्या कृतज्ञ, निगर्वी व्यक्तिमत्त्वाची साक्ष पटते.

वयाची ब्याऐंशी वर्षे उलटून गेल्यावर त्यांना ज्ञात असलेल्या डझनभर भाषा कमी पडल्या म्हणून की काय, त्यांनी नेपाळी भाषा शिकून घेतली. तीही कुणाकडून? तर बंद दृष्टीला जगाच्या सर्व वाटा बंद झाल्यावर राहता राहिलेल्या गच्चीत फिरताना भेटलेल्या गुरखा-पत्नीकडून. तिचे नाव दुनाकुमारी. त्यांच्या निवासस्थानाच्या सुरक्षाकामावर असलेल्या गुरख्याने चार महिन्यांकरता तिला मुंबईत आणले. ताबडतोब सेतुमाधवरावांनी रोज संध्याकाळी तासभराचा तिचा 'क्लास जॉइन करून' जमेल तेवढे नेपाळी शिकून घेतले. नेपाळी गुरख्यांचे वंशविस्तार, रीतिरिवाज वगैरे जे जे काही मिळाले ते ते पदरात पाडून घेतले. या पुस्तकातील 'दुनाकुमारी' हा त्यांचा लेख म्हणजे मधमाशीच्या निरलसतेने ते कुठून कुठून काय काय मिळवीत असतात याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.

'माझे दूरदर्शन' या लेखात ते आपली मुलाखत घेणाऱ्या उर्दू विद्वानाच्या विद्वत्तेचे पितळ उघडे पाडतात, आणि आपल्या फजितीचा किस्साही तितक्याच मोकळेपणाने रंगवून सांगतात. 'प्रकाशाचा नवा किरण'मध्ये कट्टर मुसलमान धर्मीय ही 'असलमें क्या चीज है' हे दाखवतात, त्याचप्रमाणे श्रद्धेला कुठल्याही धर्माचा देव पूजनीय कसा वाटतो त्याचे दोन मासले दाखवून विस्मित करतात. यांतील तिरुपतीचे दर्शन गुपचुप घेणारा मुसलमान ड्रायव्हर मूर्तिभंजकांची मती गुंग करणारा आहे.

तसे पाहिले तर प्रस्तुत पुस्तक हा एक अजबखानाच म्हणावा लागेल. त्यात सेतुमाधवरावांनी प्रत्यक्ष फिरून पडताळून पाहिलेली काही ऐतिहासिक क्षेत्रे आहेत. 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे', 'द्वारका-मथुरा', 'सोमनाथ', 'पानिपतची माती' ही लेखांची नावेच मुळी बोलकी आहेत. या महास्थानांचे आजचे दर्शन तितकेसे उत्साहवर्धक नाही याची खंत त्यांना वाटते. हे सर्व पाहताना आपणाला मध्येच पंजाबचे थोर पुढारी

ग्यानी प्रतापसिंग भेटतात, हिंदुस्थानात येऊन योगी कृष्णप्रेम बसलेले रोनाल्ड निक्सन भेटतात, तसेच आकस्मिकपणे इतिहासमहर्षी स्व. दत्तो वामन पोतदारही पडद्यावर येऊन जातात. मध्येच उपभोगवादी जगातील एक अजब सितारा फ्रँक सिनाट्राही जवळून पाहायला मिळतो, तेव्हा नित्याच्या जगात वावरत असताना मध्येच कुठून तरी एखादे सिनेमागीत ऐकू आल्यासारखे वाटते.

यातील 'महाभारतातील दोन तेजस्वी स्त्रिया' हा लेख भारतीय नारी विचारांचे किती उंच शिखर गाठू शकतात याचे प्रत्यंतर आणून देतो. महापुरुषांनाही निरुत्तर करणाऱ्या सुलभा आणि विदुला या दोन तेजस्विनी म्हणजे पुरुषांच्या जगात समानतेसाठी लढा देणाऱ्या स्त्रियांना किंवा आजच्या आपल्या राजकीय नेत्यांना स्फूर्तिस्थान ठरतील अशा तोडीच्या आहेत. या लेखाच्या शेवटी सेतुमाधवराव म्हणतात :

"सुलभा काय किंवा विदुला काय, ह्या दोन्ही ज्ञानी स्त्रिया आपल्या देशात दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेल्या. एकीच्या बुद्धिवैभवापुढे जनक नम्र झाला, तर दुसरीकडून स्फूर्ती घेऊन विदुलापुत्र शस्त्र घेऊन सिंदू राजावर चालून गेला आणि त्याचा त्याने निकाल लावला. त्याने आपले राज्य जिंकून परत घेतले. क्षात्रधर्माचे हे प्रदर्शन भारताच्या समोर आजही असले पाहिजे. आज आपल्या देशासमोर अनंत प्रश्न उभे आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी भारताने क्षणभर जरी मागे वळून पाहिले तरी त्याला अनेक स्फूर्तिस्थाने आढळून येतील."

इव्हलिन वॉ या इंग्लिश लेखकावरील लेख म्हणजे लेखकांच्या जगात मारलेला एक फेरफटका आहे. इव्हलिन ही बाई म्हणून फसणारे वाचक, याचे नाव धडपणे लक्षात न घेता काही वेळ त्याच्यावर भाळणारी एक उच्चभ्रू चाहती किंवा इव्हलिनला टी.व्ही.वर भेटलेले तत्त्वशून्य आणि भंपक वक्ते हे सर्व वाचताना जग हे इथून तिथून सारखेच असल्याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. 'सत्तेच्या खुर्चीखालची प्रकरणे' हा एका साम्यवादी देशातील केविलवाण्या जीवनावर विदारक प्रकाश टाकणारा लेख आहे. मात्र साम्यवादी राजवटीबद्दल थोडीफार माहिती असणाऱ्या लोकांना तिची खुमारी जास्त कळेल.

या तऱ्हेच्या लेखांतील सर्वात लक्षणीय लेख आहे तो म्हणजे ऑर्थर कोस्लर या गाजलेल्या लेखकाचे अफाट जीवन समोर उभे करणारा. तरुणपणी साम्यवादात गुरफटलेला कोस्लर, त्याच्या जीवनात आलेल्या स्त्रिया, पुढे साम्यवादाबद्दल भ्रमनिरास झाल्यानंतरचे त्याचे इंग्लंडमधील जीवन आणि स्वतःच्या जीवनाबद्दल लिहिलेल्या चार-खंडी चरित्रातील विशेष हे सर्व सेतुमाधवरावांनी या लेखात प्रभावीपणे उभे केले आहे. अर्नाल्ड ब्रेख्ट या जर्मन पुरुषाच्या आत्मचरित्राची सेतुमाधवरावांनी करून दिलेली ओळखही अशीच प्रभावी आहे. कोस्लर आणि ब्रेख्ट यांच्या जीवनांबद्दल हे

सर्व वाचल्यावर त्यांची ही पुस्तके मुळातून वा त्यांची भाषांतरे वाचण्याची इच्छा नाही झाली तरच नवल. मुख्य म्हणजे ऑर्थर कोस्लर काय किंवा अर्नाल्ड ब्रेख्ट काय, ही व्यक्तिमत्त्वेच कशी जिवंत, रसरशीत आणि फारसे काही न लपवता आपले आयुष्य जसेच्या तसे वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी पाहिलेले जग, काढलेले निष्कर्ष, दाखवलेल्या वा मान्य केलेल्या चुका या सर्वांतून त्यांची व्यक्तिमत्त्वे उत्तुंग बनत जातात, आणि आपल्याकडच्या चरित्रांचा वा आत्मचरित्रांचा थिटेपणा लक्षात येत जातो. याच दृष्टीने पाहिले तर यातील 'पाश्चात्य कादंबऱ्यांची झेप' हा लेखही अशी झेप घेण्याची प्रेरणा जागृत करणारा आहे.

थोडक्यात सांगायचे तर सेतुमाधवराव पगडींच्या या पुस्तकातील एका लेखाचा दुसऱ्या लेखाशी संबंध नाही. आणि तरीही प्रत्येक लेख, त्यातील विषय वेगळा असूनही, एखादे नवे व्यक्तिमत्त्व, एखादे नवे विश्व किंवा एखादा नवा विचार देऊन जातो, आणि वाचकाच्या विविधज्ञानविस्तारात भर घालून त्याच्या विचाराच्या, वाचनाच्या कक्षा रुंदावतो.

**– पुरुषोत्तम धाक्रस**

❈ ❈

# तू अशी जवळी राहा

इ. स. १९८२ पर्यंत माझे इतिहास-संशोधनाचे, फारशी, उर्दू साहित्याच्या वाचनाचे व लेखनाचे आणि प्रवासाचे, व्याख्यानांचे धावपळीचे जीवन व्यवस्थितपणे चालू होते. रोज लोकलने प्रवास करावा, एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय गाठावे, तिथे वाचन आणि लेखन करावे आणि संध्याकाळी परतावे हा माझा कार्यक्रम अव्याहत चालू होता. दूरदर्शन किंवा आकाशवाणी यांवरील कार्यक्रम मी अधूनमधून पाही. पण तेसुद्धा बहुतांशी बातम्यांपुरते मर्यादित असत.

त्या काळात वाचन आणि लेखन ही दोन्ही कामे मी मोठ्या प्रमाणात उरकून घेत असे. माझे वाचन अनेक विषयांवर चालू असे. चरित्रे, आत्मचरित्रे, इंग्रजी कथा-कादंबऱ्या, इतिहास, राजकारण असे कोणतेच विषय माझ्या नजरेतून सुटत नव्हते. लेखन मी माझ्या वाचनाच्या बरोबरीनेच करीत गेलो. आयुष्यात मला जवळजवळ पाच हजार पुस्तकांचे वाचन करता आले. तर हजार-बाराशे लेख मी स्वतः हाताने लिहून काढले. स्वतंत्र पुस्तके निराळी. मी हाताने लिहून काढलेल्या लेखांची पाने कमीत कमी दहा हजार तरी होतील.

१९८२ साली या माझ्या जीवनक्रमाला पहिला तडाखा बसला. डोळे त्रास देऊ लागले. दृष्टी हळूहळू अधू होऊ लागली. १९८२ त माझ्या वयाच्या बहात्तराव्या वर्षी माझ्यावर 'सेरेब्रो थ्रॉंबोसिस'चा मोठा आघात झाला. मेंदूच्या वाटेवर कुठे तरी एका गाठीचा अडथळा आला, असे डॉक्टरांचे म्हणणे. सौम्य पक्षाघाताचा मला झटका बसला, आणि वाचा बंद पडली. डॉक्टरांच्या उपचारांमुळे या आजारातून मी बरा झालो. पण एशियाटिक सोसायटीचा रोजचा लोकलचा प्रवास बंद पडला तो कायमचाच. विशेष म्हणजे हाताने लिहिणे संपुष्टात आले. डोळ्यांवर शस्त्रक्रिया करून घेतली. त्यामुळे पुढील पाच-सहा वर्षे मला आपले वाचन चालू ठेवता आले. गेल्या दहा वर्षांत लेखनिकांमुळेच मला माझे संशोधनाचे लेखनकार्य चालू ठेवता आले. यांतील काही वर्षे वाचन मात्र मी स्वतः करीत होतो. १९८८ पासून डोळे अजिबात काम करीनासे झाले. त्यामुळे वाचनही बंद पडले. तेही लेखनिकांच्या द्वारे करून घेण्याची पाळी आली. यामुळे संशोधन, लेखन, वाचन, भाषणे इत्यादींवर बंधने आली, मर्यादा पडू लागल्या.

आता माझे नाटक-सिनेमा पाहणे सुटले. सर्वच पाहणे सुटले. मी शेवटचा प्रयोग पाहिला तो गडकऱ्यांच्या 'गर्वहरण' नाटकाचा. आता माझी पत्नी अधून-मधून नाटके पाहते, आणि त्यांचे वर्णन करून सांगते तेवढेच. आता तिचे डोळे हेच माझे डोळे झाले आहेत.

माझ्याप्रमाणेच माझ्या पत्नीचा स्वभावही गोष्टीवेल्हाळ आहे. तशी तिची वृत्ती आध्यात्मिक आहे. ज्ञानेश्वरीच्या ओव्या तिच्या जिभेवर सतत असतात. गुरुगीता, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इत्यादींची तिने किती तरी पारायणे केली आहेत. सत्संग, भजन इत्यादींचा तिला चांगलाच नाद आहे. माझी आध्यात्मिक बाजू तिनेच सांभाळली आहे. याशिवाय फावेल तेव्हा ती माझ्यासाठी वर्तमानपत्रे, मला हवे असलेले ग्रंथ इत्यादींचे वाचन करून दाखविते.

तिला टी. व्ही. वरील चित्रपट पाहण्याचा छंद आहे. ती चित्रपट पाहण्यात किती गर्क होते याचे प्रात्यक्षिक मला अनुभवायला मिळते. चित्रपटातील खलपुरुषाला नायक बदडून काढतो तेव्हा "हाण अजून मेल्याला" असे तिचे उत्स्फूर्त उद्‌गार ऐकून मला मोठी गंमत वाटते. आपण पाहिलेल्या जवळजवळ सर्व चित्रपटांची कथानके मला समजावून सांगण्यात तिला कोण आनंद वाटतो! कथानक सांगताना ती सुरुवातच मुळी आपल्या विशिष्ट लकबीने करते. "दुष्ट मेले! तिला लुबाडणं बरं आहे का? कालीगंजच्या बहूचे कोण हाल? हा घोर अन्याय आहे. या डायरेक्टरचे काय डोके फिरले आहे? सगळी संकटे संपल्यावर नायिकेला विनाकारण मारायचे काय कारण आहे? मेले सुखाने राहू देत नाहीत." असे तिचे ज्वलंत उद्‌गार असतात. आधुनिक चित्रपटांवरील तिने केलेल्या भाष्यांवरून एक लेखमालाच तयार होण्यासारखी आहे!

तिने मला कथानके सांगावीत आणि मी तिला इतिहासाच्या गोष्टी सांगाव्यात, असे आमचे संवाद सारखे चालू असतात. माझ्या सततच्या इतिहासाच्या गोष्टी सांगण्यामुळे तीही इतिहासतज्ज्ञ बनू लागली आहे. तर तिच्यामुळे मीही चित्रपटांचा 'भाष्यकार' बनू लागलो आहे. टी. व्ही. पाहता पाहता संगीताचे सूरही माझ्या कानांवर सतत पडू लागले आहेत. वाद्यांत मला सर्वांत अधिक आवडणारे वाद्य म्हणजे वीणा. त्याखालोखाल सतार. वीणेचे बोल ऐकताच मी बेभान होतो. वीणेचे बोल माणसाच्या बोलण्यासारखे प्रत्ययकारी वाटतात आणि हृदयाला भिडतात. एक अनोखे विश्वच डोळ्यांसमोर उभे राहते अशा वेळी.

**"उत्संगे वा मलीन वसने सौम्य निक्षिप्य वीणाम्।"**
**"मद्‌गौत्रांकं विरचित पदम् गेयमुद्‌गातु कामाम्॥"**

या कालिदासाच्या पंक्तीची मला आठवण येते. असा हा आमचा कार्यक्रम. दिवस कसा जातो हे सांगायचे तर एखाद्या दिवसावरून सुद्धा सांगता येईल. कालचीच गोष्ट

घ्या. अलीकडे मी सकाळी पाच-साडेपाचला उठतो. सहापर्यंत रेडिओ ऐकण्यास बसतो. भक्तिगीते, बातम्या वगैरे ऐकून चहापान झाले की घराच्या गच्चीवर फेऱ्या मारण्यास जातो. तासभर फिरणे होते. त्या वेळी जुन्या गोष्टींचे मनन, ऐतिहासिक विषयांचे चिंतन, दिवसाच्या पुढील कार्यक्रमांची रूपरेषा यांचे विचार मनात सतत चालू असतात. डोळ्यांनी दिसत नाही, मग स्मरणशक्तीचा जास्तीत जास्त वापर करून ऐतिहासिक घटना, तारखा, व्यक्ती यांचे मी मनाशी पुन्हा पुन्हा चिंतन करत जातो.

कालही मी हा नित्यनियम पुरा करून तासभराने खाली आलो. आंघोळ, सकाळची न्याहरी उरकून मी आपल्या जागेवर येऊन बसलो. तोच दहाच्या सुमारास माझी लेखनिका विद्या वाणी ही आली. आल्या-आल्या तिने 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया' ही वर्तमानपत्रे मला वाचून दाखविली. 'टाइम्स ऑफ इंडिया'तील संपादकीय आणि तज्ज्ञांचे लेख मी आवडीने ऐकतो. वर्तमापत्रांचे वाचन झाल्यावर मी लेख सांगण्यास सुरुवात करतो, आणि विद्या लेख उतरवून घेते. सध्या तंजावरवर माझे संशोधन चालू आहे. या लहानशा मराठी संस्थानाचे जहागीरदार आणि तंजावरचे अंकित वेदोजी भास्कर (इ. स. १६५६) यांच्या वंशावर सध्या माझे लिहिणे चालू आहे. त्याचा काही भाग पुरा केला. यानंतर काही पत्रांची उत्तरे दिली आणि सकाळची वेळ संपवली.

दुपारचे जेवण झाल्यावर मी विश्रांती घेतली. संध्याकाळी माझे प्रकाशक मित्र श्री. अप्पा परचुरे हे माझ्या भेटीला आले. त्यांच्याशी चर्चा आणि गप्पा झाल्यावर मी संध्याकाळच्या फिरण्यासाठी पुन्हा गच्चीवर गेलो. साडेसातच्या सुमारास परत आल्यावर टी. व्ही. चे कार्यक्रम, नंतर भोजन, पुन्हा काही टी. व्ही. चे कार्यक्रम, आणि दहा वाजता पलंगावर पडणे. या वेळी माझी पत्नी एखादे पुस्तक घेऊन मला वाचून दाखविते. काल तिने सांगली संस्थानचे संस्थापक चिंतामणराव अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्राची काही पाने वाचून दाखविली. ती ऐकत असता मला झोप येऊ लागली आणि तिलाही झोपेने घेरले. मी केव्हा झोपी गेलो कळले नाही.

रात्री जाग आली तेव्हा हात पुढे करून चाचपडत पत्नी जवळ झोपली आहे की नाही याची खात्री करून घेतली. ती जवळच झोपली आहे हे पाहून मनाला समाधान वाटले. मनात सहज विचार आला की, आपल्या आयुष्यात किती तरी व्यक्ती आल्या आणि गेल्या. 'कहाँ गये वो लोग?' चित्रपटातील चित्रणाप्रमाणे त्या आता नाहीशा झाल्या आहेत. आयुष्याच्या प्रदीर्घ प्रवासात वरील माणसांनी कोणी दोन पावले तर कोणी चार पावले माझी सोबत केली, आणि नंतर ती मला सोडून गेली. पण गेली अठ्ठावन्न वर्षे एक माणूस माझी सोबत करीत आहे. पावलाबरोबर पावले टाकीत चालते

आहे. माझ्या सुखदु:खात, प्रवासात, संशोधनात, लेखनात आपला भाग हिरीरीने उचलीत आहे. संसार उत्कृष्टपणे चालवीत आहे. मला काही पाहावे लागत नाही. आता तर ती माझे डोळे म्हणूनही काम करीत आहे. आता एकच इच्छा राहिली आहे. ती एवढीच की,

आज तू डोळ्यांत माझ्या मिसळुनी डोळे पाहा
तू अशी जवळी राहा

माझे आणखी काही मागणे नाही.

❈ ❈

# कर्नाटकात भेटलेली शामा

विष्णुभक्तीचा प्रसार महाराष्ट्रात झाल्यावर तेथे विठ्ठलाची उपासना वाढली. ही उपासना तिरुपतीहून निघून कर्नाटकाच्या द्वारे महाराष्ट्रात आलेली दिसते. नाही तर व्यंकटेश-पुराणाची मोठी छाया पांडुरंगमाहात्म्यावर पडलेली आपल्याला दिसली नसती.

संशोधनाचा हा टप्पा दृष्टिपथात येऊ लागला त्या ऐन वेळी माझ्या डोळ्यांनी मला दगा दिला. ऑगस्ट १९८२ मध्ये मधुमेहामुळे एक डोळा एकाएकी निकामी बनला. दुसऱ्या डोळ्याचे ऑपरेशन करून आणि नंतर लेसर किरणांचे उपचार करून रक्षण झाले खरे, पण दृष्टी हळूहळू अधू होऊ लागली. हाताने लेखन बंद पडले व वाचनही वाढत्या प्रमाणात अडचणीचे होऊ लागले. मी त्या वेळी बंगलोरला मुलीकडे गेलो होतो. कन्नड पुस्तके माझ्या टेबलावर. अडचण वाचनाची. त्यातून मार्ग कसा काढावा याचा मी विचार करीत असता कर्नाटकात चिक्मंगलूर जिल्ह्यात असलेली माझी मुलगी मला म्हणाली, "बाबा, माझ्या घरी काम करणारी सीतम्मा ही तुम्ही पाहिलीच आहे, तिची मुलगी शामला कॉलेजात बी. ए. च्या प्रथम वर्षात आहे. तिने कन्नड साहित्य हाच विषय घेतला आहे. उन्हाळ्याची सुट्टी सुरू आहे. आपल्या कॉफीच्या मळ्यात मी तिला बोलावून घेते, कन्नड पुस्तके तुम्ही तिच्याकडून वाचून घ्या आणि ताईला (माझी पत्नी) लेख सांगून तिच्याकडून लिहून घेत जा." यामुळे माझी मोठी सोय झाली. दुसऱ्या दिवसापासून शामला आमच्याकडे येऊ लागली.

शामलाची हकीकत ऐकून मला मोठा विस्मय वाटला. तिचे गाव आमच्या जावयांच्या मळ्यापासून पंधरा मैलांवर आहे आणि जिल्ह्याचे ठिकाण चिक्मंगलूर येथून २५ मैलांवर आहे. मंगलोरहून बंगलोरला येणारी बस तिच्या गावावरून येई. सकाळी आठ वाजता ती रोज बसने चोवीस मैलांचा प्रवास करून कॉलेजला जाई आणि संध्याकाळी परत येई. घरची स्थिती गरिबीची असावी म्हणूनच तर तिची आई, मावशी आणि मावसबहिणी या मळ्यात काम करीत होत्या. शामलाचे वडील परागंदा झाले होते असे कळले. काका घरची व्यवस्था पाहत होता. त्यांची थोडीशी शेती आणि ताडीमाडीचा व्यवसाय होता. यावरून हे कुटुंब मागासवर्गीय समाजापैकी असावे आणि हा समाज बहुधा कलालांचा असावा अशी कल्पना आली.

शामलाच्या मावसबहिणी ह्या जवळजवळ निरक्षर, लग्ने करून मोकळ्या झालेल्या. एक मावस बहीण बिनलग्नाची राहिलेली. शामलाची आई माझ्या मुलीच्या घरचे सगळे काम अगदी बाजारहाटापासून पाहून घेई. अशा परिस्थितीत आपण शिक्षण घेऊन पुढे सरकावे ही जिद्द बाळगून शामला पुढे सरकत होती. ''लग्न करून मोकळी हो,'' असा तिच्या आईचा सारखा आग्रह, पण तिने भीक घातली नाही. ती आमच्याकडे येऊ लागली तेव्हा तिचे बी. ए. चे प्रथम वर्ष चालू होते. तिचा कन्नड साहित्याचा (विशेषत: व्याकरणाचा) अभ्यास चांगला होता. ती स्वत: हळूहळू कविता करू लागली होती, पण क्रमिक पुस्तकांच्या पलीकडे ती सरकली नव्हती. संस्कृती, धर्म, इतिहास, भूगोल इत्यादींचे तिचे अज्ञान स्तिमित करणारे होते. मात्र तिचे उच्चार स्पष्ट, वाचन चांगले आणि खणखणीत असे होते.

तिच्या या रोजच्या वाचनामुळे पुढील तीन-चार वर्षांत माझ्या हातून कर्नाटकासंबंधी वीस-पंचवीस लेखांचे संशोधनकार्य होऊ शकले. आम्ही मळ्यावरून बंगलोरला आलो की ती आमच्याबरोबर येई आणि उन्हाळ्याची सुट्टी संपेपर्यंत आमच्यापाशी राही. तिच्या वाचनामुळे मला मोठा लाभ झाला, आणि संशोधनाचे नवीन टप्पे नजरेसमोर येऊ लागले. शामलामुळे जुने कन्नड आणि आधुनिक कन्नड यांतील फरक माझ्या ध्यानात येऊ लागला. आपल्याकडे महानुभाव वाङ्मय किंवा ज्ञानेश्वरी यांची भाषा दुर्बोध असली, थोडी जुनी असली तरी ती समजण्यास आधुनिक महाराष्ट्रातही विशेष अडचण पडत नाही. कन्नडचे तसे नाही. प्राचीन कन्नडला हळेगन्नड म्हणतात. मध्ययुगीन कन्नडला नडगन्नड म्हणतात. ही दोन्ही अलीकडील वाचकांस दुर्बोध वाटतात. म्हणून कर्नाटकाचे शासन, विद्यापीठे आणि साहित्य परिषद यांनी एकत्र येऊन विद्वानांकडून जुन्या कन्नडमधील महत्त्वाच्या ग्रंथांचे आधुनिकीकरण केले. शेक्सपीयरची नाटकेसुद्धा आधुनिक करून विद्यापीठातून शिकविली जातात त्याप्रमाणे कन्नडमधील अशी साठ पुस्तके निवडली गेली आहेत आणि त्यांपैकी वीस प्रकाशित झाली आहेत. त्यांत पंपाचे महाभारत, रन्न, जन्न, चौंडरस इत्यादींच्या ग्रंथांचा समावेश आहे.

यांपैकी चौंडरसाच्या दशकुमार चरिताचे रूपांतर शामलाने माझ्यासाठी समग्र वाचून काढले. वैष्णवस्वामींपैकी वादिराज, श्रीपाद, व्यासतीर्थ, सत्यकथा इत्यादी ग्रंथही तिने वाचले. श्री. शास्त्री यांनी शृंगेरीचा संपूर्ण इतिहास लिहिला आहे तोही तिने वाचला. हे ग्रंथ वाचत असताना शामलाचे व्यक्तित्वही विकसित होऊ लागले.

ती आता पहिल्याप्रमाणे क्रमिक पुस्तकांना चिकटून राहणारी बुजरी, इतिहास आणि भूगोलाच्या अज्ञानामुळे पदोपदी अडखळणारी मुलगी राहिली नव्हती. वाचनाच्या संदर्भात तिला माहिती पुरविण्यासाठी मीही हौसेने तिला अनेक गोष्टी सांगत असे.

त्यामुळे तिचेही कुतूहल जागृत झाले. पुढील तीन-चार वर्षांत ती उडपी (मध्वाचार्यांचे श्रीकृष्ण मंदिर), शृंगेरीचे सुप्रसिद्ध क्षेत्र मंत्रालय (राघवेंद्रस्वामी या वैष्णव संताची समाधी), मेलकोट (रामानुजांनी पूजिलेली विष्णू आणि नरसिंह मंदिरे), बेलूर (होयसळकालीन चन्नकेशवाचे मंदिर) इत्यादी स्थळे पाहत आली. या स्थळांचे महत्त्व, तेथील शिल्पकला, मठांतील परंपरा इत्यादीसंबंधी माझ्याशी ती चर्चा करू लागली. उत्तर कर्नाटक योगी आणि संत महितस्वामी कायवटे यांचे चरित्र तिने वाचून काढले. सुप्रसिद्ध हरिदास आणि कवी प्रसन्नाव्यंकट (बागलकोट, अठरावे शतक) यांचेही चरित्र तिने वाचून काढले. ती तिरुपतीला जाऊन आल्यावर तेथील वैष्णव संप्रदायाचा इतिहास, विजयनगरकालीन अवशेष, व्यंकटेशमूर्तीचे शिल्प इत्यादींच्या संबंधाने तिने माझ्याकडून बरीच माहिती गोळा केली.

शामलामध्ये हा दिवसेंदिवस होणारा फरक माझ्या लक्षात येऊ लागला. मलाही तिचे कौतुक वाटू लागले. मागास समाजातील ही पोर ज्ञानसाधनेच्या मार्गाला लागली होती. बंगलोर हे विद्वानांचे आगर. तेथे इतिहास क्षेत्रातील अनेकांशी माझ्या ओळखी होत्या. तेथील माझ्या इंग्रजी आणि कन्नड व्याख्यानांना ती माझ्याबरोबर हजर राहू लागली. कर्नाटक गॅझेटियरचे संपादक डॉ. कामत, संत वाङ्मयाचे चिकित्सक आणि ऐतिहासिक कादंबरीकार आद्य रामाचार्य, भारतीय गॅझेटियर समितीचे माजी सदस्य व इतिहास-संशोधक देशिकाचारी, लिंगण कवीच्या केळदी नृपविजयम् या ग्रंथाचे संपादक व इतिहास-संशोधक श्री. गुंडाजोइस इत्यादींशी मी ''ही माझ्यासाठी पुस्तके वाचून दाखविणारी रीडर'' असा तिचा परिचय करून दिला. देशिकाचारी मला म्हणाले, ''हिला तुमची सेक्रेटरीच करून घ्या ना!'' हे त्यांचे वाक्य ऐकून ती हरखून गेली.

बंगलोरच्या मुक्कामात अनेक इंग्रजी व कन्नड ऐतिहासिक ग्रंथ मी तिच्याकडून वाचून घेतले. लिंगण कवीचे 'केळदी नृपविजयम्' (१९७३), गोविंद वैद्य यांचे 'कंठीरव नरसराज चरित्र' (१६४८), तिरुमल्ल आर्य (१७०४) याच्या अप्रतिम वीर चरित्रावरील प्राध्यापक बसवराज यांचा टीकाग्रंथ, हयवदनरावकृत 'मैसूरचा इतिहास' (इंग्रजी) आणि शामरावकृत 'आधुनिक मैसूर' (१८०० ते १९४०) हे ग्रंथ तिने वाचले.

ज्ञानाच्या या कक्षा तिच्या आटोक्यात येऊ लागल्या तशी तिची वृत्ती बदलू लागली. तिच्या वृत्तीत निर्धार दिसू लागला. तिची आई सीतम्मा तिला लग्न करून मोकळी होण्यास सांगत होती. तेव्हा प्रथम ती गप्प बसे, पण आता तिच्या नकारात निश्चय दिसून येऊ लागला. मी तिच्या आईला म्हटले, ''सीतम्मा, तिला एम. ए. होऊ दे, डॉक्टरेट मिळवू दे, उद्या तीच २००० रुपये कमावून तुमच्या ओटीत घालत जाईल तेव्हा तुम्हांला तिची किंमत कळेल.''

माझ्या पत्नीने शामलाला सांगितले, ''तू सरळ एम.ए. ला प्रवेश मिळव. तुला काय खर्च लागेल, कमी पडेल तो आम्ही देऊ.'' माझ्या मुलीनेसुद्धा तिला हेच सांगितले. एक दिवस रात्री दूरदर्शनवर बंगलोरच्या काही महिला साहित्यिकांचा परिसंवाद होता. तोही तिने एकाग्रतेने ऐकला. आज कर्नाटकाच्या स्त्री-लेखिकांत कमला हंपणवर, शांता इचनूर, नवरत्ना राव ह्यांची नावे गाजत आहेत. उद्याच्या जगात येणाऱ्या साहित्यिकांत शामला आल्याशिवाय राहणार नाही हे तिच्या निर्धारावरून मला जाणवले.

❁ ❁

# अये लेखनिके!

आज बारा ऑगस्ट १९९०. उद्या गोकुळाष्टमी. शके १८३२. साधारण संवत्सराची गोकुळाष्टमी हा माझा जन्मदिवस. इंग्रजी तारीख २७ ऑगस्ट १९१०. पुढील ब्याऐंशी वर्षांचा माझ्या आयुष्याचा काळ अनेक भल्या-बुऱ्या प्रसंगांनी, विविध अनुभवांनी आणि अखंड भ्रमणाने भरून गेला. शिक्षण अन् शासनातील नोकऱ्या या गोष्टी क्रमप्राप्तच होत्या, पण जिद्द आणि छंद म्हणून मी वाचन आणि लेखन यांचा जन्मभर व्यासंग केला. लेखनाचे विविध विषय हाताळले. लघुकथा, ललित लेख, परीक्षणे, फारसी, उर्दू ग्रंथांचे अनुवाद, साहित्यिकांचे परिचय, आदिवासी समाज व भाषा यांचा अभ्यास, इतिहास-संशोधन असे काही ना काही लेखन सतत चालू होते. या काळात माझी पन्नास पुस्तके बाहेर पडली. हे सगळे लेखन मी स्वत: हाताने लिहून काढले.

हे असेच चालू राहील, यात कोणत्याही प्रकारचे विघ्न येणार नाही, या भ्रमात मी होतो. पण काळाचा तडाखा जबर असतो आणि हा आघात कोणत्या प्रकारे होईल याचीही कल्पना नसते. १९८२ मध्ये मला नेत्रविकार जाणवू लागला. मधुमेहाचा विकार तर १९५२ पासून मागे लागला होता. संशोधनाच्या निमित्ताने आणि भाषणांच्या प्रसंगाने माझी भारतभर भ्रमणे चालू होती. काश्मीर ते कन्याकुमारी आणि आसाम ते सौराष्ट्र या भागात मी निदान एक हजार भाषणे पाच भाषांतून केली. या दगदगीचा परिणाम म्हणून डोळे अधू होऊ लागले. १९८२ च्या मे महिन्यात उजवा डोळा त्रास देऊ लागला. डॉक्टरांनी तो कामातून चालला आणि त्याचा इलाज होणे नाही, असे सांगून निदान डावा डोळा वाचवा असा सल्ला दिला. ठाण्याच्या डॉक्टर सौ. नीलाताई परांजपे यांच्या प्रयत्नाने मुंबईतील मोठे नेत्रतज्ज्ञ डॉ. उर्सेकर यांच्याकडून माझ्या डाव्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. ती तारीख होती ६ ऑगस्ट १९८२. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. एक आठवड्याने पुन्हा तपासणीसाठी या, असे मला उर्सेकरांनी सांगितले.

१२ ऑगस्ट १९८२ हा गोकुळाष्टमीचा दिवस. त्या दिवशी मी डॉ. उर्सेकरांकडे जावे अशा विचारात होतो, तेवढ्यात माझ्या प्रकृतीला आणखी एक जबर तडाखा बसला. तो होता सेरेब्रो थ्रॉंबोसिसचा. मेंदूचा विकार. क्लॉट म्हणजे गाठ ही फिरत फिरत मेंदूच्या जवळ जाऊन अडकली होती. भल्या पहाटे मला जाग आली तर दोन गोष्टी

जाणवल्या. उजव्या पायाला अर्धांगवायूचा सौम्य झटका. माझे बोलणे अडखळत येऊ लागले. त्यापुढील चौदा दिवस मला इस्पितळात काढावे लागले. त्यानंतर चालणे फिरणे सुरू झाले. दवाखान्यात दोनदा वाचा बंद पडली होती, तीही बरी झाली. मेंदूवर झालेला आघात दूर झाला. पण डॉक्टर म्हणाले, ''तुम्ही बरे झालात, पण यापुढे फारसे फिरणे करू नका. आपली शक्ती ओळखून वागा.''

२६ ऑगस्ट १९८२ रोजी माझे लेखन बंद पडले. डाव्या डोळ्याने वाचन करणे मात्र शक्य होते. एके काळी मी शेकडो भाषणे केली, पण तो आत्मविश्वास शिल्लक राहिला नव्हता. भाषणांची आमंत्रणे यायची, ती मी प्रकृतीची सबब सांगून टाळू लागलो. मन मात्र खिन्न झाले होते. आपण आता अपंग बनलो, आपल्याकडून यापुढे भाषणे देण्याचे काम जमणार नाही याची मला खंत वाटू लागली.

माझ्या अशा घसरलेल्या परिस्थितीतून मला माझ्या पत्नीने वर ओढले. ती सांगू लागली, ''तुम्ही चार शब्द बोलून तरी पाहा! आपण किती वेळ बोलू शकतो – आपली स्मरणशक्ती किती चालू शकते याची तुम्हांला कल्पना तरी येईल. सुरुवातीला श्रोत्यांच्या समोर दीर्घकाल गंभीर विषयावर भाषण देणे जमले नाही तरी शाळेतील विद्यार्थ्यांसमोर किंवा लहान लहान सभागृहांतून बोलून पाहावे.'' अशा स्थितीत २ ऑक्टोबर रोजी एका शाळेत मी महात्मा गांधींवर बोललो. ते भाषण पंचेचाळीस मिनिटे चालले. त्या दिवसापासून मला हरवलेला आत्मविश्वास परत मिळाला. त्यानंतर गेल्या दहा वर्षांत देशभर जवळजवळ दोनशे भाषणे मला देता आली.

लेखनासंबंधीही असेच झाले. लिहिणे बंद पडले होते. आयुष्यभर मी लेखन करीत आलो, ते बंद म्हणजे निष्क्रिय आणि मरणप्राय जीवन. कुणी लेखनिक अगर लेखनिका मिळाली तर ही उणीव भरून येण्यासारखी होती.

माझी ही कुचंबणा माझ्या पत्नीच्या लक्षात आली. ती दूर करण्यासाठी ती उपाय शोधू लागली. तिने भजन, कीर्तन, पठण इत्यादींसाठी महिला मंडळे, चिन्मयानंद मिशन, अंधेरीचा उमानंद आश्रम इत्यादींतून भाग घेण्यास सुरुवात केली. तिने अनेक मैत्रिणी जमविल्या. त्यांतूनच एखादी मैत्रीण लेखनिका म्हणून मला साहाय्य करू शकेल काय, याचा तिने शोध घेतला. सुदैवाने या कामात तिला यश आले आणि मला आयुष्यात प्रथमच लेखनिकेच्या द्वारे आपले लेख लिहून काढण्याची संधी मिळाली. पुढील दोन-तीन वर्षांत माझ्या हातून शंभर लेख 'लिहिले' गेले, ते या लेखनिकेमुळे.

त्यामुळे समर्थ आणि त्यांचा संप्रदाय अशांसारखी पुस्तके बाहेर पडली. महाराष्ट्रातील नियतकालिकांतून माझ्या लेखांना सतत प्रसिद्धी मिळत गेली. माझे स्वतःच्या हाताने लिहिणे बंद पडले आहे हे कुणाच्याही लक्षात आले नाही. हे सगळे

काम लेखनिकेमुळे झाले. या निमित्ताने माझ्या आयुष्यात एका नवीन साहाय्यकाचा प्रवेश झाला. ती व्यक्ती म्हणजे सौ. प्रभाताई आपटे. माझ्या आयुष्यात त्र्याहत्तराव्या वर्षी ध्यानी-मनी नसता मला लाभलेला हा एक सत्संगाचा योग होता.

सौ. प्रभाताई आपटे ह्यांचे माहेर बडोद्याचे. त्यांचे वडील श्री. गोखले ह्यांचा चित्रपटसृष्टीच्या तांत्रिक विभागाशी संबंध आलेला होता. प्रभाताईंचे पूर्वायुष्य (जन्म १९२६) गुजराथेत गेले असल्यामुळे त्या मराठीइतकीच गुजराथीतूनही सफाईदारपणे भाषणे देऊ शकतात. प्रभाताई या मुंबईच्या रुइया कॉलेजमधून पदवीधर झाल्या (१९४३). इन्कमटॅक्स खात्यात त्या नोकरीला होत्या. योगायोगाने विजापूरच्या आपटे घराण्यातील एका कर्तबगार तरुणाशी त्यांचा परिचय झाला. त्या वेळी आपटे हे कारखान्यात तंत्रज्ञ म्हणून काम करीत. परिचयाचे रूपांतर लवकरच विवाहात झाले, आणि आपटे कुटुंब सुखाने नांदू लागले. अनेक वर्षे नोकरी केल्यावर प्रभाताईंनी ती सोडून दिली, आणि त्या मुंबईच्या मुलुंड उपनगरात स्थायिक झाल्या. त्यांच्या आयुष्यात दुःखाचे प्रसंग आले नाहीत असे नाही. परमेश्वराने त्यांच्या बाबतीत अपत्यसुख ठेवलेले नव्हते. त्यामुळे पुतण्याला जवळ करून त्याच्या संसाराशी हे आपटे कुटुंब समरस झाले आहे.

अशा या प्रभाताईंनी माझ्या लेखनिकेच्या कामाची जबाबदारी उचलली. त्यांचा व्यासंगी पण शांत स्वभाव हा मला पहिल्याच दिवसापासून जाणवू लागला. कोणत्याही विषयावरचा लेख असो, न कंटाळता त्या मान खाली घालून लिहीत. अमका विषय आवडता आणि अमका विषय नावडता असे त्यांच्या बाबतीत घडले नाही. लेखनकामात अधूनमधून विश्रांती घेत निरनिराळ्या विषयांवर त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळे. मी दिलेल्या विषयांतील विविधता पाहून त्यांना विस्मय वाटे. ते विषय कधीच त्यांच्या वाचनातून गेले नव्हते. उर्दू साहित्यिक अख़्तर हुसेन याचे आत्मचरित्र, काश्मीरच्या शेख अब्दुल्लांचे जीवन, कर्नाटकातील महिपती, रुक्मांगद, भास्करराय, राघवेंद्रस्वामी, शिवरामस्वामी, केशवस्वामी भागानगरकर, कर्नाटकातील वैष्णव मठाचे स्वामी ही नावे त्यांनी ऐकलीसुद्धा नव्हती. मराठ्यांच्या इतिहासाचा त्यांचा परिचयही अगदी जुजबी होता. त्यांचा प्रवासही गुजराथ आणि महाराष्ट्र या राज्यांच्या बाहेर तसा कमीच झाला होता. त्यामुळे माझे श्रीशैलम्, कुरुक्षेत्र, प्रयाग, ग्वाल्हेर इत्यादी स्थळांचे वर्णनपर लेख त्यांना नवीन वाटले.

पण कोणताही लेख असो, त्यांनी हौसेने लिहून काढला. या लेखनामुळे प्रभाताईंच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारत गेल्या. त्यांच्यात होत असलेला हा बदल माझ्याही लक्षात येऊ लागला. त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा करताना त्यांना वाटू लागलेल्या कुतूहलाचे मला कौतुक वाटू लागले. मला बोलण्याची जितकी हौस

तितकीच त्यांना. त्या वृत्तीने आध्यात्मिक आहेत. त्या वाङ्मयाचा त्यांना बराच परिचय आहे. मला अध्यात्मात विशेष आस्था नाही. मध्ययुगीन भारतातील द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, सगुण, निर्गुण, आत्मा, परमात्मा, इत्यादींसंबंधीचे अफाट वाङ्मय पाहून मी स्तिमित होतो.

माझा कल आहे भारतीय संस्कृतीच्या उत्क्रांतीवरील वाङ्मयातून ऐतिहासिक धागेदोरे काही सापडतात का, हे पाहण्याकडे. प्रभाताईंच्या आणि माझ्या प्रवृत्तीतील एक समान धागा मला गवसला तो म्हणजे कृष्णभक्तीचा. प्रभाताईंना भाषणे देण्याची मोठी हौस. माझीही तीच आवड. त्यातल्या त्यात कथा सांगण्याकडे त्यांचा अधिक ओढा. आध्यात्मिक विवेचनाकडे कमी. भागवतातील श्रीकृष्णचरित्रवर्णनावर त्यांची भाषणे सात सात दिवस चालतात. या भागवत सप्ताहात त्या रसाळ वाणीने श्रीकृष्ण-चरित्र अथपासून इतीपर्यंत सांगतात.

प्रभाताईंचे हे भाषणसप्ताह लोकप्रिय झाले आहेत. मुंबईच्या बाहेरही हैदराबाद, बडोदे इत्यादी ठिकाणी त्यांची श्रीकृष्णचरित्रावर प्रवचने झाली आहेत. तुम्ही भागवताकडे का वळलात असे मी त्यांना विचारले, तेव्हा त्या म्हणाल्या, ''गुजराथेत डोंगरे महाराज यांचे भागवत ऐकण्याचे अनेक योग आले. त्यामुळे महिलांच्यात आपणही कृष्णकथा सांगावी असे मला वाटू लागले. अध्यात्मापेक्षा कथा-श्रवणाकडे श्रोत्यांचा ओढा अधिक असतो हे माझ्या ध्यानात आले. ही गोष्ट माझ्याही पथ्यावर पडली. अध्यात्माची मला आवड नाही असे नाही. वासुदेवानंद (टेंबेस्वामी) यांचे चरित्र आणि वाङ्मय अभ्यासण्याचा मला योग आला. नर्मदेकाठी गरुडेश्वर येथे असलेल्या वासुदेवानंदांच्या विश्रामधामाचे मी अनेक वेळा दर्शन घेतले आहे. स्वरूपानंद आणि सत्यदेवानंद यांना मी गुरुस्थानी समजते. गुरुभक्तीचा काय महिमा असतो यावर गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी अनेक वेळा बोलले आहे. खरा गुरू सापडणे हे मुमुक्षूच्या दैवातच असले पाहिजे, नाही तर कठीण. अहंभावी गुरू काही कमी आढळत नाहीत. या बाबतीत मी सुदैवी आहे. पण श्रीकृष्णाच्या कथा, साधुसंतांच्या जीवनातील अलौकिक चमत्कार हे मला मुग्ध करून सोडतात. म्हणून भागवत, महाभारत, रामायण इत्यादी पुराणातील कथा व भारतातील शेकडो संतांची जीवने यांचा अभ्यास हा माझा आवडता छंद आहे.''

हे ऐकून भारतीय संस्कृतीच्या माझ्या अभ्यासात मला एक नवीन दालन सापडले. प्रभाताईंना अशा अलौकिक गोष्टींची आवड आहे हे पाहून अभावितपणे माझ्या वाचनात आलेल्या अशा गोष्टी मी आवर्जून टिपून ठेवू लागलो. प्रभाताईंना देव-देवता, विविध संप्रदायांचे महात्मे व साधुपुरुष, फार काय, परधर्मातील साधुपुरुषही वर्ज्य नव्हते. मी गोष्टी सांगाव्या आणि त्यांनी टिपून ठेवाव्या व आपल्या भाषणात त्यांचा

उल्लेख वा वापर करावा असे घडू लागले. म्हणजे त्यांचा मला तसा माझाही त्यांना उपयोग होऊ लागला.

अर्थात माझा दृष्टिकोन आपल्या संस्कृतीच्या मूल्यांचा शोध घेण्याचा होता. उदाहरणार्थ : गुरुचरित्रातील नायक नरसिंह सरस्वती यांचे अलौकिक चमत्कार प्रभाताईंना भुरळ पाडीत, तर शिवकालापूर्वीच्या महाराष्ट्रातील "कळिकाळाचे ज्यासी नाही भय त्यासी यवन काय होय ?" अशी गर्जना करणारा संघटक नरसिंह सरस्वती मला मुग्ध करून सोडतो. कर्नाटकातील वैष्णव स्वामींची भ्रमणे मला भारताचे दर्शन घडवितात, तर प्रभाताईंना त्यांनी दाखविलेले अलौकिक चमत्कार प्रभावित करतात. कृष्णदयार्णवाच्या हरिवरदातील ऐतिहासिक उल्लेख मी शोधीत बसतो. कृष्णदयार्णवांनी श्रीकृष्ण-कालयवन संघर्षाच्या रूपाने शिवाजी महाराज आणि सिद्दी जौहर यांच्यातील संघर्ष दाखविला आहे. त्यांनी वर्णन केलेल्या वीरांच्या शिबिरांचा उल्लेख पाहताना मला मोगल-मराठा संघर्षातील उभय पक्षांच्या शिबिरांची आणि लष्करी हालचालींची कल्पना येते. श्रीकृष्ण आणि कालयवन यांच्या संघर्षातील शरण आलेले शत्रुसैनिक दीन दीन म्हणतात यातून नवीनच शोध माझ्या मनाला स्पर्श करून जातो.

ही झाली माझी वृत्ती. पण प्रभाताई रमतात श्रीकृष्णाच्या गोकुळात. वृंदावनाच्या कदंब वृक्षांत, गोपबालकांच्या मेळाव्यात, गोपींच्या दही-दूध-लोणी इत्यादींच्या नित्यक्रमात आणि रासक्रीडेत. भक्तीच्या बळावर गोपी तरून गेल्या अशी सर्वांची श्रद्धा आहे. पण या भक्तियोगातून जीवन सार्थकी लावणे आणि आशययुक्त करणे हेही काही कमी महत्त्वाचे काम नाही. प्रभाताईंच्या सहवासामुळे माझे लिखाणाचे स्वरूप नवीन मूल्ये शोधणारे ठरले. समर्थ आणि समर्थ संप्रदाय, कर्नाटकाची संस्कृती, कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यातील समान धागे, साधू, संन्यासी, मठपती, पंडित इत्यादींच्या अनुभवांतून सांस्कृतिक इतिहास शोधणे ही एक नवीनच प्रवृत्ती वाढू लागली. हा योगायोगच किंवा प्रभाताईंच्या शब्दांत चमत्कार म्हणावा लागेल.

तीन वर्षांनंतर प्रभाताईंच्या घरात नातीचा (पुतण्याच्या मुलीचा) जन्म झाला आणि त्यांचे येणे-जाणे कमी झाले. मला नव्या लेखनिकेची नेमणूक करावी लागली. अजूनही त्यांची अधून-मधून गाठ पडते. त्या वेळी मी आठवून आठवून त्यांना नवीन नवीन गोष्टी आणि कथा सांगतो. "माझ्या भाषणात मी त्या कथांचा उपयोग करते," असे त्याही मला आवर्जून सांगतात. मला मात्र वाटते, भागवत धर्म जगणाऱ्या या लेखनिकेने जितके माझ्याकडून मिळविले, त्याहूनही अधिक मला दिले आहे.

❈ ❈

# प्रात:संध्या

प्रभाताई आपटे यांच्यानंतर आता माझे काम पाहण्यासाठी कुणाला लेखनिका म्हणून नेमावे हा मोठा प्रश्न मला पडला. माझ्याप्रमाणेच अनेक वयोवृद्ध साहित्यिकांनाही हा प्रश्न भेडसावीत असतो. या कामासाठी लेखनिक वा लेखनिका पुढे येत नाहीत, आणि येतात त्यांच्यातील बहुतेकांपाशी साहित्यिकांचे काम करण्यासाठी लागणारी क्षमता आणि अभ्यासू वृत्ती ही असतातच असे नाही. या दृष्टीने काहींनी हा एक व्यवसाय म्हणून स्वीकारायला काही हरकत नसावी. त्यासाठी इंग्रजीचे चांगले ज्ञान हवे. मराठी शुद्धलेखन-वाचनाचा सराव हवा आणि साहित्यिकाला हव्या असलेल्या विषयांची ओझरती ओळख किंवा ही ओळख करून घेण्याची तयारी तरी हवी. लेखनिकेच्या वेळा, तिच्या घरातील अडचणी, तिच्या कामाला लागणारे टंकलेखन, लघुलेखन, सुवाच्य अक्षर आणि सहनशीलता ही सगळी पाहता चांगले मानधन देऊनही लेखनिक मिळत नाहीत, आणि मिळाले तरी टिकत नाहीत, हा अनेक साहित्यिकांचा अनुभव आहे.

मला तर या गोष्टीचा खडतरच अनुभव आला. लेखनिक किंवा लेखनिका तर हवी, नाही तर सारेच काम अडून बसणार. त्यामुळे कसे का असेना, काम चालू ठेवणे मला आवश्यक होते. योगायोगाने नवी लेखनिका मला एका आठवड्यातच मिळाली.

या मुलीचे नाव संध्या करमरकर. तिचे माहेर पिटकरांकडचे. तिचे आजोबा हे रेल्वे खात्यात असत. त्या व्यवसायात त्यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांना मदत करणे, वरिष्ठांकडे त्यांची गाऱ्हाणी मांडणे, त्यांच्यात जागृती निर्माण करणे अशा चळवळी केल्या. मुंबईतील नामांकित मजूर पुढाऱ्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. मुलुंडमध्ये तर ते आपल्या निरलस समाजसेवेमुळे खूपच लोकप्रिय झाले होते. त्यांच्या मुलांपैकी एकाने चांगली नोकरी करून आपली परिस्थिती चांगली केली. पण तरीही संध्याच्या वडलांना एक साधी नोकरी पत्करणे भाग पडले. त्यातच त्यांचा अकाली मृत्यू झाला. त्यांच्या मागे दोन मुलगे आणि दोन मुली असा परिवार होता. घराण्याची आर्थिक स्थिती खालावली होती.

अशा परिस्थितीत संध्याच्या आईने मोठ्या हिंमतीने संसाराचा गाडा चालवला होता. दूध केंद्रात तिने नोकरी पत्करली. संध्याचे शिक्षण एका समाजकार्य संस्थेच्या

शाळेत झाले. शाळेच्या वसतिगृहात तिला अतिशय काटकसरीने दिवस काढावे लागले. मॅट्रिक झाल्यानंतर तिने हिंमतीने आपले पुढील शिक्षण चालू ठेवले. मुलुंडच्या वाणिज्य महाविद्यालयातून ती पदवीधर झाली. लग्नानंतर काही कारणाने तिला आपल्या लहान मुलाला घेऊन आईकडे यावे लागले, आणि पोटापाण्यासाठी व्यवसाय म्हणून मुलुंडच्या शाळेत नोकरी पत्करावी लागली. वेतन अपुरे, त्यामुळे ती आणखी काही कामे करण्याच्या विचारात होती. ती पदवीधर आहे, तिची मला मदत होईल या विचाराने लेखनिका म्हणून मी तिला नियुक्त केले.

अलीकडे शिक्षणाची पातळी बरीच घसरलेली दिसते. पदवीधर झालेले मुलगे आणि मुली ही इंग्रजी भाषण आणि लेखन यांत अगदीच कच्ची असतात. साधे पत्र लिहायचे त्यांना जमत नाही. भोवतालच्या वातावरणात इंग्रजीतून बोलणारी माणसे फार कमी भेटतात. त्यातही अधूनमधून कानांवर पडते ती कामचलाऊ, चालचलाऊ इंग्रजी. त्यातही बिगरइंग्रजी शब्द वापरले जातात. त्यात कोणताही धरबंद नसतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. ''ही इज फालतू,'' ''ही इज चालू मॅन,'' ''डोन्ट फुगाव मी,'' ''माय हेड इज ईटिंग सर्कल,'' (डोके चक्कर खाते!) अशी काही उदाहरणे देता येतील. त्यातच अलीकडच्या उच्चभ्रू जीवनात अमेरिकन पद्धतीची भर पडली आहे. डॅडी, मम्मी, बेबी, आँटी, बाय बाय, अंकल, हाय, हॅलो असे उपरे शब्द तोंडात बसले आहेत. क्रमिक पुस्तकांच्या पलीकडे वाचन नाही आणि संभाव्य उत्तरे तोंडपाठ करून परीक्षेतील प्रश्न सोडवण्याची जडलेली सवय. अशी अतिशय निराशाजनक परिस्थिती सर्वत्र दिसून येते. इंग्रजीच्या बाबतीत ही अशी परिस्थिती. पण मराठी भाषण, लेखन-वाचन या बाबतीतही इंग्रजीहून ती फार वेगळी आहे असे म्हणण्याची सोय नाही.

सांगायचा मुद्दा असा की, संध्याची शिक्षणातील कमाई यापेक्षा अधिक नव्हती. माझ्याशी इंग्रजीतून बोलून भाषणाची सवय वाढवावी ही गोष्ट ती शेवटपर्यंत टाळत गेली. क्रमिक पुस्तकांच्या बाहेर तिचे इंग्रजीचे वाचन जवळजवळ शून्य होते. शाळेत तिच्या शिक्षणाकडे शिक्षकांनी लक्ष दिल्यामुळे तिचे मराठीतील शुद्धलेखन मात्र चांगले झाले होते. काव्य या विषयाचा तिचा अभ्यास बरा होता. काव्याचे व्याकरण, वृत्ते, अलंकार, उपमा, लघु, गुरु, यति इत्यादींचा तिला बऱ्यापैकी परिचय होता. मराठीतील तिचे वाचन दहा-पाच पुस्तकांच्या बाहेर असावे असे वाटत नाही. घरच्या परिस्थितीमुळे तिला नाटकासारखे करमणुकीचे प्रकारही अनुभवण्यास मिळाले नव्हते. शाळा-कॉलेजमधील कार्यक्रम काय असतील ते असोत, पण आयुष्यात आपण एकही नाटक पाहू शकलो नाही, थोडीबहुत पाहिली ती दूरदर्शनवरची नाटके वा मालिका असे ती सांगे. कथा-कादंबऱ्यांचे वाचनही तिच्या हातून विशेष झाले नव्हते.

माझ्याजवळ बसून तिने काम करायला सुरुवात केली. माझ्याकडे रोज येणारे वर्तमानपत्र म्हणजे इंग्रजी 'टाइम्स ऑफ इंडिया'. गेली पस्तीस वर्षे या पत्राचा मी वर्गणीदार आहे. टाइम्स ऑफ इंडियाचे संपादकीय लेख हे वाचनीय तर असतातच, पण त्याहूनही महत्त्वाचे वाटणारे, विविध तज्ज्ञांच्या द्वारे करण्यात आलेले विवेचक-विश्लेषक लेख हे या पत्राचे विशेष मला उपयुक्त वाटतात. जगातील असंख्य विषय या लेखांतून तज्ज्ञांनी हाताळलेले आहेत. त्यांचा अभ्यास मी नेहमी करीत असतो.

संध्याचे पहिले काम म्हणजे मला इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रे वाचून दाखविणे हे होते. तिचे इंग्रजीचे ज्ञान तोटके आणि बेताबाताचे असल्यामुळे ते काम तिच्याकडून करून घेणे मला अवघड होऊ लागले. पण याला उपाय नव्हता. लेखांतून येणारे असंख्य शब्द तिच्या आवाक्याबाहेरचे होते. विषयही तिला समजत नसत. तिचे उच्चारही अशुद्ध असत. पण अशाही परिस्थितीत मी तिच्याकडून इंग्रजी लेख वाचवून घेऊ लागलो. शब्दाशब्दावर ती अडायची आणि अक्षरश: रडकुंडीला यायची. पण मीही जिद्दीला पडलो होतो. ती वाचू लागली की मी तिच्याकडून शब्दांचे उच्चार नीट करवून घेऊ लागलो. त्यांचा अर्थही तिला समजावून देऊ लागलो. माझ्या सांगण्यावरून तिने एका वहीत शब्द, त्यांचे उच्चार आणि अर्थ टिपून घेण्यास सुरुवात केली.

पुढील दीड-दोन वर्षांत तिने आपल्या वहीत टिपून ठेवलेल्या इंग्रजी शब्दांची संख्या हजार-दीड हजारापर्यंत गेली. हळूहळू तिचा वाचनाचा आत्मविश्वास वाढू लागला. त्याबरोबरच सततच्या वाचनामुळे वाचनातील विषयाची माहितीही तिला होऊ लागली. वाचनाच्या निमित्ताने तिला राजकारण, अर्थशास्त्र, भूगोल हे विषयही हळूहळू समजू लागले. 'टाइम्स ऑफ इंडिया'तील तज्ज्ञ लेखकांची नावे ती आता मोकळेपणाने घेऊ लागली. तिच्या तोंडून अनेक लेखकांची नावे बाहेर पडू लागली, तेव्हा मला मोठे कौतुक वाटू लागले. 'टाइम्स ऑफ इंडिया' उघडला की ती म्हणू लागली, ''बाबा, आज मधल्या पानावर गिरिलाल जैन यांचा लेख आला आहे, कोपऱ्यात चंचल सरकारचाही लेख आहे, करंट टॉपिक्स या सदराखाली क्रिकेटचा एक किस्सा आला आहे.'' या सदराच्या शेवटी एक विनोदी चुटका असतो, तोही तिला समजू लागला.

पुढील एक-दोन वर्षांत तिच्या तोंडून गिरिलाल जैन, दिलीप मुखर्जी, शामलाल, चंचल सरकार, अरविंद दास, अब्राहम, इंद्र मल्होत्रा, खन्ना, गोपाळसिंग, सुब्रह्मण्यम शास्त्री, तेलंग ही नावे माझ्या कानांवर पडू लागली. इतकेच नव्हे तर त्यांनी लिहिलेल्या विषयांवर ती माझ्याशी थोडीबहुत चर्चाही करू लागली. जगातील अनेक समस्यांचा तिचा परिचय वाढत होता, आणि आत्मविश्वासही. मला याचा आनंद होऊ लागला. आपल्या डोळ्यांसमोर एक फूल हळूहळू उमलत आहे असे मला वाटू लागले. संध्याचे वाचन सुधारू लागले. अपरिचित, अवघड शब्दांचे उच्चारही करण्याची तिला सवय

झाली. इंग्रजी भाषेतील म्हणी, वाक्संप्रदाय इत्यादींचा मराठीशी सहज मेळ बसेल असे नाही. दोन्ही प्रदेशांतील प्रचलित म्हणी या तेथील इतिहास, भूगोल व समाज यांतून घडलेल्या असतात. तेही समजून घेणे आवश्यक असते. संध्येला हे पदोपदी समजावून द्यावे लागे. 'नाकापेक्षा मोती जड,' 'एकादशीच्या घरी शिवरात्र,' 'व्याह्याने धाडले घोडे,' 'वारू तुफान तर राव नादान,' या मराठी म्हणी, तर 'शिडातील वारा गेला,' 'पायाखालची वाळू सरकली,' 'झोपलेल्या कुत्र्याला झोपलेलाच राहू द्या,' अशा इंग्रजी म्हणी यांतील फरक तिला समजावून द्यावा लागला.

त्यानंतर संध्येचे इंग्रजी वाचन चांगले सुधारू लागले. उच्चारही चांगले झाले. अनेक कठीण शब्दांचे अर्थही तिला कळू लागले, आणि तिचा आत्मविश्वास वाढला. तिचे मराठी लेखन चांगले होते. औरंगजेबाच्या दरबारची दैनंदिन बातमीपत्रे मूळ फारसी भाषेत आहेत, त्यांचा मी मराठीत अनुवाद करीत होतो, त्या वेळी मोगलांची नावे, त्यांच्या हालचाली, त्यांच्या लष्करी छावण्या, मोगल प्रशासनातील रूढ असलेले शब्द हे सारे उतरून घेताना तिची बरीच तारांबळ उडे. मराठीत अनेक फारसी, तुर्की व अरबी या भाषांतील शब्द आले आहेत. बऱ्याच वेळा हे शब्द मुळाहून बदललेले असतात. हे तिला समजावे म्हणून मी तिला तिच्या वहीत मूळ शब्द, मराठी रूपांतर, उच्चार आणि अर्थ हे उतरून घ्यायला लावले. काही दिवसांतच मराठीत असलेल्या या परकीय शब्दांची तिच्या वहीतील नोंद एक हजारापर्यंत पोचली. रूढ असलेले अनेक मराठी शब्द म्हणजे परकीय शब्दांची बदललेली रूपे आहेत, हे तिच्या लक्षात येऊ लागले. फाजील, तकलुबी, बेहत्तर, बेकार, मुत्सद्दी असे शब्द वापरण्यातही संध्या तरबेज झाली. मोगलांची नावे आणि पदव्या लिहून काढणे हे तिला सुरुवातीला अवघड गेले. पण पुढे पुढे तर जुल्फिकारखान, मीर अतिष तरबियत खान, जुम्द-तुल-मुल्क असदखान, अमीरुल-उम्रा, शाइस्तेखान अशी नावे ती सहजपणे घेऊ लागली याचे मलाही कौतुक वाटू लागले.

इतकेच नव्हे तर तिला लेख सांगत असताना मी मध्येच थांबलो की ती आपण होऊन माझे वाक्य पुरे करू लागली. इ. स. १७०३ मध्ये मोगल सरदारांनी चिपळूण घेतले. यावर ती आपण होऊनच म्हणाली, "बाबा, हा सरदार म्हणजे मीर अतिष तरबियत खान ना?" तिची ही तयारी पाहून मला विस्मय वाटला. ओरिसावरील लेखमालेतही तिने जगन्नाथाचे देऊळ कधी (११७५) आणि कुणी (गंगवंशातील अनंतवर्मा) बांधले हे सांगितले. मला आश्चर्य वाटलेले पाहून ती म्हणाली, "मागं तुम्ही सांगितलं होतं ते आठवणीत आहे."

कर्नाटक, तंजावर, हरियाणा, महाराष्ट्र इत्यादी प्रदेशांतील घटनांविषयी ती हळूहळू मोकळेपणाने बोलू लागली. जागतिक राजकारणावरही हळूहळू मते व्यक्त करू लागली.

तिच्या ज्ञानाच्या कक्षा वाढत होत्या, त्याबरोबरच तिचे कुतूहल आणि चौकस वृत्ती हीही वाढीस लागली होती हे मला जाणवू लागले होते. मी तिला मराठीतील प्राचीन आणि अर्वाचीन साहित्यिक आणि त्यांचे साहित्य यांची माहिती देऊ लागलो. कधी कधी जगातील, भारतातील आणि महाराष्ट्रातील अतिश्रेष्ठ व्यक्तींची नावे तिच्याकडून वदवून घेऊ लागलो.

संध्याला काव्याचा बराच नाद होता. तिचा आवाजही बऱ्यापैकी होता. मराठी भावगीतांची तिला बरीच आवड दिसली. तिने आपल्या वहीत अनेक भावगीते उतरून ठेवली होती. मधून मधून ती मला भावगीते म्हणून दाखवी. 'शुक्रतारा मंद वारा चांदणे पाण्यातुनी' हे तिने म्हणून दाखविले, त्या वेळेपासून दूरदर्शनवरील चांगली भावगीते ऐकण्याची माझी प्रवृत्ती बळावली. ही तिच्याकडून झालेली माझी कमाई.

संध्याने न कंटाळता माझ्या कामाचा डोंगर उपसला. पुढील तीन वर्षांत तिने माझे विविध विषयांवरील १०० तरी लेख लिहून काढले असतील. माझे लेखन अद्याप चालू राहिले त्याचे श्रेय तिने चिकाटीने आणि निरलसपणे केलेल्या लेखन-साहाय्याला द्यावे लागेल.

या तीन वर्षांत तिच्यातही मोठा बदल झाला. सुरुवातीस बुजरी दिसणारी, अडखळणारी, इंग्रजीतील अपुऱ्या ज्ञानाची आणि संस्कृती, राजकारण, इतिहास यांबद्दल अत्यंत अपुरी माहिती असलेली संध्या आता फार बदलून गेली होती. अनिल कवींची कविता थोडा फेरबदल करून म्हणायची झाल्यास ''संध्या रंगे नटली अनुपम'' असेच तिच्याबद्दल म्हणता येईल.

१९९० च्या सुरुवातीस तिच्या कुटुंबातील मंडळींनी मुलुंडचे स्वतःचे घर काढून डोंबिवलीत नवीन घर घेतले. त्यामुळे संध्या तिकडे राहायला गेली आणि माझ्याकडचे तिचे काम संपुष्टात आले. तिकडेच ती नोकरीच्या शोधाला लागली.

तिने माझे पुष्कळ काम हलके केले. त्याच्या मोबदल्यात मी तिला जे दिले ते अल्प होते. सहासष्ट वर्षांपूर्वी मी सोळा वर्षांचा असताना काशी येथे संस्कृतचे प्राध्यापक परशुराम नारायण ऊर्फ अण्णासाहेब पाटणकर यांच्याशी माझा संबंध आला. गुरुवर्यांनी मला लहानशी शिदोरी बांधून दिली, ती चारच ओळींची होती : ''प्रसंगी अखंडित वाचीत जावे, दिसामाजी काही तरी ते लिहावे'' आणि ''यत्न तो देव जाणावा; केल्याने होत आहे, आधी केलेचि पाहिजे.'' ही शिदोरी मला जन्मभर पुरली. तिचेच काही घास मी संध्याकडे सरकविले, ती माझ्याकडे तीन वर्षे लेखनकाम करीत असताना आमचे दोघांचे ज्ञानाचे आदान-प्रदान हे अशा प्रकारचे होते. ती रोज सकाळी माझ्याकडे यायची. म्हणूनच ही तीन वर्षे ती माझी प्रातःसंध्या बनली होती.

❋ ❋

# सत्यवती

इ. स. १९६९ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर मी तीन-चार वर्षे इंग्रजीत 'शिवचरित्र' लिहून काढण्याच्या कामात गुंतलो होतो. त्यासाठी मी 'एल्फिन्स्टन' कॉलेजच्या आवारातील शासकीय दफ्तरखान्यात जात असे. ते काम इ. स. १९७२ मध्ये संपले. त्यानंतर मी संशोधनासाठी एशियाटिक सोसायटीमध्ये जाऊ लागलो. तेथेच बसून मी खाफीखान, शहानवाजखान इत्यादींचे फारसी ग्रंथ आणि इतर अनेक इतिहासविषयक साधने वाचून काढली. सकाळी साधारण अकरा-साडेअकराच्या सुमारास सोसायटीत जावे आणि संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तिथे वाचत बसावे, असा माझा उद्योग इ. स. १९७२ ते १९८२ पर्यंत चालला होता.

या काळात मी एके दिवशी ग्रंथ चाळीत असता एक मुलगी माझ्याकडे आली. तिचे नाव सत्यवती. तिने आपली हकीकत सांगितली ती अशी :

सत्यवती ही मूळची आंध्र प्रदेशातील एलूर या गावची राहणारी. तिचे वडील संस्कृतचे मोठे पंडित आणि नावाजलेले ज्योतिषी होते. तिने संस्कृत विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची एम. ए.ची पदवी घेतली. पुढे तिचा विवाह एका इंजिनियरशी झाला. अल्पावधीतच त्याची बदली कलकत्त्याला झाली. तिला आपल्या नवऱ्याबरोबर तिकडे जावे लागले. पण कलकत्त्यास गेल्यावर पुढील शिक्षणाची ओढ तिला स्वस्थ बसू देईना. तिने आपल्या नवऱ्याला सांगितले, "मला मुंबईला जाऊन संस्कृत या विषयात डॉक्टरेट मिळवायची आहे. त्यासाठी मला वर्ष-सहा महिने मुंबईला राहावे लागेल. तेथे महिला वसतिगृहात मी एक खोली घेऊन राहीन." तिच्या नवऱ्याने तिचे म्हणणे मान्य केले आणि सत्यवती मुंबईला आली. मुंबईला ती पूर्वी शिकत होती त्या वेळी भारतीय विद्याभवन संस्थेचे संस्कृतचे गाढे विद्वान डॉ. उपाध्ये हे सत्यवतीला गुरू म्हणून लाभले होते. डॉक्टरेटसाठी प्रबंध तयार करण्याकरिता ती त्यांचाच सल्ला घेण्यासाठी गेली. डॉक्टरेट तर मिळवायची, पण प्रबंध कोणत्या विषयावर लिहावा याबद्दल तिला सल्ला हवा होता. डॉ. उपाध्ये तिला म्हणाले, "अभ्यासासाठी एखादे काव्य निवडा." सत्यवती म्हणाली, "कोणते काव्य?" उपाध्ये म्हणाले, "कालिदास, हर्ष, भारवी इत्यादींच्यावर काम झालेले आहे. सामान्यपणे अपरिचित असा एखादा कवी निवडा." ती म्हणाली, "कोणता कवी? आणि त्याचे काव्य कोणते?" यावर ते म्हणाले,

''तुम्ही सेतुमाधवराव पगडी यांना भेटा.'' त्यांच्याकडून तिने माझा पत्ता मागितला आणि तो घेऊनच मला भेटण्यासाठी ती एशियाटिक सोसायटीत आली होती.

तिने मला सांगितले, ''संस्कृतमध्ये डॉक्टरेट मिळवण्याची माझी इच्छा आहे. पण विषय कोणता निवडावा हे समजत नाही. त्यासाठी तुमचा सल्ला आणि मार्गदर्शन घ्यावे म्हणून माझे गुरू डॉ. उपाध्ये यांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे.'' सत्यवतीचे बोलणे ऐकून मला मोठे आश्चर्य वाटले. फारसी भाषेतील साधनांमध्ये गुंतलेला मी. माझा संस्कृतशी तसा संबंध थोडाच. विद्यार्थिदशेत मी काशी येथे असता माझे गुरू कै. परशुराम नारायण पाटणकर यांनी वर्षभर माझ्याकडून संस्कृतचा कसून अभ्यास करवून घेतला होता. अभ्यास म्हणजे तेवढाच. पण पाटणकरांमुळे मला संस्कृत साहित्याची जी गोडी लागली ती आजतागायत टिकून आहे. कालिदास, भवभूति, जयदेव, माघ इत्यादी कवी आणि नाटककार यांचे ग्रंथ मी वाचून काढले. स्वतः पाटणकर यांनी संस्कृतमध्ये 'वीरधर्मदर्पण' नावाचे नाटक लिहिले होते. ते त्यांनी समग्र माझ्याकडून वाचून घेतले. शिवचरित्रसंशोधनाच्या निमित्ताने मला काही संस्कृत ग्रंथ वाचावे लागले. कवींद्र परमानंदाचे 'शिवभारत', जयराम पिण्डचे याचे 'राधामाधवविलास चम्पू' व 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान', संकर्षण सकळकळे याचे 'शिवकाव्य' असे काही ग्रंथ माझ्या वाचनात आले होते एवढेच.

मी सत्यवतीला म्हटले, ''तू भलतीकडे आलीस. माझा संस्कृतचा अभ्यास फार नाही. काव्यशास्त्र, अलंकार, व्याकरण इत्यादींशी माझा परिचय नाही. मी फार तर एखादे ऐतिहासिक काव्य सुचवू शकेन.''

ती म्हणाली, ''चालेल.''

यावर मी म्हणालो, ''शिवचरित्राच्या निमित्ताने मी कवींद्र परमानंदाच्या 'शिवभारता'चा कसोशीने अभ्यास केला आहे. काव्य म्हणूनही तो ग्रंथ चांगलाच आहे. अद्यापपर्यंत या काव्यावर इंग्रजीत कोणीही प्रबंधच लिहिलेला नाही. तो विषय हातात घेशील तर शिवचरित्राचे एक मोठे साधन भारतातील सर्व सुशिक्षितांना उपयोगी पडेल.''

सत्यवती म्हणाली, ''मी ते काव्य चाळून पाहीन आणि पुन्हा तुमच्याकडे येईन.''

यानंतर दहा-पंधरा दिवसांनी सत्यवती मला भेटण्यास आली. तिचा चेहरा पडला होता. मी तिला म्हटले, ''का ग? प्रबंध लिहिण्याचा विचार टाकून दिलास की काय?'' यावर ती म्हणाली, ''छे छे. डॉक्टरेट मिळविण्याचा मी निर्धारच केला आहे. शिवभारतातील काव्य, अलंकार इत्यादींचे मी परीक्षण करू शकेन. पण महाराष्ट्राचा इतिहास मला विशेष माहीत नाही. परमानंद हा स्थळे आणि व्यक्ती यांच्या नावांचेसुद्धा संस्कृतीकरण करतो. त्यामुळे त्यांची खरी नावे समजत नाहीत. काहींचे संदर्भही

लक्षात येत नाहीत. प्रत्यंडापूर, प्रवर्षणगिरी इत्यादी नावे नकाशात सापडत नाहीत. तुंगारण्य कुठे आहे कळत नाही. व्यक्तींची नावे अशी घोटाळ्यात पाडणारी आहेत. गोकपाट, मल्लसुरी, उजबक, अजबड, घंटक ही काय नावे आहेत? मी तर पार गोंधळून गेले आहे.''

सत्यवतीची अडचण मला जाणवली. इतिहास या विषयाशी तिचा परिचय अगदी बेताचा होता. त्यात तिने सांगितल्याप्रमाणे स्थलनामे आणि व्यक्तिनामे यांचा गोंधळ ही मोठीच अडचण होती. अनभिज्ञ मनुष्य किती गोंधळून जाईल हे सहज समजण्यासारखे आहे. भले भले इतिहाससंशोधकही बुचकळ्यात पडलेले आढळतात. नावाचे संस्कृतीकरण करण्याचा पंडित कवींचा हव्यास विलक्षणच आहे. मल्लसुरी म्हणजे मालुसरे, गोकपाट म्हणजे गायकवाड, अभिराम मलिक म्हणजे मलिक इब्राहिम, उजबक म्हणजे उजवे तुर्क, अजबड म्हणजे शेळ्यामेंढरांत ज्याचे बळ आहे असा म्हणजे धनगर, कंटक म्हणजे काटे, घंटक म्हणजे घाटगे अशी किती तरी उदाहरणे देता येतील. प्रवर्षणगिरी म्हणजे पन्हाळा, प्रत्यंडापूर म्हणजे परींडा, अशी उदाहरणेही थोडीथोडकी नाहीत.

अशा प्रकारामुळे संशोधक बुचकळ्यात पडले तर नवल नाही. त्यातून मोठे विनोद निर्माण झाले. तुंगारण्य हे झाशीजवळील ओर्च्छा संस्थानातील एक अरण्य. तिकडचा सरदार मित्रसेन बुंदेला हा इ. स. १६६१ मध्ये करतलबखान याच्या उंबर खिंडीच्या मोहिमेत होता. संशोधकांनी तुंगारण्य हे झाशीहून काढून लोणावळ्याजवळ आणून ठेवले आहे!

काही कवी तर नावे बदलून कोडी घातल्यासारखे बोलतात. शहाजहान बादशहाचे युवराज काळातील नाव शहाजादा खुर्रम असे होते. संकर्षण सकळकळे याने खुर्रमचे 'कुर्मनृपति' असे केले आहे. कुर्मनृपतीचा (खुर्रम, शहाजहान) मुलगा औरंगजेब. त्याच्या नावाने वसलेले गाव म्हणजे औरंगाबाद. संकर्षण सकळकळे त्या गावाला 'कुर्मनृपतिसुतनगर' म्हणतो. बिकानेर राज्याचे महाभारतकालीन नाव कुरुजांघल. त्याचा हिंदी अपभ्रंश होऊन बिकानेरच्या राजाला लोक जंगलचा राजा म्हणून संबोधू लागले! त्याचे संस्कृतीकरण करून संकर्षण सकळकळे याने बिकानेरचा राजा राव कर्णसिंह याचे नाव वनपाळ म्हणजे जंगलखात्याचा अधिकारी असे दिले. रावकर्ण राठोड हा इ. स. १६५५ मध्ये औरंगजेबाच्या आज्ञेने शिवाजीमहाराजांना गुप्तपणे भेटला. तो गुप्तपणा राखण्यासाठी संकर्षण सकळकळे याने रावकर्ण हे नाव बदलून त्याच्या जागी वनपाळ आणि धरणीधर महाराज (बिकानेरच्या राजांचे एक बिरुद) ही नावे दिली. दत्तो वामन पोतदार यांना हे माहीत नसल्यामुळे ते बुचकळ्यात पडले. तसेच कुर्मनृपति म्हणजे कछवाह रजपूत. तोच रावकर्ण असला पाहिजे अशी त्यांनी समजूत

करून घेतली. म्हणून त्यांनी जयपूरच्या कछवाह रजपुतांना बिकानेरच्या राजाशी जोडून दिले. पण बिकानेरचे राजे हे राठोड रजपूत; कछवाह नव्हेत. त्यांना हे कोडे सुटले नाही. शेवटी त्यांनी हताश होऊन ''या ठिकाणी कवीने गुगली टाकलेली दिसते,'' अशी क्रिकेटची परिभाषा वापरली.

इतिहास संशोधनातील हा एक मोठा विनोदच म्हणावा लागेल. रजपूत शब्दाचे संस्कृतीकरण राजपुत्र असे केल्यामुळे साल्हेरच्या युद्धात औरंगजेबाचे आणि मोगल बादशाही कुटुंबातील इतर अनेक राजपुत्र पकडले गेले, असाही शोध एका संशोधकाने लावला!

परमानंदाचे काव्य हे कवींद्र परमानंदाने रचलेले 'शिवचरित्र'. परमानंदाचा मुलगा देवदत्त याने संभाजीकालीन घटनांवर काव्य लिहिले आणि त्याला 'परमानंद काव्य' हेच नाव ठेवले. त्यामुळे हे काव्यही कवींद्र परमानंदाचे असावे अशी समजूत जदुनाथ सरकार आणि सरदेसाई यांनी करून घेतली. दोन्ही काव्ये भाषा, व्याकरण आणि काव्यगुण इत्यादी बाबतीत (आणि घटनांच्या बाबतीत) एक आहेत की भिन्न आहेत हेही तपासून पाहण्याची कोणी तसदी घेतली नाही!

संस्कृत कवींच्या या हुशारीपुढे सत्यवतीने हात टेकले. तिचा रडवेला चेहरा पाहून कुठे तरी मनात गलबलल्यासारखे झाले. वास्तविक पाहता मी काही तिचा मार्गदर्शक नव्हतो. तिच्या प्रबंधाचा परीक्षकही नव्हतो. तिचे मार्गदर्शक होते डॉ. उपाध्ये. सत्यवती मला म्हणाली, ''परमानंद काव्याचे वाङ्मयीन विवेचन मी करीन. ऐतिहासिक संदर्भात तुम्ही मला मदत केली पाहिजे. काहीही झाले तरी हा प्रबंध माझ्याकडून लिहिला गेला पाहिजे.''

परमानंदाच्या काव्याचा इंग्रजीतून परिचय करून देणारा एखादा तरी ग्रंथ हवा असे मलाही वाटत होते. शिवचरित्रावरील साधनांमध्ये परमानंदाच्या या काव्याचे मोल केवळ अपूर्व असे आहे. त्याचा विस्तृत परिचय भारतीय जनतेला होणे आवश्यक आहे. सत्यवतीकडून हे काम करवून घेण्याची मला अनायासेच संधी मिळाली होती. तिचा निर्धार होताच. मी तिला म्हटले, ''तू काही काळजी करू नकोस. मी तुझ्याबरोबर बसून एकेक ओळ वाचत जाईन आणि स्थल, काल, व्यक्ती आणि घटना यांचे संदर्भ सांगत जाईन. तू त्या माहितीवरून आपला प्रबंध तयार कर.''

त्या दिवसापासून पुढे जवळजवळ वर्षभर मी कवींद्र परमानंदाच्या मागे हात धुऊन लागलो होतो. सत्यवतीचे काय सांगावे? या कामात ती अक्षरश: झपाटल्यासारखी वागू लागली. ती चेंबूरच्या महिला वसतिगृहात राहत असे. तेथून ती रोज प्रथम भारतीय विद्याभवनामध्ये जाई. नंतर एशियाटिक सोसायटीत येई आणि माझ्याशी चर्चा करी. तिने शिवाजी महाराजांवरील मिळतील ती इंग्रजी चरित्रे वाचून काढली. मी

लिहिलेले इंग्रजी शिवचरित्र ती सतत जवळ बाळगीत होती. शिवकालीन महाराष्ट्राचे तिने नकाशे गोळा केले. मराठी साधनेही वाचण्याचा ती प्रयत्न करू लागली. पुढे तिला हळूहळू मराठी मजकूर कळू लागला. आम्ही आपसात इंग्रजीत किंवा तेलगूत बोलत असू. एशियाटिक सोसायटीत माझे कधी जाणे न झाल्यास ती मुलुंडला आमच्या घरी येऊ लागली. माझ्या पत्नीची तिने ओळख करून घेतली. अनेक वेळा ती आमच्याबरोबरच जेवून जात असे. मुलांसाठी खाऊ म्हणून कधी बिस्किटे तर कधी चॉकलेट वगैरेसारख्या चिजा ती घेऊन येई. मुलुंडच्या माझ्या घरी ती आली की तीन-चार तास माझ्याबरोबर चर्चा करीत बसे.

तिच्या सहवासामुळे परमानंदाच्या काव्याचे आलोचन माझ्या मनात बिंबू लागले, तर ऐतिहासिक घटनांच्या बाबतीत सत्यवती तरबेज होऊ लागली. पुढे पुढे तर तिचा व्यासंग आणि तिची ग्रहणशक्ती ही पाहून मला तिचे कौतुक वाटू लागले. ती आपण होऊन विचारू लागली, "सुवर्णशर्मा म्हणजे सोनोपंत काय? आणि गोकपाट म्हणजे गायकवाड काय?" तिचे हे अर्थपूर्ण बोलणे ऐकून मलाही मोठा आनंद वाटू लागला. तिचा प्रबंध लिहून होईपर्यंत मीही 'शिवचरित्र' संशोधनाचा आनंद लुटीत होतो. वेळ कसा जाई हे कळत नसे.

सत्यवतीला आमच्या घराचा लळा लागला होता. माझ्या पत्नीसाठी आणि मुली-सुनांसाठी ती अधूनमधून फुलांचे गजरेही घेऊन येऊ लागली. तिची दोन मुले कलकत्ता येथे शिकत होती. त्यांचे फोटो तिने आम्हांला दाखविले. विशाखापट्टण येथे ती आपले घर बांधत होती. ती एकदा मला म्हणाली, "विशाखापट्टणला सहकारी सोसायटी आहे. तिथे सभासद होण्याची इच्छा असल्यास मला सांगा. अतिशय स्वस्त दरामध्ये तिकडे घरे बांधली जातात." एक दिवस ती विशाखापट्टणच्या गृहबांधणी सोसायटीचा नकाशाही (प्लॅन) घेऊन आली. मला हसू आले. मी तिला म्हटले, "सत्यवती, मी विशाखापट्टणला येऊन काय करू? मुंबई हेच माझं कार्यक्षेत्र आहे."

सत्यवतीचे वडील मोठे ज्योतिषी होते. तिने माझी पत्रिका मागवून घेतली आणि त्यांच्याकडे पाठविली. त्यांनी पत्रिकेचा अभ्यास करून माझे संपूर्ण भविष्य वर्तविले. मला ज्योतिषात काही कळत नाही. कुठला ग्रह कुठे बसला, तो वाकड्या नजरेने दुसऱ्या ग्रहाकडे का पाहतो, अमका ग्रह मागे का सरकला, एकाच जागी दोन ग्रह आले तर काय होते, मंगळाचा प्रताप काय इत्यादी प्रश्नांपुढे मी सरळ सरळ आपटी खातो. आपले बरे होणार म्हटले की बरे वाटते. काळ अनिष्ट आहे म्हटले की मी सावधगिरीने वागतो. इतकाच मी त्या शास्त्रापासून घेतलेला बोध. भांडू नका असे भविष्य छापून आले की मी त्या दिवशी काही न बोलता कामात गुंतून राहतो. रस्ता ओलांडू नका असे वाचले तर त्या दिवशी मी रिक्षातूनही बाहेर जात नाही. मेजवानीचा

आनंद असे वाचले की घरी गोडधोड करा म्हणून मी सर्वांच्या मागे लागतो. मुलाबाळांचे प्रश्न सुटतील असे वाचले की तुमचे काय प्रश्न आहेत, असे मी मुलाबाळांना विचारीत बसतो. अर्थात या सर्वांची आठवण त्या क्षणापुरतीच राहते. पण करमणूक मात्र भरपूर होते.

सत्यवतीच्या वडिलांनी माझे भविष्य चांगले राहील असे लिहिले होते. पण ते पूर्ण झालेले पाहण्यास ते जगले नाहीत. आपली मुलगी डॉक्टरेट करील हा विश्वास त्यांना होता. एका संस्कृत पंडिताची ती संस्कृत विदुषी कन्या. पण तिला डॉक्टरेट मिळण्यापूर्वीच ते वारले. सत्यवतीचे काम मात्र चालूच राहिले. तिचे मार्गदर्शक गुरू डॉ. उपाध्ये हे व्याख्यानाचा दौरा करण्यासाठी पश्चिम जर्मनीत गेले होते. त्यामुळे तिच्या प्रबंधाच्या मार्गदर्शनाचे काम माझ्या अंगावरच येऊन पडले. मध्ये एकदा-दोनदा सत्यवतीही कलकत्ता आणि विशाखापट्टण येथे जाऊन आली. तिकडील नभोवाणीवर तिची संस्कृत, इंग्रजी व तेलगू या भाषांतून भाषणे झाली. मला तिचे सारखे कौतुक वाटत राही. आपला पती आणि मुले यांचा संसार सांभाळीत ती हे सर्व करीत होती.

वर्षभरातच तिचा प्रबंध तयार झाला. विद्यापीठाने त्याला मान्यता दिली. तिला डॉक्टरेटची पदवी मिळाली. तो प्रबंध छापून आला तर कवींद्र परमानंदाच्या 'शिवभारता'वर एक उत्कृष्ट ग्रंथ अभ्यासकांच्या हाती येईल. मी सत्यवतीला म्हटले, ''या ग्रंथाने तुझी कीर्ती वाढेल. तुझ्या मेहनतीचे चीज झाले पाहिजे. पण ग्रंथ छापून येणे सोपे काम नाही. विद्यापीठाचे अनुदान मिळालेच तर त्याने छपाईचा खर्च भरून येत नाही. तरीही हा ग्रंथ छापून बाहेर येणे आवश्यक आहे असे मला वाटते.''

त्यानंतर सत्यवती कलकत्त्याला निघून गेली. मला तिची दोन-तीन पत्रेही आली. शेवटच्या पत्रात तिने म्हटले होते : ''संस्कृत व्याकरणावर मी आणखी एक प्रबंध लिहिण्याच्या विचारात आहे. मला अमेरिकेत शिष्यवृत्ती मिळाली आहे. मी तिकडे जाण्याच्या तयारीत आहे. तुमचा आशीर्वाद असावा.''

तिचे पत्र वाचून मला मोठे समाधान वाटले. घार आता आकाशात उडू लागली होती. मी उत्तरात लिहिले : ''अमेरिकेला अवश्य जा. ज्ञानसंपादनाची आपली हौस भरपूर फेडून घे. आशीर्वादासाठी म्हणशील तर तो देण्यासाठी आमचे दोन्ही हात नेहमीच तयार आहेत.''

❖ ❖

# नेपाळची दुनाकुमारी

नेपाळ या राज्याबद्दल मला विशेष माहिती नव्हती. बौद्ध धर्माचे संस्थापक भगवान गौतम बुद्ध यांचे जन्मस्थान नेपाळमधील लुंबिनी विहार या स्थळी असून हे स्थळ भारतीय सीमेच्या पलीकडे थोड्या अंतरावर आहे, हे मला माहीत होते. त्या ठिकाणी सम्राट अशोक याने एक स्तंभ उभा केला होता. स्तंभावरील अशोकाने कोरलेले ''येथे तथागताचा जन्म झाला'' हे वाक्य भगवान बुद्धाच्या जन्मस्थानाबद्दल निश्चित प्रमाण म्हणून जगातील बौद्ध समाजाच्या पुढे आले. हा शोध सुप्रसिद्ध भारतीय आर्षविद्यातज्ञ राखालदास बॅनर्जी यांनी लावला.

बनारसला बी. ए. पदवीसाठी 'प्राचीन भारतीय इतिहास' आणि ऑनर्ससाठी 'सम्राट अशोक' हे माझे विषय होते. त्या अभ्यासातून भगवान बुद्धाचे वडील शुद्धोदन यांच्या राजधानीच्या नावाचा (गोरखपूरजवळील भारतीय सरहद्दीच्या आतील पिपरिया) शोध लागला. आणखी एक महत्त्वाची बातमी कळली ती अशी की, सीतेचे माहेर जनकपूर हे नेपाळमध्ये आहे. गाव नेपाळात पण काही अंतरावर असलेले जनकपूर रेल्वे स्टेशन हे बिहार प्रांतात अशी गंमत आहे.

मध्ययुगीन भारतातील तुर्क सत्तेचा नेपाळशी फारसा संबंध आला नाही. नेपाळ हे तसे काही मोठे राज्य नव्हे. आपल्या संघराज्यातील गुजराथ किंवा ओरिसा इतकाच त्याचा विस्तार. सुमारे साठ हजार चौरस मैलांचा. लोकसंख्याही दीड कोटी. पण हिमालयाचे उत्तुंग शिखर धवलगिरी आणि इतर अनेक शिखरे त्या देशात आहेत. चीन-भारत मार्ग हा तिबेट आणि नेपाळ या दोन देशांतूनच जातो. येथील प्रजा बहुतेक हिंदू धर्माची. त्यातील लढाऊ वृत्तीची आणि सत्ताधारी जमात गुरखा या नावाने ओळखली जाते. आज 'गुरखा'ऐवजी नेपाळी हा शब्द जास्त प्रमाणात वापरात आहे. गुरखा म्हणजे गोरक्षनाथांचे अनुयायी, शूर आणि कडवे. नाथ संप्रदायाचा उदय आणि विकास हा इ.स.च्या दहाव्या शतकापासून नेपाळमध्ये सुरू झाला. या पंथाला मोठे तपस्वी आणि व्यवहारी संघटक अशा गुरूंचा लाभ झाला. या नाथ संप्रदायात पुढे भैरव संप्रदाय आणि काश्मिरी शैव संप्रदाय यांचाही प्रभाव पडला. तांत्रिक (तंत्रमंत्राधिष्ठित) शाक्त आणि शैव या संप्रदायांबरोबरच पुढील काळात वैष्णव पंथाचाही शिरकाव या संप्रदायात झालेला दिसतो. हठयोग हे साधन. ह म्हणजे

सूर्यतेज आणि ठ म्हणजे चंद्रतेज हे संकेत. शिव हे परम उद्दिष्ट. सगळे जीव हे अज्ञानात गुरफटलेले पशू. त्यांना सांभाळणारा 'शिव' हा पशुपतिनाथ. हा म्हणजे नेपाळचे उपास्यदैवत. नाथ संप्रदायाचे मूळ वेदांतच आहे. हे दाखविण्याचा प्रयत्न नाथसांप्रदायिकांनी केला. नेपाळातून निघालेला हा संप्रदाय पुढे भारतभर पसरला. त्रिशूळ, डमरू, धुनी, चिमटा, झोळी ही याची चिन्हे. नाथ संप्रदायाचे प्रवर्तक आदिनाथ हे. पण जगद्विख्यात झाले ते मत्स्येंद्रनाथ. मत्स्येंद्रनाथ यांचे नाव नेपाळशी निगडित झाले आहे. मत्स्येंद्रनाथ, त्यांचे शिष्य सुप्रसिद्ध गोरक्षनाथ, मत्स्येंद्रनाथांचे भाचे मीननाथ, ही नावे नेपाळात सर्वपरिचित आहेत. नेपाळमधील अनेक मंदिरे या महापुरुषांच्या वास्तव्याची आणि त्यागी जीवनाची साक्ष देत अद्याप उभी आहेत. नाथ संप्रदाय हा महाराष्ट्रातही पसरला. गहिनीनाथांचे शिष्य निवृत्तिनाथ आणि निवृत्तिनाथांचे शिष्य ज्ञानेश्वर. त्यांनी भागवत धर्माचा योग सांगून 'नाथ संप्रदाया'ला लोकाभिमुख केले.

ऐतिहासिक दृष्टीने पाहता तुर्क संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या प्रतिकारात नाथ संप्रदाय हा उठून दिसतो. सभेतील वादात किंवा रणांगणातील चकमकीत एकीकडे नाथपंथीय गोसावी आणि दुसरीकडे तुर्क मूलतत्त्ववादी यांच्या संघर्षाचे अनेक उल्लेख आपल्याला फारसी आणि उर्दू साहित्यात आढळून येतात.

गेली शेकडो वर्षे नेपाळने आपले स्वातंत्र्य राखले आहे. नेपाळचे राजघराणे हे अद्याप राजमुद्रेवर 'श्रीगोरक्षाय नमः' हे बिरुद मिरवीत असते. असे हे चिमुकले पण शूर राष्ट्र. या राष्ट्राच्या परंपरेची, भाषेची, संस्कृतीची, समाजरचनेची थोडी तरी ओळख करून द्यावी, असे मला वाटू लागले. पण या ना त्या कारणाने वयाची ब्याऐंशी वर्षे हा योग आला नाही.

इ. स. १९८८ च्या जूनपासून दृष्टिहीनता माझ्या नशिबी आली. बाहेर जाणे-येणे अतिशय मर्यादित होऊ लागले. घराजवळील बागेतही जाणे जमेना. माझ्या मुलाने मुंबईतील आमच्या मुलुंडच्या वास्तव्यस्थानातच वरच्या मजल्यावरची गच्ची विकत घेतली, आणि तेव्हापासून मला फिरायला मुबलक जागा झाली. अडवण्यास कोणी नाही. भिंतीला धरून मी एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत बत्तीस पावले चालत जातो, आणि परत येतो. दोन्ही मिळून साठ फेऱ्या होतात. सकाळी साठ आणि संध्याकाळी साठ अशा एकशेवीस फेऱ्यांचा माझा कार्यक्रम कधीच चुकत नाही. फिरून झाल्यावर गच्चीवर खुर्ची मागवून मी तिथे तासभर बसतो. सोबत असल्यास उत्तम. नसल्यास माझे फारसे काही बिघडत नाही. अध्यात्मात चिंतन, मनन आणि जप यांचे महत्त्व बरेच सांगितले आहे. तीच शिस्त मी माझ्या ज्ञानसंपादनाकडे लावली

आहे. एखादा विषय मनाशी घ्यावा, तोंडाने नावे पुटपुटत राहावे आणि बोटे हलवीत राहावे असे अनेकदा घडले आहे. विषयांची उणीव भासत नाही. काही काही विषय आठवतात. त्यांची कुणालाही गंमत वाटेल. उदाहरणार्थ :

१) मोगल-मराठा संघर्षातील औरंगजेबाचे प्रमुख अधिकारी कोण कोण होते?

२) या स्वातंत्र्ययुद्धातील मराठ्यांचे पुढारी कोण?

३) फ्रान्सच्या राजघराण्याचा इतिहास

४) इंग्रजी साहित्यातील प्रमुख कादंबरीकार, कवी, नाटककार, चरित्रकार, आत्मचरित्रकार कोण? आणि त्यांची आपण वाचलेली पुस्तके कोणती?

५) अमेरिकन साहित्याची आपण कोणती पुस्तके वाचली?

६) युरोपीय साहित्यातील आपण वाचलेली (अनुवादित) रशियन, फ्रेंच, जर्मन, नॉर्वेजियन, स्वीडिश, इटालियन, रुमानियन इत्यादी पुस्तके आणि त्यांचे लेखक.

७) पर्शियन वाङ्मयाचा अभ्यास

८) संस्कृत साहित्य आणि साहित्यिक

९) भारतातील इंग्रजी राजवट

१०) मोगल साम्राज्य आणि संस्कृती यांचे स्वरूप

११) घटनांची स्थळे आणि तारखा व अंतरे इत्यादी.

सततच्या मनन-चिंतनामुळे व्याख्यानात किंवा संभाषणात मला घटनांच्या तारखा, स्थळे, व्यक्ती, धोरणे इत्यादींचे अर्थ लावण्यास एका क्षणाचाही विलंब लागत नाही. माझ्या स्मरणशक्तीबद्दल पुष्कळ बोलले जाते. पण त्याच्यामागील रहस्य जप, मनन, चिंतन आणि मनाशी संभाषण यांत साठलेले आहे.

सांगायचा मुद्दा असा की, माझे गच्चीतील चिंतन-मनन असे सुरू झाल्यावर अचानक नेपाळी भाषा थोडीफार शिकून घेण्याचा योग आला. आमच्या वाड्यात चार-पाच बिऱ्हाडे राहतात. गच्चीवरील फुलझाडांची निगा आणि वाड्याचे एकंदरीत संरक्षण चौकीदाराकडे सोपविण्यात आले आहे. गेली कित्येक वर्षे तो वाड्यावर राहत आला आहे. सगळे त्याला 'गुरखा' म्हणत. मीही त्याला गुरखा म्हणून हाका मारतो. एक-दोन महिन्यांपूर्वी तो नेपाळातून आपली बायको आणि दहा वर्षांची मुलगी यांना चार-सहा महिन्यांसाठी घेऊन आला आणि त्याने गच्चीवरील एका खोलीत आपले बिऱ्हाड थाटले. गुरख्याचा मोठा मुलगा उमानाथ हा गावी इंटरपर्यंत शिकून तिकडेच शिक्षक म्हणून कामाला लागला होता. त्यानंतर गुरख्याला मुलगी झाली. ती जन्मल्यानंतर गुरखा कामासाठी बाहेर पडला. तो गेली दहा-बारा वर्षे आपल्या गावाकडे जाऊ शकला नाही.

गुरख्याची बायको 'दुनाकुमारी' ही एक मध्यमवयीन स्त्री. अगदी निरक्षर आणि अशिक्षित. कष्टाळू मात्र भरपूर. केव्हाही पाहा, स्वयंपाकपाणी, बाजारहाट, फुलझाडांना पाणी घालणे इत्यादी कामांत गुंतलेली. मी गच्चीवर फेऱ्या मारीत असता तिची हळूहळू ओळख होऊ लागली, आणि नेपाळच्या दिशेने आजपर्यंत बंद असलेली माझी खिडकी हळूच उघडली जाऊ लागली. तिच्याशी बोलताना नेपाळी भाषेविषयी आणि त्या देशातील समाज आणि संस्कृती यांसंबंधीचे माझे कुतूहल वाढू लागले. अडचण होती ती भाषेची. दुनाकुमारीचे हिंदीचे ज्ञान अगदी तोटके. ती नेपाळीतच बोले. सुदैवाने मला अनेक भाषा येतात: मराठी, कन्नड, हिंदी, इंग्रजी, उर्दू, फारसी या भाषा घरी आणि शालेय शिक्षणात आत्मसात झाल्या. शासकीय जीवनात तेलगूचा परिचय झाला. गुरुवर्य पाटणकरांमुळे संस्कृतची गोडी लागली. बनारसमधील बंगाली मित्रांच्या सोबतीत मी शुद्ध बंगाली उच्चारांसहित बोलू लागलो. आसामी आणि उडिया या भाषाही कानांवरून गेल्या. पंजाबीही समजण्यास अवघड वाटेनाशी झाली.

या मार्गावरील प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे दोन वन्य जमातींच्या भाषांशी आलेला माझा संबंध. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्याच्या दक्षिणेस त्या काळच्या निजाम राज्यात आणि आजच्या आंध्र राज्यात आदिलाबाद हा जिल्हा आहे. पेणगंगा आणि गोदावरी या नद्यांमधील प्रदेशात वन्य जमातीची लोकसंख्या लाख-दीड लाखाहून अधिक आहे. गोंड, कोलाम, प्रधान, भुट्टी, नायकपोड इत्यादी वन्य जमाती या जिल्ह्यात आहेत. प्रदेश जंगलझाडीचा. वाहतुकीचे मार्ग कमी. अशा प्रदेशातील जमातींच्या समाजकल्याणाचा अधिकारी म्हणून मी इ. स. १९४५ पासून इ. स. १९४८ पर्यंत काम करीत होतो. लोकांच्या मनात प्रवेश करण्याचा सरळ मार्ग म्हणजे त्यांच्या भाषा शिकून त्यातूनच त्यांच्याशी बोलत राहणे. अधिकारी आपल्या जमातीच्या भाषेतून बोलतात, उर्दू किंवा शासकीय भाषांतून नाही याचे त्यांना कोण कौतुक!

मी चार-पाच महिन्यांतच गोंडी आणि कोलामी या दोन भाषांतून अस्खलितपणे तासन् तास बोलू लागलो. या भाषांतील सर्वनामांची यादी मी तयार केली. नंतर मी क्रियापदांकडे वळलो. बाकीच्या शब्दांत मी गोंडी आणि कोलामी समजेपर्यंत इतर भाषांतील शब्दांची सरमिसळ करीत असे. ही प्रवृत्ती हळूहळू पुढे कमी झाली. या भाषांचा शब्दकोशही माझ्याजवळ जमला. या उपक्रमातून मी इंग्रजीतून या भाषांची 'व्याकरणे व शब्दकोश' ही तयार केली. आज परदेशांतील विद्यापीठांतून या ग्रंथांचा अभ्यास होत आहे. तेलगू आदी भाषा शिकताना मूळ शब्द आठवले नाहीत तर मी चक्क संस्कृत शब्द वापरीत असे. त्यामुळे पांडित्याचा आभास निर्माण होऊन उणे झाकले जाई! सुदैवाने तेलगूत संस्कृत शब्द अनेक आहेत. ते आपले लक्ष वेधून

घेतात. उदाहरणार्थ, उपाध्याय : शिक्षक, विद्यारंगत : ज्ञानक्षेत्रम्, पंचवार्षिक प्रणालिका : पंचवार्षिक योजना, प्रभुत्व : सरकारी उन्नत, पाठशाला : हायस्कूल, जातीय : राष्ट्रीय, कौलिक : जातीय, अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

दुनाकुमारीशी बोलताना मी तिची नेपाळी वाक्ये काळजीपूर्वक ऐकू लागलो. गावाकडे शेती-वाडी असलेली आणि त्यात रमलेली ती एक निरक्षर बाई. तिच्या बोलण्यात तिच्या नातेवाइकांचे उल्लेख येऊ लागले, आणि मग माझा शब्दकोश जमू लागला. मायली, मोरी : मी, तुमरी : तुम्ही, तो : तो, ती, ते, बा : बाप, आमा : आई, तानी माँ : मावशी, बैनी : बहीण, केटा : मुलगा, केटी : मुलगी, नाती : नात, बाकी मामा, काका, दादा इत्यादी शब्द हिंदीप्रमाणे. काही बंगाली शब्दही मिसळल्याचा भास होतो. बाताश : वारे, शीतल : थंड किंवा गार, घामेले : ऊन हे शब्द मला बंगालीतही आढळले. वृद्ध माणसांना थोरो, वृद्ध स्त्रीला थोरी, वृद्धांना आणखी शब्द म्हणजे बुढो, हजिरुबा (आजोबा).

मला उपयुक्त वाटणारे शब्द मी आधी लक्षात ठेवले. लौरु : हातातील काठी, ताळा : खाली, खालचा मजला, इजा : काल, आइजी : आज, भोली : उद्या, आयभी : आत्ताच, रामरोज : उत्कृष्ट. कोणत्याही चांगल्या गोष्टीला हा शब्द लावतात. उदाहरणार्थ : "बोम्माई (मुंबई) रामरोज छो," "कोठा (खोली) रामरोज छो" इत्यादी.

क्रियापदांच्या बाबतीत मला दुनाकुमारीचे उच्चार नीट न समजल्यामुळे घोटाळे होऊ लागले. भूत, भविष्य, वर्तमान हे मी धाब्यावर बसविले. कुठे हिंदी क्रियापदे वापरू लागलो. दुनाकुमारीच्या बोलण्यातून क्रियापदे हुडकून काढू लागलो. बाबा आयो: बाबा आले; बाबानू कित्थे फेरी भयो : बाबांच्या किती फेऱ्या झाल्या? दोपहर गरीमां घामले पोलसन : दुपारी उन्हामुळे उकडते, खुर्चीमा बसशू : खुर्चीवर बसा, गोरखपूर आमरा आवनी जावनी छो : गोरखपूर जाण्या-येण्याच्या वाटेवरचे गाव आहे. कोणत्याही क्रियापदाला दुनाकुमारी सन ही अक्षरे जोडते. खुर्ची नेवूसन : खुर्ची नेते, खाना पकासन : स्वयंपाक करते. मी सन ही अक्षरे वापरू लागलो. आवसन : येणे, जावसन : जाणे, सुर्नसन : ऐकणे. यातून काही विनोद निर्माण होई तेव्हा दुनाकुमारी खळखळून हसे. तिचे उच्चारही शुद्ध नसत. ठ आणि छच्या उच्चारात हे घोटाळे हटकून होत. त्यामुळे छो म्हणजे आहे या शब्दाचा उच्चार मी बरेच दिवस ठो असा करत होतो. छोडेनाला मी थोडेला म्हणत होतो. तिची बहीण 'टिका-कुमारी' हिच्या नावाचा उच्चार मी 'सीताकुमारी' असा करीत होतो.

दुनाकुमारीचे गाव 'बाताशकोट' हे नेपाळच्या हद्दीत असून भारतातील गोरखपूरपासून जवळ आहे. तिच्या दोन बहिणी टिकाकुमारी आणि पुतळी या जवळच असलेल्या 'बाला' आणि 'टेहू' या गावी राहतात. दुनाकुमारीचे बाताशकोट हे गाव

ब्राह्मण वस्तीचे दिसते. ब्राह्मणांना तिकडे 'ब्राऊन' असे म्हणतात. दुनाकुमारीचा आजा काळू पाध्ये हा विद्वान पंडित होऊन गेला. त्याचा मुलगा म्हणजे दुनाकुमारीचा बाप चुडामणी हा माफक शिकलेला असून शेतीवाडी सांभाळून असतो. दुनाकुमारीचा भाऊ लीलाप्रसाद तिवारी हा फक्त चौथीपर्यंत शिकला असून तो मुंबईत वाहतुकीच्या धंद्यात काम करीत आहे. दुनाकुमारीच्या शिक्षणाकडे कुणीच लक्ष दिले नाही. लहान वयातच तिचे लग्न पद्मपाणी शर्मा या मध्यमवर्गीय कुटुंबातील शेतकरी माणसाशी झाले. त्याचे शिक्षण चौथीच्या पलीकडे सरकले नाही. त्याचा मुलगा उमानाथ हा मात्र इंटरपर्यंत शिकला आणि आपल्या गावातील शाळेचा मुख्याध्यापक बनला. पुढे बऱ्याच वर्षांनी पद्मपाणी आपल्या तान्हया मुलीला गावी सोडून नोकरीच्या निमित्ताने कलकत्ता, मुंबई इत्यादी ठिकाणी भटकत राहिला, आणि शेवटी आमच्या वाड्यावर गुरखा म्हणून राहिला. बारा वर्षे तो आपल्या गावी गेला नाही. त्याची बायको दुनाकुमारी ही आपला मुलगा उमानाथ आणि मुलगी लक्ष्मी ऊर्फ लखुमा यांना घेऊन गावीच एकाकी जीवन जगत होती. मध्यंतरी उमानाथाचे लग्न झाले. आता त्याला एक मुलगा आणि एक मुलगी अशी संतती आहे. त्याने आपल्या बहिणीला शाळेत घातले. आज ती मुलगी दहा-अकरा वर्षांची असून पाचवीपर्यंत आली आहे. शेवटी दुनाकुमारी आणि तिची मुलगी या काही दिवसांसाठी मुंबईला आल्या आणि त्यामुळे माझी व त्यांची ओळख झाली.

दुनाकुमारीचे अज्ञान काय सांगावे ? तिला महाभारत अजिबात माहीत नाही. पांडव, कौरव, द्रौपदी ही नावे तिच्या डोक्यावरून जातात. तिने राम आणि सीता ही नावे तेवढी ऐकली आहेत. फक्त रामाचा वनवास आणि भरताचे राज्य या दोन गोष्टी तिला माहीत आहेत.

पुढील चार ओळी ती नेहमी गुणगुणते :

**सीता लायी छोडेना।**<br>
**ना जाऊ रामा बनमा॥**<br>
**रामराथी बयी बनीबासा।**<br>
**भरता लागी राजायी॥**

लक्ष्मण, शत्रुघ्न ही नावे तिला माहीत नाहीत. दशरथ म्हटल्यावर ती नकारात्मक मान हलविते. रावण कोण होता हे तिला माहीत नाही. दहा तोंडांचा (डोक्याला नेपाळीत टकोरा म्हणतात.) कुणी एक होता इतकेच तिला माहीत आहे. कृष्णासंबंधी राधा गवळण आणि कृष्णाची मुरली यांपलीकडे तिला कसली माहिती नाही. गावात मंदिरे आहेत. ती कोणत्या देवाची आहेत याची तिला कल्पना नाही. देवाच्या चित्रांना ती फोटो म्हणते. सणवार, ऋतू आणि महिने यांची तिल कल्पना आहे. पण ते

शेतीच्या व्यवसायाला आणि गोडधोड खाण्याला धरून. उदाहरणार्थ दसरा : भाताची कापणी झाल्यावर, दिवाळी, भावांना ओवाळून खाऊपिऊ घालतात तेव्हा. बाकी रामनवमी, गोकुळाष्टमी इत्यादी दिवसांचा तिला पत्ता नाही.

नेपाळमधील आराध्यदैवत नवनाथ हे तिच्या कानांवरून गेलेले नाही. पण मंदिरात लोक मंत्र म्हणतात, कीर्तन करतात, ढोल, पखवाज वाजवतात हे तिला माहीत आहे. घरी ही मंडळी आली की खाण्याचे बेत होतात. दही, दूध, खीर इत्यादींचे ती रसभरित वर्णन करते. तिच्या बोलण्यात काही इंग्रजी आणि फारसी शब्द आलेले पाहून मला गंमत वाटली. चित्रपटाला ती पिकचर म्हणते. चित्रांना फोटो, पॅन्टला पंटो, पुडीला पावडर, पायमोज्याला जुराब, बुटाला जुत्ता आणि मफलरला गलुबन, मोटारीला जीप, बस हे तिच्या वापरातील शब्द. मी तिला म्हटले, ''काही भजन म्हण.''

ती म्हणाली, ''माझ्या गळ्यात तुळशीची माळ आहे. मी अभक्ष्य भक्षण करीत नाही. माझी आंघोळ चुकत नाही. माझा एकादशीचा उपवास चुकत नाही. भजनाच्या दोनतीन ओळी मला माहीत आहेत.''

**राधेश्याम, राधेश्याम, श्याम, श्याम, राधे राधे।**
**राधेकृष्ण, राधेकृष्ण, कृष्ण, कृष्ण, राधे राधे॥**
**रघुपतिराघव राजाराम पतितपावन सीताराम।**

अशी ही दुनाकुमारी. तिची मुलगी लक्ष्मी ही एकदा माझ्याजवळ आली. मी तिला म्हटले, ''तुला काही येते का ?'' तिने स्पष्ट आवाजात म्हटले :

**नमस्ते शारदे देवी, वीणा पुस्तकधारिणी। विद्यारंभम् करिष्यामि, प्रसन्न भवसर्वदा॥**

नेपाळची ही नवीन पिढी. शिक्षणाचा प्रभाव दिसू लागला होता. पंधरा दिवसांनी मायलेकी आपल्या गावी जाणार. पुन्हा त्यांच्या भेटीची शक्यता नाही. जणू मला नेपाळी भाषेची ओळख करून देण्यासाठीच ती मुंबईत आली होती. नेपाळमध्ये आपल्या कुटुंबात आज ती माझी आठवण काढीत असेल.

❈ ❈

# माझे दूरदर्शन!

आमच्या पिढीतील शिक्षण सरळ आणि धोपटमार्गी असे. शाळेतील विषयही नेमके आणि सुटसुटीत असत. भाषा, इतिहास, भूगोल, गणित असे विषय असत. त्यामुळे माध्यमिक शाळा संपेपर्यंत माझे इंग्रजी, उर्दू, फारसी, इतिहास, भूगोल हे विषय चांगले शिकून झाले. गणितात मी कच्चाच ठरलो. कॉलेजमध्ये जाईपर्यंत माझा मराठीशी कोणत्याही शाळेत व कोणत्याही वर्गात संबंध आला नाही. निजामी राजवटीतील उर्दूच्या प्रभावाचा हा परिणाम होता. विज्ञानाशी संबंध आला तो पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये. तोही जेमतेम तोंडओळख होण्यापुरता. कॉलेजमध्ये गेल्यावर तो संबंधही सुटला. तंत्रविज्ञान – ज्याला टेक्नॉलॉजी म्हणतात – त्याचा आम्हांला गंधही नव्हता.

आमचे लहानपण खेड्यापाड्यातून अगर खेडेवजा तालुक्याच्या ठिकाणी गेलेले. त्यामुळे त्या काळातही सामान्य समजल्या गेलेल्या अनेक गोष्टी आम्हांला अपरिचित वाटत. वीज, गॅसच्या बत्त्या, ट्राम, फूटबॉल, क्रिकेट या गोष्टी मी प्रथम पाहिल्या तेव्हा मला मोठा चमत्कार वाटे. अशा अपरिचित वस्तूंना हाताळण्याची प्रवृत्ती राहिली नाही. ती वृत्ती अद्यापपर्यंत टिकून आहे. कानाला काही अपाय होईल या कल्पनेने मी कित्येक दिवस फोन वापरण्याचे टाळीत असे! विजेच्या दिव्याच्या बटनांना अजूनही मी भीत भीतच हात लावतो. विद्यार्थिदशेत सायकल पंक्चर झाली तर ते नीट करणे मला जमले नाही. थर्मामीटर पाहताना माझ्या मनाचा अद्याप गोंधळ उडतो. लिफ्टमधून ये-जा करताना मी अजूनही बावरल्यासारखा होतो. असे हे आमचे अगाध तंत्रज्ञान. आणि अशात एके दिवशी मुंबईच्या दूरदर्शनने मला कळविले की आम्ही दूरदर्शनवर आपली मुलाखत घेणार आहोत. सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका शांता शेळके या तुमची मुलाखत घेतील. आजवर दूरदर्शनवर इतरांच्या मुलाखती पाहत होतो. आता स्वत: मुलाखत देण्याची वेळ आली.

दूरदर्शनचे श्री. धुमाळे म्हणाले, ''माधवराव, तुमची सगळी पुस्तके पाठवून द्या. ती एकत्र ठेवून त्यांचे पहिल्या पानावरील दर्शन आम्ही प्रेक्षकांना घडवू.''

ठरल्या वेळी मी दूरदर्शनच्या कार्यालयात गेलो. तेथे शांताबाई शेळके यांची गाठ पडली. साधारणपणे कोणते प्रश्न त्या मला विचारतील याची त्यांनी मला माहिती दिली. इतक्यात आम्हांला असे सांगण्यात आले की ''मेकअप रूममध्ये चला.''

मी म्हटले "अहो, माझं वय काय? आणि मेकअप तो काय करायचा?" त्यावर मला असे सांगण्यात आले की, "दूरदर्शनवर स्पष्टपणे दिसण्यासाठी तोंडाला थोडासा मेकअप करणे आवश्यक आहे." म्हटले, "करा." कपाळाला, गालावर काहीसा चमकदार तांबूस रंग लावताना मला राहून राहून गंमत वाटत होती. मुलाखत चांगलीच झाली. इतरांना बोलते करण्याचे कसब शांताबाईंना फार चांगले साधले आहे. त्यातून माझा स्वभाव बोलका. त्यामुळे दोनतीन वेळा असे झाले की मी बोलतच राहिलो आणि दूरदर्शनवाले कुठे तरी संवाद थांबवीत म्हणजे 'कट' करीत गेले. शेवटची माझी वाक्ये तर मुलाखतीत आलीच नाहीत. शेवटी वेळ संपला होता, असे मला सांगण्यात आले. त्याउलट आम्ही हात खाली करू तेव्हा संवाद थांबवावा अशी सूचना देण्यात आली. असे असूनही शांताबाईंनी गैरसमजामुळे संवाद अचानक थांबविला व मग पुन्हा सांधा जुळवावा लागला. अशा किरकोळ गोष्टी सोडल्या तर माझी मुलाखत चांगली रंगली याचे मला मोठे समाधान वाटले.

दूरदर्शनवरील माझा दुसरा प्रसंग हा माझी बरीच तारांबळ उडवून गेला. विषय होता शिव-समर्थ संबंध आणि चर्चा करण्यास माझ्याबरोबर होत्या सुमतीबाई धनवटे. चर्चेसाठी बैठक मांडली होती ती पेशवाई थाटाची. खुर्चीवर बसण्याच्या अनेक वर्षांच्या सवयीमुळे आणि वाढत्या वयामुळे मांडी घालून बसण्याची माझी सवय जवळजवळ नाहीशी झाली आहे. पाटावर बसण्याचा क्वचित प्रसंग आला तरी एक मांडी उंच ठेवूनच मी बसतो. आता लोडाला टेकून बसणे म्हणजे खाली बसणे आले. मला मांडी घालता येईना आणि दोन्ही पाय पसरून बसणे अशिष्टपणाचे वाटू लागले. मी आमच्या चर्चेचे संचलन करणाऱ्या अधिकाऱ्यांना विचारले, "अहो, खुर्च्या का नाही मांडल्या?" ते आश्चर्य दाखवून म्हणाले, "काय? शिव-समर्थ भेट आणि त्यासाठी टेबल-खुर्च्या? अहो, ते बरं दिसणार नाही. या प्रसंगाला गादी, तकिया आणि लोड हीच खरी." यावर तुम्ही काय बोलणार?

घोटाळा असा झाला की, मी प्रथम लोडावर बसलो आणि मग घसरत गादीवर आलो. अजून चर्चा सुरू झाली नव्हती म्हणून मी आरामात दोन्ही पाय पसरले. पण एकदा चर्चा चालू झाल्यावर मला पायावर पाय घेऊन बसावे लागले. चर्चेच्या वेळी प्रकाशझोत इतरांकडे गेला की मी पाय पसरीत असे आणि माझ्यावर प्रकाश आला की मी पाय वर ओढून घेई. आमची चर्चा चालूच होती. "समर्थ आणि शिवाजी महाराज यांची भेट सोळाशे बहात्तरच्या पूर्वी झाली असल्याचा पुरावा नाही. ती बहात्तरमध्ये झाली याचा निश्चित पुरावा आहे. त्यानंतरचे त्यांचे संबंध अतिशय निकटचे होते." हे ठासून सांगताना मी लोडाला पाठ टेकली. तो काय सांगावे? लोड घरंगळत मागे गेला, आणि आम्हीही त्याच्या मागोमाग गादीवर उताणे झालो. माझे

# माझे दूरदर्शन !

आमच्या पिढीतील शिक्षण सरळ आणि धोपटमार्गी असे. शाळेतील विषयही नेमके आणि सुटसुटीत असत. भाषा, इतिहास, भूगोल, गणित असे विषय असत. त्यामुळे माध्यमिक शाळा संपेपर्यंत माझे इंग्रजी, उर्दू, फारसी, इतिहास, भूगोल हे विषय चांगले शिकून झाले. गणितात मी कच्चाच ठरलो. कॉलेजमध्ये जाईपर्यंत माझा मराठीशी कोणत्याही शाळेत व कोणत्याही वर्गात संबंध आला नाही. निजामी राजवटीतील उर्दूच्या प्रभावाचा हा परिणाम होता. विज्ञानाशी संबंध आला तो पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये. तोही जेमतेम तोंडओळख होण्यापुरता. कॉलेजमध्ये गेल्यावर तो संबंधही सुटला. तंत्रविज्ञान – ज्याला टेक्नॉलॉजी म्हणतात – त्याचा आम्हांला गंधही नव्हता.

आमचे लहानपण खेड्यापाड्यातून अगर खेडेवजा तालुक्याच्या ठिकाणी गेलेले. त्यामुळे त्या काळातही सामान्य समजल्या गेलेल्या अनेक गोष्टी आम्हांला अपरिचित वाटत. वीज, गॅसच्या बत्त्या, ट्राम, फूटबॉल, क्रिकेट या गोष्टी मी प्रथम पाहिल्या तेव्हा मला मोठा चमत्कार वाटे. अशा अपरिचित वस्तूंना हाताळण्याची प्रवृत्ती राहिली नाही. ती वृत्ती अद्यापपर्यंत टिकून आहे. कानाला काही अपाय होईल या कल्पनेने मी कित्येक दिवस फोन वापरण्याचे टाळीत असे! विजेच्या दिव्याच्या बटनांना अजूनही मी भीत भीतच हात लावतो. विद्यार्थिदशेत सायकल पंक्चर झाली तर ते नीट करणे मला जमले नाही. थर्मामीटर पाहताना माझ्या मनाचा अद्याप गोंधळ उडतो. लिफ्टमधून ये-जा करताना मी अजूनही बावरल्यासारखा होतो. असे हे आमचे अगाध तंत्रज्ञान. आणि अशात एके दिवशी मुंबईच्या दूरदर्शनने मला कळविले की आम्ही दूरदर्शनवर आपली मुलाखत घेणार आहोत. सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका शांता शेळके या तुमची मुलाखत घेतील. आजवर दूरदर्शनवर इतरांच्या मुलाखती पाहत होतो. आता स्वत: मुलाखत देण्याची वेळ आली.

दूरदर्शनचे श्री. धुमाळे म्हणाले, ''माधवराव, तुमची सगळी पुस्तके पाठवून द्या. ती एकत्र ठेवून त्यांचे पहिल्या पानावरील दर्शन आम्ही प्रेक्षकांना घडवू.''

ठरल्या वेळी मी दूरदर्शनच्या कार्यालयात गेलो. तेथे शांताबाई शेळके यांची गाठ पडली. साधारणपणे कोणते प्रश्न त्या मला विचारतील याची त्यांनी मला माहिती दिली. इतक्यात आम्हांला असे सांगण्यात आले की ''मेकअप रूममध्ये चला.''

मी म्हटले "अहो, माझं वय काय? आणि मेकअप तो काय करायचा?" त्यावर मला असे सांगण्यात आले की, "दूरदर्शनवर स्पष्टपणे दिसण्यासाठी तोंडाला थोडासा मेकअप करणे आवश्यक आहे." म्हटले, "करा." कपाळाला, गालावर काहीसा चमकदार तांबूस रंग लावताना मला राहून राहून गंमत वाटत होती. मुलाखत चांगलीच झाली. इतरांना बोलते करण्याचे कसब शांताबाईंना फार चांगले साधले आहे. त्यातून माझा स्वभाव बोलका. त्यामुळे दोनतीन वेळा असे झाले की मी बोलतच राहिलो आणि दूरदर्शनवाले कुठे तरी संवाद थांबवीत म्हणजे 'कट' करीत गेले. शेवटची माझी वाक्ये तर मुलाखतीत आलीच नाहीत. शेवटी वेळ संपला होता, असे मला सांगण्यात आले. त्याउलट आम्ही हात खाली करू तेव्हा संवाद थांबवावा अशी सूचना देण्यात आली. असे असूनही शांताबाईंनी गैरसमजामुळे संवाद अचानक थांबविला व मग पुन्हा सांधा जुळवावा लागला. अशा किरकोळ गोष्टी सोडल्या तर माझी मुलाखत चांगली रंगली याचे मला मोठे समाधान वाटले.

दूरदर्शनवरील माझा दुसरा प्रसंग हा माझी बरीच तारांबळ उडवून गेला. विषय होता शिव-समर्थ संबंध आणि चर्चा करण्यास माझ्याबरोबर होत्या सुमतीबाई धनवटे. चर्चेसाठी बैठक मांडली होती ती पेशवाई थाटाची. खुर्चीवर बसण्याच्या अनेक वर्षांच्या सवयीमुळे आणि वाढत्या वयामुळे मांडी घालून बसण्याची माझी सवय जवळजवळ नाहीशी झाली आहे. पाटावर बसण्याचा क्वचित प्रसंग आला तरी एक मांडी उंच ठेवूनच मी बसतो. आता लोडाला टेकून बसणे म्हणजे खाली बसणे आले. मला मांडी घालता येईना आणि दोन्ही पाय पसरून बसणे अशिष्टपणाचे वाटू लागले. मी आमच्या चर्चेचे संचलन करणाऱ्या अधिकाऱ्यांना विचारले, "अहो, खुर्च्या का नाही मांडल्या?" ते आश्चर्य दाखवून म्हणाले, "काय? शिव-समर्थ भेट आणि त्यासाठी टेबल-खुर्च्या? अहो, ते बरं दिसणार नाही. या प्रसंगाला गादी, तकिया आणि लोड हीच खरी." यावर तुम्ही काय बोलणार?

घोटाळा असा झाला की, मी प्रथम लोडावर बसलो आणि मग घसरत गादीवर आलो. अजून चर्चा सुरू झाली नव्हती म्हणून मी आरामात दोन्ही पाय पसरले. पण एकदा चर्चा चालू झाल्यावर मला पायावर पाय घेऊन बसावे लागले. चर्चेच्या वेळी प्रकाशझोत इतरांकडे गेला की मी पाय पसरीत असे आणि माझ्यावर प्रकाश आला की मी पाय वर ओढून घेई. आमची चर्चा चालूच होती. "समर्थ आणि शिवाजी महाराज यांची भेट सोळाशे बहात्तरच्या पूर्वी झाली असल्याचा पुरावा नाही. ती बहात्तरमध्ये झाली याचा निश्चित पुरावा आहे. त्यानंतरचे त्यांचे संबंध अतिशय निकटचे होते." हे ठासून सांगताना मी लोडाला पाठ टेकली. तो काय सांगावे? लोड घरंगळत मागे गेला, आणि आम्हीही त्याच्या मागोमाग गादीवर उताणे झालो. माझे

बोलणे चालूच होते. दूरदर्शनवर हा प्रसंग टिपला गेला त्या वेळी या प्रसंगातील विनोद माझ्या लक्षात आला नाही. पण घरी परत आल्यावर जेव्हा सारेच जण मला काळजीच्या स्वरात म्हणू लागले, "बाबा, तुम्ही निजून का बोलत होता? ऐन वेळी प्रकृती बिघडली की काय?" अर्थात ती गोष्ट मला हसण्यावारी न्यावी लागली.

दूरदर्शनवरील तिसरा प्रसंग काहीसा जिद्दीचा ठरला. काही वर्षांपूर्वी उर्दू भाषेचे कविश्रेष्ठ इकबाल यांची जन्मशताब्दी देशभर साजरी करण्यात आली. महाराष्ट्रातही इकबालसंबंधी काही कार्यक्रम करावे असे ठरविण्यात आले. इकबालच्या ग्रंथांचे प्रदर्शन, त्यांच्या वाङ्मयावरील चर्चा-परिसंवाद आणि भाषणे असे बरेच कार्यक्रम या प्रसंगाच्या निमित्ताने मुंबईत आणि इतरत्र करण्यात आले. या कार्यक्रमांपैकी एक भाग म्हणजे दूरदर्शनवरून इकबालच्या काव्याची आणि तत्त्वज्ञानाची चर्चा. हा कार्यक्रम ठरविणाऱ्यांनी एक हेतू मनात बाळगला असावा. महाराष्ट्रात इकबालबद्दल किती आस्था आहे, हे देशातील इतर उर्दू भाषिकांना कळावे हा तो हेतू. चर्चेसाठी महाराष्ट्रीय आणि मराठी भाषिक माणसे असावी, म्हणजे मराठी भाषिकांनाही इकबालबद्दल किती गोडी आहे हे कळून येईल. यासाठी त्यांना उर्दू जाणणारी मराठी भाषिक मंडळी चर्चेसाठी हवी होती. अर्थात चर्चेचे संचालन करण्यासाठी त्यांनी अली सरदार जाफरी यांच्यासारखा प्रतिभाशाली उर्दू कवी इकबालवरील तज्ञ म्हणून निवडला. मराठी भाषिक व्यक्तींमध्ये चर्चा करण्यासाठी म्हणून मी आणि पुण्याचे श्री. श्रीपाद जोशी यांना बोलावण्यात आले. श्री. श्रीपाद जोशी ह्यांचा उर्दूचा अभ्यास दांडगा आहे. त्यांनी उर्दूतील अनेक विषयांवर मराठीत लेखन केले आहे. उर्दू-मराठी कोशाची रचना आणि संपादन ही त्यांची मोठीच कामगिरी आहे. महाराष्ट्रातील उर्दू साहित्य अकादमीचे ते काही वर्षे सभासदही होते. मीही उर्दू साहित्य अकादमीचा सभासद आहे. उर्दू आणि फारसी या साहित्यांतील अनेक विषयांवर माझी आजपर्यंत बारा पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. मिर्झा गालिबच्या उर्दू गजलांचा मराठी अनुवाद मी केला आहे. उर्दू काव्याचा परिचय हा माझा ग्रंथ सर्वमान्य झाला आहे. गेल्या तीस वर्षांत मी माझ्या लेखनाद्वारे महाराष्ट्राला जवळजवळ शंभर उर्दू साहित्यिकांचा परिचय करून दिला आहे.

अली सरदार जाफरी हे उर्दू भाषेचे सुप्रसिद्ध कवी आहेत ह्यात तिळमात्र शंका नाही. डाव्या विचारसरणीचे ते एक प्रमुख लेखक आहेत. कविश्रेष्ठ मीर याच्या काव्याचे त्यांनी उत्कृष्ट संपादन केले आहे. पण चर्चेचे संचालन करण्यापूर्वी त्यांना आमच्याबद्दल एक तर संपूर्ण माहिती देण्यात आलेली नसावी, किंवा चर्चेच्या माध्यमातून उर्दू किती लोकप्रिय बनत चालली आहे हे दाखविण्याचा मोह त्यांना स्वतःला टाळता आला नसावा. आमचे उर्दूचे ज्ञान तितपतच असावे आणि तेही नुकतेच मिळविलेले असावे अशा समजुतीने ते प्रश्न विचारीत होते. चर्चेचा विषय

इकबालचे तत्त्वज्ञान हा होता हे त्यांच्या लक्षात राहिले नाही अगर इतकी झेप आम्हांला नसावी असे त्यांना वाटले असले पाहिजे. काहीशा ऐटीच्या स्वरातच त्यांनी आम्हांला प्रश्न विचारायला सुरुवात केली, ''तुम्ही उर्दूकडे केव्हा वळलात? उर्दूसंबंधी प्रेरणा तुमच्या मनात कशी निर्माण झाली? तुम्ही उर्दूचा काय अभ्यास केला आहे?''

चर्चा कशाची आणि प्रश्न काय? पण माझे मित्र श्री. जोशी हे शांतपणे त्यांना उत्तरे देत होते. तेच प्रश्न अली सरदार जाफरींनी मला विचारले. मी त्यांना म्हटले, ''अनावश्यक गोष्टी विचारणे थांबवा आणि मूळ मुद्द्यांवर या. ज्या चर्चेसाठी आपण इथे जमलो आहोत त्याची माहिती आम्हांला काही असलीच पाहिजे म्हणून तर इथे जमलो आहोत. जाफरी साब, छोडिये इन बातोंको. हम इकबाल के फिलसुफे के बारे में बहस करने के लिये यहाँ जमा हुए हैं, उसके मुतालक सवालात पूछिये. आप उर्दू कबसे सीखने लगे, क्यों सीखने लगे ऐसे सवाल कोई माने नहीं रखते.''

माझ्या या बोलण्यामुळे दूरदर्शनच्या कार्यक्रमात व्यत्यय येतो, म्हणून कार्यक्रम थांबवून चर्चा पुन्हा सुरू करण्यात आली. इकबालच्या तत्त्वज्ञानाची चर्चा सुरू झाली. मी मूळ मुद्द्यालाच हात घातला. मी म्हटले, ''इकबालचे खुदीचे (अस्मितेचे) तत्त्वज्ञान हे त्याने भारतीय परंपरेतून घेतले आहे.'' यावर अलीसाहेब जाफरी म्हणाले, ''काय? इकबालचे तत्त्वज्ञान कुराणावर आधारलेले नाही?'' मी म्हटले, ''त्याचा प्रत्यक्ष संबंध भारतीय परंपरेशी पोचतो. इकबालने अस्मिता हा शब्द वापरला आहे. त्याचा अर्थच मुळी लोकांना गोंधळात टाकणारा आहे. खुदीला एकदा तो स्वतंत्र स्थान देतो, तर कधी आत्म्याच्या जागी खुदी हा शब्द वापरतो. त्याच्या विचारसरणीला कुराणात आधार नाही. इकबाल जेव्हा अस्मितेवर (खुदीवर) भर देतो तेव्हा सृष्टीतील चैतन्यशक्तीवर तो भर देतो. 'सामर्थ्य आहे चळवळीचे' हे त्याचे सूत्र आहे. चळवळ, चैतन्य, खुदी हे त्याचे तत्त्व आहे. कुराणात असे मानलेले नाही.'' ''मग इकबालने हे तत्त्वज्ञान कुठून घेतले?'' असे जाफरींनी मला विचारले. मी त्यांना म्हटले, ''अहो, सरळ गोष्ट आहे. इकबाल हा काश्मिरी. तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी. काश्मिरी शैव संप्रदायाचा अभ्यासक. वसुगुप्ताने नवव्या शतकात सुरू केलेला आणि अभिनवगुप्ताने पुढे वाढविलेला हा शैव संप्रदाय. यातील स्पंदनशास्त्र हीच इकबालची चैतन्यमय खुदी आहे.'' माझ्या या बोलण्याने अली सरदार जाफरी स्तब्ध झाले. त्यांनी आजपर्यंत बहुधा काश्मीरचा शैव संप्रदाय आणि त्याची वैशिष्टचे यांचा अभ्यास केला नव्हता हे उघड दिसले. इकबालच्या तत्त्वज्ञानाचा साधा चैतन्यशक्तीपुरता या संप्रदायाशी जुळतो हे भल्या भल्या इकबालभक्तांना माहीत नसते. कारण या दृष्टीने त्यांचा अभ्यास झालेलाच नसतो.

त्यानंतर मला काय प्रश्न विचारावा हे न सुचून ते आम्हा दोघांना काही किरकोळ प्रश्न विचारून वेळ घालवू लागले. थोड्याच वेळात मुलाखत संपली. त्यानंतर माझी आणि जाफरी यांची गाठ पडली नाही. पण दूरदर्शनवरील आमचा कार्यक्रम झाल्यावर मला अनेक फोन आले. त्यात माझे दक्षिणी मुसलमान मित्र होते. ते मला म्हणाले, ''मुबारक हो. अली सरदार जाफरींना निरुत्तर करणारे तुम्हीच एक भेटलात. आम्हांला आनंद झाला.''

दूरदर्शनवरचा आणखी एक प्रसंग मोठा गमतीचा आहे. मराठीतील तमाशा रंगभूमी किंवा लोकनाट्य आणि उर्दू साहित्य अशांसारख्या एका विषयावर दूरदर्शनवर चर्चा होती. ध्वनिमुद्रणाच्या वेळी (रेकॉर्डिंग) आम्ही तिघे जण जमलो होतो. मी आणि माझे दोन जिव्हाळ्याचे मित्र विद्याधर गोखले आणि सुप्रसिद्ध तमाशा कलावंत कै. इनामदार. संचालन मुंबई विद्यापीठाचे प्राध्यापक युनूस आगासकर हे करीत होते. दूरदर्शनचे अधिकारी मला म्हणाले, ''विषयाला साजेसे कपडे घालता येणार नाहीत काय ?''

मी म्हटले, ''मला ते जमणर नाही. मी बुशकोट आणि पॅंटवरच भागवीन.'' गोखल्यांनीही तसेच सांगितले. पण इनामदार मला म्हणाले, ''माधवराव, मी अशा प्रसंगासाठी आपले कपडे बॅगमध्ये बरोबर घेऊन येतो. मी कपडे बदलून येतो.'' असे म्हणून ते जवळच्या खोलीत गेले. थोड्या वेळाने ते बाहेर आले, ते आमूलाग्र बदललेले दिसले. चुडीदार पायजमा, उत्तमशी काळ्या रंगाची शेरवानी आणि डोक्याला बांधलेला झोकदार फेटा. मला इनामदार ओळखू येईनात. मी त्यांना म्हटले, ''इनामदार! कमाल केलीत बुवा! तुमच्यापुढे माझे आणि गोखल्यांचे बुशकोट आणि पॅंट असले कपडे कुणाच्या नजरेत भरणार आहेत ?''

चर्चा चालू असताना दूरदर्शनचे कर्मचारी पुरुष आणि महिला कामासाठी म्हणून अधूनमधून खोलीत येत आणि इनामदारांकडे एक नजर टाकून जात. मी त्यांच्याकडे अधूनमधून मिस्किलपणे पाहत राही. इनामदार मोठे प्रसन्न दिसत होते. मराठी तमाशाचा त्यांचा अभ्यास गाढा असल्यामुळे चर्चेत त्यांचा वाटा फार मोठा होता यात शंका नाही. चर्चा खेळीमेळीची झाली आणि आम्ही पांगलो.

पुढे लवकरच आमचा हा कार्यक्रम दूरदर्शनवर दाखवण्यात आला. त्यालाही दोन-तीन दिवस झाले; आणि मला या कार्यक्रमासंबंधी मोठा मजेशीर अनुभव आला. त्या काळात मी संशोधनकार्यासाठी एशियाटिक सोसायटीत जात असे. संध्याकाळी चार-साडेचारपर्यंत तेथे काम करून मी घरी जायला बोरीबंदर स्टेशनाकडे निघे. वाटेत नेहमीच्या सरावाच्या माझ्या एका उडपी हॉटेलमध्ये मी चहा घेण्यासाठी जात असे. हॉटेलचा मॅनेजर मला नेहमी पाही. क्वचित एखादे वेळी कन्नडमधून एक-दोन शब्द बोले. त्यापलीकडे नाही. पण दूरदर्शनवरील कार्यक्रमानंतर मी जेव्हा हॉटेलमध्ये गेलो

तेव्हा त्याने माझे भलतेच अगत्यपूर्वक स्वागत केले. त्याने माझ्यासाठी स्पेशल चहा आणला. गरम गरम वडे आवर्जून खाऊ घातले. पैसेबियसे काही घेतले नाहीत. त्याच्या वागणुकीची मला मोठी गंमत वाटली. मी हॉटेलातून निघते वेळी तो मोठ्या प्रसन्नपणे मला म्हणाला, ''परवा मी तुम्हांला टी.व्ही.वर पाहिले. तुम्हांला पाहताच मी ओळखले की आपल्या हॉटेलमध्ये येणारे ते हेच.''

त्याच्या या बोलण्याने मी भलताच खूष झालो. मी विनयाने म्हटले, ''कार्यक्रम आवडला का? तुम्ही मला कसं ओळखलंत?''

त्यावर तो मोकळेपणे हसून म्हणाला, ''अहो, कार्यक्रम पाहिला ना! तुम्हांला न ओळखणं कसं शक्य आहे? काळी शेरवानी आणि रुबाबदार फेटा या पोशाखात तुम्ही काय छान दिसत होता!''

मी सर्द झालो. हा शहाणा इनामदारांनाच मी समजून माझी तारीफ करीत होता. यावर मी काय बोलणार? ''वा! छान!'' असे म्हणून मी तिथून पळ काढला.

❖ ❖

# आणि जोगळेकरांनी मिशा ठेवल्या !

माझी भाषणे ऐकून व लेख वाचून लोक माझ्या स्मरणशक्तीबद्दल चांगले उद्गार काढतात. मला इतिहासाचा आणि इतर आवडीच्या विषयांचा छंद असल्यामुळे सततच्या अभ्यासातून आणि पुनरुच्चारांनी त्या घटना व तारखा लक्षात राहतात. पण ज्या विषयाची मला आवड नाही त्यासंबंधीचे माझे ज्ञान तुटपुंजेच नाही तर नगण्यच म्हणावे लागेल. उदाहरणेच घ्यायची तर वनस्पतिशास्त्र, खगोलशास्त्र, गणित इत्यादी शास्त्रे. चार झाडांची नावे सांगू शकेन, पण ती ओळखू शकेनच असा आत्मविश्वास नाही. बाजारातून शंभर वेळा फुले आणली असतील पण अबोली, सायली, शेवंती, मोगरा, जाईजुई यांचे बारकावे लक्षात ठेवावेसे वाटले नाही. भाजीपाल्याच्या बाबतीत असेच. अनेक वर्षांच्या सवयीने मेथी व पालक तेवढी ओळखता येऊ लागली आहे. लाल माठ रंगामुळे ओळखू येतो. पण घोळ, चवळी, मायाळू, राजगिरा, आंबट चुका, अंबाडी इत्यादी पालेभाज्यांबद्दल माझे ज्ञान अगाध आहे.

अधिकाऱ्याचे एक कर्तव्य असते म्हणून मी सुरुवातीस पत्ते खेळण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण मन इतिहासात भरकटत असल्यामुळे हे क्षेत्र आपले नाही हे लवकरच ध्यानात आले, आणि तो नाद मी सोडून दिला. त्या पूर्वाश्रमातील आठवणी अद्याप सूत्ररूपाने शिल्लक आहेत. ''सेकंडहँड लोएस्ट (का हाय्येस्ट), थर्डहँड हाय्येस्ट,'' ''कव्हर ऑनर विथ ऑनर,'' ''व्हेन इन डाउट प्ले ट्रंप'' ही प्रस्थानत्रयी तेवढी लक्षात राहिली आहे. गणितात बेरीज, वजाबाकी, भागाकार आणि गुणाकार यापलीकडे मी सरकलोच नाही.

म्हणजे स्मरणशक्तीचा स्वत:च्या छंदाशी मोठा घनिष्ट संबंध असावा. इतिहासातील शेकडो घटना आणि तितक्याच तारखा मला तोंडपाठ आहेत. अनेक लहानमोठ्या घराण्यांच्या वंशावळी माझ्या डोळ्यांसमोर सतत नाचत असतात. कदाचित मी मनातल्या मनात या गोष्टींत रममाण होत असल्यामुळे समोरच्या ओळखीच्या माणसाच्या कपड्यालत्त्यांत, अगर दाढीमिश्यांत, अगर चष्मा लावण्यात फरक दिसला की त्या माणसाची ओळख पटत नाही. यामुळे माझी तारांबळ उडण्याचे प्रसंग काही थोडेथोडके आले नाहीत. माझे मित्र वामनराव नातू आणि वा. ल. कुलकर्णी, प्राध्यापक ग्रामोपाध्ये आणि नांदेडचे पुढारी देशपांडे यांची मी अशीच गल्लत करीत असे.

कन्नमवारांना नेहमी खादी पायजमा आणि शर्ट यात पाहण्याची मला सवय, पण साहित्य संस्कृती मंडळाच्या उद्‌घाटनाच्या समारंभासाठी ते नागपूर मुक्कामी आले आणि श्रोत्यांत येऊन बसले ते सुटाबुटात. त्यांना हुडकून काढताना माझी परिस्थिती अगदी केविलवाणी झाली होती.

माझे मित्र श्री. जोगळेकर हे एक प्रभावी लेखक आहेत. वीर सावरकर यांची परंपरा त्यांनी कित्येक वर्षे जोपासली आहे. त्यांचे निर्भीड विवेचन हे त्यांचे अमोघ शस्त्र आहे. ते घणाचे घाव घालतात आणि इतरांनाही तेच करण्यास सांगतात. माझी भूमिका याउलट आहे. साधने बाहेर काढा, सत्य आपोआप बाहेर येईल. साधनांशिवाय क्षोभ करून घेणे किंवा निर्माण करणे हे आपल्याला पटत नाही. आणि मग कथाकादंबरीकारांची व प्रचारकांची या साधनांमुळे तारांबळ उडते.

औरंगजेबाच्या दरबारची बातमीपत्रे फारसी भाषेत आणि हस्तलिखितांत आहेत. मी त्यांचे चार खंडांत भाषांतर केले आहे. याशिवाय औरंगजेबाचा वेगळा पत्रव्यवहार आहे. त्याचा अहकामे आलमगिरी, औरंगजेबाचे आदेश हा पत्रसंग्रह त्याच्या शेवटच्या चार वर्षांतील आहे. त्याचाही मी मराठी अनुवाद केला आहे. वरील ऐतिहासिक साधनांतून औरंगजेबाची अस्सल प्रतिमा व त्याचे उद्‌गार बाहेर पडतात.

त्याच्या लेखी मराठ्यांचा उल्लेख काफर, गनीम, बंडखोर, दुष्ट, उलट्या काळजाचे, फुटक्या नशिबाचे, परमेश्वराच्या कोपाला बळी पडलेले, हलकट, कोल्ह्याच्या वृत्तीचे असा होतो. शिवाजी, संभाजी, राजाराम इत्यादींचा उल्लेख जहन्नमी (नरकवासी) असा होतो. आणि त्याचे हे उद्‌गार पाहा : 'मी काफरांशी (मराठ्यांशी) जिहाद (धर्मयुद्ध) करीत आहे. मला पाठिंबा देणे हे प्रत्येक मुसलमानाचे कर्तव्य आहे.', 'काफरांना मी आपल्या तरवारीचे पाणी पाजीन.', 'सोमनाथाच्या देवळात हिंदू अद्याप पूजा करीत असतील तर ती ताबडतोब थांबवा आणि देऊळ नष्ट करून टाका.', 'द्वारकेचे देऊळ मोडून टाका.', 'पंढरपूरचे देऊळ जमीनदोस्त करा.', 'उत्सव बंद पाडा आणि देवळात गोहत्या करा.'

पण त्याच्या अखेरच्या पत्रांतील उद्‌गार निवळलेला व गोंधळलेला औरंगजेब दाखवितात. औरंगजेबाने आपला भाऊ मुराद बख्श व पुतण्या सुलेमान शुकोह यांची हत्या केली होती. पन्नास वर्षांनंतर त्याला त्याची आठवण झाली असावी. त्याने आज्ञा केली की दोघांच्या कबरींना चिरे पडले आहेत, ते दुरुस्त करण्यात यावेत आणि कबरीसाठी कुराण-पठणासाठी एक व सेवेसाठी एक अशी दोन माणसे तेथे नेमण्यात यावीत. हा पश्चात्तापच म्हणावा की खाई त्याला खवखवे असा प्रकार समजावा? ज्या भावांना त्याने मारले त्यांच्या मुलांनाच त्याने आपले जावई करून घेतले! तोही प्रकार

वरीलप्रमाणे असावा, पण त्याने जावयांना कामगिऱ्या दिल्या नाहीत. वर्षासने देऊन दिल्लीत ठेवले.

मोगल-मराठा संघर्षात हट्टी व जिद्दी अशी औरंगजेबाची प्रतिमा आहे. पण १७०५ मध्ये सततच्या युद्धाने तो किती हैराण झाला होता आणि गोंधळला होता यासंबंधीचे पुढील पत्र पाहा :

''शिवाजी व त्याचे मुलगे जिवंत असेपर्यंत त्यांच्यापाशी बारा हजाराहून अधिक स्वार होते असे ऐकिवात नव्हते. आणि आता आम्हांला पुन्हा पुन्हा कळविण्यात येते की हलकट गनिमांची तीस-तीस चाळीस-चाळीस हजार स्वारांची सैन्ये सर्वत्र पसरली आहेत. ही सैन्ये गुजरात व माळवा प्रांतांत जात आहेत. आमच्यासमोर येणारी बातमीपत्रे पाहता मराठ्यांचे सैन्य दोन लाख स्वारांपर्यंत जावे. हे प्रकरण म्हणजे एक गूढ आहे. तुम्हांला (खान फिरोज जंग यांना) अनेक गोष्टींची माहिती आहे. या किड्यामुंग्यांचा (मराठ्यांचा) नि:पात व्हावा, मुसलमानांच्या संपत्तीवर अब्रूवर ते घाला घालीत आहेत, हे आक्रमण संपुष्टात यावे याबद्दल तुम्हांला ज्या योजना योग्य वाटतात त्या सुचवीत चला.''

कुठली जिद्द, कुठला निर्धार? हा तर थकला भागलेला माणूस आहे. चिखलात फसला आहे. मागे जाववत नाही, मराठ्यांशी तडजोड करवत नाही. कारण त्यांनी सारी दक्षिण आधीच घशात घातली आहे. आणि तरीही हळूहळू रेटीत वाटचाल करणारा हा माणूस आहे.

मी जोगळेकरांना म्हटले, ''अशी साधने काढा. तुमच्या आक्रमक भाष्याची आवश्यकता राहणार नाही. तुमचे संशोधन होईल आणि लोकांचे इतिहास प्रबोधनही होईल.''

जोगळेकर म्हणाले, ''हा ज्याचा त्याचा स्वभाव आहे. आम्ही घणाचेच घाव घालणार. तुम्ही एखादा दणदणीत लेख तर लिहा. मग बघू.''

यानंतर काही दिवसांनी मला भाषणांच्या निमित्ताने नाशिकला जावे लागले. नाशिक व नाशिकचा इतिहास यांबद्दल मला नेहमी कुतूहल वाटे. आजचे गजबजलेले नाशिक (दक्षिणवाहिनी गोदावरीच्या पश्चिम काठावर) हे पेशव्यांनी निर्माण केलेले १७५२ चे नाशिक आहे. पूर्व तटावरील पंचवटी हे प्राचीन स्थान आहे. पण नाशिक नगर हे १७५२ पर्यंत गोदावरीच्या दक्षिण तीरावरील नऊ टेकड्यांवर वसले होते. महानुभाव संस्थापक श्री चक्रधर यांनी पंचवटीतील रामनाथ, कपालेश्वर, रामकुंड, पश्चिम काठावरील सुंदरराम व नाशिक नगरीतील महालक्ष्मी व कालिका या स्थळांचे वर्णन केलेले आहे. (इ. स. १२७२ पूर्वी)

मोगल कालात महालक्ष्मीचे देऊळ नष्ट झाले (इ. स. १६३६). त्या जागेवर आता भव्य मशीद उभी आहे. इतर देवालयांना किती उपसर्ग झाला समजण्यास मार्ग नाही. पण पंचवटीचा राम, सुंदरराम, लक्ष्मीनारायण इत्यादी देवालयांचा जीर्णोद्धार अगर नवनिर्मिती ही पेशवेकाळातील आहेत.

माझे कुतूहल जागृत झाले ते जुन्या नाशिकमधील टेकडीवरील सादिकशहाच्या दर्ग्याने. दर्ग्याला जहागिरी व इनाम जमिनी असून तेथे दर वर्षी उरूस भरतो. या साधुपुरुषाचा काळ शोधावा म्हणून मी दर्ग्यावर गेलो. सत्तावीस रुपये देऊन मी नुकत्याच घेतलेल्या कोऱ्या करकरीत चपला पायऱ्यांपाशी ठेवल्या होत्या. मी वरून परत येईपर्यंत सादिकशहाच्या कोणा भक्ताने त्या पळविल्या. आणि मग रणरणत्या उन्हात मला चपलांचा नवीन जोड विकत घ्यावा लागला.

सादिकशहा मूळ अरबस्तानातला. भटकत भटकत तो हिंदुस्थानात आला. गुजरातेत काही दिवस वास्तव्य केल्यावर तो नाशिकला येऊन स्थायिक झाला. टेकडीवर जोग्यांचा मठ होता. जोग्यांना मठातून त्याने हाकलून लावले, आणि मठाचा ताबा घेतला, तेथेच त्याचा दर्गा आहे. त्याचा मृत्यू इ. स. १६४० मध्ये झाला.

(कोकणातील मुस्लिम जमातीला कोकणी मुसलमान म्हणतात. आपले मुख्य मंत्री बॅरिस्टर अंतुले हे या जमातीचे आहेत. या जमातीची मातृभाषा कोकणी म्हणजे मराठीची बोलीभाषा आहे. जसे इराणमधील छळाला कंटाळून पारशी हिंदुस्थानात आले तसे तेराशे वर्षांपूर्वी अरब सुभेदाराच्या जुलुमाला कंटाळून शेकडो अरब निर्वासित कोकणपट्टीत आणि मद्रासच्या किनाऱ्यावर उतरले. नव्याने आलेल्या या निर्वासितांना लोक 'नवायत' (नवागत) अगर नायते म्हणू लागले. व्यापार, दर्यावर्दीपणा अशा व्यवसायांत ही माणसे असत. धर्मशास्त्रात प्रवीण अशी अनेक माणसे त्यांच्या जमातीत होऊन गेली. राजकारणात हे लोक फार पुढे सरकले नाहीत.) अर्काटचा नवाब आणि कल्याण-भिवंडीचा मोगल फौजदार मातबरखान ही दोनच नावे त्यांच्यात प्रमुख दिसतात. मातबरखान याजकडे नाशिक, कल्याण व भिवंडी हा प्रदेश होता (१६८० ते १७०५). त्याच्या मृत्यूनंतर तो प्रदेश चौदा वर्षे सांभाळला गेला. चौतीस वर्षांच्या या दीर्घ काळात नाशिकला अनेक कोकणी मुस्लिम कुटुंबे स्थायिक झाली. नाशिकला अद्यापही मातबरपुरा नावाचा पुरा आहे.

आज नाशिकला कोकणी मुसलमान बरेच आहेत. त्यांच्यापैकी काही महापौर वगैरे पदांवर होते. कोकणी मुसलमान हे गोरे आणि तीक्ष्ण बुद्धीचे आहेत. नाशिककरांना यांपैकी काहीच माहीत नाही. गालिबवरील भाषणासाठी मी नाशिकला गेलो होतो तेव्हा माझे स्वागत नगरपालिकेच्या देखण्या व रुबाबदार महापौरांनी केले. माझे मित्र

मणिलाल देसाई मला हळूच म्हणाले, "पाहिलंत, कसं व्यक्तिमत्व आहे? अहो, हे सगळे बाटलेले कोकणस्थ ब्राह्मण."

मी एकदम स्तिमित झालो. त्यांना कोकणी मुसलमान हा शब्दच ठाऊक नव्हता. मातबरखान आणि अर्काटचा नबाब दूरच राहिले. अर्धा तास मी त्यांना सर्व काही समजावून देत होतो. मग मणिलाल यांचा गैरसमज दूर झाला.

सादिकशहाने मठातून जोग्यांना हाकलले, हे माझे आणखी एक मित्र आदिवासी कार्यकर्ते श्री. परदेशी ग्रांच्या कानांवर गेले असावे. त्यांनी जोग्यांचा केला जोग आणि त्यांना ओढले धर्मांतरात आणि मला पत्राद्वारे हृदयद्रावक कहाणी ऐकविली. ते पडताळून पाहण्यासाठी सादिकशहासंबंधी मी माहिती मिळवू लागलो. एक उर्दू बखर हाती लागली. सादिकशहाच्या वंशजांकडून (त्यांना पीरजादे म्हणतात.) काही कागदपत्र मिळाले. महालक्ष्मीची मशीद करण्याचे काम शहाजहानचे दिसते. सादिकशहाचा त्या गोष्टीशी संबंध नाही. जोग्यांना मठातून हाकलून लावण्याचे काम मात्र त्याचे आहे. काही जोग्यांची त्याने धर्मांतरे घडवू आणली व नाशिकमध्ये प्रथम इस्लामचा झेंडा रोवला, असे त्याच्या मृत्युतिथीवरच्या श्लोकात लिहिले आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासाला अंशत: तरी साहाय्यभूत होतील अशी हजारो कागदपत्रे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरील मठामठांतून विखुरलेली आहेत. त्यांपैकी श्री रामदासी वाङ्मयाच्या संशोधनाचे प्रचंड कार्य धुळ्याचे देव यांनी पार पाडले. त्यांच्या परिश्रमाला तोड नाही.

मुसलमान सूफी, साधू, फकीर, पीर यांचे मठ भारतात शेकडोंनी आहेत. त्यांना दर्गे अगर खानका (मोनास्ट्री) म्हणतात. मुस्लिम सूफींचे (अध्यात्मवादी) चार प्रमुख पंथ चिश्ती, कादी, सुरहवर्दी व नक्शबंदी हे भारतभर पसरले आहेत. मठाधिपतींनी राजसत्तेचे साहाय्य घेतले, वर्षासने मिळविली, नोकऱ्या पत्करल्या, धर्मयुद्धे केली. सारांश आक्रमक प्रचारकांचे काम (काही अपवाद वगळता) चोख बजावले. हे सूफी साधू सज्जन, निरुपद्रवी, जातीय ऐक्याचा संदेश पसरविणारे शांतिस्वरूप होते अशी प्रतिमा प्राध्यापक अर्नाल्ड यांनी आपल्या 'प्रीचिंग ऑफ इस्लाम' या ग्रंथात मांडली. महाराष्ट्रातील फाटक आदी विद्वानांनी ती मानली.

अलीकडे मुस्लिम मठातून अक्षरश: हजारो कागदपत्रांचा अभ्यास करून प्राध्यापक ईटन यांनी आपला ग्रंथ 'विजापूरचे सूफी' हा प्रसिद्ध केला आहे. त्यातील माहितीवरून सुरुवातीच्या सूफींच्या युद्धपिपासू वृत्तीवर आणि नंतरच्या सूफींच्या सत्तेसमोर नाकदुऱ्या काढण्याच्या वृत्तीवर प्रकाश पडतो. हैदराबादच्या मठातील कागदपत्रे कित्येक हजार आहेत. त्यांचे संशोधन अलीगड, हैदराबाद, दिल्ली इत्यादी ठिकाणी चालू आहे.

सूफी साधुसंतांचे बखर वाङ्मय म्हणजे चमत्कारांचे भेंडोळे. राज्यकर्त्याशी जवळीक साधण्याचा असा केविलवाणा प्रयत्न आपल्या मराठी संतचरित्रांतही आढळतो. मेलेली माणसे जिवंत करणे, मांसपदार्थाचे फुलांत रूपांतर करणे, साप अंगावर चढविणे, गुप्त होऊन दुसरीकडे प्रकट होणे, मनाला न पटेल इतकी वर्षे जगणे, या सर्व गोष्टी चमत्कारांत बसतात.

सादिकशहाच्या बखरीवरून पाहिले तर त्याला जवळजवळ दीडशे वर्षांचे आयुष्य लाभले होते. त्याच्यात आणि त्याच्या बायकोच्या वयात ऐंशी वर्षांचे अंतर होते. तरी परमेश्वराने त्यांना पाच मुले दिली. बापाविरुद्ध बंड करून आलेला शहाजहान आश्रयासाठी फिरत फिरत नाशिकला आला (इ. स. १६२६). तेव्हा सादिकशहाने त्याला आशीर्वाद दिला की, ''तू बादशहा होशील.''

अर्थात शहाजहानच्या चरित्रात सादिकशहाचे नावही येत नाही. सादिकशहाच्या मृत्यूनंतर त्या घराण्याला दर्ग्याच्या उरुसासाठी जहागिरी देण्यात आल्या.

शहाजीराजे हे मोगलांतर्फे लष्करी प्रशासक होते. मोगलांविरुद्ध त्यांनी १६३१ अखेरीस बंड केले. हे युद्ध १६३६ पर्यंत चालले. तोपर्यंत शहाजीराजांनी नाशिकचा ताबा सोडला नाही. शिवाजी महाराजांचे बालपण नाशिकला गेले, तेही जुन्या नाशिकमध्येच.

सादिकशहाच्या बखरीचे नाव 'गुल्जार सादिक'. त्याची चिकित्सा करून मी एक दणदणीत लेख लिहिला. मी आपल्या लेखावर बेहद्द खूष होतो. 'लोकसत्ते'च्या दिवाळी अंकासाठी तो लेख द्यावा असे मी ठरविले होते. पण लेख पाठविण्यापूर्वी तो जोगळेकरांना दाखवायचा माझा निश्चय होता. आमचे तंत्र साधने उघडी करून प्रबोधन घडवून आणण्याचे आहे हे त्यांना पटवून द्यायचे होते.

मी तो लेख घेऊन एशियाटिक सोसायटीत गेलो. माझी बसण्याची जागा एका हॉलमध्ये होती. समोरच्या खुर्च्यांवर जोगळेकर, ज्ञानेश्वरीचा हिंदी अनुवाद करणारे कुमठा, अशोक शहाणे, मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्राध्यापक पुरोहित हे बसले होते. हॉलमध्येच पण पलीकडच्या खिडकीजवळ दुर्गा भागवत बसतात. बाकीचे संशोधक अधूनमधून ये-जा करतात. जवळच्या हॉलमध्ये चित्रपट-लेखक रामचंद्र ठाकूर, मराठी कादंबरीकार र. वा. दिघे, अर्थशास्त्रज्ञ शहा व अधूनमधून भारतीय विद्याभवन कॉलेजच्या इतिहासाच्या प्राध्यापिका मिसेस देशमुखही बसत.

मी हॉलच्या दारात पाऊल ठेवले मात्र, तो समोरून जोगळेकर येताना दिसले. मी चटकन त्यांना अडविले आणि म्हटले, ''नमस्कार महाराज. आज तुमची सुटका नाही. तुमच्या मनासारखा मी लेख लिहून आणला आहे – तो तुम्हांला ऐकावा लागणार आहे.''

मराठी ग्रंथालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3533
२६९२३

ते शांतपणे (शांतपणा जोगळेकरांच्या खळखळणाऱ्या व्यक्तिमत्त्वात बसत नाही.) म्हणाले, ''ऐकतो.'' हॉलमधील माझ्या जागेजवळील मंडळींना उपसर्ग नको म्हणून आम्ही लगतच्या दुसऱ्या हॉलमध्ये गेलो.

मी लेख काढून वाचण्यास सुरुवात केली. जोगळेकर काळजीपूर्वक ऐकत होते. एन्शंट मरिनर काव्यातील नावाड्याप्रमाणे मी त्यांना कोंडले होते. माझी दृष्टी त्यांच्यावर खिळली होती. ते काही बोलत नव्हते. माझे वाचन शांतपणे ऐकत होते. जोगळेकर शांत बसणारे नाहीत. वाहवा, क्या बात है असे म्हणून दाद देतील. क्षोभ झाला तर शेलकी शिवी द्यायलाही मागेपुढे करणार नाहीत. मग या खेपेस जोगळेकर शांत कसे ही शंका एकदा-दोनदा मनाला चाटून गेली. पण लेख गंभीर स्वरूपाचा असल्यामुळे त्याचे ते मनन करीत असावेत असे समजून मी ती शंका झटकून टाकली.

माझे वाचन संपल्यावर मी काहीशा अभिमानाने त्यांना म्हटले, 'कसा वाटला लेख ?'' ते शांतपणे म्हणाले, ''बरा आहे.'' जोगळेकरांची प्रतिक्रिया अगदी वेगळी अनुभवायला येई. पाठीवर थाप मारणे, वाह वाह, फार छान अशा शब्दांची खैरात ते करीत. पण आज तसे काही झाले नाही. पुन्हा मी हीच कल्पना केली की, मी वाचलेल्या लेखाचे ते दीर्घ चिंतन करीत आहेत.

मी तेथून उठून बाहेर आलो आणि लायब्ररीतील पुस्तके न्याहाळून थोड्या वेळाने आपल्या खुर्चीवर जाऊन बसलो. जोगळेकर समोरच येऊन बसले होते. काही तरी बोलावे म्हणून मी त्यांना म्हटले, ''बरं झालं जोगळेकर, तुम्ही माझा लेख ऐकला. आता तो लोकसत्तेसाठी पाठवायला हरकत नाही.''

जोगळेकर म्हणाले, ''कोणता लेख ?''

मी म्हटले, ''असं काय करता ? आत्ता पलीकडच्या हॉलमध्ये नाही का तुम्हांला वाचून दाखविला ?''

जोगळेकर आश्चर्याने म्हणाले, ''माधवराव, कमाल आहे तुमची. अहो, मी गेले दोन तास येथे अभ्यास करीत बसलो होतो. तुम्ही आणखी कुणाला तरी लेख ऐकविला असला पाहिजे.''

मी म्हटले, ''आणखी कोण ?'' माझे डोके गरगर फिरू लागले. जोगळेकर उठले आणि पलीकडच्या हॉलमध्ये गेले. परत येऊन ते मला म्हणाले, ''माधवराव, अहो ते प्राध्यापक मालशे.''

मी म्हटले, ''अरे देवा. मालशे हे माझे जुने मित्र आहेत. पण त्यांच्या भेटी झाल्या तर दादर-वांद्रे भागात होतात. एशियाटिक सोसायटीत मी त्यांना क्वचितच पाहिले असेल. मी त्यांनाच जोगळेकर समजून त्यांच्या डोक्यावर लेख आदळावा ही गोष्ट घडली कशी ?''

नंतर मी आपला लेख जोगळेकरांना वाचण्यास दिला. त्यांना तो लेख अतिशय आवडला आणि त्यांनी आपल्या पद्धतीने त्याची दादही दिली.

मी मात्र अत्यंत खजील झालो. प्रा. स. गं. मालशे म्हणजे सौजन्यमूर्ती. धन्य त्यांच्या शांततेची. सगळा लेख ते शांतपणे ऐकत होते. एकदाही त्यांनी मला म्हटले नाही, 'माधवराव, मी कधी लेख लिहा म्हटले? मला तुम्ही का ऐकवीत आहात?'

आपला लेख ऐकविण्याच्या नादात मी मालशांकडे नीट पाहिले नसावे. जोगळेकर आणि मालशे यांच्यात आश्चर्यकारक साम्य आहे. याचाही माझ्या मनावर परिणाम झाला असावा. लहानसहान शंका मनाला शिवल्या तरी जाणवल्या नाहीत.

इतक्यात मालशेच आमच्याकडे आले. मी लगबगीने उठून त्यांना म्हटले, "अहो मालशे, माफ करा बुवा. मी तुम्हांला जोगळेकर समजून माझा लेख ऐकविला. केवढी माझी चूक? तुम्हांला मी विनाकारण त्रास दिला. एकदा तरी तुम्ही मला अडवायचं?"

मालशे मृदू हास्य करीत म्हणाले, "अहो, मी कशाला अडवू? मी मालशे म्हणूनच तुम्ही मला लेख ऐकवीत आहात याची मला खात्री होती. तुम्ही मला जोगळेकर समजत आहात अशी मला तिळभरही शंका आली नाही. शासनाने क्रमिक पुस्तकात योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी जी समिती नेमली आहे तिचे कार्य मी करतो. त्यासाठी असे लेख मध्ययुगीन महाराष्ट्रावर प्रकाश पाडणारे म्हणून मला उपयुक्त वाटतात. तुमचे आणि माझे इतक्या वर्षांचे संबंध पाहता तुम्ही कौतुकाने मला तुमचा लेख वाचून दाखविला याचं मला समाधान वाटलं." मालशांचे उत्तर ऐकून मला भलताच दिलासा वाटला.

मी जोगळेकर आणि मालशे या दोघांकडे पाहिले आणि म्हटले, "तुम्हांला स्वत:लाच आपल्यातील साम्य जाणवेल. माझ्यासारख्यांची पुन्हा पंचाईत होऊ नये यासाठी निदान जोगळेकरांनी तरी मिशा ठेवाव्या. नाही तर पुन्हा घोटाळा व्हायचा!"

आम्ही हसलो आणि चहासाठी उठलो. हास्यविनोदात चहाच्या पेल्यातील वादळ शमले.

काही दिवसांपूर्वी मी एशियाटिक सोसायटीत गेलो असताना जोगळेकर भेटले. त्यांनी आता खरोखरच मिशा बाळगल्या होत्या. जोगळेकर-मालशे अशा घोटाळ्याचे आता कारण राहिले नव्हते. आज मात्र हे वाचायला प्राध्यापक मालशे आमच्यात नाहीत याचे दु:ख होते.

❖ ❖

# इतिहासातील खरे-खोटे

एके दिवशी सकाळी उठून मी आज काय कार्यक्रम पार पाडावा याची मनातल्या मनात जुळणी करीत बसलो होतो. सकाळी थोडा वेळ वर्तमानपत्राचे वाचन, नंतर जेवणाच्या वेळेपर्यंत औरंगजेबाच्या दरबारच्या फारशी बातमीपत्रांचा अनुवाद, भोजनानंतर एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात जाऊन औरंगजेबकालीन मुहमदअली याच्या मृत्युशकावली या ग्रंथातील 'तारीखे मुहम्मदी'मधील तारखांची छाननी, परत आल्यानंतर रात्री अर्नाल्ड ब्रेख्ट या जर्मन अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाच्या आत्मचरित्राचे वाचन असा कार्यक्रम मी आखला.

इतक्यात फोनची घंटा खणखणली. मी फोन उचलला तो आमच्या कुटुंबाच्या जिव्हाळ्याच्या परिचित अशा एका सुशिक्षित महिलेचा आवाज ऐकू आला. उत्तर भारताच्या दौऱ्यावर आम्ही पति-पत्नी गेलो असताना आम्ही त्यांच्याकडे उतरलो होतो. ती पति-पत्नी अत्यंत रसिक, सुसंस्कृत, समाजकार्यात भाग घेणारी व लेखन, वाचन, गायन ,इत्यादींचा छंद असलेली अशी आहेत. त्यांच्या सहवासात उत्तर भारतातील आमचे दिवस मोठ्या आनंदात गेले होते. त्या महिलेने फोनवर सांगितले, ''माधवराव, मी आणि माझी भावजय (लोकसभेत निवडून आलेल्या खासदारांच्या पत्नी) आपल्याकडे येणार आहोत. उत्तर भारतातील मासिकांतून मराठ्यांच्या इतिहासावर आधारलेले लेख, कथा, निबंध इत्यादी लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहे. आज आपल्याकडून मिळेल ती माहिती मी जमविणार आहे.''

माझ्या पत्नीने माझ्या हातातून फोन घेत त्यांना म्हटले, ''मग असे करा ना, आमच्याकडे जेवायलाच या. म्हणजे संध्याकाळपर्यंत तुमच्या इतिहासावर गप्पा चालतील. मी तर त्यांच्याकडून रोज इतिहास ऐकतच असते, पण आजची चर्चा ऐकण्यात मला जास्त मजा वाटेल.''

त्या दिवशीचा माझा 'एशियाटिक सोसायटी'त जाण्याचा कार्यक्रम बारगळला. औरंगजेबाची बातमीपत्रेही कपाटात जाऊन बसली. ग्रंथलेखन वा वाचन ही आपल्या परीने महत्त्वाची खरीच, पण जिवंत रसरशीत माणसांच्या संपर्काच्या मानाने ती किती महत्त्वाची समजावीत हाही एक प्रश्नच आहे. 'बुक्स आर आफ्टरऑल ए ब्लडलेस सब्स्टिट्यूट फॉर ह्युमन बीइंग्ज' या म्हणण्यात अगदीच तथ्य नाही असे नाही.

त्या महिलांच्या सहवासात आमचा तो दिवस मोठ्या आनंदात गेला. आम्ही गप्पा मारीत बसलो तसे मी म्हटले, ''हे पाहा, इतिहास हा माझा छंद आहे. पण म्हणून मला सर्वच गोष्टी माहीत आहेत असे समजू नका. हे लक्षात घेऊन प्रश्न विचारीत चला.''

या गप्पांचा विशेष असा की एखादा विषय निघाला तर तो मला संपवता येईना. मध्येच प्रश्नांच्या सरबत्तीमुळे त्याला फाटे फुटत आणि मूळ विषय कुठल्या कुठे जाई. या गप्पांत सर्वच जणी (माझ्या पत्नीसकट) भाग घेत होत्या. त्यामुळे कोणी कोणता प्रश्न विचारला हे सांगणे कठीण होऊन बसे. आता हेच उदाहरण घ्या.

''आनंदीबाईने 'ध' चा 'मा' केला हे खरे आहे काय ?''

''नाही. या प्रकरणात तिचे अंगच नव्हते.''

''मग लोक खोटे का लिहितात ?''

''कथा, कादंबऱ्या, नाटके यांमधून असे काही आढळले तर ती कलावंतांनी सजविलेली कलाकृती समजावी. आणि त्या दृष्टीने तिचा आस्वाद घ्यावा. शेक्सपीयरची नाटके, स्कॉटच्या कादंबऱ्या यांचा इतिहास म्हणून कोणी अभ्यास करीत नाहीत.''

''तुम्ही म्हणता तशी आनंदीबाईसंबंधी माहिती कुठे आढळेल ?''

''पेशवे दप्तरात.''

''पेशवे दप्तर म्हणजे काय ?''

''पेशव्यांच्या काळाचे सुरक्षित ठेवलेले दप्तर. त्यात अस्सल आणि समकालीन अशी लाखो कागदपत्रे आहेत. आजपर्यंत त्यांपैकी साठ-पासष्ट खंड प्रकाशित झाले आहेत. सरदेसायांनी प्रकाशित केलेल्या खंडात ही माहिती मिळेल.''

''हे सरदेसाई कोण ?''

''थोर इतिहास-संशोधक.''

त्यानंतर दुसरा विषय पुढे आला तो असा :

सवाई माधवरावांनी आत्महत्या केली काय ?''

''नाही. ताप अतिशय वाढला. जवळ बसलेल्या अनुबाई घोरपडे (इचलकरंजीकर) या काही कामासाठी खाली गेल्या. अंगाची काहिली झाल्यामुळे माधवराव कठड्याजवळ उभे राहिले. तो तोल गेला. मृत्यू अपघाती होता.''

''आपण घोरपड पाहिली आहे काय ?''

''प्रत्यक्ष नाही. फक्त चित्रात पाहिली आहे.''

''घोरपडीच्या साहाय्याने तानाजी गडावर चढला हे खरे आहे का ?''

''नाही. घोरपडीसारखे मावळे चढले.''

''तानाजीजवळ घोरपड असेल का ?''

''शक्य आहे. त्याने घोरपड पाळली असेल. शकुनाची म्हणून.''

''घोरपडच का ?''

''लोक कुत्री, मांजरी, पोपट इत्यादी बाळगतात. तसा त्या काळचा हा प्रकार असावा.''

सवाई माधवराव राहिले बाजूला. अनुबाई घोरपडेही नाहीशा झाल्या आणि ही घोरपड पुढे आली. या घोरपडीच्या तडाख्यातून सुटका करून घेण्यास मला बराच वेळ लागला.

मी म्हटले, ''शिवाजी महाराजांचा एक इमानी कुत्रा होता म्हणतात. महाराजांच्या चितेत त्याने उडी घेतली. त्याचा एक पुतळा रायगडावर महाराजांच्या समाधीशेजारी बसविला आहे.''

''म्हणजे महाराजांच्या एका इमानी कुत्र्याने आपले प्राण दिले ना ?''

मी म्हटले, ''नाही. असे म्हणतात. असा कुत्रा अस्तित्वात होता याला काहीच पुरावा नाही. महाराजांच्या चितेत त्याने उडी घेतली हेही काल्पनिकच.''

''मग या सर्व घटनेचा, कुत्र्याच्या पुतळ्याचा पाया काय ?''

मी म्हटले, ''राम गणेश गडकरी यांच्या प्रतिभेतून स्फुरलेली ती कविता आहे. आपले रणजित देसाई यांनी गोरेगावच्या साहित्य संमेलनात ही गोष्ट आवर्जून सांगितली.''

''आपण पद्मिनी हीसुद्धा नव्हतीच असे म्हणता ?''

''हो. ती कथाही सोळाव्या शतकातील मलिक मुहंमद जायसी या सूफी कवीला स्फुरलेली. ते रूपक काव्य आहे. शरीर म्हणजे चितोड, मन म्हणजे रतनसिंग, शक्ती म्हणजे पद्मिनी, वासना म्हणजे अल्लाउद्दीन अशी नावे त्याने दिली आहेत. हे सगळे कल्पनेचे खेळ आहेत.''

''मग येथील वाटाडे तर काय काय दाखवितात –''

''अहो, त्या वाटाड्यांची योग्यता काय ? पुष्कळदा ते लोकांना बनवितात.'' असे म्हणून मी ऑलिव्हर क्रॉम्वेल (१६५०-१६६०) याची गोष्ट सांगितली.

पदार्थसंग्रहालय पाहण्यासाठी एक जोडपे गेले. वाटाड्या म्हणाला, ''इंग्लंडच्या इतिहासात एकदाच स्थापन झालेल्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष क्रॉम्वेल हा मोठा शूर आणि कर्तबगार होऊन गेला. त्याच्या डोक्याची कवटी पाहा.'' त्या जोडप्याने कवटी पाहिली. नवरा विचार करीत म्हणाला, ''अहो, ही कवटी फारच लहान दिसते.'' यावर तो वाटाड्या मख्खपणे म्हणाला, ''अहो, ही त्याच्या लहानपणची !''

माझ्या या गोष्टीवर आम्ही तिघेही (मी, माझी पत्नी आणि आमची उत्तर भारतातील बुद्धिमान मैत्रीण) खूप हसलो. पण खासदार पत्नींनी अगदी निरागसपणे विचारले, ''म्हणजे, क्रॉम्वेल लहानपणीच मेला की काय?'' हा प्रश्न इतका निर्व्याज होता की मी पुढे काही बोललो नाही. आपण तरी कोडे घालताना भास्कराचार्यांनी लीलावतीला गणिताचा प्रश्न विचारताना दाखविलेला हळुवारपणा दाखवायला नको का?

**रतिसमयी तरुणीची मुक्तमाला तुटोनी ओघळली**
**भूवरी त्र्यंश पसरली पंचांश तशी सुमंचकी गळली**
**अंश सहावा तिचिया हाति प्रियकरे दशांश ओंजळली**
**सूत्री सहा लटकली, सांग किती मोति हारि माळविली**

हा विनोद आहे हे सर्वांना समजल्यावर आम्ही मग पुन्हा एकदा खळखळून हसलो.

मीही आता सावधपणे बोलत होतो. प्राथमिक शाळेतील काही शिक्षक पूर्वी शिवाजी महाराजांचा जन्म किल्लयात झाला हे मुलांच्या आठवणीत राहावे म्हणून मुलांना शिकविताना किल्लयांचा जुडगा दाखवीत. असे सांगताना ''महाराज किल्लयांच्या जुडग्यात जन्मणे शक्य नाही, हा विनोद आहे,'' हे सांगण्याची मी काळजी घेतली. नाना फडणिसांनी सात-आठ लग्ने केली. शेवटचे लग्न छप्पन्नाव्या वर्षी झाले हे सांगताना मी लगबगीने पण आवर्जून सांगितले, ''म्हणजे लग्नात नाना फडणिसांचे वय छप्पन्न वर्षांचे होते बरे का! आणि त्यांची नवी बायको जिऊबाई ही दहा वर्षांची होती.'' हो, उलटा ग्रह झाला तर काय घ्या?

''इतिहासाच्या ग्रंथांत सहसा न आढळणारी पण घडलेली अशी एखादी गोष्ट सांगता येईल का? म्हणजे हिंदी मासिकातून ती देता येईल.'' असे आमच्या मैत्रिणीने मला विचारले. मी म्हटले, ''गोष्टी सांगतो – त्यांपैकी कोणतीही निवडा.''

इंग्रज-मराठा युद्धात फोर्ब्स हा इंग्रज अधिकारी कीटिंग याच्या पथकात चॅप्लेन (धर्मकर्मे करणारा) म्हणून होता. त्याने पुढे 'ओरिएंटल मेमॉयर्स' म्हणून प्रचंड ग्रंथ लिहिला आहे. फोर्ब्स हा राघोबाच्या छावणीत होता. राघोबाची एक नाटकशाळा होती. पण तेथील बाईचे प्रेम होते एका शिलेदारावर. ती राघोबादादाची नजर चुकवून शिलेदाराबरोबर पळून गेली. या गडबडीत शिलेदाराला आपला आवडता घोडा नेता आला नाही. राघोबाने शिलेदाराचा पुष्कळ शोध केला, पण पत्ता लागला नाही. शेवटी त्याने एक युक्ती केली. मराठ्यांना घोडा म्हणजे जीव की प्राण. हा शिलेदार आपला घोडा घेऊन जाण्यासाठी परत आल्याशिवाय राहणार नाही याची राघोबाला खात्री हाती. त्याने छावणीलगत एका झाडाला घोडा बांधून ठेवण्याची आज्ञा केली. जरा लांब अंतरावर शिपाई ठेवण्यात आले. मात्रा बरोबर लागू पडली. एक-दोन दिवसांतच घोडा

घेऊन जाण्यासाठी तो शिलेदार दबकत दबकत येत असताना पकडला गेला. राघोबाच्या आज्ञेने त्याला आणि त्याच्या प्रेयसीला पोत्यात घालून नर्मदेत बुडविण्यत आले!

पेशवाई संपली. दुसऱ्या बाजीरावाला ब्रह्मावर्ताकडे जावे लागले. तेथे गेल्यानंतर त्याने आपल्या पत्नीला – वाराणसीबाईला – बोलावून घेतले.

त्या काळात हिंदुस्थानभर ठगांचा सुळसुळाट झाला होता. त्यांच्या मोठमोठ्या टोळ्या सर्वत्र हिंडत असत. निदान तीस हजार माणसे तरी ठगांना बळी पडली असावीत असा अंदाज आहे. असेच एक ठगांचे टोळके वाराणसीबाईच्या लवाजम्याच्या मागे लागले. दोन-तीनशे मैल तरी ठग तिच्या लवाजम्याबरोबर वेषांतर करून चालत होते. शेवटी वाराणसीबाईला मारण्याची संधी त्यांना मिळाली. पण तिचा उपयोग करून न घेता ठगांचा पुढारी आपली टोळी घेऊन तेथून निघून गेला.

पुढे इंग्रजांनी कर्नल स्लीमन याला ठगांचा बंदोबस्त करण्यासाठी नेमले. शेकडो ठग फासावर लटकले आणि ठगांचा बंदोबस्त झाला. पकडलेल्या ठगांत वाराणसीबाईच्या मागे लागलेला ठग पुढारी होता. आपल्या जबानीत ''वाराणसीबाईचा गळा आवळून तिला मारण्याची संधी मिळाली होती. (ठग नेहमी हातरुमालाने किंवा उपरण्याने गळा आवळून प्राण घेत.) पण मी तिला मारले नाही.'' असे त्याने सांगितले. ''तू तिला मारायचे का टाळलेस?'' असे विचारल्यावर तो म्हणाला, ''तिच्या अप्रतिम सौंदर्यामुळे तिला मारण्याची मला हिंमत झाली नाही.''

ही गोष्ट सांगून मी म्हटले, ''स्लीमनचे आत्मचरित्रवजा पुस्तक 'रॅंबल्स अँड रीकलेक्शन्स' हे प्रसिद्ध आहे. पण मी सांगतो ती माहिती टर्नरने लिहिलेल्या स्लीमन चरित्रात – 'यलो स्कार्फ'मध्ये – आढळेल. यलो स्कार्फ म्हणजे पिवळा रुमाल. ठग लोक रुमालाने गळे आवळून ठार मारीत. यावरून त्या ग्रंथाला हे नाव देण्यात आले आहे.''

तोपर्यंत संध्याकाळचे पाच वाजले होते. चहापान करून आमच्या पाहुण्या आमचा निरोप घेऊन गेल्या. माझ्या लेखन-वाचनाच्या ठरीव चाकोरीच्या जीवनात एक आगळा आनंद देणारा तो दिवस होता.

❋ ❋

# प्रकाशाचा नवा किरण

इ.स. १९७९ ऑक्टोबर, तारीख ११ हा दिवस माझ्या आयुष्यातील एक संस्मरणीय दिवस ठरला. त्याचे असे झाले :

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून त्या वर्षी मराठ्यांच्या स्वातंत्र्य-युद्धावर तीन भाषणे देण्याचे आमंत्रण मला आले होते. सामान्यपणे ही भाषणे कोल्हापूरला विद्यापीठाच्या सभागृहात होतात. पण त्या वर्षी ती भाषणे साताऱ्यात आयोजित करण्यात आली होती. तेथील कॉलेजचे प्राचार्य पाटील हे नुकतेच काही दिवसांपूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या उपकुलगुरुपदावरून निवृत्त होऊन आपल्या साताऱच्या कॉलेजचे पुन्हा प्राचार्य झाले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली माझी भाषणे झाली.

विषय माझ्या आवडीचा आणि भाषणे साताऱ्यात. औरंगजेबाने इ. स. १६९९ डिसेंबरमध्ये साताऱ्याच्या किल्ल्याला वेढा घातला होता. हा वेढा पाच महिने चालला. एप्रिल महिन्यात मोगलांनी किल्ल्याला सुरुंग लावून तट उडवून देण्याचा प्रयत्न केला. एका सुरुंगाने तटाच्या भिंती किल्ल्याच्या आत पडल्या. त्यामुळे किल्ल्यातील जवळजवळ चारशे माणसे ठार अगर जखमी झाली. मोगल घाईने किल्ल्यात प्रवेश मिळवू पाहत होते. त्यामुळे दुसऱ्या सुरुंगाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. किल्ल्याच्या आत प्रवेश मिळवण्याच्या त्यांच्या गडबडीत दुसरा सुरुंग उडाला आणि त्या वेळेस तटाच्या भिंती बाहेरच्या बाजूस असलेल्या मोगल सैन्यावर कोसळल्या.

खुद्द मोगलांच्या बातम्यांप्रमाणे या प्रचंड घटनेत दोन हजार मोगल सैनिक ठार अगर जखमी झाले. मोगलांचे अनेक मातबर अधिकारी मारले गेले. धुरळ्याच्या उडालेल्या धुरामुळे माणसाला माणूस दिसेनासे झाले. तोपर्यंत मराठे सावध होऊन किल्ल्यावरून मोगलांवर तोफांचा भडिमार करू लागले. खुद्द औरंगजेबाचा तळ साताऱ्यापासून दोन मैलांवर असलेल्या करंज ह्या गावी होता. सुरुंगाचा स्फोट ऐकल्यावर त्याने तातडीचा निरोप पाठविला की, मोगल अधिकारी आणि सैनिक ह्यांनी लौकर किल्ल्यात घुसावे.

प्रत्यक्ष परिस्थितीची त्याला कल्पना नव्हती. किल्ल्यासमोर मोगल सैनिकांच्या प्रेतांचा खच पडलेला होता. चहूकडे हाहा:कार झाला होता. किल्ल्याला मोठे भगदाड पडले होते. जे थोडेबहुत मोगल किल्ल्यात घुसू पाहत होते त्यांना मराठ्यांनी कापून

काढले होते. अशा परिस्थितीत किल्ल्यासमोरील मोगल सेनापतीने औरंगजेबाला निरोप पाठविला, ''आपण म्हणता कामाची माणसे किल्ल्यात पाठवा. कामाची सर्व माणसे कामी आली आहेत. काय करावे?'' सातारच्या ह्या किल्ल्याची हकीकत मोगलांच्या बातमीपत्रांत तपशीलाने आली आहे. मी त्यांचा मराठीत अनुवादही केला आहे.

माझ्या भाषणात मी सातारच्या वेढ्याचा तपशील बारकाव्यांसहित सांगत होतो. ''अमक्या ठिकाणी औरंगजेबाचा तळ होता. तेथून तो ओढ्याच्या काठाकाठाने किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत आला. मंगलाईच्या बुरजाखाली शामियाना पडला. दोन टेकड्यांच्या मध्यभागी तरबेजखानाने त्याचे स्वागत केले. हा मोगल सैन्याचा अधिकारी. किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर शाहिस्तेखानाचा मुलगा खुदाबंदाखान हा तैनात होता. किल्ल्याच्या पलीकडे परळीच्या वाटेवर शहाजादा आज्जम याचा तंबू होता. मंगलाईच्या बुरजाखाली जेथे औरंगजेब थांबला तेथे किल्ल्याला समांतर असा रस्ता आहे. त्या जागेवर आता मारुतीचे देऊळ आहे.'' मी जितक्या तादात्म्याने हा तपशील सांगत होतो तितकेच श्रोते एकाग्र होऊन ऐकत होते. इतकेच नव्हे तर भाषणाच्या वेळी मी हातवारे करून सभागृहाच्या खिडक्यांच्या बाहेरच्या स्थळांचा निर्देश केला की श्रोते माना वळवून त्या स्थळाकडे पाहत. त्या एका भाषणामुळे सातारकरांना जसा इतिहास घडला तसाच तो प्रत्यक्ष जागेवर हजर राहून पाहण्याचा आनंद मिळाला.

त्या दिवशी भाषण आटोपल्यावर मला सहज कल्पना आली की सातारा आणि परळी जिंकून घेतल्यावर जून महिन्यामध्ये औरंगजेब हा भूषणगड येथे जाण्यास निघाला. भूषणगड साताऱ्यापासून छत्तीस मैलांवर आहे. पण पावसाचा जबरदस्त मारा, नद्यांचे पूर, रस्त्यातील चिखल आणि मराठ्यांचे गनिमी हल्ले ह्यामुळे आपल्या सैन्याच्या सरंजामाचे लटांबर घेऊन हे छत्तीस मैलांचे अंतर कापण्यास औरंगजेबाला छत्तीस दिवस लागले! त्यांच्या मुक्कामाचे हे तपशील बातमीपत्रांत आहेत. मी श्री. पाटील ह्यांना म्हटले, ''उद्या टॅक्सीची व्यवस्था करा. मी औरंगजेबाच्या मार्गावर जातो. रहिमतपूर, औंध, वडूज, खटाव, खसगण, पासेगाव आणि वर्धनगड असे करीत मी संध्याकाळी साताऱ्याला परत येईन. मोगल सैन्याचे काय हाल झाले असतील त्याची मला कल्पना येईल.'' दुसऱ्या दिवशी त्याच कॉलेजमधील एक प्राध्यापक पाटील टॅक्सी घेऊन आले.

तो दिवस ११ ऑक्टोबर १९७९ हा होता. मी बातमीपत्रांचे पुस्तक हातात ठेवले होते. साताऱ्याहून आम्ही रहिमतपूरच्या वाटेकडे निघालो. सकाळी १० वाजता रहिमतपूरला कृष्णेच्या काठावर आलो. औरंगजेबाने जून इ.स. १७०० मध्ये कृष्णा

ओलांडली होती. त्या वेळी कृष्णेला विलक्षण पूर आला होता. त्या पुराचे आणि त्यातून झालेल्या मोगलांच्या प्राणहानीचे प्रत्ययकारी वर्णन खाफीखानाने केले आहे.

मोगलांचा सरंजाम रस्त्यावर मैल मैल लांब पडला होता. ओझे वाहणारे बैल मिळेनात. चिखल तुडवीत मोगलांना वाट काढावी लागली. औरंगजेब हा कृष्णा ओलांडून रहिमतपूरला पोहोचला. रहिमतपूरला शहाजी राजांचा मित्र रणदुल्लाखान (मृत्यू १६४३) ह्याचा घुमट असून त्यावर फारसी भाषेत लेख कोरलेला आहे. मोगलांच्या बातमीपत्रात औरंगजेबाच्या आज्ञेने ह्या घुमटाभोवती बाग तयार करण्यात आली होती आणि औरंगजेब काही काळ तेथे थांबला होता, असे लिहिले आहे. ही सर्व हकीकत मी पुस्तक पाहून सांगत होतो. ड्रायव्हर आणि प्रा. पाटील दोघे मोठ्या कुतूहलाने हे ऐकत होते.

रहिमतपूरहून आम्ही पुढे सरकलो आणि औंधच्या वाटेला लागलो. औंधच्या अलीकडे एक लहानसा घाट चढावा लागतो. तेथे औरंगजेबाचा मुक्काम होता असे बातमीपत्रात नोंदले आहे. मला ती जागा लौकर सापडेना. पण एका गुराख्याने पीराचा माळ म्हणून जागा दाखविली. तेथे एक वास्तू होती. बादशहाचा मुक्काम तेथे होता असे कळले. औरंगजेब औंधलाही पोचला होता आणि यमाईच्या देवळाला त्याचा उपसर्ग झाला होता, असे स्थानिक माहितीवरून कळले. औंधहून भूषणगडकडे जाण्यासाठी आम्ही निघालो.

ज्या किल्ल्याचे नाव औरंगजेबाने नारागड असे ठेविले होते त्या ठिकाणी मराठ्यांनी छावणीवर हल्ले करून मोगलांचे हत्ती-घोडे पळवले. लहानसहान चकमकी तर सतत चालू होत्या. पाऊसपाण्यामुळे आम्हांलाही भूषणगडपर्यंत जाता आले नाही. त्यामुळे आम्ही अर्ध्या वाटेवरून परत फिरून विरला नदीच्या काठाकाठाने खटावपर्यंत पोहोचलो. जेजुरीच्या खंडोबाचा जीर्णोद्धार करणारा नारो राघव ह्याचा मुलगा रामचंद्र हा मोगलांतर्फे खटावचा ठाणेदार होता. मराठ्यांशी लढताना तो मारला गेला. औरंगजेबाने खटावची ठाणेदारी त्याचा भाऊ कृष्णराव याला दिली. इतिहासात उल्लेख असलेला कृष्णराव खटावकर तो हाच. त्याने प्रथम शाहू राजांच्या विरुद्ध बंडखोरी केली. नंतर तो शरण गेला. मराठ्यांनी रायगडावर हल्ला करून तो किल्ला जिंकून घेतला. त्या प्रसंगी तो मारला गेला (इ.स. १७३४).

साताऱ्याहून औरंगजेब इ.स. १७०० मध्ये निघाला त्या वेळी त्याने भूषणगडाजवळ छावणी घातली होती. सप्टेंबर महिन्यात त्या ठिकाणीच प्रतापराव गुजर ह्याच्या दोन मुलांचे धर्मांतर करून घेण्यात आले. त्यानंतर तो खाली उतरून सोलापूर जिल्ह्यात गेला आणि पन्हाळगडच्या वाटेला लागला. पन्हाळगडहून परत आल्यावर इ.स. १७०१ मध्ये त्याने खटावजवळ छावणी घातली होती. आम्ही औरंगजेबाच्या

छावणीची जागा पाहिली. तेथून आम्ही पाच मैलांवर असलेल्या बुधपाचेगाव ह्या ठिकाणी गेलो. मोगलांचा एक मातबर मराठा सरदार पद्माजीराव घाटगे हा औरंगजेबाच्या काळात पाचेगावचा ठाणेदार होता. घाटगे ह्यांचा मोठा वाडा आज मोडकळीस आला आहे. त्यांच्या वंशजांपैकी रास्त वंशज असे कोणी नाहीत. त्यांच्या घरच्या मुली मात्र ग्वाल्हेरच्या आंग्रे कुटुंबात दिल्या गेल्या असे कळले. कागलचे घाटगे, मळठणचे घाटगे आणि बुधपाचेगावचे घाटगे ही सर्जेराव, झुंजारराव आणि बाजीराव घाटगे मंडळी आपापसात भाऊबंद असून मोगलांना चिकटून होती.

बुधपाचेगावात घाटग्यांना अद्याप राजे घाटगे म्हणून ओळखतात. आधुनिक पिढीला बुधपाचेगाव हे नाव माहीत आहे. कारण भारतातील सुप्रसिद्ध गणिती आणि रोम येथील जागतिक अन्न संशोधन कार्यालयाचे सदस्य श्री. सुखात्मे यांचे ते गाव. पाचेगावहून परत येताना वाटेत वर्धनगडचा किल्ला लागला. औरंगजेबाच्या हयातीत मराठ्यांनी तो किल्ला जिंकून घेतला होता. पण मोठ्या शिकस्तीने पुन्हा तो मोगलांनी परत घेतला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर पुन्हा तो मराठ्यांकडे आला.

त्या दिवशी आमच्या गाडीत औरंगजेबाशिवाय दुसरा विषय नव्हता. मी मोकळेपणाने औरंगजेबाचे स्वभावविशेष सांगत होतो. ड्रायव्हरही आमची चर्चा लक्षपूर्वक ऐकत होता. औरंगजेबाचा स्वभाव, त्याची कारस्थाने, त्याचे उद्देश, त्याच्या लष्करी हालचाली, त्याच्या आयुष्यात आलेले यशापयशाचे प्रसंग या सर्वांची मी उजळणी करीत होतो. उल्लेख करीत होतो. औरंगजेबाच्या अतिरेकी धार्मिक धोरणाचीही चर्चा करीत होतो.

आम्ही साताऱ्याच्या जवळ आलो, तेव्हा एकाएकी ड्रायव्हर सांगू लागला, ''साहेब, माझ्याही आयुष्यत एक चमत्कारिक अनुभव आला. मी तिरुपतीच्या यात्रेला गेलो होतो. त्या देवळात मोठी गर्दी होती. देवळात जाण्याचा मी खूप प्रयत्न केला, पण प्रवेश मिळेना. शेवटी मनात मी परमेश्वराला म्हटले, देवा, तुझे सत्त्व ह्यावेळी मला दाखव आणि मला दर्शन दे. इतक्यात माझ्या ओळखीचा सोलापूरकडील एक इसम दिसला. तो माझ्या लांबच्या नात्यातील होता. त्याने मला पाहिले. तो माझ्याजवळ आला. मी त्याला म्हटले, गड्या, मला व्यंकटेशाचे दर्शन घडव. त्याने तिकडे कुठे कळ फिरविली कोणास ठाऊक, देवळातील एक मनुष्य आला आणि लोकांची रांग बाजूला सारीत मला गाभाऱ्यापाशी घेऊन गेला. गाभाऱ्याच्या दारापाशी आमच्या साताराचे श्री. बाबासाहेब भेटले. मला पाहून ते म्हणाले, अरे, तू इकडे कोणीकडे? आम्ही आत यायला केव्हाचे धडपडतो आहोत आणि तू आत कसा आलास? मी हसलो आणि म्हटले, ''बाबासाहेब, हे तिरुपती आहे, आणि व्यंकटेशाची कृपा आहे.

मी बराच वेळपर्यंत देवाकडे पापणी न हलवता पाहत राहिलो. मी मनात सारखे म्हणत होतो, देवा, तू आज मला दर्शन दिलेस, मी धन्य झालो.''

ही त्याची हकीकत होईपर्यंत संध्याकाळ झाली होती. सातारला आम्ही माझ्या मुक्कामावर परतलो. मी गाडीतून उतरलो आणि ड्रायव्हरला म्हटले, ''मी पण व्यंकटेशाचा भक्त आहे. आजपर्यंत मी दहा-बारा वेळा तरी तिरुपतीला गेलो. पण देवाचे दर्शन मिळण्यास वेळ लागतो हे खरे. तुमची भक्ती मोठी म्हणून तुम्हांला देवाचे दर्शन लवकर झाले. बरे झाले आपली ओळख झाली. हा हरिभक्तांचा मेळावाच म्हणायचा. आपले नाव काय ?''

ह्यावर काहीशा संकोचाने ड्रायव्हर म्हणाला, ''शहाबुद्दीन !''

थक्क होण्याची पाळी आता माझ्यावर आली. सर्वत्र अंधार झाला होता. पण प्रकाशाचा एक नवा किरण त्या ड्रायव्हरने नजरेसमोर सोडला होता, तो त्या अंधारात माझ्यासमोर सारखा चमकत होता.

❉ ❉

# दुरावलेली वेल परत मांडवाकडे

हैदराबाद राज्याच्या नोकरीत आमच्या घराण्याच्या तीन पिढ्या गेल्या (इ.स. १८५९ ते १९५६). त्या निमित्ताने त्या राज्यात वर्चस्व गाजविणाऱ्या सत्ताधारी मुस्लिम समाजाच्या अंतरंगाचे जवळून निरीक्षण करण्याची आम्हांला संधी मिळाली. उर्दू आणि फारसी भाषांतील शिक्षणामुळे त्या समाजाच्या साहित्याचा परिचय झाला. त्याप्रमाणेच शासनातील अनुभवामुळे मुस्लिम समाजातील अनेक लहानमोठ्यांशी मैत्रीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध जमून आले. या काळात मुस्लिम समाजाच्या अनेक पैलूंचा मी अभ्यास करीत होतो. जगातील मुस्लिम समाजाचा प्रारंभ, त्याची उत्क्रांती, राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतरे, जगातील इतर समाजांशी आलेले त्यांचे स्नेहाचे आणि संघर्षाचे संबंध इत्यादी विषयांचा अभ्यास मी करीत होतो. अनेक मुस्लिम विद्वान, साहित्यिक, कलावंत इत्यादींशी माझे आजतागायत संबंध टिकून आहेत.

असे असले तरी मुस्लिमांच्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे त्यांच्यातील कुटुंबसंस्था अगर स्त्रीजीवन यांचा अभ्यास करण्याची फारशी संधी मला मिळाली नव्हती. तो योग अनपेक्षितपणे बेंगळूर मुक्कामी जुळून आला.

हैदराबाद येथील पोलिस कारवाई (१९४८) ही अनेक दृष्टींनी क्रांतिकारी ठरली. ही केवळ सत्तांतराची बाब नव्हती. हैदराबाद राज्यात मुस्लिम समाजाचे वर्चस्व उणीपुरी पाचशे वर्षे टिकले. चौदाव्या शतकाच्या मध्यापासून तो १९४८ सालापर्यंतचा हा काळ आहे. राजघराणी बदलत गेली. तुर्क आले, इराणी आले, मोगल आले, पठाण आले, शिया आले, सुन्नी आले. पण अनेक राजकीय आपत्तींतून मुस्लिम समाजाने आपली सत्ता टिकविली. कधी युद्ध तर कधी तडजोड, कधी हिंदू समाजधुरीणांशी आर्जवी आणि धोरणी वागणूक ठेवून तर कधी त्यांना धाब्यावर बसवून या समाजाने आपला मार्ग काढला. शेवटी इंग्रजांचे मांडलिकत्व पत्करल्यावर राज्याचा बराचसा भाग गमावूनही उरलेला बराच भाग (ब्याऐंशी हजार चौरस मैल क्षेत्रफळ, एक कोटी लोकसंख्या, तेवीस हजार खेडी, सतरा जिल्हे, एकशे तीस तालुके, बत्तीस कोटींचे उत्पन्न) टिकवून ठेवण्यात निजामाला यश मिळाले.

राज्यात मुस्लिम समाजाचे वर्चस्व होते हे उघड आहे. पण राज्यातील हिंदू जमीनदार वर्गाचे आर्थिक वर्चस्व कायम ठेवल्यामुळे सरंजामी राजवटीच्या या राज्यात आर्थिक प्रगती समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचणे शक्य झाले नाही. तो असंतोष

सुरू होऊन लोकशाही चळवळीचे मूळ धरण्यास साहजिकच बराच काळ लोटावा लागला. मुस्लिम सत्ताधारी आणि शेती व्यवस्थेतील जमीनदारीवर पोसलेले हिंदू सरंजामदार यांची युती हे हैदराबाद राज्याचे वैशिष्टच म्हणावे लागेल. सत्तेच्या वापरात जातीयवाद होताच. मुस्लिम समाजाकडे साहजिकच झुकते माप होते. मुस्लिम सण, वार, उत्सव, उर्दू-फारसी साहित्य इत्यादींना बरेच महत्त्व होते. उलट बहुसंख्य प्रजेच्या परंपरेच्या बाबतीत उदासीन वृत्ती होती. अधूनमधून तिचा स्फोट होत राही. पण अशा विषम परिस्थितीतून उद्भवणाऱ्या धोक्याची जाणीव आर्थिक आणि मागासलेली समाजव्यवस्था यांमुळे सहज होऊ शकत नव्हती.

१९४८ च्या पोलिस कारवाईमुळे केवळ सत्ताच बदलली असे झाले नाही, तर पाचशे वर्षे चालत आलेली सामाजिक मूल्येही एकदम इतिहासजमा होऊन गेली. नुसता निजामच पदभ्रष्ट झाला नाही, तर त्याच्या आश्रयावर जगणारा समाजच नष्ट होण्याच्या मार्गास लागला. जुन्या पिढीतील अधिकारी, जहागीरदार, सरंजामदार, त्यांचे आश्रित हे पाचोळ्याप्रमाणे उडून गेले.

असेच एक कुटुंब मला बेंगळुरास भेटले. मीर हसन त्यांचे नाव. हे हैदराबाद राज्यातील चार गावांचे एक जहागीरदार. शिया पंथी मुसलमान. मनुष्य अतिशय सुसंस्कृत आणि व्यासंगी. हैदराबादेतील आपले घर त्यांनी तसेच ठेवले आणि जहागिरीच्या विलिनीकरणातून मिळालेली रक्कम घेऊन ते बेंगळूरला स्थायिक झाले. बेंगळूरला ते माझ्या मुलीच्या घराचे शेजारी असल्यामुळे माझ्या बेंगळूरच्या वार्षिक भेटीच्या प्रसंगी त्यांच्याशी माझ्या नेहमी गप्पागोष्टी होत. त्यामुळे हैदराबादेतील अनेक मुस्लिम कुटुंबांची मला तपशीलवार माहिती मिळू शकली.

हैदराबादेत आणि अन्यत्र आढळणाऱ्या दुर्मिळ वस्तू मिळविणे आणि त्यांची खरेदी-विक्री करणे हा मीर हसन यांचा व्यवसाय होता. या धंद्यात त्यांना बरीच कमाई होत असावी. इतकेच नव्हे, या व्यवसायाच्या निमित्ताने त्यांची मुले अमेरिकेत जाऊन स्थायिक झाली. त्यांच्या कुटुंबाच्या हकीकतीवरून असे कळले की, प्रथम पत्नीचा त्यांनी त्याग करून तिच्याच बहिणीशी विवाह केला होता. इस्लाम धर्मात पहिली बायको असताना तिच्या हयातीत तिच्याच बहिणीशी लग्न लावणे हे निषिद्ध मानले जाते. असे असताना मीर हसननी असे का केले हे कळले नाही. पहिल्या पत्नीपासून त्यांना एक मुलगा आहे. तो अमेरिकेत वास्तव्य करून आहे. दुसऱ्या पत्नीकडून त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी अशी अपत्ये झाली. मुलगा सतरा-अठरा वर्षांचा होऊन मोटार अपघातात मरण पावला. या सुसंस्कृत कुटुंबाच्या दुःखाला सीमा राहिली नाही.

मीर हसनची पत्नी फातिमा ही माझ्या मुलीची जिवश्चकंठश्च मैत्रीण. तिने आपल्या मैत्रिणीचे या दुःखाच्या प्रसंगी अनेक प्रकारे सांत्वन केले. या निमित्ताने त्या दोघी एकमेकींच्या अगदी निकट आल्या.

मीर हसन हे नेहमी माझ्याकडे येत. त्यांच्यामुळे हैदराबादेतील मुस्लिम समाजाविषयी – विशेषत: शिया पंथाबद्दल – मला बरीच माहिती मिळाली. जागतिक मुस्लिम समाजात अनेक पंथ आहेत. त्यांचे परस्परांत मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध सातत्याने टिकून राहतात असे नाही. ''आपला धर्म हा जागतिक धर्म आहे. राष्ट्रवाद, मातृभूमी इत्यादी तत्त्वे आपल्याला मान्य नाहीत. एखादा विशिष्ट देश आपला असे मानून आम्ही त्याला महत्त्व देत नाही. आमचा धर्म आणि तो मानणारे आमचे बांधव हे आमचे सर्वस्व. ते कुठे राहतात आणि कोणत्या देशाचे आहेत याचे आम्हांला महत्त्व नाही.'' अशी त्यांची एकूण विचारसरणी असते. यासंबंधी इकबालचे एक वचन प्रसिद्ध आहे : ''परमेश्वर आपल्या भक्तांना विचारतो, महत्त्व मदिरेचे आहे. ती मातीच्या भांड्यात ठेवली आहे की रत्नखचित पात्रात ठेवली आहे याला काय महत्त्व आहे? तुम्ही स्वत:ला तुर्क, अफगाण, अरब, इराणी, भारतीय असे म्हणविता. पण आपण मुसलमान आहोत हे कधी लक्षात आले काय?'' इकबालच्या या वचनाचा दूरगामी अर्थ लक्षात यावा.

पण इस्लामचा असा दावा असला तरी जगातील वंशवाद, राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीय वाद यांपुढे इस्लामला माघार घ्यावी लागली हे उघड दिसते. जगातील मुस्लिम समाज हा अनेक वंश, देश आणि समाज यांत वाटला गेला. राजकारण आणि संख्या या दृष्टीने पाहता इस्लाममधील प्रमुख वंश म्हणजे अरब, तुर्क, इराणी, अफगाण, भारतीय, इंडोनेशियी, आफ्रिकी इत्यादी समाज होत. भारतीय उपखंडात तीस कोटी, इंडोनेशिया आदी देशांत वीस कोटी, इराणी पाच कोटी, तुर्क पाच कोटी, अरब दहा कोटी, आफ्रिकी सुमारे दहा कोटी, चीनमधील पाच कोटी, रशियाच्या विविध राज्यांतील पाच कोटी अशी ही जागतिक मुसलमानांची ढोबळ मानाने दिसणारी विभागणी आहे. वंशवाद आणि राष्ट्रवाद यांच्यापुढे स्वत:ला एकसंध समजणारा इस्लामी समाज हा अनेक भागांत आणि स्पर्धक गटांत विखुरला-भंगला आहे.

धार्मिक चळवळीतही परिस्थिती काही वेगळी दिसत नाही. एक परमेश्वर, कुराणातून प्रसिद्ध झालेले त्याचे आदेश, जगापर्यंत ते पोचवणारा प्रेषित महंमद या तीन मूलभूत तत्त्वांवर इस्लाम उभा आहे. पण प्रत्यक्षात हा धर्म अनेक पंथांत विभागला गेला आहे. शिया, सुन्नी, अहमदिया, मीअदवी हे काही प्रमुख पंथ होत. अर्थात इस्लाममध्ये शेकडा पंचाहत्तर लोक हे सुन्नी आहेत. शिया हे शेकडा पंधरा भरतील. अलीकडे इराणच्या आक्रमक धोरणामुळे शिया पंथाचा बराच गवगवा झाला आहे. जगात संपूर्णपणे शिया पंथ असलेली राज्ये इराण, यमन अशी दोनतीनच आहेत.

इराणी शिया हे वंशाने आर्य. अरब हे वंशाने अगदी भिन्न सेमिटिक गटाचे. इराणचे साम्राज्य मूळचे झरतुष्ट्र धर्माचे – म्हणजे पारशी. इ.स. ६४० मध्ये अरबांनी इराणी

साम्राज्य नष्ट केले. बहुसंख्य लोकांचे धर्मांतर झाले. मूठभर पारशी भारतात पळून आले. इराणचा धर्म बदलला, भाषेची लिपी बदलली आणि अरबीकरणाचे प्रयत्न झाले. इराणच्या अस्मितेला खोल जखम झाली. बगदादच्या अरब सत्ताधाऱ्यांच्या हाताखाली नांदत त्यांनी अनेक शतके काढली. पण त्यांनी आपला राष्ट्रवाद जागृत ठेवला. सत्ताधाऱ्यांचा धर्म स्वीकारावा लागला तरी त्यातही आपले वैशिष्ट्य वेगळे आहे हे दाखविण्याची त्यांची सतत धडपड चालू होती.

इस्लाममधील एका भयंकर घटनेमुळे इराणी राष्ट्रवादाला तोंड फुटले. पैगंबराचा नातू हुसेन हा जुलमी अरब खलिफांच्या विरुद्ध बंड करीत असता अतिशय भीषण परिस्थितीत मारला गेला. महंमद पैगंबरांना मुलगा नव्हता. मुलगी फातिमा, तिचा पती अली, दोन मुले हसन, हुसेन हे सर्व शिया पंथीयांचे पंचायतन होते. इस्लामच्या खलिफाची गादी महंमदाच्या वंशात राहायला हवी होती. ती त्यांना मिळाली नाही. ज्यांनी ती बळकावली त्यांना शिया पंथीय खलिफा मानीत नाहीत. पैगंबराच्या घराण्यातील पुढील पिढ्यांतील पुरुषांशी ते एकनिष्ठ राहिले आहेत. त्यामुळे इस्लामचे व्यवहार धर्मसूत्र (शरीयत) त्यांना मान्य नाही. शिया पंथीयांचे शरीयत वेगळे आहे. पैगंबराचे जावई आणि नातू यांचे घुमट इराकमधील काबा आणि नजब येथे आहेत. ती शिया पंथीयांची मोठी श्रद्धास्थाने मानली जातात.

नऊशे वर्षांच्या दीर्घ अवधीनंतर इराणमध्ये इ.स. १५२० साली राष्ट्रीय राजवट पुन्हा स्थापन झाली. ती शिया पंथीय होती. जेथे अल्पसंख्य तेथे सामोपचाराने आणि मुत्सद्दीपणे वागणे हा शिरस्ता शिया लोकांना सतत पाळावा लागला. भारतातील सुन्नी सत्ताधाऱ्यांशी (तुर्क, मोगल इत्यादी) ते हुशारीने आणि चाणाक्षपणे वागले. इराणी लोकांची फारसी भाषा आणि साहित्य भारतात लोकप्रिय झाले. हजारो इराणी घराणी भारतात स्थायिक झाली. अनेक इराणी स्त्रिया मोगल राजघराण्यात विवाहबद्ध झाल्या (नूरजहाँ, मुमताज महल इत्यादी). अवधचे (लखनौ) नबाब हे शिया पंथीय आहेत. अशी या समाजाची परंपरा आहे. इराणच्या बाहेरील देशांत शिया हे अल्पसंख्य असल्यामुळे त्यांनी तुर्क, अरब, पठाण इत्यादी सत्ताधाऱ्यांशी मिळतेजुळते धोरण ठेवले आहे.

अयातुल्ला खोमेनीच्या उदयानंतर सगळ्या जागतिक इस्लामी समाजाचे पुढारीपण आपल्याला मिळावे ही महत्त्वाकांक्षा इराणने धरली. बहुसंख्य मुसलमानांनी आपली विचारसरणी स्वीकारावी, हा त्यांचा अंतस्थ हेतू. त्यासाठी इस्लामचे खरे क्रांतिकारक आपण, पोथीनिष्ठ धर्म पाळणारे आपण, सौदी अरब आदी राज्ये ही पाश्चात्यांचे गुलाम अशी हाकाटी त्यांनी केली. यातूनच इराक-इराणचे युद्ध उद्भवले.

मीर हसन यांच्याशी गप्पांचे अनेक प्रसंग आले. त्यांतून मला शिया पंथीयांची अशी बरीच माहिती मिळाली. भारतातील बहुसंख्य सुन्नी मुसलमानांशी आपला तसे

पाहता विशेष संबंध नाही. फार काय, आम्ही मूलत: इराणी राष्ट्राचे आहोत अशी विचारसरणी ते मांडू लागले. आपल्याला भारतीय मुसलमान म्हणण्याऐवजी इराणी म्हणवून घेणे अधिक यथार्थ होईल असे त्यांना वाटू लागलेले दिसते. पाकिस्तानात संपूर्णपणे इस्लामी राज्य स्थापन करण्याचा अट्टाहास चालू आहे. त्यासाठी इस्लामी कायदेकानूनच लागू झाले पाहिजेत, असा आग्रह धरण्यात येत आहे. इस्लामी कायदा म्हणजे शरीयत हे धर्मसूत्रच पाकिस्तानात संपूर्णपणे लागू करण्यात यावे अशी चळवळ कट्टर इस्लाम पंथीयांनी सुरू केली. त्यांच्या दडपणाला बळी पडून पाकिस्तानच्या राष्ट्रीय विधिमंडळाने तसे विधेयक जून १९९१ मध्ये संमत केले आणि त्याला तात्त्विक मान्यता दिली. याला प्रखर विरोध पाकिस्तानात असलेल्या शेकडा पंधरा टक्के शिया पंथीयांचा आहे. आमचे शरीयत वेगळे आहे, तुमचे शरीयत आम्हांला लागू करू नये, अशा मागणीचा शिया पंथीय कट्टरपणे पुरस्कार करीत आहेत. इस्लामी राष्ट्रात कट्टर शरीयतवादी (मूलतत्त्ववादी – फंडामेंटालिस्ट) आणि उदारमतवादी यांच्यात देशादेशांतून निकराचे संघर्ष चालू आहे.त

या माहितीतून अभ्यासकांनी योग्य तो बोध घ्यावा. मीर हसन यांच्या कुटुंबाशी आलेल्या संपर्कामुळे एका गोष्टीचा मात्र सखोल परिणाम करणारा अनुभव मिळाला. मीर हसनची पत्नी फातिमा ही माझ्या मुलीची मैत्रीण. घरातील काही मतभेदांमुळे ती माहेरी जाऊन राहिली. आपले पती आपल्याला परत बोलावण्यास चालढकल करीत आहेत या कल्पनेने ती अस्वस्थ झाली. यावर तोडगा काय म्हणून तिने माझ्या मुलीला सल्ला विचारला. माझ्या मुलीचा ओढा आध्यात्मिक गोष्टीकडे आहे. ती म्हणाली, ''माझ्या अध्ययनामध्ये गुरुगीता असते. मी ज्यांच्याकडून गुरूपदेश घेतला त्यांचे ध्यान करून तुझ्यासाठी प्रार्थना करून पाहीन.''

तसे तिने केले. काही दिवसांनी फातिमा आमच्या घरी आली. तिने बरोबर नारळ, फळे, सुका मेवा वगैरे चिजा आणून देवासमोर ठेवल्या. ती माझ्या मुलीला म्हणाली, ''अग, तुमच्या गुरूला आम्ही केलेली प्रार्थना पावली. माझ्या पतीने गोड बोलून हे सगळे प्रकरण मिटवले.''

या बातमीने आम्हा सर्वांना मोठे समाधान झाले. त्याच वेळी मनात एक विचार आल्याशिवाय राहिला नाही. कुठली दुरावलेली वेल परत मांडवाकडे अशी कशी वळली ?

❇ ❇

# त्याने सूर्यमंडळ भेदिले!

भारतीय वैमानिक दलातील फ्लाइट लेफ्टनंट अशोक ढवळे हे माझे जावई. माझी धाकटी मुलगी अनुराधा हिचे ते पती. फिल्म डिव्हिजनमधील सेवानिवृत्त फोटोतज्ज्ञ कै. बाळासाहेब ढवळे हे अशोक ढवळ्यांचे वडील. अशोकची आईही कोल्हापूरच्या सुप्रसिद्ध तोफखाने घराण्यातील होती. अशोकला लहानपणापासूनच मर्दानी खेळांची आवड होती. पुण्याच्या महाराष्ट्र मंडळात त्याने या क्षेत्रात प्रशिक्षण घेऊन उत्कृष्ट प्रावीण्य मिळविले होते. अशोकचे व्यक्तिमत्त्व पाहताक्षणीच डोळ्यांत भरण्याइतके रुबाबदार होते. सहा फुटांची उंची, कणखर देहयष्टी, भेदक डोळे यामुळे कुणालाही त्याच्याकडे पाहतच राहावेसे वाटे.

पुण्याच्या वाडिया कॉलेजमधून त्याने बी.एससी.ची पदवी घेतली. त्यानंतर तो वायुदलात प्रशिक्षण घेण्यासाठी दाखल झाला. त्याचे वडील बाळासाहेब ढवळे हे माझे जुने स्नेही. फिल्म डिव्हिजनने महाराष्ट्रातील किल्ले या विषयावर एक लघुपट (documentry) काढण्याचे ठरविले होते. या निमित्ताने सल्लागार म्हणून फिल्म डिव्हिजनने आपल्या पेडर रोडवरील कार्यालयात मला बोलाविले होते. त्या बैठकीत सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक कै. वसंत देसाई, बाळासाहेब ढवळे आणि मी असे तिघे जण एकत्र आलो. त्या वेळी आमच्या जुन्या परिचयाचे गाढ मैत्रीत रूपांतर झाले.

अशोक ढवळे याचे वायुदलातील क्षेत्र हे मला सर्वस्वी अपरिचित होते. आपल्या वायुदलाच्या आणि वैमानिकांच्या कामगिरीची चित्तथरारक वर्णने काय ती माझ्या वाचनात येत. पण अशोक ढवळे ज्या ज्या वेळी आम्हांला भेटण्यासाठी येई त्या त्या वेळी विमानदलाच्या अद्भुत हकीकती सांगे. त्या आम्ही मंत्रमुग्ध होऊन ऐकत असू. त्याच्या स्वत:वरही जीव घेणारे प्रसंग ओढवले होते. त्याने आपला एक अनुभव सांगितला तो असा : एकदा अशोक हा वायुदलातील जेट विमान चालवीत होता. तो प्रदेश हिमालयातील सिक्किमच्या जवळपासचा असावा. अशोकचे विमान अतिशय उंचीवरून चालले होते. विमानात काय तांत्रिक बिघाड झाला कोण जाणे, विमान झपाट्याने खाली येऊ लागले. आणखी काही क्षणांचा विलंब झाला तर मृत्यू आपल्यावर कोसळणार याची जाणीव होताच अशोकने ताबडतोब निर्णय घेऊन विमानाचे दार उघडले आणि हवाई छत्रीच्या (पॅराशूट) साहाय्याने पृथ्वीकडे झेप

घेतली. जेट विमान कोसळले, पण अशोकचे प्राण वाचले. काही किरकोळ जखमांवर तो या प्राणसंकटातून निसटला. त्यामुळे त्याला काही आठवडे दवाखान्यात पडून राहावे लागले.

विमानदलातील एकेका विमानाचा खर्च काही थोडाथोडका नाही. पण वायुदलाने सगळ्या परिस्थितीची बारीकसारीक चौकशी करून अशोकच्या प्रसंगावधानाची प्रशंसाच केली.

अशोक ढवळे हा वायुदलाच्या अनेक छावण्यांतून काम करीत होता. त्याचे वैवाहिक जीवनही मोठे समाधानाने चालले होते. त्याला एक मुलगाही (आमचा नातू कौस्तुभ) झाला होता. या अवधीत अशोकने तांबरम (मद्रासजवळ), तेजपूर, अरुणाचल प्रदेश, अंबाला इत्यादी ठिकाणी कामे केली. आघाडीवरील विमानदलात सक्रिय कामगिरी करण्यासाठी वयोमर्यादेची एक अट लावण्यात येते. ती मर्यादा संपल्यावर अशा वैमानिकांना त्यांच्या विभागातून काढून निरीक्षक-प्रशिक्षक अशी कामे देण्यात येतात. अशोकने ती मर्यादा ओलांडली, विमानदलाकडून हैदराबादजवळच्या विमान शिक्षण संस्थेत प्रशिक्षक म्हणून अशोकची नेमणूक करण्यात आली. तो काही आठवड्यांतच आपल्या कामावर रुजू होण्यास जाणार होता. इतक्यात डिसेंबर १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धाचा डोंब उसळला.

वयोमर्यादा ओलांडली असल्यामुळे अशोकला आघाडीच्या दलात सामील होण्याचे कारण नव्हते. तो सुरक्षितपणे हैदराबादच्या वायुदल शिक्षण केंद्रात प्रशिक्षक म्हणून राहू शकला असता. पण ही गोष्ट त्याच्या धाडसी स्वभावाला मानवणारी नव्हती. युद्धाचा भडका उडतो आहे, त्यातून आपण पाय मागे घ्यावा ही कल्पनाच त्याला असह्य झाली. ''मला आघाडीवर जाऊ द्या. फक्त काही महिन्यांनी मी वयोमर्यादा ओलांडली म्हणून मला मागे ठेवू नका.'' असा त्याने हट्ट धरला. त्याची समजूत घालण्यासाठी त्याला युद्धआघाडीवरील अंबाला येथील विमानतळावर नेमण्यात आले. तेही त्याला पटले नाही. त्याला हवे होते त्याचे जुने स्वतःचे आणि पूर्वी प्रत्यक्ष काम केल्याचे विमान ताफ्याचे स्थळ. आपल्या विमानदलाच्या वरिष्ठांना तो म्हणाला, ''मला माझ्या पूर्वीच्या युनिटमध्ये जाऊ द्या. अंबाल्याच्या सुरक्षित युनिटमध्ये बसून मी काय करणार? मला पाकिस्तानावरील वैमानिक हल्ल्यात प्रत्यक्ष भाग घ्यायचा आहे.'' अशोकचा अफाट उत्साह पाहून विमानदलाने त्याच्या मागणीला शेवटी मान्यता दिली आणि अशोक पाकिस्तानच्या सरहद्दीवर, अमृतसर येथे दाखल झाला.

अंबाला येथे जाण्यापूर्वी अशोक मुंबईला येऊन आम्हांला भेटून गेला. तो प्रसंग अद्याप माझ्या डोळ्यांसमोर आहे. मी त्याला म्हटले, ''अरे, हैदराबादच्या विमानतळावरील नोकरी बरी होती ना? आघाडीवर जाण्याची कोणत्याच प्रकारे सक्ती

नव्हती. मग जाण्याची एवढी घाई का?'' उत्तरादाखल अशोकने माझ्याकडे रोखून पाहिले. त्याच्या डोळ्यांतील खोल भाव माझ्या हृदयात जाऊन बसला. त्याच्या तेजस्वी डोळ्यांत त्या क्षणी मला मृत्यूची झाक दिसल्याचे अद्याप आठवते. क्षणभर का होईना, माझ्या पोटात धस्स झाले.

योगायोग पाहा. नेमके त्या वेळी मी पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचा अभ्यास करीत होतो. माझ्यासमोर भाऊसाहेबांची बखर होती, होळकरांची थैली होती, नाना फडणिसांची पत्रे होती, फारसी कागदपत्रे होती. १० जानेवारी १७६० चा तो प्रसंग : अहमदशहा अब्दाली आणि नजीबखान रोहिला यांचा यमुनेपलीकडील अंतर्वेदीत भारी जमाव जमलेला. दिल्ली येथे दत्ताजी शिंद्यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे उत्तर भारतातील प्रमुख लष्करी ठाणे होते. रोहिल्यांच्या मानाने मराठ्यांचे सैन्य कमी. दत्ताजीने पेशव्यांकडे लष्करी साहाय्याची मागणी केली. पण पेशवे निजामाच्या मोहिमेत गुंतलेले. मल्हारराव होळकर राजस्थानात अडकलेले. रोहिले दिल्लीच्या उत्तरेस दहा मैलांवर असलेल्या बरारी येथे यमुनापार होऊन चालून आले. दिल्लीहून मराठी लष्कर हलवून ग्वाल्हेरला न्यावे आणि पेशव्यांकडून येणाऱ्या मदतीची प्रतीक्षा करावी, असा भोवतालच्या मंडळींनी दत्ताजीला सल्ला दिला. त्या तेजस्वी वीराला तो मानवला नाही. तो रोहिल्यांवर चालून गेला. ''कालचे शेणाचे गोळे आज लोखंडाचे बनू पाहतात,'' हे त्याचे रोहिल्यांसंबंधीचे उद्‌गार!

''दिल्लीचा परिसर म्हणजे कुरुक्षेत्राची पुण्यभूमी. येथे मोक्ष मिळावा म्हणून अनेक मुनी, तपस्वी वर्षानुवर्षे तपस्या करतात. पण आम्ही क्षत्रिय. रणभूमीवर जय मिळाला तर भोगण्यास पृथ्वी आणि धारातीर्थी पडणे आल्यास क्षणात स्वर्ग, मुक्ती आणि मोक्ष. याहून अधिक आम्हांस काय पाहिजे?'' असे उद्‌गार काढीत दत्ताजी शिंद्याने बरारीच्या दिशेने चाल केली. परंतु त्या चढाईत त्याला रणभूमीवर आपला देह ठेवावा लागला. माझे आणि अशोकचे भाषण चालू असताना नेमके त्याच वेळी माझ्या पुढ्यात असलेले दत्ताजीवरील पान हा योग माझ्या त्या वेळी लक्षात आला नाही. पण नंतरची घटना पाहून असे वाटते की, मृत्यू हा अशोकला बाजूला सारू पाहत होता. पण अशोक तर मृत्यूच्या पाठीला लागला होता! नाही तर कोणत्याही प्रकारची सक्ती नसताना आघाडीवर जाण्याचा हट्ट त्याने कशाला धरला असता? पानिपतच्या बखरीत भाऊसाहेबांनी विश्वासरावांना म्हटले, ''रावसाहेब, आज युद्धाचा प्रसंग आहे. अंगावर चिलखत तरी ठेवावे.'' तर विश्वासरावाने उत्तर दिले, ''भाऊसाहेब, आज आम्ही मृत्यूचा शोध घेत रणात फिरणार आहोत!''

त्याच हिरिरीने अशोकने आपले विमान पाकिस्तानवर नेले. पुढील आठवड्याभरात त्याने पेशावरपर्यंत धडक मारून शत्रुसैन्यावर बॉंबवर्षावाची तुफान आक्रमणे केली.

त्याने आपल्या आईला लिहिलेले पत्र त्याच्या मृत्यूनंतर एक दिवसाने तिच्या हाती पडले. ते मी जपून ठेवले आहे. त्यात त्याने म्हटले आहे : ''तुम्ही काही काळजी करू नका. आमच्या बॉंबवृष्टीमुळे पाकिस्तानच्या सैन्याची धावपळ चाललेली मी जेव्हा वरून पाहतो तेव्हा मन उत्साहाने भरून येते. पाकचा निकाल लावून आम्ही लवकरच परत येऊ.''

युद्ध संपत आले, आम्हीही भारताच्या विजयाचा हर्ष मनोमन बाळगून चाललो होतो. काळ फक्त आणखी एकच दिवस थांबला असता तर सारे सुरळीत झाले असते. पण ते होणे नव्हते. ११ डिसेंबर १९७१ रोजी एक तार आमच्या हाती पडली. ती विमानदलातून आली होती. माझे थोरले जावई हे त्या वेळी पुण्याजवळील लोहगावच्या विमानतळावर वैद्यकीय अधिकारी होते. तारेतील मजकूर ''अशोक ढवळे बेपत्ता असल्याचे समजते'' असा होता.

भयंकर भवितव्याच्या कल्पनेने माझे मन अक्षरशः दडपून गेले. भाबडी आशा पुन्हा पुन्हा म्हणत होती, अगदीच घाबरण्याचे काय कारण आहे? अशोकचा पत्ता नाही एवढेच म्हटले आहे ना? तो शत्रुकैदेत जिवंतही असू शकेल. मी आपल्या मनाची समजूत घालण्याचा सतत प्रयत्न करीत होतो. असाच प्रसंग कल्पून महाकवी गालिब याने पक्षी, बंधने, भाग, घरटे, वीज इत्यादींचे रूपक पुढील शब्दांत वर्णिले आहे :

*कफस में मुझसे रुदादे चमन कहते न डर हमदम*
*गिरी है जिसपे कल बिजली वो मेरा आशियां क्यूं हो?*

''अरे माझ्या सोबत्या, मी असा पिंजऱ्यात अडकलो आहे. माझ्या मागे बागेत आणि माझ्या घरात काय घडले याची हकीकत काही न लपवता मला सांग बरे. संकोच करू नकोस. अरे वेड्या, काल बागेत प्रचंड वीज कडाडली. ती माझ्या घरट्यावरच जाऊन कोसळली असे थोडेच असेल?''

पण काय सांगू? सर्व काही सुखरूप असेल अशी आम्ही उराशी धरलेली आशा निराधार निघाली.

आम्ही पुण्यास पोहोचलो. दुसऱ्या दिवशी आलेल्या दुसऱ्या तारेने मजकूर स्पष्ट झाला. बॉम्बहल्ल्यावरून परत येत असताना विमानविरोधी तोफांनी त्याच्यावर हल्ला केला. त्यात अशोकला जबर जखम झाली. तशाही परिस्थितीत आपले विमान शत्रूच्या हाती लागू नये म्हणून त्याने ते तसेच पुढे रेटले. पाक सरहद्द ओलांडल्यावर अमृतसरजवळ त्याचे विमान कोसळले.

अशोकचे शरीर छिन्नविच्छिन्न झाले होते. ते ओळखणे कठीण होते. पण त्याने उराशी बाळगलेल्या पिशवीतील दोन चित्रांमुळे ओळख पटली. एक फोटो माझी मुलगी अनुराधा हिचा आणि दुसरा फोटो त्यांचा एक वर्षाचा मुलगा कौस्तुभ याचा.

आम्हा सर्वांवर ब्रह्मांडच कोसळले होते. आम्ही अनुराधाचे सांत्वन कोणत्या शब्दांनी करणार?

काळ कुणासाठी थांबत नाही. या भयंकर दुःखातून सावरण्यास आमच्या कुटुंबाला पुष्कळ दिवस लागले. अशोक पाकच्या कैदेत असेल, नंतर तो सुटून येईल, ही तिची वेडी आशा. तिने कडकडीत असे सोळा सोमवार केले. शेवटच्या सोमवारी तो जेवणाच्या वेळेस नक्की येईल, त्या वेळी तुम्ही पण असायला पाहिजे, असा तिने आमच्यापाशी हट्ट धरला. पण ते कसे शक्य होते? आम्हांला अश्रू आवरणे कठीण झाले. पाट-पाणी केलेले रिकामेच राहिले. "द वन हू डिड नॉट कम टु द लंच!"

या दुःखातून सावरण्यास अनुराधाला अतिशय कष्ट पडले. तिचे मन रमविण्यासाठी मी तिला कॉलेजमध्ये पुन्हा नाव घालण्याचा सल्ला दिला. चिकाटीने तिने राज्यशास्त्रात एम.ए. ची पदवी मिळवली. ग्रंथालय शिक्षणाची डिग्री पण मिळवली. तत्त्वज्ञानाचे आणि अध्यात्माचे तिला आकर्षण वाटू लागले. आता ती काश्मीरमधील शैव संप्रदाय आणि ज्ञानेश्वरी यांचा अभ्यास करून मराठा विद्यापीठातून डॉक्टरेटसाठी प्रबंध लिहीत आहे. तिचा मुलगा कौस्तुभ आता बी.कॉम. झाला आहे. गिटार-वादनात त्याने पुण्यात खूप नाव कमावले आहे. काळ थांबलेला नाही.

अशोकच्या मृत्यूनंतर मला अनेक पत्रे आली. महाराष्ट्रातील थोर इतिहास-संशोधक आणि माझे मित्र कै. ग. ह. खरे यांनी पत्रात लिहिले होते : "माधवराव, आपले जावई अशोक ढवळे हे सूर्यमंडळ भेदून गेले या जाणिवेने शोक आवरावा."

भारत सुजलाम्, सुफलाम् व्हावा यासाठी आमच्या कुटुंबाला हा त्याग सोसावा लागला. त्यानंतर जेथे अशोकचे विमान कोसळले ते स्थळ पाहण्यासाठी आम्ही पति-पत्नी अमृतसरला जाऊन आलो. आज त्या गोष्टीला बावीस वर्षे झाली. मृत्युमुखी गेलेले एकदाच अग्नीच्या आहारी जातात, पण आम्हा मागे राहिलेल्यांची अंतरीची आग विझत नाही. गालिब म्हणतो, "हम तो रोज हर दिन जलजलके मरे जाते हैं." ते खरे आहे.

❋ ❋

# ग्यानी प्रतापसिंग

अमृतसर येथील अकाल तख्त आणि सुवर्णमंदिर यांचे माजी पुजारी ग्यानी प्रतापसिंग यांच्या निर्घृण हत्येची बातमी वाचली आणि माझे मन सुन्न झाले. ग्यानी प्रतापसिंग या विद्वान, धर्मपरायण आणि साधुतुल्य माणसाशी माझा विलक्षण रीतीने संबंध आला होता. साडेचार वर्षांपूवी अमृतसर येथे त्यांची गाठ पडली आणि तीन-चार तासपर्यंत त्यांच्या सहवासात शिखांचा इतिहास, धार्मिक परंपरा, पंजाबातील दोनशे वर्षांपूर्वीचा संघर्ष इत्यादीसंबंधी माहिती मिळविण्यात मी घालविले. ग्यानी प्रतापसिंगांच्या समतोल आणि संशोधक दृष्टीने मी अतिशय प्रभावित झालो. त्यांची गाठ कशी पडली त्याची हकीकत पुढीलप्रमाणे :

अमृतसरचे सुवर्णमंदिर पाहावे अशी आम्हा पतिपत्नींची फार दिवसांची इच्छा होती. तो योग २ नोव्हेंबर १९७९ रोजी आला. त्या दिवशी संध्याकाळी आम्ही अमृतसरला पोचलो. स्टेशनला लागून ग्रँड हॉटेल आहे. तेथे आम्ही मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ नोव्हेंबरला आम्ही अमृतसर स्टेशनवर जाऊन अमृतसर ते दादर अशी प्रथम वर्गाची तिकिटे आरक्षित करून घेण्याच्या प्रयत्नाला लागलो. प्रवास लांबचा असल्याने तिकिटे मिळण्यास अडचण पडणार नाही अशी आमची समजूत. पण स्टेशनवर कळले की, पाकिस्तानातून हॉकीची टीम येणार होती. त्या निमित्ताने अनेक पाक नागरिकांनी मुंबईपर्यंतची तिकिटे घेतली होती. आठ-दहा दिवसपर्यंत तरी आम्हांला मुंबईची तिकिटे मिळणे अशक्य आहे.

हे ऐकून आम्ही अस्वस्थ झालो. अमृतसरला आठ-दहा दिवस बसून करायचे काय? अशा अस्वस्थ मन:स्थितीत आम्ही सुवर्णमंदिराकडे गेलो. सुवर्णमंदिराच्या माहिती विभागाच्या ऑफिसमध्ये आमच्या शेजारी एक वृद्ध गृहस्थ बसले होते. मनुष्य अतिशय सात्त्विक, सज्जन आणि शांत वृत्तीचा दिसला. समोरच्या अधिकाऱ्याला आम्ही कोण, कुठले हे सांगत असताना ते गृहस्थ आमचे बोलणे ऐकत होते. मी माहिती अधिकाऱ्याला म्हटले, "मी मुंबईहून आलो आहे. मी एक सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी आहे. शिखांच्या इतिहासावर माझे एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळे आम्ही पती-पत्नी हे सुवर्णमंदिर पाहण्यासाठी मुद्दाम अमृतसरला आलो आहोत."

मी शिखांचा इतिहास लिहिला आहे हे ऐकताच माझ्या शेजारी बसलेल्या वृद्ध गृहस्थांचे कुतूहल जागे झाले. ते म्हणाले, ''माझाही शिखांच्या इतिहासाचा अभ्यास कित्येक वर्षांपासून आहे. तुम्ही कोणते पुस्तक लिहिले आहे?'' मी म्हटले, ''पंजाबचा सुभेदार मीर मोइनुल-मुल्क ऊर्फ मीर मन्नू (मृत्यू १७५३) याचे नाव शिखांच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. मीर मन्नू, अहमदशहा अब्दाली इत्यादींनी शिखांवर अनेक स्वाऱ्या केल्या आणि शेवटी पंजाब मोगल साम्राज्यातून वेगळा निघून अफगाण साम्राज्यात सामील झाला (१७६१-१८००). मोगल आणि शीख, अफगाण आणि शीख यांच्यात सतत युद्धे या काळात चालू होती. आम्हा मराठ्यांच्या स्वातंत्र्युद्धाप्रमाणे हे शिखांचे स्वातंत्र्ययुद्धच. मराठे यशस्वी झाले, तसे अफगाण-पठाणांना हाकलून लावण्यात शीखही यशस्वी झाले. मीर मन्नूचा नोकर तहमसखान हा १७६३ मध्ये पंजाब सोडून दिल्लीला आला. तिथे तो शहा आलमच्या दरबारात १८०२ पर्यंत होता.

''तहमसखानाचा मुलगा सादतयारखान रंगीन हा उर्दूतील सुप्रसिद्ध कवी होता. तहमसखानाने फारसी भाषेत आपले आत्मचरित्र 'तहमसनामा' हे लिहिले आहे. या विलक्षण आत्मचरित्रात मीर मन्नू, त्याची बायको, अहमदशहा अब्दाली, शीख, मराठे यांचे अनुभव तहमसखानाने दिले आहेत. मराठ्यांच्या दृष्टीने या ग्रंथाचे महत्त्व असे की, २० एप्रिल १७५८ रोजी मराठ्यांनी लाहोर घेतले. त्यापूर्वी एक दिवस अफगाण लाहोर सोडून पळून गेले होते. माजी मोगल सुभेदाराची पत्नी मुगलानी बेगम ही लाहोरमध्येच होती. तहमसखान हा तिचा कारभारी. मराठ्यांना लाहोरचे दरवाजे दि. २० एप्रिलला उघडून देणारा हाच तो तहमसखान. त्याच्या या आत्मचरित्राचे मी इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध केले आहे.'' असे मी त्यांना सांगितले. माझे हे बोलणे ऐकून ते वृद्ध गृहस्थ म्हणाले, ''तुमचे हे पुस्तक माझ्या वाचनात नाही. मोठेच आश्चर्य आहे. चला, मी तुमच्याबरोबर सुवर्णमंदिर दाखवायला येतो.'' असे म्हणून या ७५ वर्षांच्या गृहस्थांनी आम्हांला अतिशय जिव्हाळ्याने सुवर्णमंदिराचा प्रत्येक भाग दाखविला. आज वर्तमानपत्रात गाजत असलेले अकाल तख्त, नानक निवास, रामदास निवास हे सर्व भाग आम्ही पाहून घेतले. मुख्य मंदिरात गुरुग्रंथाचा अखंड पाठ चालू असतो. तिथे आम्हांला भरपूर प्रसाद खायला मिळाला तोही ग्यानी प्रतापसिंगांमुळे. मंदिराच्या गच्चीवर आम्ही बसलो, तेव्हा माझ्याजवळ असलेली तहमसनाम्याची प्रत मी प्रतापसिंगांना चाळण्यासाठी दिली.

मी प्रतापसिंगांना म्हटले, ''पंजाबचे राज्यपाल काकासाहेब गाडगीळ यांनी शिखांचा इतिहास हे पुस्तक लिहिले आहे. मराठ्यांनी शिखांबरोबर १७८४ मध्ये मैत्रीचा तह केला आणि सतलज नदीची हद्द ठरवून घेतली. नामधारी मोगलांच्या मागे उभे राहून

मराठ्यांना भारताचे राज्य करायचे होते. आणि शिखांना अफगाणांपासून मुक्त व्हायचे होते. त्यामुळे दिल्लीबद्दलच्या मराठ्यांच्या भावना आणि शिखांच्या भावना या एकच असणे शक्य नव्हते. दोघांचीही कार्ये महत्त्वाची. पण कार्यक्षेत्रे भिन्न.''

प्रतापसिंग म्हणाले, ''शिखांच्या इतिहासाचे मर्म तुम्ही स्पष्ट करून सांगितले, त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. तुमचे हे पुस्तक पंजाबमधील प्रत्येक विद्यापीठात पोचल्याशिवाय राहणार नाही. मी तुमच्यासाठी काय करू शकतो?'' मी म्हटले, ''मुंबईला परत जाण्यासाठी आम्हांला तिकिटे मिळत नाहीत. त्यामुळे आम्हांला अडकून पडल्यागत झाले आहे. आठ दिवस तिकिटे मिळणार नाहीत असेही आम्हांला सांगण्यात आले.''

हे ऐकून प्रतापसिंग म्हणाले, ''माझ्याबरोबर चला.'' ते आम्हांला गुरुद्वारा प्रबंधक कमिटीच्या कार्यालयात घेऊन गेले. त्यांनी आमच्याशी सेक्रेटरीची ओळख करून दिली. ते त्याला म्हणाले, ''अशी विद्वान माणसे सुवर्णमंदिरात आली हा योगायोग आहे. हे शिखांच्या इतिहासाचे तज्ज्ञ. आणि मुंबईला परतण्यासाठी त्यांना तिकीट मिळू नये हा काय प्रकार आहे?''

प्रतापसिंगांच्या सांगण्यावरून रेल्वेच्या मुख्य अधिकाऱ्यासाठी गुरुद्वारामधील त्या सेक्रेटरीने माझ्याकडे एक पत्र दिले, ते असे : ''सेतुमाधवराव पगडी आणि त्यांची पत्नी हे गुरुद्वारा प्रबंधक कमिटी आणि सुवर्णमंदिर यांचे खास पाहुणे आहेत. कोणतीही सबब न सांगता त्यांची मुंबईला परत जाण्याची सोय करून द्यावी!''

मी पत्र हातात घेतले. बाहेर पडताना मी कृतज्ञतेने प्रतापसिंगांना म्हटले, ''मी तुमचा फार आभारी आहे. आमची अडचण तुम्ही दूर केलीत.'' यावर ते शांतपणे म्हणाले, ''तुम्ही शिखांच्या इतिहासासाठी इतके केलेत, आमच्याकडून इतकेही होऊ नये काय?'' असे बोलून ते सुवर्णमंदिराकडे निघून गेले.

तो दिवस होता ३ नोव्हेंबर १९७९. वेळ होती दुपारची. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना त्यांच्या सात्त्विकतेची छाप माझ्या मनावर कायमची उमटली. त्यांच्या पत्रामुळे आम्हांला तिकिटे मिळाली. आम्ही लगेच मुंबईला परत आलो. त्यानंतर पुन्हा आमची आणि प्रतापसिंगांची गाठ पडली नाही. आणि परवा बातमी ऐकली की अतिरेकी दहशतवाद्यांनी त्यांचा खून केला. एवढ्या मोठ्या व्यक्तीचा खून? कशासाठी? कोणी? शिखांनीच शिखांचा खून करावा? हा कोणता न्याय आहे? हा कुठला काळ आहे? आणि कसला इतिहास आहे? मन विषण्ण होते. लाजेने मान खाली जाते. पण इतिहास घडवणाऱ्यांना त्याचे काही आहे का?

❋ ❋

# इतिहास-ब्रह्मर्षि पोतदार

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात जी पोकळी निर्माण झाली आहे ती लवकर भरून निघू शकेल असे 'मतामतांचा गलबला कोणी पुसेना कोणाला' या वर्तमान परिस्थितीत तरी वाटत नाही. दत्तो वामन म्हणजे महाराष्ट्राचा गेल्या सत्तर-ऐंशी वर्षांचा सांस्कृतिक इतिहासच. न्यायमूर्ती रानडे यांना आपण लहानपणी पाहिले होते, असे ते मला सांगत. त्या वेळेपासून आजपर्यंत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील विविध स्थित्यंतरे त्यांनी पाहिली, अनुभवली, कथिली आणि पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवली. इतिहास परिषद असो की साहित्य संमेलन असो, राष्ट्रभाषा-परिषद असो की गीर्वाण वाग्वर्धिनी सभा असो, ग्रंथालय चळवळ असो अगर विद्यापीठीय समस्या असो, पोतदारांच्या स्पर्शाने गाडे सुरळीत चालावे असेच बहुश: होत गेले. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेचे ते सर्व काही होते म्हटल्यास वावगे ठरू नये.

पोतदारांमध्ये वाचन, लेखन, निरीक्षण, खेळकरपणा, 'राखावी बहुतांची अंतरे' ही वृत्ती, बहुश्रुतपणा इत्यादी अनेक गुण एकत्र जमले होते. पण पोतदार म्हटले की इतिहास संशोधन मंडळ, अखिल भारतीय इतिहास परिषद, इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स कमिशन इत्यादी संस्था डोळ्यांसमोर उभ्या राहतात. इतिहास-संशोधकांचे, अभ्यासकांचे आणि इतिहासप्रेमी अशा शेकडो लोकांचे जीवन त्यांनी घडविले. निजामी राज्यासारख्या मागास संस्थानातील आम्ही. पण कळमनुरी, करीमनगर यांसारख्या दूरदूरच्या गावी असूनही मी इतिहासाच्या अभ्यासाकडे वळलो तो पोतदारांच्या व्यक्तिमत्त्वामुळे. प्रत्यक्ष भेटीचा योग अनेक वर्षांनी आला. पोतदारांनी केवळ आपल्या आदर्श आणि व्यासंगी जीवनामुळे अक्षरश: शेकडो जणांना ज्ञानसाधनेकडे खेचले. या दृष्टीने पोतदार म्हणजे एक स्वतंत्र ज्ञानपीठच म्हणावे लागेल.

इतिहासाच्या क्षेत्रात पोतदारांनी काय विशेष कामगिरी केली असे लोक विचारतात तेव्हा त्यांना नक्की काय म्हणायचे असते हे त्यांचे त्यांनाच समजत नाही. अर्थात त्यांच्या हातून शिवचरित्र लिहिले गेले नाही यातून विनोद निर्माण करणारी मंडळी सोडून द्या. पण इतरांचा समज हा अपुऱ्या माहितीवर आधारलेला दिसतो. गिबन्स म्हणजे 'रोमन साम्राज्याचा अपकर्ष' हा ग्रंथ. टाइनबी म्हणजे 'जागतिक संस्कृतीचा

इतिहास', राजवाडे म्हणजे 'इतिहासाचे खंड', सरदेसाई म्हणजे 'रियासती' अशी जोड जनमानसात आहे. एखादा 'मॅग्नम ओपस' म्हणजे ग्रंथराज प्रत्येक मोठ्या लेखकाचा पाहिजेच अशी अपेक्षा ही मंडळी करतात. पण पोतदारांचा व्यासंग, त्यांचे मनन आणि चिंतन, त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांचे वक्तृत्व, संस्कृत-मराठी-हिंदी-इंग्रजीवरील त्यांचे प्रभुत्व ही पाहता त्यांना इतिहास क्षेत्रातील डॉक्टर जॉन्सन असे म्हणावेसे वाटते. ''जे जे आपणा ठावे। ते सकळांसि सांगावे। शहाणे करून सोडावे। सकल जन॥'' हे ब्रीद त्यांनी आमरण पाळले. अगदी हातचे काही राखून न ठेवता. पोतदारांच्या आणि माझ्या बैठकी नेहमी होत. दिल्ली, हैदराबाद, औरंगाबाद, पुणे, मुंबई, पैठण अशा अनेक ठिकाणी आम्ही दोघांनीही भाषणे केली आहेत. वसंत व्याख्यानमालेच्या माझ्या कित्येक भाषणांना तेच अध्यक्ष असत.

खाजगी बैठकीत पोतदारांच्या प्रचंड ज्ञानाने मी स्तिमित होत असे. मी त्यांच्याशी चर्चा केली आणि त्यांच्याकडून नवीन काही घेऊन उठलो नाही असे कधीच घडले नाही.

पुण्यातील मेहुणपुऱ्यातील दात्यांच्या वाड्यातील बैठकीत ते मला अफझलखानाचा प्रसंग समजावून सांगत होते. आमची चर्चा सुमारे दोन तास चालली होती. एकांगी, द्वंद्व युद्ध यांचे स्वरूप उलगडून दाखवण्यासाठी त्यांनी संस्कृत कोश काढले. प्रत्यक्ष घटनेसंबंधी त्यांनी कवींद्र परमानंद, जेधे शकावली, एक्क्याण्णव कलमी बखर, सभासद बखर इत्यादींना झाडून वेठीस धरले. दोन तासांच्या चर्चेत अफझल-वध प्रसंगाचे अनेक बारकावे पोतदारांनी माझ्या नजरेस आणून दिले.

अशीच एक चर्चा ते पुणे विद्यापीठाचे उप-कुलगुरू होते त्या वेळची मला आठवते. संभाजी राजे युवराज असताना त्यांना शृंगारपूर येथे ठेवण्यात आले होते. तेथे त्यांचा शाक्त पंथीय मंडळींशी संबंध आला. तो धागा घेऊन पोतदारांनी जवळजवळ दोन तासपर्यंत मला कोकणातील शाक्त पंथ, त्याचा बंगालमधील तांत्रिक विद्येशी असलेला संबंध, कोकणातील शाक्तपंथी घराणी यांचे इतके काही तपशील सांगितले की त्यांच्याकडून मी त्या पंथाची दीक्षाच घेत आहे असे मला वाटू लागले!

महाराष्ट्रातील इतिहासप्रसिद्ध कुटुंबांची त्यांना खडान् खडा माहिती असे. शिवाजी महाराजांसंबंधी त्यांनी बारीकसारीक माहिती गोळा केली होती. असे असूनही महाराजांच्या जीवनातील काही घटनांसंबंधी अधिक माहिती मिळविण्याची त्यांची धडपड होती. महाराजांचा बालपणाचा काळ, आग्रा-भेटीमागील महाराजांचा मनोदय, व्यंकोजी राजांशी संबंध, पितापुत्रांचे संबंध, महाराजांचे शेवटचे दिवस, असे काही प्रसंग त्यांच्या चिंतनाचे सतत विषय बनलेले असावेत असे मला त्यांच्याशी झालेल्या अनेक चर्चांच्या शेवटी वाटू लागले.

प्रत्यक्ष लेखन होईल ते जास्तीत जास्त निर्दोष व्हावे ही त्यांची तळमळ सहज समजण्यासारखी आहे.

''नुसते खूब (उत्तम) असून चालणार नाही. खूबतर (अत्युत्तम) हवे. ते मिळविण्याची आमची धडपड आहे. आता बघू या आमची नजर कोठे जाऊन स्थिरावते ती.'' असे उर्दू कवी हाली याने म्हटले आहे :

**है जुस्तजू के खूबसे है**
**खूबतर कहाँ ?**
**अब देखिये ठहरती है**
**जाकर नजर कहाँ ?**

असेच पोतदारांच्या लेखनविषयक दृष्टिकोनाचे असावे. पण हा दृष्टिकोन, हा अद्‌भुत छंद, 'मॅग्निफिसेंट ऑब्सेशन' हा ध्रुवताऱ्यासारखा मार्गदर्शकच ठरणारा आहे. शिवचरित्रे लिहिली जातील. पण ती अधिकाधिक निर्दोष व्हावी अशी तळमळ काही कमी महत्त्वाची नाही. आमच्यासारख्या शिवचरित्रकारांनी या तळमळीतून निश्चितच बोध घेतला आहे.

पोतदारांनी आयुष्यभर माणसे जोडली, आणि जोडलेली कधी तोडली नाहीत. यामुळे ते प्रत्येकाला हवेहवेसे वाटत. इतिहासाचे अनेक प्रकांडपंडित माझ्या पाहण्यात आले आहेत. सर जदुनाथ सरकार, रमेशचंद्र मुजुमदार, प्राध्यापक मुहंमद हबीब, सर शफात अहमदखान, ईश्वरी प्रसाद, डॉक्टर ताराचंद, बेनी प्रसाद, आळतेकर, मिराशी, सरदेसाई, हारूनखान, शेरवाणी, पिसुर्लेकर, डॉ. सतीशचंद्र अशी किती नावे सांगावीत ? या सर्वांत पोतदारांचे व्यक्तिमत्त्व आगळेच भासे. माझा आणि त्यांचा सहवास काही नाही तरी तब्बल पंचवीस वर्षांचा होता. माझ्या आणि त्यांच्या बैठकी आणि चर्चा निदान शंभर वेळा तरी झाल्या असतील. पण कुणाही इतिहासकाराबद्दल त्यांनी कटू शब्द वापरले असे मला आठवत नाही. फारच झाले तर ते म्हणतील, ''डॉक्टर ताराचंद म्हणत की जदुनाथ सरकारांचे फारसी भाषेचे ज्ञान कमी पडते.'' किंवा मला म्हणतील, ''माधवराव, अमक्या अमक्या इतिहासकाराबद्दल तुम्ही ज्या मजकुरावरून विधान केलेत, तो माझ्या अद्याप पाहण्यात आला नाही. त्यामुळे त्याबद्दल मी काही मत देऊ शकत नाही.'' यापलीकडे ते गेले नाहीत.

आपल्याजवळ असलेली भरपूर माहिती इतरांना देण्यात त्यांना मनस्वी आनंद होई. यामुळे ज्ञानपिपासूंना त्यांचा सहवास म्हणजे रम्य उपवनातील फेरफटक्याप्रमाणे वाटे.

**ठहर गये वो जहाँ**
**सर्व बाग थे गोया।**
**अगर चले तो नसीमे**
**बहार (वसंतवात) होके चले॥**

पोतदारांचे इतिहासविषयक अनेक लेख, टिप्पण्या, निबंध हे वाङ्मय काही कमी नाही. ते संशोधनपत्रिकांतून विखुरलेले आहे. ते एकत्र केले तर त्यातून पोतदारांच्या मार्मिक निरीक्षणाची प्रचीती अभ्यासकांना यावी.

लोकांना बोलते करून त्यांच्याकडून कामे करवून घेणे हे पोतदारांचे कर्तृत्व फार मोठे होते. याचे एकच उदाहरण सांगतो. मराठ्यांच्या इतिहासाची असंख्य साधने पोर्तुगीज भाषेत उपलब्ध आहेत. त्या साधनांची माहिती गोमंतकातील सुप्रसिद्ध संशोधक पिसुर्लेकर यांनी अनेक ग्रंथांतून करून दिली. पण हे ग्रंथही पोर्तुगीज भाषेत. महाराष्ट्रात त्यांची फारशी माहिती कशी व्हावी ?

येथे पोतदारांचे कर्तृत्व कसोटीला लागले. त्यांनी पिसुर्लेकरांना सांगितले, "तुम्ही पुणे विद्यापीठात मराठे-पोर्तुगीज संबंध, साधने यांवर भाषणे द्या. आम्ही ती छापून काढू." पिसुर्लेकरांना मराठीतून ती भाषणे लिहून काढणे काहीसे अवघड गेले, कारण त्यांची सगळी ग्रंथरचना पोर्तुगीज भाषेत आणि थोडीशी इंग्रजीतून झाली होती. पण पोतदारांची जिद्द मोठी. त्यांनी पिसुर्लेकरांच्या सर्व अडचणी दूर केल्या. आणि मराठीतील या विषयावरील एक प्रमाण ग्रंथ सिद्ध झाला. या ग्रंथामुळे पोर्तुगीज साधनांचा विस्तार व त्यांचे महत्त्व यांची मराठी अभ्यासकांना कल्पना आली.

आमच्यासारख्या जवळच्या मंडळींचे कौतुक करण्याची त्यांची पद्धत घरातील वडीलधाऱ्या माणसाप्रमाणे असे. आमच्या मुलाबाळांच्या लग्न-मुंजी इत्यादी कार्यात ते भाग घेत. आस्थेने चौकशी करीत. घरातील मुलामुलींना स्वाक्षऱ्या देत. क्वचित लटक्या दरडावणीच्या स्वरात आमची इतिहासविषयक विधाने उडवून लावण्याचा प्रयत्न करीत आणि शेवटी म्हणत, "याचा विचार झाला पाहिजे."

पोतदारांचे सर्वच क्षेत्रांतील कर्तृत्व थक्क करून सोडणारे आहे. 'भारत इतिहास संशोधन मंडळ' आणि 'भारतेतिहास परिषद' या दोन संस्था केवळ त्यांच्याच प्रयत्नामुळे आज नावारूपाला आल्या आहेत, आणि भारताचे अलंकार म्हणून शोभत आहेत! त्यांनी संस्था निर्माण केल्या आणि जोपासल्या. राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाशी ते गेली सत्तर-ऐशी वर्षे इतके तादात्म्य पावले होते की भारताच्या इतर भागांत महाराष्ट्रीय संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणून लोक त्यांचा उल्लेख आदराने करीत. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे पोतदारांनी माणसे घडविली, आणि निष्ठा, जिद्द, इत्यादींचा आदर्श राष्ट्रासमोर ठेवला.

असा माणूस क्वचितच आपल्या वाट्याला येतो. त्यांचा सहवास आम्हांला लाभला हे आमचे भाग्य. आज ते आपल्यात नाहीत. घरातले वडीलधारे माणूस निघून जावे असे झाले आहे. पुणे, वाई याहूनही लांब अशा ठिकाणी ते राहायला गेले आहेत :

यारोंकी मौतने
मेरी दुनिया उजाड दी!
यारोंने कितनी दूर
बसायी हैं बस्तियां!

❇ ❇

# योगी कृष्णप्रेम ऊर्फ रोनाल्ड निक्सन

आयुष्यात काय विलक्षण योगायोग येतात हे सांगता येत नाही. इ.स. १९२६ मध्ये मी कॉलेजशिक्षणासाठी काशीला गेलो. तिथे आम्हाला इंग्रजी साहित्य शिकविण्यासाठी एक इंग्रज प्राध्यापक होते. त्यांचे नाव रोनाल्ड निक्सन. ते आम्हाला शेक्सपियरचे 'हेन्री फिफ्थ' हे नाटक शिकवीत असत. माझा इंग्रजी साहित्याचा अभ्यास बऱ्यापैकी होता. त्यामुळे प्रा. निक्सन यांचे माझ्याकडे लक्ष गेले. त्यांच्याकडे माझे जाणे-येणे वाढले. बनारस विद्यापीठात अभिनयासहित इंग्रजी संवाद म्हणून दाखविण्याची स्पर्धा ठेवण्यात आली होती. मी पण स्पर्धेसाठी आपले नाव दिले होते. 'हॅम्लेट' नाटकातील 'टु बी ऑर नॉट टु बी' हे हॅम्लेटचे सुप्रसिद्ध स्वगत मला म्हणून दाखवायचे होते. अभिनयाचे आणि भाषणाचे पाठ घेण्यासाठी मी प्रा. निक्सन यांच्याकडे गेलो. त्या वेळी ते बनारस येथे लखनौ विद्यापीठाचे कुलगुरू (सेवानिवृत्त) चक्रवर्ती यांच्या गंगा घाटावरील वाड्यात राहत होते. तेव्हा ते तरुण आणि अविवाहित होते. मला अभिनय आणि संभाषण शिकविण्यासाठी त्यांनी पुष्कळ मेहनत घेतली. त्यामुळे मला त्या स्पर्धेत पारितोषिक मिळाले.

नंतर काही महिन्यांनी निक्सन हे विद्यापीठ सोडून गेले आणि मग एक दिवस बातमी आली की निक्सन हे बनारसला आले आहेत. मी त्यांना भेटण्यासाठी गेलो, आणि त्यांना पाहून थक्कच झालो. रोनाल्ड निक्सनचे रूप पार बदलून गेले होते. डोक्यावर ब्राह्मणी पद्धतीप्रमाणे घेरा आणि शेंडी. कपाळाला उभे गंध, अंगावर भगवी वस्त्रे हे त्यांचे आताचे रूप पाहून मी विस्मित झालो. माझ्या चेहऱ्यावरील भाव पाहून ते हसून मला म्हणाले, ''सेतुमाधव, मी आता हिमालयात असतो. कृष्णभक्तीचे व्रत मी स्वीकारले आहे. आता माझे नाव निक्सन नाही बरे का? माझे नाव आहे कृष्णप्रेम.''

त्यांचे बोलणे ऐकून मला मोठे आश्चर्य वाटले. दोनचार दिवसांनी मी कॉलेजमध्ये गेलो तेव्हा ते व्हरांड्याच्या पायरीवर उभे होते. त्यांच्या भोवती माझ्या वर्गबंधूंचा घोळका होता. त्यांना पाहताच मी सायकलवरून खाली उतरलो. त्यांच्याजवळ जाऊन मी वाकलो आणि त्यांच्या पायावर हात ठेवला. त्यांनी मला उठविले आणि आशीर्वाद दिला. त्या वेळी त्यांनी डोक्याला साफा बांधला होता. त्यांचे निळे आणि प्रेमळ डोळे

मला अद्याप आठवतात. स्वामी कृष्णप्रेम यांची आणि माझी त्यानंतर कधीच गाठ पडली नाही.

त्या गोष्टीला आता साठ वर्षे उलटून गेली. कृष्णप्रेम यांचे पुढे काय झाले याची मला माहिती कळत नव्हती. पण योगायोग पाहा. सहा वर्षांपूर्वी म्हणजे १९८६ मध्ये काश्मीरचे युवराज, राज्यपाल आणि माजी केंद्रीय मंत्री डॉ. करणसिंह यांच्या आत्मचरित्राचे दोन खंड माझ्या हाती आले. पहिल्या खंडाचे नाव आहे 'हेअर ॲपरंट' (युवराज). दुसऱ्या खंडाचे नाव आहे 'सदरे रियासत' (राज्यप्रमुख). त्या पुस्तकात मला कृष्णप्रेम आणि त्यांचे शिष्य करणसिंग यांच्याबद्दल मोठी विलक्षण माहिती मिळाली. आपल्या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडाच्या ('युवराज') पान १४२ वर करणसिंग लिहितात : ''त्या वर्षी मी वाचलेल्या पुस्तकांत (४९-५०) एक महत्त्वाचे पुस्तक म्हणजे दिलीपकुमार राय यांचे 'अमंग दि ग्रेट' (थोरामोठ्यांच्या सहवासात) हे होते. बर्ट्रांड रसेल, रोमा रोलाँ, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर आणि अरविंद घोष यांच्यावरील निबंधांचा तो संग्रह होता. त्या निबंधांतूनच रोनाल्ड निक्सन या नावाच्या इंग्रजाचा उल्लेख आला होता. त्यांनी संन्यास स्वीकारून कृष्णप्रेम हे नाव धारण केले होते. त्या पुस्तकामुळे मला माझ्या आयुष्यातील एका विलक्षण महात्म्याच्या चरणांपर्यंत जाण्याची संधी मिळाली. माझ्या आयुष्यात श्री अरविंद आणि श्री कृष्णप्रेम हे मार्गदर्शकांप्रमाणे माझ्या साधनेला वाट दाखवीत होते. कृष्णप्रेम यांच्यामुळे मी त्या अमर मुरलीधराच्या दिव्य आणि मधुर बासरीच्या सुरांकडे ओढला गेलो.''

आपल्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडात (सदरे रियासत) करणसिंग हे कृष्णप्रेम यांच्यासंबंधी लिहितात : ''रोनाल्ड निक्सन हे पहिल्या महायुद्धात ब्रिटिश वायुदलात अधिकारी म्हणून काम करीत होते. महायुद्ध संपल्यानंतर ते इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून लखनौ विद्यापीठात दाखल झाले. त्या वेळी लखनौ विद्यापीठाचे उपकुलगुरू म्हणून प्रा. चक्रवर्ती हे काम पाहत होते. चक्रवर्ती यांची पत्नी ही मोठी भगवद्भक्त आणि योगिनी. तिचे नाव यशोदामाई.

आयुष्यातील चमत्कार पाहा. यशोदामाईंनी काही काळाने गृहस्थाश्रमाचा त्याग केला आणि त्या हिमालयात जाऊन राहिल्या. प्रा. निक्सन हे काही दिवसांसाठी बनारसच्या हिंदू विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून राहिले आणि नंतर ते आपल्या गुरूपाठोपाठ हिमालयात गेले. तेथे त्यांनी संन्यास घेऊन कृष्णप्रेम हे नाव धारण केले. अलमोड्यापासून काही अंतरावर मीरतोला हे गाव आहे. तेथे यशोदामाई आणि कृष्णप्रेम यांनी श्रीकृष्णाचे मंदिर बांधले. काही वर्षांनी काही इंग्रज शिष्य येऊन त्यांना मिळाले. त्यांतील दोन शिष्यांपैकी एकाने श्रीहरिदास, तर दुसऱ्याने श्रीमाधव आशिश अशी भारतीय नावे धारण केली. काही भारतीय शिष्यही त्यांच्या भोवती जमले.''

करणसिंग म्हणतात, ''कृष्णप्रेम हे मोठे अधिकारी पुरुष होते. अतिशय चौकस मन आणि अध्यात्माची विलक्षण ओढ हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष म्हणता येतील. ते केंब्रिज विद्यापीठाचे पदवीधर, पण त्यांनी संस्कृत व पाली भाषेचा कसून अभ्यास केला. ते हिंदी आणि बंगाली भाषा सफाईने बोलत. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यांचे अनेक लेख विविध मासिकांतून आणि नियतकालिकांतून प्रसिद्ध होत. 'योगाचा परिचय' ही त्यांची लेखमाला ('इनिसिएशन इंटु योग') ही जगप्रसिद्ध झाली. त्यांचे आणखी दोन ग्रंथ सर्वमान्य झाले. ते म्हणजे 'भगवद्गीतेतील योग' आणि 'कठोपनिषदातील योग' होत.''

त्यांच्या ग्रंथांतील विशेष म्हणजे त्यांनी पाश्चात्य योग्यांचा आणि गूढवाद्यांचा परिचय या ग्रंथांतून करून दिला आहे. अशा योग्यांमध्ये लॉटिनस, हरमेस प्रिसमेजिस्टस्, मिस्टर एफहार्ट ही काही नावे देऊन त्यांनी असे दाखवून दिले आहे की, अध्यात्माची ओढ एका विशिष्ट धर्मापुरती नाही, ती जगात सर्वत्र पसरली आहे. एकीकडे विलक्षण बुद्धिमत्ता तर दुसरीकडे त्यांची अती उत्कट अशी कृष्णभक्ती, ही साधकांच्या सहज लक्षात येतील. कृष्णाला ते ठाकूर म्हणून संबोधत. अरविंद घोष यांनी कृष्णप्रेम यांच्याविषयी धन्योद्‌गार काढले आहेत.

करणसिंग यांनी कृष्णप्रेम यांच्या पहिल्या भेटीचे वर्णन करताना म्हटले आहे : ''कृष्णप्रेम यांच्या पायावर हात ठेवण्यासाठी मी वाकलो. त्यांनी इतक्या प्रेमाने मला आलिंगन दिले की आपण जन्मभर एकमेकांना ओळखतो आहोत असे मला वाटू लागले. त्यांचे डोळे निळे होते. इतरत्र कुठेच मी इतके निळे डोळे पाहिले नाहीत. आज त्या गोष्टीला इतकी वर्षे झाली, पण अद्याप त्यांच्या तेजस्वी डोळ्यांतील प्रेम आणि शक्ती यांचे जे किरण बाहेर पडत त्यांची आठवण मी विसरलेलो नाही. कृष्णमंदिराजवळील एका लहानशा झोपडीत आमची उतरण्याची सोय करण्यात आली होती. कृष्णप्रेम यांच्या गुरू यशोदामाई यांची मुलगी मोतीराणी हिने ते देऊळ बांधले होते. यशोदामाईंचा मृत्यू २-११-१९४४ रोजी झाला. संध्याकाळच्या आरतीच्या वेळेला कृष्णप्रेम यांनी भजने म्हटली आणि अस्खलित हिंदीमध्ये कीर्तन केले. कीर्तनाला पखवाजाची साथ त्यांचे इंग्रज शिष्य माधव आशिश हे करीत होते. संध्याकाळचे दिवे लागल्यानंतर आणखी एक शिष्य रवींद्रनाथ बॅनर्जी यांनी झांजा वाजविल्या. भोवतालच्या डोंगरांतून त्यांचे प्रतिध्वनी येऊन सगळे वातावरण भारावून गेले. मी मंत्रमुग्ध होऊन तो समारंभ पाहत होतो.

''श्रीकृष्णाचे देऊळ लहानसे पण सुबक आहे. तेथे जवळच एका लहान घरात कृष्णप्रेम आणि त्यांचे शिष्य राहत होते. तेथील राहणी अतिशय साधी होती. कुणाला वाटेल की योग्यांच्या कुटिरातील वातावरण सतत गंभीरच असले पाहिजे, पण तसे काही नव्हते. ती मंडळी हाताने स्वयंपाक करून जेवत असत. चर्चा असो की गप्पा

असोत, मंडळींच्या हास्याचे तुषार सतत बाहेर पडत. कृष्णप्रेम एके ठिकाणी म्हणतात, 'हास्याची वृत्ती परमेश्वराने मानवाला दिली आहे. अप्रतिम देणग्यांपैकी ती एक आहे. जनावरांत हास्याची वृत्ती नाही. त्याची आवश्यकताही त्यांना नाही. कारण जनावरे ही निसर्गाशी समरस झालेले आणि निव्वळ उत्स्फूर्त जीवन जगणारे प्राणी आहेत. मनुष्यालाच अहंभाव आहे. आणि त्यातूनच जीवनात संघर्ष निर्माण होतो. तो कमी व्हावा यासाठीच परमेश्वराने मानवाला विनोद आणि हास्य यांची देणगी दिली आहे. जीवनात ज्याला हसता येत नाही त्याची दुर्दशा काय सांगावी ?' ''

अर्थात अध्यात्माची ओढ ही काही विनोदाची गोष्ट नव्हे. तीन दिवसपर्यंत करणसिंग हे कृष्णप्रेम यांच्याशी चर्चा करीत होते. कृष्णप्रेम हे करणसिंगांना म्हणत, ''मी तुम्हांला अमुक करा तमुक करा असे म्हणत नाही. मी इतकेच म्हणेन की तुमचा अंतरीचा दिवा विझू देऊ नका. तुमची विद्वत्ता, तुमची संपत्ती आणि तुमची कीर्ती या सर्वांहूनही तो अंतरीचा दिवा तुम्हांला अधिक मोलाचा आहे. तुम्हांला उदात्त, दिव्य आणि भव्य वाटते तिकडे या दिव्याच्या प्रकाशातून तुम्ही चाला. तुम्हांला कधीही पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही.''

कृष्णप्रेम यांनी आणखी एक गोष्ट सांगितली : प्रकृती आणि पुरुष, शिव आणि शक्ती यांची सांगड अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्यामधील विसंगती म्हणजे एक अनर्थच. ती वाट अवघड आहे. कठोपनिषदात म्हटल्याप्रमाणे ती वाट म्हणजे तारेवरील कसरत आहे. पण ही सांगड जमली नाही तर जीवन अपूर्ण राहते हे विसरू नका. कृष्णप्रेम यांच्या सहवासातील ते तीन दिवस मी कधीच विसरणार नाही. बाह्य जगात अंतरीच्या विश्वाची सांगड घालण्याची कृष्णप्रेम यांची शक्ती विलक्षण होती. जीवन म्हणजे एक वर्तुळ आहे. या वर्तुळात अनेक वर्तुळे असतील. पण या वर्तुळाचे केंद्र म्हणजे आत्मा. करणसिंग म्हणतात, ''ही तर उपनिषदांतील विद्या. दहा हजार मैलांवरून हे इंग्रज येथे येतात आणि हे ज्ञान आत्मसात करतात हे विशेष म्हटले पाहिजे. त्यांच्या चर्चेचा प्रभाव माझ्यावर पडत होता हे निश्चित. पण त्याहूनही अधिक म्हणजे त्यांच्या मौनाचा प्रभाव पडला. त्यांच्या नेत्रांतून अशी काही शक्ती बाहेर पडल्यासारखी वाटे की मी अक्षरश: श्वास रोखून त्यांच्या तेजस्वी नेत्रांकडे पाहत बसे. शक्तिपात म्हणतात तो हाच असावा.''

यानंतर अनेक वेळा करणसिंग कृष्णप्रेम यांना भेटण्यास जात असत आणि प्रत्येक वेळी त्यांच्याकडून काही नवीन उपदेश घेऊन येत. स्वप्ने आणि स्वप्नांतील साक्षात्कार यांचा कृष्णप्रेम यांनी बराच अभ्यास केला होता. स्वप्नांचे अर्थ योग्य रीतीने समजून घेतले तर आपल्या अंतर्विश्वाचा अधिक परिचय आपल्याला होतो असे ते म्हणत. करणसिंग यांनी बरीच स्वप्ने लिहून कृष्णप्रेमांकडे पाठविली. आपल्या स्वप्नांतून अनेक हिंदू देव-देवतांचे आणि साधुपुरुषांचे दर्शन घडे असे करणसिंगांनी लिहून ठेवले आहे.

एका स्वप्नात अरविंद घोष आणि मदर (माता) यांनी आपल्याला दीक्षा दिली, त्यामुळे आपल्याला समाधी लागली, असे ते लिहितात. आणखी एका स्वप्नात श्री रमण महर्षींनी आपल्याला बोलावले असे त्यांनी म्हटले आहे. दोन वेळा स्वप्नात आपल्याला श्रीकृष्णाचे दर्शन झाले. एकदा बाळगोपाळाच्या स्वरूपात तर एकदा तरुणाच्या स्वरूपात असे करणसिंग म्हणतात. ही एक मोठी मानसशास्त्रीय संपत्ती असून आपले बाह्य ज्ञान किती कमी आहे याची कल्पना आपल्या स्वप्नसृष्टीवरून आपल्याला येते, असे करणसिंगांचे म्हणणे आहे.

भावना व भक्ती यांच्यावर कृष्णप्रेम यांचा विशेष भर असे. प्रेम ही दिव्य भावना आहे तशीच ती दैवी आहे. स्वर्गात प्रेम हे त्याज्य असेल तर त्या स्वर्गाला अर्थ नाही असे ते म्हणत. काही लोक प्रेमाचे दोन भाग करतात. एक दिव्य व दैवी आणि दुसरे ऐहिक. कृष्णप्रेम यांचे म्हणणे असे की, असा भेद करता येत नाही. अध्यात्म हे जगाच्या बाहेरचे नाही. परमेश्वराने निर्माण केलेली प्रेम ही भावना ऐहिक आणि आध्यात्मिक यांमध्ये विभागणे योग्य नाही असे त्यांचे म्हणणे असे. करणसिंग म्हणतात : ''कृष्णप्रेम यांचा सहवास ही माझ्या आयुष्यातील फार मोठी घटना. माझ्या आयुष्यात अनेक चढउतार झाले. अनेक सुखदु:खे आली. आशेचे-निराशेचे प्रसंग आले. पण प्रत्येक वेळी त्यांच्या सहवासाचा सुगंध मला शक्ती देऊन जात होता. कृष्णप्रेम, स्वामी विवेकानंद आणि अरविंद घोष या तिघांनी माझ्या आयुष्यावर मोठा प्रभाव गाजविला आहे. अर्थात या तिघांपैकी मी फक्त कृष्णप्रेम यांनाच डोळ्यांनी पाहिले. इतर दोघे फक्त माझ्या वाचनात आले.''

२ डिसेंबर १९६४ रोजी करणसिंग हे मीरतोला येथे कृष्णप्रेम यांच्या सहवासात होते. त्या दिवसाची हकीकत ते सांगतात ती अशी :

''कृष्णप्रेम यांच्या सहवासात आम्ही तोपर्यंत तीन दिवस घालवले होते. २ डिसेंबर १९६४ चा दिवस. बरोबर वीस वर्षांपूर्वी कृष्णप्रेम (त्यांना सगळे गोपाळदा म्हणत) यांच्या गुरू श्री यशोदामाई या निवर्तल्या, त्यांची आज पुण्यतिथी होती. मी सकाळी उठलो आणि टेकडीकडे चालत गेलो. तेथून सूर्योदय पाहावा ही माझी इच्छा. वातावरणात सगळीकडे मोठा तजेला होता. मी पुढे चालत होतो. समोरून झाडांच्या आडून सूर्य वर येत होता. एका विलक्षण क्षणी सूर्यबिंब झाडांनी झाकले गेले. सूर्याचे असंख्य किरण प्रकाश उधळीत सर्वत्र पसरले. मी मंत्रमुग्ध होऊन झाडाकडे चालत गेलो. तेथे झाडाच्या तळाशी बसून मोठ्याने मंडूकोपनिषदातील मंत्र म्हटले.

''त्या सोनेरी आणि दिव्य आवरणाच्या मागे ते निर्गुण आणि अभेद्य ब्रह्म दडलेले आहे.त्याचे तेज काय वर्णावे ? ते तेजांचेच तेज. आत्मज्ञान शोधू इच्छिणाऱ्याला जाणवणारे ते ब्रह्मच होय. मी बराच वेळ त्या दिव्य अनुभूतीच्या झोतात न्हाऊन

निघत होतो. थोड्या वेळाने उठून मी आश्रमाकडे परत येण्यास निघालो. आता सूर्य वर येत होता. समोरील बुंध्यावर माझी लांबलचक सावली पडली होती. मी चालत येत असताना मला एक विचित्र अनुभव आला. मला असे वाटू लागले की माझ्या व्यक्तिमत्त्वाचा एक नवा आविष्कार होत आहे. जणू काही मी दूर उभा राहून माझ्या स्वत:कडे पाहत आहे.

''त्या अनुभवाचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. मी माझे मानचिन्ह म्हणून एक आकृती बनविली. त्या मानचिन्हात सूर्य आणि सूर्याच्या आत एक त्रिशूळ आहे. त्याच्या खाली पुढील ऋषिवचने मी कोरली : ''अंधाराच्या पलीकडे प्रकाशाने तळपणाऱ्या सूर्याप्रमाणे तेजस्वी असलेले ते ब्रह्म मी जाणतो.''

करणसिंग यांना जाणवलेला साक्षात्काराचा दिव्य क्षण.

त्यानंतर फक्त एकदाच त्यांची व कृष्णप्रेम यांची गाठ पडलेली दिसते. ऑगस्ट १९६५ मध्ये करणसिंग दिल्लीस गेले असताना कृष्णप्रेम आजारी असल्याची बातमी त्यांना कळली. कृष्णप्रेम हे आतड्याच्या दुखण्याने आजारी असून अत्यवस्थ होते. त्यांना नैनीतालच्या दवाखान्यात ठेवण्यात आले होते. करणसिंग म्हणतात :

''मी त्यांचा निरोप घेण्यासाठी त्यांच्यापुढे वाकलो. त्यांनी मला आलिंगन दिले. त्यांच्या तेजस्वी निळ्या डोळ्यांत प्रेम आणि शक्ती मला जाणवत होती. हीच आमची आयुष्यातली शेवटची भेट याची आम्हा दोघांनाही जाणीव होती. आयुष्यात मी पाहिलेल्या माणसांत सर्वश्रेष्ठ महात्मा म्हणजे कृष्णप्रेम. उपनिषदांतील पुढील पंक्ती कृष्णप्रेम यांना पूर्णपणे लागू पडतात : 'आत्म्यामध्ये रममाण झालेले, आत्म्यातच मग्न असलेले, सतत क्रियाशील असलेले हे महात्मे म्हणजे ब्रह्मज्ञान्यांमधील श्रेष्ठ पुरुष होत.' ''

यानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे १४ नोव्हेंबर १९६५ रोजी करणसिंग यांना नैनितालहून तार मिळाली. त्याच दिवशी श्री कृष्णप्रेम हे अनंतात विलीन झाले होते.

अशी या इंग्रज योग्याची विलक्षण कथा. तशीच ती करणसिंग या साधकाची कथा. श्रीकृष्णभक्त कृष्णप्रेम ऊर्फ प्राध्यापक रोनाल्ड निक्सन हे माझे प्राध्यापक म्हणून बनारस विद्यापीठात माझ्याही आयुष्यात काही काळ येऊन गेले. वर्ष-दीड वर्षाचा त्यांचा सहवास मला लाभला. त्या वेळी ते साधक होते आणि मी सतरा वर्षांचा त्यांचा विद्यार्थी होतो. आता वयाच्या त्राऐंशीव्या वर्षाकडे झुकताना मनात सहज विचार येतो की आपल्या नकळत आपल्यावर कसे संस्कार होत जातात? कृष्णप्रेम यांचा थोडा स्पर्श तेव्हा मला लाभला याबद्दल मला अतिशय धन्यता वाटते.

❖ ❖

# महाभारतातील दोन तेजस्वी स्त्रिया

महाभारत हा भारतीय संस्कृतीवरील एक अपूर्व ग्रंथ आहे. भारतीय युद्धाची (कौरव-पांडव युद्ध) प्रत्यक्ष घटना (सुमारे ख्रिस्तपूर्व एक हजार वर्षांपूर्वी) जशी घडली तशी ती वैशंपायनाने भारतीय युद्धातील वीर अभिमन्यू ह्याचा नातू जनमेजय ह्याला सांगितली (ख्रिस्तपूर्व ९५० मध्ये). ही कथा म्हणजे मूळ महाभारत. ही चोवीस हजार श्लोकांची होती. हे वैशंपायनी महाभारतात नमूद करण्यात आले आहे. ह्या मूळ कथेत प्रतिभावंत कथाकारांनी पुढील एक हजार वर्षांच्या काळात पन्नास हजारांच्यावर श्लोकांची भर घातली. अशा कथाकारात शौनकादिक ऋषींना नैमिषारण्यात भारताची कथा सांगणारा सूत (ख्रिस्तपूर्व ४८५), त्याचा मुलगा सौती, हरिवंशाची भर घालणारा हरिवंशकार (सुमारे ख्रिस्तपूर्व १५० वर्षे) आणि पर्वसंग्रहकार (ख्रिस्तशतारंभ) इत्यादींचा समावेश होतो.

वैशंपायनी महाभारतात युद्धाच्या कथेबरोबर धर्म, राजनीती, तत्कालीन समाजजीवन, इत्यादी माहिती आपल्याला मिळते. त्यात सूत, सौती इत्यादिकांनी आपापल्या काळातील समाजजीवनाचे चित्रण तर केलेच आहे, पण त्याबरोबरच अनेक कथा, दंतकथा, आख्याने, उपआख्याने, इत्यादींची प्रचंड भर घालून भारतीय संस्कृतीचा परंपरेने चालत आलेला ठेवा पुढील पिढीसाठी जपून ठेवण्याचे काम केले आहे. राजनीती, तत्त्वज्ञान, इत्यादींवरील त्यांच्या विवेचनामुळे भारताच्या आध्यात्मिक आणि इतर तत्त्वज्ञानाची ख्रिस्तपूर्व एक हजार वर्षांत कशी उत्क्रांती होत गेली त्याचे अपूर्व चित्र त्यांच्या ग्रंथात आढळून येते.

शांतिपर्वातील राजीनीती, मोक्षधर्म, भगवद्गीता, सांख्ययोग, पाशुपत, वेद, पंचगात्र इत्यादींची भरपूर चर्चा ऐतिहासिक पद्धतीने केल्याचेही आपल्याला आढळून येते. याज्ञवल्क्य, वसिष्ठ, हिरण्यगर्भ, शंकर, नारायण, व्यास, कपिल महामुनी, इत्यादी तत्त्वज्ञान्यांच्या विवेचनाच्या रूपाने आपल्याला भारतीय वैचारिक मंथनाचा भरपूर पुरावा मिळतो.

महाभारतातील स्त्रीजीवन हाही संशोधनाचा एक मोठा विषय आहे. ह्यातसुद्धा वैशंपायन कालातील स्त्रीजीवन, सूत-सौतींच्या (बौद्धाचा उदयकाल) काळातील स्त्रीसमाज आणि हरिवंश काळातील (शृंगवंशकाल) स्त्रियांचे समाजातील स्थान 'हे

विषय संशोधण्यासारखे आहेत. महाभारताच्या युद्धकाळातील स्त्रियांच्या इतका दर्जा पुढील काळात राहिला नसावा असे जरी असले तरी कर्तबगार स्त्रियांचे अनेक उल्लेख महाभारताच्या एक हजार वर्षांच्या कालखंडात आपल्याला आढळतात. ह्यात करारी क्षत्रिय स्त्रिया आहेत. तशाच ब्रह्मवादिनी, योगिनी आणि भल्या भल्या पुरुषांशी वाद घालणाऱ्या स्त्रियाही आहेत. ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे महाभारतातील सुलभा-जनक संवाद हे होय. पुण्याचे सुप्रसिद्ध संशोधक आणि व्यासंगी विद्वान श्री. मधुकरराव यार्दी ह्या सेवानिवृत्त आय्.सी.एस्. अधिकाऱ्याने आपल्या 'महाभारत : उद्गम आणि विकास' ह्या (इंग्रजी) पुस्तकात या संवादाची कथा दिली आहे. सुलभासारखी तडफदार स्त्री जनकासारख्या तत्त्वज्ञ राजाला कशी निरुत्तर करते ही गोष्ट कथेत आली आहे. आजच्या स्त्रीमुक्तीच्या चळवळीत ही कथा महिला कार्यकर्त्यांना मोठी उद्बोधक वाटेल.

ख्रिस्तशतारंभी म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वी एका तडफदार स्त्रीचे वर्णन आलेले सध्याच्या पिढीलाही मार्गदर्शक ठरावे. श्री. यार्दी यांनी आपल्या ग्रंथाच्या पान अठ्ठावन्नवर जी माहिती दिली आहे ती पुढे देत आहे :

त्या काळात एक निरीच्छ आणि अनासक्त राजा म्हणून जनक राजाची ख्याती होती. राजा असल्यामुळे राजधर्माचे पालन करून तो अनासक्ती योगाने वागतो ह्याची ख्याती ऐकून सुलभा हिने त्याची भेट घेण्याचे ठरविले. ती एक योगिनी होती आणि जगात सगळीकडे ती भ्रमण करीत असे. तिला असे सांगण्यात आले की, जनकाने आपल्या आयुष्यात विदेह अवस्था प्राप्त करून घेतली आहे. हे कितपत खरे आहे हे पाहावे असे सुलभाने ठरविले. योगमायेने तिने सुंदर रूप धारण केले आणि ती जनक राजाच्या सभेत गेली. जनकाने तिचे मनःपूर्वक स्वागत केले. सुलभाने जनकाकडे पाहिले आणि योगमायेच्या बळावर तिने त्याच्या शरीरात प्रवेश केला.

त्यानंतर जनकाने आपल्याला आत्मबोध आणि मुक्ती कशी प्राप्त झाली हे तिला सांगितले. जनक म्हणाला, "मी पंचशिखा मुनींचा आवडता शिष्य. त्यांच्याकडून मी मुक्तीचे रहस्य शिकलो. त्या पंचशिखा मुनींनी मला सांगितले, तू राज्यपद किंवा राजाची कर्तव्ये सोडून द्यावी असे मी म्हणणार नाही. ऋषींनी म्हटले आहे की 'मुक्ती संपादण्याचे तीन मार्ग आहेत. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि ज्ञानकर्ममार्ग.' माझे गुरू पंचशिखा ह्यांनी मला हा तिसरा ज्ञानयुक्त कर्ममार्ग शिकविला. गृहस्थाश्रमी माणसाने संयम बाळगला तर तो संन्याशाच्या बरोबरीला येतो. त्याउलट संन्याशाने मनात इच्छा बाळगल्या आणि क्रोध, अहंकार आणि आसक्ती ह्यांना थारा दिला तर त्या संन्याशात आणि गृहस्थाश्रमी माणसात काही फरक राहत नाही. माणसाला मुक्ती मिळते ती ज्ञानातून. त्याच्या हातात राजदंड आहे की संन्याशाची त्रिदंडी आहे याला महत्त्व

नाही. मुक्ती ही दारिद्र्यातूनच लाभते असे नाही. तसेच वैभव हे बंधन आहे असेही नाही. ह्या बाह्य सोपस्कारांवर मुक्ती अवलंबून नसते. मुक्ती प्राप्त होते ती ज्ञानातून आणि अनासक्त योगातून.''

असे सांगून जनकाने सुलभाचा सौम्य शब्दांत निषेध करण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, ''हे स्त्रिये, माझ्या शरीरात तू प्रवेश केलास ही तुझी वागणूक गैर म्हणावी लागेल. तू जबरदस्तीने माझ्या शरीरात प्रवेश केलास. हा तर वर्णसंकर केलास. तू ब्राह्मण आणि मी क्षत्रिय. आणखी एक गोष्ट म्हणजे तू एक संन्याशीण आणि मी एक गृहस्थाश्रमी आहे. आश्रमाच्या संकराचा दोषही तुझ्याकडे येतो. कुणी सांगावे, तुझे आणि माझे गोत्र एक असावे. असे असल्यास तुझा प्रयत्न म्हणजे सगोत्र मीलनाचा आणि म्हणून दोषास्पद म्हणावा लागेल. बरे, तुझा विवाह झाला असल्यास तुझ्यावर स्वैराचाराच दोष येतोच. बरे, ह्या सभेत येऊन तू आपले उच्च ज्ञान आणि योगशक्तीचे प्रदर्शन केलेस हाही आमचा आणि आमच्या सभेचा अपमानच आहे.

''माझ्या मर्जीविरुद्ध तू माझ्या हृदयात प्रवेश केला आहेस. स्त्री आणि पुरुष ही परस्परांच्या मर्जीने जेव्हा एक होतात तेव्हा ते मीलन म्हणजे एक अमृत असते. पण दोघांपैकी एकाची जबरदस्ती असली तर असे मीलन हे विष म्हणावे लागेल. तर हे स्त्रिये, तू कोण आहेस, हे सांग. कोणत्या आश्रमाशी तुझा संबंध आहे आणि तू ह्या सभेत का आलीस, कुणी शत्रू राजाने तुला हेर म्हणून तर पाठविले नाही ना ?''

यावर ती विचलित झाली नाही. तिने शांतपणे आणि स्वाभिमानाने विचारपूर्वक उत्तरे दिली. ती म्हणाली, ''राजा, प्रश्न करणाऱ्याने प्रश्न विचारताना शिष्टाचार पाळले पाहिजेत हा नियम आहे. हे सामान्य शिष्टाचार तुला पाळता आले नाहीत. हे राजा, तू मला विचारतोस, तू कोण आहेस, कोणत्या कुटुंबातील आहेस ? ह्यावर माझे उत्तर असे की, तुझा प्रश्नच मुळी अप्रस्तुत आहे. कारण मी माझ्या शरीरापासून वेगळी आहे.'' सुलभा पुढे म्हणाली, ''ह्या शरीराच्या तीस कला आहेत. त्यामुळे जीवनात आणि शरीरात संबंध असतोच असे नाही. तू माझा आत्मा आणि तुझा आत्मा यात भेद करतोस, तर तू आपल्याला मुक्त कसा म्हणवून घेतोस ? खरा मुक्त माणूस दुसऱ्याच्या आत्म्यात आपल्या आत्म्याचा शोध घेतो. इतकेच नव्हे तर तुला कशाबद्दल आसक्ती नाही म्हणतोस. असे असेल तर तू या राजचिन्हांना चिकटून का राहिला आहेस ? ह्याचा अर्थच असा की तुला अद्याप संपत्ती आणि सुखे ह्यांची आसक्ती आहे. आणि मित्र व शत्रू यांच्यात भेद करण्याची तुझी वृत्ती अद्याप गेली नाही.''

सुलभेची वागणूक चांगली नाही असा जनकाने तिच्यावर आरोप केला होता, त्याला उत्तर देताना सुलभा म्हणाली, ''माझे शरीर तुझ्या शरीराहून भिन्न असेल, पण

माझा आत्मा तुझ्या आत्म्याहून भिन्न कसा? केवळ अज्ञानी आणि मूढ माणसेच शरीर आणि आत्मा ही एक आहेत असे समजतात. त्यांना असे वाटते की जाती आणि आश्रम हे परस्परांहून भिन्न आहेत. अशा लोकांच्या मनात वर्णसंकराचा प्रश्न उद्‌भवतो. पण मला आत्मबोधाची खरी शिकवण मिळाली आहे. मी एकटीच जगभर भटकते. मी तपस्या करते. ह्या बाबतीत मी कोणत्याही प्रकारची लबाडी, लपवाछपवी करीत नाही. माझा निवृत्तिमार्ग हा काही दंभाचार नव्हे. मी जो आश्रम स्वीकारला आहे त्यातील नियमांचे मी योग्य रीतीने पालन करते. माझ्या नियमांत मी स्थिर आहे. तुझ्यापाशी असलेल्या ज्ञानातून आणि आध्यात्मिक नियमांतून मला काही मिळू शकेल अशा आशेने मी तुझ्या सभेत आले. स्वत:चा गौरव करून घ्यावा आणि तुला आणि तुझ्या सभेला खजील करावे असा माझा मुळीच हेतू नव्हता. मी तुझ्या मनात शिरले. तुझ्या शरीराला मी स्पर्शही केला नाही. कमलपत्रावरील जलबिंदूप्रमाणे मी वागले. असे असूनही जर माझ्या स्पर्शाचा प्रभाव तुला जाणवत असेल तर तुझ्या गुरूकडून तुला मिळालेले ज्ञान तुझ्या खरोखरच पचनी पडले आहे किंवा नाही त्याची मला शंका येते.''

ह्यानंतर सुलभा राजाला म्हणते, ''मी एका राजऋषीची मुलगी आहे. मला माझ्यायोग्य आयुष्याचा जोडीदार मिळाला नाही म्हणून मी निवृत्तिमार्ग स्वीकारला आहे. तू अमाचा पाहुणचार केलास ह्याबद्दल मी तुझी आभारी आहे. पण आम्हा संन्याशांच्या पंथात कोणत्याही ठिकाणी एक दिवसाच्या वर राहू नये असा नियम असल्यामुळे मी आजची रात्र येथे काढून उद्या येथून निघून जाणार आहे.''

ह्यावर लिहिताना श्री. यार्दी ह्यांनी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधले आहे. ते म्हणतात की, सुलभाने सांख्यांसंबंधी जी माहिती दिली आहे ती वसिष्ठ आणि याज्ञवल्क्य ह्यांच्याहून काहीशी भिन्न आहे. पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये, मनुबुद्धी आणि पंचमहाभूते ही आहेत. पण प्रकृती आणि अहंकार ह्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. असित देवत हा आठ भूतांचा उल्लेख करतो. त्यात काळ, घटक आणि अघटत् ह्यांचा समावेश आहे. सुलभाने ह्या तिन्ही गोष्टींचा समावेश केला आहे. असित देवताने जी ज्ञानाची आठ इंद्रिये दाखविली आहेत त्यांत चित्र, मानस, बुद्धी, सहा कर्मेंद्रिये ही आहेत. कर्मेंद्रियांत बलाचा समावेश आहे. सुलभाने मानस, बुद्धी आणि बल ह्या तिन्हींचा समावेश केला आहे. ह्यात तिने आणखी भर घातली आहे ती अशी – सत्त्व, क्षेत्रज्ञ, सामव्य, संघात, आकृती आणि व्यक्ती, द्वंद्व, विधी आणि शुक्रा. हे सांगताना श्री. यार्दी सांगतात की हरिवंशकाळातही (ख्रिस्तशतारंभ) सांख्यांच्या चोवीस कला निश्चितपणे ठरल्या नव्हत्या. सुलभाने तर म्हटले आहे : ह्या चोवीस कला सतत चैतन्ययुक्त होत्या. असे असूनही त्या सर्वांचे मिळून एका दिव्याच्या वातीप्रमाणे एकच व्यक्तित्त्व तयार होते.

आपल्याला सांख्यांची चर्चा करायची नाही. पण सांख्यांच्या चोवीस गुणांपलीकडचा मी आहे असे पंचगात्रात सांगितले आहे. तो पंचविसावा म्हणजेच विठ्ठल होय. ही भूमिका आपल्या संतकवींनी मांडली. म्हणजे परमेश्वर आहे तो सांख्यांच्या चोवीस गुणांपलीकडील आहे. तो गुणातीत आहे. सांख्यमताची ही निश्चिती (चोवीस गुणांची) ही ख्रिस्तशतकारंभापर्यंत झाली नव्हती हे सुलभा-जनक संवादावरून दिसून येते.

ते काहीही असले तरी सुलभा-जनक संवाद म्हणजे एका प्रखर बुद्धिमत्तेच्या स्त्रीने आपल्या श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरविणाऱ्या विदेही जनकाचा नक्षा कसा उतरवला त्याची गोष्ट आहे. गोष्ट दोन हजार वर्षांपूर्वी लिहिली गेली आहे हे विसरता कामा नये.

हे उदाहरण विद्वत्तेचे झाले. क्षात्रधर्माचे असेच प्रखर उदाहरण या महाभारतात आढळते. कृष्णशिष्टाई फसल्यानंतर कृष्णाने कुंतीला म्हटले, ''आत्या, आता मी पांडवांकडे परत जातो आहे. पांडवांसाठी काही निरोप आहे का?'' ह्यावर कुंतीने सांगितले, ''हे माधवा, धर्मात्मा राजा युधिष्ठिर याला सांग की, तुझा क्षात्रधर्म फार कमी पडत चालला आहे. आता तरी हे व्यर्थ खूळ पुरे कर. भीमाला सांग की क्षत्रिय स्त्री ज्या कारणासाठी पुत्रांना जन्म देते त्याचा समय येऊन ठेपला आहे. वेळ आली असता पुरुषाने प्राण देखील दिला पाहिजे. क्षात्रधर्माचे पालन करण्यासाठी आपल्या मुलाला उत्तेजन देणाऱ्या विदुला राणीची गोष्ट तू माझ्या मुलांना जाऊन सांग.''

विदुला नावाची कोणी निग्रही, क्षात्रधर्माभिमानी, राजसभेतही विख्यात, यशस्वी, बहुश्रुता, दूरदृष्टीची एक स्त्री होती. तिच्या पोटच्या पुत्राला सिंधू राजाने जिंकल्यामुळे तो दीन होऊन पडून राहिला असता विदुला त्याची निर्भर्त्सना करीत म्हणाली, ''हे पुत्रा, तू शत्रूचा आनंद वाढविणारा आणि माझा हर्ष नाहीसा करणारा आहेस. याचा अर्थ तू कुठून तरी आमच्या कुळात घुसला आहेस. माझ्यापासून किंवा माझ्या पतीपासून झालेला नाहीस. ज्याला कशाची इच्छा नाही, ईर्षा नाही आणि ज्याची सर्व इंद्रिये नेभळी झाली आहेत, अशा पुरुषाला कोणीही गणतीत धरीत नाहीत. तू बसून राहिलास तर तुला पुढे येण्याची आशा नाही. तू आपल्याला कमी समजू नकोस, अल्पसंतुष्ट राहू नकोस. तू भीती गुंडाळून ठेव. अरे भ्याडा, ऊठ, असा पराजित होऊन हातपाय गाळून काय बसला आहेस? असा कसा तू मेषपात्र? अगदीच कसा तुला त्वेष नाही? नदीला पूर केव्हाच येतो, उंदराची भूक चार दाण्यांनी भरते. त्यामाणेच का पुरुष तत्काळ संतुष्ट होतो? पाहिजे तर सर्पाची दाढ उपटण्याचा प्रयत्न करून तडकाफडकी मरून जा किंवा दुसरे कोणतेही अचाट कृत्य करून प्राणसंकटात पड. पण पराक्रम केल्यावाचून राहू नकोस. श्येन पक्षी जसा उंच आकाशात उडून तेथून निर्भयपणे आपल्या शत्रूचे छिद्र शोधीत असतो त्याप्रमाणे तू गुपचुप राहून किंवा

वादविवाद करून शत्रूची छिद्रे शोधून काढ. आणि संधी साधून पराक्रम कर. विजेचा धक्का बसलेल्या पुरुषाप्रमाणे तू असा प्रेतवत होऊन काय पडलास? अरे मुर्दाडा, खडबडून उभा राहा. शत्रू तुझ्या छातीवर पाय देत असूनही तू असा पसरलास काय? असा दीन होऊ नकोस. स्वपराक्रमाने सर्वत्र गाजून राहा.''

आईने आपल्या मुलाला जितके म्हणून चेतवावे तितके चेतवून विदुला आपल्या मुलाला तीव्र शब्दांनी क्षोभ आणीत होती. ती म्हणाली, ''जिवाची पर्वा करून कोंड्याच्या विस्तवाप्रमाणे ज्वालेवाचून केवळ धुमसू नकोस. नाहीसा होऊ नकोस. दीर्घ काळपर्यंत नुसते धुमसत राहण्यापेक्षा एक घटकाभर का होईना, धडकून जळणे चांगले.''

विदुला राणीचे भाषण हे महाभारतात उद्योग पर्वामध्ये १३३ व्या अध्यायात आले आहे. ते मुळातूनच वाचून काढले पाहिजे. येथे फक्त विदुलाच्या भाषणातील काही भाग दिला आहे. हे भाषण म्हणजे क्षात्र वृत्तीचे जळजळीत उदाहरण आहे.

सुलभा काय किंवा विदुला काय, ह्या दोन्ही ज्ञानी स्त्रिया आपल्या देशात दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेल्या. एकीच्या बुद्धिवैभवापुढे जनक नम्र झाला, तर दुसरीकडून स्फूर्ती घेऊन विदुलापुत्र शस्त्र घेऊन सिंधू राजावर चालून गेला आणि त्याचा त्याने निकाल लावला. त्याने आपले राज्य जिंकून परत घेतले. क्षात्रधर्माचे हे प्रदर्शन भारताच्या समोर आजही असले पाहिजे. आज आपल्या देशासमोर अनंत प्रश्न उभे आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी भारताने क्षणभर जरी मागे वळून पाहिले तरी त्याला अनेक स्फूर्तिस्थाने आढळून येतील.

❖ ❖

# महाभारताच्या मूळ रूपाचा शोध

महाभारत हा भारताचा अपूर्व असा राष्ट्रीय ग्रंथ आहे. एक लाख श्लोकांचे हे महाकाव्य जगातील अत्यंत प्राचीन, समृद्ध आणि भारतीय संस्कृतीची एक हजार वर्षांची वाटचाल सांगणारे महाकाव्य आहे. आपल्या या राष्ट्रीय ग्रंथात काय नाही असाच प्रश्न विचारावासा वाटतो.

या महाकाव्यात निरनिराळ्या कवींनी आणि विचारवंतांनी नवीन नवीन ज्ञानाची भर टाकली आहे. मूळ महाभारतातील श्लोकांची संख्या चोवीस हजार होती, असे खुद्द महाभारतातच नमूद आहे. जनमेजयाच्या सर्पसत्रात वैशंपायनांनी आपले गुरू वेदव्यास यांच्या उपस्थितीत राजाला महाभारत सांगितले आणि ते चोवीस हजार श्लोकांत सांगितले, असा उल्लेख ग्रंथात आहे.

भारतीय युद्ध झालेच नाही, ही कपोलकल्पित कथा आहे, असे म्हणणारेही काही होते. वराहमिहिर याच्या कालगणनेवरून हे युद्ध झाले. त्यामुळे हे ख्रिस्तपूर्व तीन हजार वर्षांपूर्वी झाले असावे असे म्हणणारेही काही विद्वान होते. ज्योतिषाचा आधार घेऊन काल निश्चित करण्याचा काही जणांनी प्रयत्न केला. अलीकडे मात्र उत्खननशास्त्र आणि पुराणवाङ्मयातील उल्लेख यांचा आधार घेऊन बहुतेक विद्वानांनी हे भारतीय युद्ध ख्रिस्तपूर्व एक हजार वर्षे आधी झाले असावे अशी विधाने केली आहेत. ती पटण्यासारखी आहेत. कुरुक्षेत्र, हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ इत्यादी ठिकाणच्या उत्खननात सापडलेल्या पात्रांची शास्त्रीय दृष्टीने आणि वैज्ञानिक दृष्टीने पाहणी करण्यात आली. अशा पात्रांना 'पेंटेड ग्रे वेअर' असे नाव देण्यात आले. या पात्रांचा काळ ख्रिस्तपूर्व एक हजार वर्षांपर्यंत जातो. त्यापूर्वीची सापडलेली पात्रे सिंधू नदीच्या खोऱ्यातील कालाची दर्शक ठरतात. भारतीय महायुद्ध सिंधू नद संस्कृतीच्या नंतरचे म्हणून ख्रिस्तपूर्व एक हजार वर्षांपूर्वीचे असावे असेच अनुमान काढावे लागते.

पुराणातील काही वंशावळी या कालखंडाच्या जवळ आपल्याला नेतात. परीक्षित (अभिमन्यूचा मुलगा) राजापासून गौतम बुद्धाचा समकालीन आणि कौसांबीचा राजा उदयन् यांच्यात पंचवीस पिढ्यांचे अंतर आहे. गौतम बुद्धाच्या निर्याणाचा काळ ख्रिस्तपूर्व ४८७ समजला जातो. प्रत्येक पिढीला वीस वर्षे धरली तर पंचवीस पिढ्यांची पाचशे वर्षे होतात. म्हणजे भारतीय महायुद्धाचा काळ ख्रिस्तपूर्व एक हजार

वर्षांपूर्वीचाच येतो. इतर अनेक उदाहरणांवरून हे सिद्ध करता आले आहे. भागवतातील उषा-अनिरुद्ध कथा या त्यातील आहेत. उषा ही बाणासुराची मुलगी. बाणासुराच्या राजधानीचे नाव शोणितपूर. इराक देशात बाणासुराच्या राजधानीचा शोध लागला. त्या काळात प्रचलित असलेल्या इराकी भाषेतील या राजधानीचे नाव निनेवा असे होते. त्याचे संस्कृत भाषांतर शोणितपूर. राजाचे नाव बाणिसूरपाल आणि काळ एक हजार ख्रिस्तपूर्व. बाणिसूरपाल हे नाव बाणासुराशी जुळते हे एक उदाहरण म्हणून दिले. अशी आणखी बरीच उदाहरणे देता येतील.

महाभारताचा काळ हा ख्रिस्तपूर्व सुमारे एक हजार वर्षपूर्व हे निश्चित झाले की त्यात पाचपन्नास वर्षांची भर घालून वैशंपायनलिखित मूळ महाभारताचा काळ ठरविणे अवघड नाही. आपल्यासमोर असलेले महाभारत ९५० वर्षांपूर्वीचे म्हणता येईल. अभिमन्यूचा नातू हा महाभारत ऐकण्यास बसला आहे याचा विसर पडता कामा नये.

पण आजच्या प्रचंड महाभारतामध्ये गडप झालेले हे चोवीस हजार श्लोक शोधून कसे काढायचे? पुण्याच्या भांडारकर संशोधन संस्थेतून महाभारताची चिकित्सक आवृत्ती निघाली आहे. त्या दिशेने प्रयत्नांची शिकस्त करण्यात आली आहे. अलीकडे संस्कृतचे प्रकांडपंडित आणि संशोधक व निवृत्त सनदी अधिकारी मधुकरराव यार्दी यांनी त्याबद्दल अभ्यास केला आहे.

प्रगत संख्याशास्त्राच्या आधारे हे संशोधन केले आहे. प्रत्येक श्लोकाची एकेक ओळ आणि प्रत्येक ओळीतील एकेक शब्द यांची त्यांनी कसोशीने छाननी केली. शब्दांचे अर्थ, लेखकाची शैली, ऐतिहासिक संदर्भ, विशिष्ट शब्द वापरण्याची सवय, फार काय पण ऱ्हस्व-दीर्घाच्या लकबी हे सर्व निकष श्री. यार्दी यांनी संशोधनग्रंथाला लावले आहेत. त्यांचा व्यासंग विलक्षण आहे. जिद्द मोठी आहे. अभ्यासही चौफेर आहे. त्यामुळे त्यांचा ग्रंथ ('द महाभारत : इट्स जेनेसिस ॲण्ड ग्रोथ') ही संशोधन क्षेत्रातील एक अपूर्व कामगिरी म्हणावी लागेल.

चोवीस हजार श्लोकांत भारतीय महायुद्धाची मूळ कथा लिहिली आहे. तिच्यावरील स्वतंत्र प्रकरणात यार्दी यांनी म्हटले आहे की मुळात कथा सोपी, सुटसुटीत आणि युद्धावर लक्ष केंद्रित करणारी आहे. महाभारताशी निगडित असलेली पात्रे, त्यांचे जन्म आणि कुलवृत्तांत देऊन पुढे कौरव-पांडवांची कथा सांगितली आहे. महाभारतातील अनेक रोचक कथा पुढे सर्वतोमुखी झाल्या त्या वैशंपायनांच्या महाभारतात आढळत नाहीत आणि आढळल्या तर त्रोटक स्वरूपात आढळतात. पांडवांच्या हातून प्रमाद घडले हे वैशंपायन मोकळेपणाने सांगतात. पण आपद्धर्म ही न विसरली जाणारी गोष्ट आहे. त्याची ते आपल्याला आठवण करून देतात. शिवाय दुर्योधनाचा मत्सरी स्वभाव, पांडवांना नष्ट करण्याची त्याची कारस्थाने यांची माहिती ते आपल्याला

देतात. त्याबरोबरच गदायुद्धात मांडी मोडून पडलेला दुर्योधन श्रीकृष्णाला त्याने युद्धात वेळोवेळी केलेल्या मर्यादाभंगाची आठवण करून देतो आणि आम्ही क्षत्रिय आहोत, आम्हांला वीरोचित मरण येत आहे, आम्ही ऐटीने राहिलो आणि मेलो असे म्हणतो. त्या वेळी आकाशात जमलेले देवादिक आपला संतोष व्यक्त करतात. वैशंपायन हे सारे सांगतात, म्हणजे त्यांनी पांडवांचे समर्थन करण्याचा हिरिरीने प्रयत्न केला नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

वैशंपायनांच्या महाभारतात द्रौपदी-वस्त्रहरणाची कथा नाही, कृष्णशिष्टाईची कथा नाही, अश्वमेधपर्व नाही. भारतीय युद्धाची कथा मात्र लक्षणीय दृष्टीने वर्णन केली आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने एक महत्त्वाची गोष्ट वैशंपायनांच्या महाभारतात आढळते. पुत्रप्राप्तीच्या इच्छेने श्रीकृष्ण हा हिमपर्वतावर शंकराची आराधना करीत असतो. तो सोहळा पाहण्यासाठी देवादिकांची गर्दी झालेली असते, त्या प्रसंगानुरोधाने त्यांनी शंकर-पार्वतीचा संवाद वर्णन केला आहे. पार्वतीच्या सांगण्यावरून शंकर हे तिला प्रवृत्ती आणि निवृत्ती या दोन मार्गांची शिकवण देतात. निवृत्ती मार्गामध्येही खूप अडचणी आहेत. मुक्तीसाठी साधुसंन्याशांनी काय करावे, सर्वांभूती दया आणि कणव बाळगावी, कोणत्याही ठिकाणी एक दिवसापेक्षा जास्त राहू नये, संपत्तीचा लोभ धरू नये, इंद्रियनिग्रह करावा, मन ताब्यात ठेवावे, ही साधुसंन्याशांची लक्षणे आहेत. अशा माणसाला हंस असे म्हणतात आणि त्रिगुणाच्या पलीकडे जाऊन त्याने आत्मबोध प्राप्त करून घेतला तर त्याला परमहंस म्हणतात.

वैशंपायनांच्या कथेतून दोन गोष्टी आपल्याला कळतात. उपदेशाचा घाट शंकर-पार्वती संवादातूनच घडतो. या पद्धतीचा प्रारंभ ख्रिस्तपूर्व ९५० च्या सुमारास घडून आला हे दिसून येते. पुढे हीच परंपरा गुरुगीता आदी ग्रंथांत उचलून धरण्यात आली. दुसरी गोष्ट म्हणजे त्या सुमारास श्रीकृष्णाकडून शंकराची उपासना करविण्यात आली आहे. त्यामुळे शैवपंथ त्या काळात बराच प्रभावी असावा असे वाटते. तिसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रवृत्ती आणि निवृत्ती या मार्गांचा उपदेश करण्यात शिव हे सांख्य आणि योग यांचा निर्देश तर करीत नव्हते? असे असेल तर या दोन मार्गांचा प्रारंभ ख्रिस्तपूर्व एक हजार वर्षांपर्यंत नेता येणे शक्य आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या उत्क्रांतीत या दृष्टीने वैशंपायन यांनी महत्त्वाची भर घातली आहे असे म्हणावे लागेल.

संशोधनातून आणखी एक माहिती बाहेर पडते ती रामायणासंबंधी. रामायणाशी निगडित असलेल्या अयोध्या, प्रयाग, गंगातीर इत्यादी स्थळांच्या उत्खननात महाभारत काळातील अवशेष सापडले नाहीत. जे सापडले ते नंतरच्या म्हणजे ख्रिस्तपूर्व तिसऱ्या-चौथ्या शतकाचे सापडले. याआधारे पुराणतत्त्वज्ञ डॉ. लाल यांनी असा कयास

बांधला की रामायणाचा काळ हा महाभारताच्या नंतरचा असावा, पण श्री. यार्दी आणि इतर संशोधक यांनी असे दाखवून दिले आहे की, महाभारतात विशेषत: वैशंपायनीय महाभारतात म्हणजे ख्रिस्तपूर्व ९५० च्या सुमारास रामायणाचे अनेक उल्लेख आढळतात. इतकेच नव्हे तर वैशंपायनांनी वाल्मीकी ऋषीला भारतीय वीरांच्या सभेतही आणले आहे. श्रीराम, जानकी, लक्ष्मण, रावण, इंद्रजित इत्यादींच्या कथा समाजाला चांगल्याच अवगत होत्या. वेद आणि उपनिषद वाङ्मयातील जनक जेव्हा ऋषींना विचारतो की परीक्षित कुठे गेला? तेव्हा पांडवांपूर्वी नवव्या पिढीत होऊन गेलेला परीक्षित त्यांना अभिप्रेत आहे, अर्जुनाचा नातू परीक्षित नव्हे हे त्यांनी दाखवून दिले आहे. तसेच जनक या नावाचे राजेही अनेक होऊन गेले. बहुधा जनक हे घराण्याचेही नाव असावे. जानकीचा पिता जनक याचा उल्लेख सितध्वज जनक असा आला आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. या सर्व आधाराची चर्चा करून श्री. यार्दी यांनी वाल्मीकीचा काळ ख्रिस्तपूर्व तेराशेचा धरला आहे. त्यावरून रामायणाची कथा ख्रिस्तपूर्व पंधराशेच्या सुमारास घडली असावी असे म्हणता येईल.

वैशंपायनांच्या महाभारत-निर्मितीनंतर महाभारतात भर घालणारे सूत आणि सौती हे पितापुत्र होत. महाभारतात जी कथा आपण वाचतो ती अशी आहे की, नैमिषारण्यात (गोरखपूर जिल्हा, उत्तर प्रदेश) शौनक ऋषींनी एक मोठा यज्ञ आरंभिला होता. हा यज्ञ बारा वर्षे चालू होता. शेकडो लोक त्या यज्ञाला जमले होते. तेथे सूत नावाचा विद्वान आणि महाभारताचा पंडित पोचला. तो आणि त्याच्यानंतर त्याचा मुलगा सौती यांनी नैमिषारण्यातील मंडळीसमोर महाभारताचे कथन केले. सध्याच्या महाभारतात शौनक सूतांना विचारतात अशा प्रश्नोत्तरांचा ग्रंथ आपल्या समोर आहे. मराठीतील सूतोवाच हा शब्द या प्रसंगाची आठवण करून देणारा आहे. हा सूत आणि सौती यांचा काळ विद्वानांनी ज्योतिषाच्या उल्लेखावरून आणि बुद्धकालीन कोसलाधिपती रसयनजित याच्या उल्लेखावरून शोधून काढला आहे. हा काळ ख्रिस्तपूर्व ४५० च्या सुमारास येतो असे सिद्ध झाले आहे.

सूताने मूळ भारतात अनेक आख्याने-उपाख्याने घातली आहेत. नीती, धर्म, शांती, अध्यात्म इत्यादींची त्याने शांतिपर्व आणि विविध संवाद यांतून भरपूर चर्चा केली आहे. पण एका महत्त्वाच्या प्रकरणाकडे डॉ. सुखटणकर आणि यार्दी यांनी संशोधकांचे लक्ष वेधले आहे, ते म्हणजे भार्गवराम, परशुराम आणि त्यांचे घराणे यांना त्या पितापुत्रांकडून दिलेले विशेष महत्त्व आहे (सूत आणि सौती). भृगू ऋषी, जमदग्नी, रेणुका, सत्यवती, भार्गवराम, परशुराम, च्यवन ऋषी, मार्कंडेय इत्यादी भार्गववंशासंबंधीची इतकी आख्याने आपण उपआख्याने सूत आणि सौती यांनी दिली आहेत की महाभारताचे भार्गवीकरण करायचे होते की काय अशी शंका येऊ लागते.

भार्गव म्हणजे परशुराम तर चिरंजीवच झाला आहे. सूताकडून गोष्टी ऐकणारा स्वत: शौनक ऋषी हाही भृगुकुलातील होता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. सूताने महाभारतात अनेक गोष्टींची भर घातली. त्यासाठी यार्दी यांचा मूळ ग्रंथ आपल्याला वाचावा लागेल.

यार्दी यांनी जो मजकूर लिहिला आहे त्याचा येथे फक्त निर्देश करणे शक्य आहे. भीष्माने केलेल्या राजधर्माच्या उपदेशाचे साठ ते ऐंशी अध्याय सूताने वाढविले आहेत. मोक्षधर्माच्या प्रकरणात भृगु-भारद्वाज संवाद, जनक-भृगू, याज्ञवल्क्य इत्यादींच्या संवादांतून सूताने ख्रिस्तपूर्व ४५० वर्षे प्रचलित असलेल्या सांख्य आणि योग यांची विस्तृत दखल घेतली आहे. अश्वमेध पर्वासारखी प्रकरणे सूताने महाभारतात वर्णिली आहेत. सांख्य आणि योग यांच्यासंबंधी सूताने जे म्हटले आहे ते श्री. यार्दी यांनी थोडक्यात पण स्पष्टपणे मांडले आहे. ते म्हणतात, सूताच्या काळात सांख्य आणि योग यांचा जनमानसावर बराच प्रभाव पडला असावा (ख्रिस्तपूर्व ४५०). सांख्य आचार्यांनी आपली स्वत:ची एक परिभाषा निरनिराळ्या तत्त्वांच्या वर्णनासाठी वापरली आहे. उदाहरणार्थ : क्षर-अक्षर, क्षेत्र-क्षेत्रज्ञ, व्यक्त-अव्यक्त. यावरून असे दिसते की सांख्य तत्त्वज्ञानातील त्या काळात वेगवेगळी मते असावीत.

सांख्यसूत्राचे वर्णन करताना सांख्य आचार्यांचे म्हणणे, सूत अनेक ठिकाणी होते. या आचार्यांचे म्हणणे असे की मुळात सांख्य आणि योग यांत भेद नाही. वसिष्ठांच्या मते योग म्हणजे ध्यान आणि प्राणायाम (एकाग्रता). याज्ञवल्क्यही निराळ्या शब्दांत पण हेच सांगतात. योग आणि सांख्य यांचा या काळातील फरक हा बराचसा तांत्रिक स्वरूपाचा दिसतो. पण दोघांचाही हेतू आत्मबोधाचाच आहे. श्री. यार्दी यांच्या मते मोक्षधर्मात सूताने वर्णन केलेले सांख्य आणि योग यांसंबंधीचे उल्लेख प्रारंभीच्या तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाचे आहेत. पुढे पातंजलीने योगाचा आणि ईश्वर कृष्णाने सांख्यांचा सिद्धान्त स्वतंत्रपणे हाताळला. पण त्या दोघांचे उल्लेख महाभारतात नाहीत. तो काळ नंतरचा समजावा.

यार्दी यांच्या मते पांडवांचे विविध प्रकारे समर्थन करण्याचे सूताने अधिक प्रयत्न केले आहेत. पांडवांच्या प्रमादांचे समर्थन करण्यासाठी त्याने वैशंपायनी महाभारतात म्हटलेले अध्याय मूळ कथेत घातले आहेत. घोषयात्रा प्रकरण, जयद्रथाकडून द्रौपदीचे अपहरण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे द्रौपदी-वस्त्रहरण कथा. मुळात नसलेले दोन प्रसंग या संदर्भात सूताने घातले आहेत. दु:शासनाच्या वधप्रसंगी भीम त्याचे रक्त प्याला आणि दुर्योधनाच्या डोक्यावर त्याने लाथ मारली याबद्दल सूताला काही तरी निमित्त सांगून वेळ मारून न्यायची होती. सूताने असे लिहिले आहे की, पांडव द्यूतात सर्व काही हरले आहेत, तेव्हा त्यांना काय आणि द्रौपदीला काय, मौल्यवान कपडे अंगावर बाळगण्याचे कारण नाही असे कर्णाने म्हटले. कर्णाने दु:शासनाला सूचना केली

की त्याने द्रौपदीची वस्त्रे जबरदस्तीने काढून घ्यावीत. दुःशासनाने द्रौपदीच्या वस्त्रांना हात घातला तेव्हा भीमाने प्रतिज्ञा केली की, आपण दुःशासनाची छाती फोडून त्याचे रक्त प्यायल्याशिवाय राहणार नाही. सूताने असेही म्हटले आहे की, दुर्योधनाने आपली डावी मांडी उघडी करून द्रौपदीला बोलावले, तेव्हा भीमाने त्याची मांडी फोडण्याची प्रतिज्ञा केली. भीमाकडून क्षात्रधर्माचा जो भंग झाला त्याचे समर्थन करण्यासाठी भीमाला सभास्थानी झालेल्या अतीव क्षोभाचे कारण म्हणून सूताने या गोष्टी दिल्या आहेत.

अर्थात वैशंपायनानेही पांडवांचा जय म्हणजे जेथे धर्म तेथे विजय ठरलेला अशी भूमिका घेतली आहे. सूताने काही झाले तरी पांडवांचे समर्थन करायचे या हेतूने काही मुळातच नसलेली कारणे (वैशंपायनदृष्टचा) शोधून काढली आहेत हे विशेष आहे. सूताचा मुलगा सौती याने (ख्रिस्तपूर्व ४८५ चा सुमार) महाभारतात जे अध्याय वाढवले आहेत त्यांची संख्या शेकडोंनी भरेल.

यार्दी यांच्या मते महाभारतामध्ये जोडण्यात आलेली अपूर्व कथा म्हणजे भगवद्गीता होय. खुद्द महाभारतकाली भगवद्गीतेची विचारसरणी प्रचारात नव्हती असे म्हणणे कठीण आहे. वैशंपायनाने स्वत: महाभारत सांगितले त्यात श्रीकृष्णाच्या तपश्चर्येच्या वेळी झालेल्या शिव-पार्वती संवादाच्या त्या प्रसंगाने प्रवृत्ती-निवृत्ती या मार्गांची चर्चाही आलीच आहे. याज्ञवल्क्य, कपिल-महामुनी इत्यादींच्या विचारसरणीतील भारतीय युद्धकाळातील लोक फारच परिचयाचे होते. सांख्य आणि योग हे मार्गसुद्धा अपरिचित नव्हते. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील परस्पर संबंध पाहता अध्यात्म आणि जीवन यांच्याविषयी विचारविनिमय झाला असणे सहज शक्य आहे. पण ऐन भारतीय युद्धाच्या प्रसंगी ती नाट्यपूर्ण पद्धतीने मांडून महाभारताशी जोडण्याची कामगिरी सौतीने केलेली दिसते. भगवद्गीता हा मुळात समन्वयवादी ग्रंथ असून त्यात सांख्य, योग, ज्ञान, भक्ती, कर्म इत्यादी मार्ग, प्रवृत्ती आणि निवृत्ती इत्यादींचा समन्वय साधण्यात आला आहे. सौतीच्या काळात श्रीकृष्णभक्ती चांगलीच रूढ झाली होती. भारतीय युद्धकाळातील पांडवांचा सखा आणि हितचिंतक, तत्त्वज्ञानी श्रीकृष्ण भगवद्गीतेत 'संभवामि युगे युगे' म्हणतो. बाकी सगळे सोडून मला शरण या म्हणजे उद्धार होईल, असे म्हणतो. सौतीच्या काळात श्रीकृष्णाचे संपूर्ण दैवीकरण झाले आहे. भक्तियोग बळावला आहे. त्या मानाने कर्मकांड कमी झाले आहे. असे असूनही त्याच काळी उदयाला येणारा बौद्ध धर्म हा हिंदू धर्मातील कर्मकांडाला आणि नकारात्मक तत्त्वज्ञानाला विरोधी असा होता असे जेव्हा मांडण्यात येते तेव्हा विस्मय वाटतो. बौद्ध धर्माचा उदय ही हिंदू धर्मातील धार्मिक घोषणेविरुद्ध प्रतिक्रिया आहे असे कसे म्हणता येईल? कारण ऐन बौद्ध धर्माच्या उदयाच्या वेळी वैदिक धर्मात

श्रीकृष्णाचे महत्त्व आणि भक्तिमार्ग ही दोन्ही वाढतच तर होती. या विषयाची बारकाईने तपासणी होणे आवश्यक आहे.

सौतीने महाभारतात भर घालण्याच्या निमित्ताने अभावितपणे का होईना, त्या काळातील भारतीय तत्त्वज्ञानाचा समन्वय साधून ते भगवद्गीतेच्या रूपाने आणि तेही श्रीकृष्णाच्या मुखाने सांगून कोट्यवधी भारतीयांना जीवन कसे जगावे याचे मोठे सुंदर विवरण केले आहे. असा ग्रंथ श्रीकृष्णाच्या तोंडूनच निघायचा. आणि म्हणूनच भारतीय युद्धातील योगेश्वर, तत्त्वज्ञ आणि पांडवांचा हितचिंतक सखा महापुरुष श्रीकृष्ण हा जगद्गुरू आणि परमेश्वराचा अवतार बनला यात नवल काय? भारतीय युद्धातील पार्श्वभूमीवरील हा ग्रंथ म्हणजे भारतीय संस्कृतीच्या मुगुटातील कोहिनूर हिराच आहे.

सौतीने ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकातील समाजजीवनाचे भरपूर उल्लेख केले आहेत. त्यात जानपदांचे उल्लेख आपल्याला गौतम बुद्धाच्या काळापर्यंत नेऊन सोडतात.

यानंतर महाभारतात भर पडली ती ख्रिस्तपूर्व १५० च्या सुमारास. ज्याने ही भर घातली त्याचे नाव कळलेले नाही, पण त्याने हरिवंशाची मोठी भर महाभारतात घातली आहे. म्हणून त्याला हरिवंशकाल म्हटले आहे. हरिवंशाचा काळ हा सूर्यवंशाचा काळ आहे. याचे उल्लेख हरिवंशाच्या साहित्यात मिळतात. हरिवंशकाराने रामायण म्हणजे श्रीरामाचे आख्यान, नलदमयंती आख्यान, मनूची कथा, किरातार्जुनीय, मार्कंडेय इत्यादी कथांची भर त्यात घातली आहे. श्रीरामाच्या आख्यानावरून वाल्मीकी रामायण त्याला माहीत होते हे स्पष्ट दिसते.

हरिवंशकाराच्या काळापर्यंतच जी तत्त्वज्ञाने भारतात नांदत होती त्यांत सांख्य, योग, वेद, पाशुपत यांचा उल्लेख तर हरिवंशकाराने केलाच आहे. त्याबरोबरच त्याने नरनारायणाची कथाही दिली आहे, ती विलक्षणच आहे. बद्रिकाश्रमात नारद गेले असताना तेथे त्यांचा आणि नारायणांचा संवाद झाला.

नारद हे मेरू पर्वतावर गेले. तेथे त्यांनी श्वेतद्वीप पाहिला. तेथील माणसे पांढरीशुभ्र. त्यांची डोकी छत्रांच्या आकाराची आणि डोळे कधी मिटत नसत. ती परमेश्वराच्या आराधनेत गुंतलेली असत. तेथे नारदांनी भगवंताची स्तुती केली आणि भगवंतांनी त्यांना दर्शन दिले. इतकेच नव्हे तर आपल्या अवतारांचेही वर्णन नारदांसमोर केले. नारायणाच्या आणि नारदांच्या संवादांतून नारायण, विष्णू, रामकृष्ण आदी अवतार आणि एकूण वैष्णव धर्म यांसंबंधीची आपल्याला बरीच माहिती मिळते. हरिवंशकारांनी दाखवून दिले आहे की त्यांच्या काळात कपिल महामुनीचे सांख्यहिरण्यगर्भकृत योग, नारायणकृत पंचरात्र, शिवकृत पाशुपत आणि अपांतरमस (नारायणाचा मुलगा) याचे वेद हे प्रचारात होते. पंचरात्राचा उपदेश स्वत: नारायणाने नारदमुनींना केला. यात नारायण स्वत:ला 'वासुदेव आणि परमात्मा' म्हणवितात, सांख्यांच्या चोवीस

कलांच्याही पलीकडचे आपण पंचविसावे आहोत असेही म्हणतात. या नारायणाचे चार आकार (व्यूह) आहेत.

मुळातूनच हे पंचरात्राचे तत्त्वज्ञान वाचले पाहिजे. भारतात त्या वेळी विष्णुभक्तीची लाट आली. त्याची प्रेरक शक्ती म्हणून हे वैष्णवांचे तत्त्वज्ञान आहे. यानंतरची भर ज्या काळी घातली त्याला श्री. यार्दी यांनी पर्व संघकाळ हे नाव दिले आहे. त्याचा काळ ख्रिस्तशकारंभाचा आहे. यातील महत्त्वाचा भाग म्हणजे सुलभा-जनक संवाद, व्यास आणि शुक संवाद, विष्णुसहस्रनाम इत्यादींची महाभारतात भर पडल्याचे दिसून येते.

❖ ❖

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3433
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे

भारतात अनेक तीर्थस्थाने आहेत. अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांजीवरम्, उज्जैन, जगन्नाथपुरी, द्वारका इत्यादी क्षेत्रे सुपरिचित आहेत. सामान्यपणे यात्रेसाठी निघणारा माणूस काशी, प्रयाग, गया, जगन्नाथपुरी वगैरे स्थळे पाहतो. अधिक कष्ट करण्याची तयारी असलेले लोक बद्रीकेदार आणि अमरनाथ येथपर्यंत जाऊन येतात. पण काय कारण असेल ते असो, कुरुक्षेत्राला जाणाऱ्यांची संख्या तसे पाहिले तर विशेष दिसून येत नाही. वर्तमानपत्रांत कुंभमेळा किंवा अर्धकुंभमेळा वगैरे प्रसंगी कुरुक्षेत्रातील ब्रह्मसरोवरावर यात्रेकरू लाखोंनी जमतात असे अधूनमधून वाचायला मिळते. यापलीकडे कुरुक्षेत्राबद्दल विशेष माहिती नसते.

हे विचार मनात येण्याचे कारण असे झाले की, गेल्या दहाबारा वर्षांत मला कुरुक्षेत्र या स्थळी दोनदा जाण्याचा योग आला. वास्तविक पाहता माझा हेतू होता पानिपतच्या रणमैदानाची पाहणी करण्याचा. भाऊसाहेब पेशवे हे कुंजपुरा जिंकून घेतल्यानंतर कुरुक्षेत्राकडे जाण्याच्या विचारात होते. त्या वेळी दिल्ली आणि कुंजपुरा यांच्या मध्ये अहमदशहा अब्दाली याने यमुना ओलांडली असून आपली दिल्लीची वाट अडविली आहे हे त्यांना कळल्यामुळे भाऊसाहेबांनी कुरुक्षेत्राचा बेत सोडून दिला आणि मागे वळून पानिपत येथे आपला तळ उभा केला. पानिपतपासून कुरुक्षेत्र जवळ असावे अशी माझी समजूत. म्हणून आम्ही दिल्लीहून प्रथम कुरुक्षेत्राला गेलो. तसे पाहिले तर दिल्लीहून अंबाला या राजमार्गावर पानिपत हे दिल्लीच्या उत्तरेला पंचावन्न मैलांवर, तर कुरुक्षेत्र नव्वद मैलांवर आहे. कुरुक्षेत्र येथे एक विश्वविद्यालय आहे. त्या विश्वविद्यालयाच्या अतिथिगृहात आम्ही उतरलो. योगायागाने विश्वविद्यालयात आम्हांला तेथील प्राचीन भारतीय इतिहासाचे प्राध्यापक हरी अनंत फडके हे भेटले. त्यांची ओळख म्हणजे मला झालेला मोठाच लाभ असे मी समजतो. दोन दिवस आम्ही पति-पत्नींनी त्यांच्या सहवासात कुरुक्षेत्राची पाहणी केली. ब्रह्मसरोवर, जेथे श्रीकृष्णाने भगवद्गीता सांगितली असे म्हणतात ते ज्योती सरोवर, कर्ण रणांगणावर पडला ती जागा, भीष्म शरपंजरी पडले तेथील सूरजकुंड, युद्धाच्या आदल्या दिवशी पांडवांनी ज्याचे दर्शन घेतले ते कालीमातेचे देऊळ, कौरवांचा तळ पडला ती दृशद्वती नदी, पांडवांचा तळ होता ती सरस्वती, स्थानेश्वराचे देऊळ, करुतीर्थ इत्यादी अनेक स्थळे

आम्हांला त्यांच्यामुळे पाहायला मिळाली. श्री. फडके यांचा कुरुक्षेत्राच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास गाढा आहे. कुरुक्षेत्राचा चालता बोलता ज्ञानकोश असे त्यांना म्हटले तरी चालेल. आता तर त्यांनी कुरुक्षेत्राचा इंग्रजी इतिहास डॉ. दत्त या इतिहासाच्या प्राध्यापकांच्या सहकार्याने (मध्ययुग आणि आधुनिक काळ यांपुरता) लिहून प्रसिद्ध केला आहे. कुरुक्षेत्राचे उल्लेख वेद-पुराणे, ललित ग्रंथ इत्यादींतून जेथे जेथे येतात त्यांपैकी एकही उल्लेख फडक्यांच्या नजरेतून सुटलेला नाही. त्यामुळे हा ग्रंथ वाचताना ऋग्वेदकालापासून कुरुक्षेत्राचा इतिहास आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

कुरुक्षेत्रातील ब्रह्मसरोवराचा उल्लेख शारण्यावत या नावाने ऋग्वेदात अनेक प्रसंगांत आलेला आहे. सोम, इंद्र, दधीचि, अश्विनीकुमार इत्यादींशी निगडित असलेले हे प्रसंग होत. चौदाव्या शतकातील सुप्रसिद्ध भाष्यकार सायणाचार्य याने पुढील आख्यायिका दिली आहे : "अथर्वणचा मुलगा दधीचि याने आपल्या हयातीत असुरांवर फार मोठी दहशत बसविली होती. त्याच्या मृत्यूनंतर असुर पुन्हा सर्वत्र पसरले. त्यांच्याशी युद्ध करणे इंद्राला शक्य होईना. त्याने ऋषिमुनींना विचारले, दधीचीचे काय झाले? त्याने मागे काही ठेवले आहे किंवा नाही? ऋषिमुनींनी त्याला सांगितले की ज्या अश्वमस्तकाच्या द्वारे दधीचीने अश्विनीकुमारांना मधुविद्या शिकविली ते अद्याप अस्तित्वात आहे. पण ते कोठे आहे हे कुणालाच माहीत नाही. इंद्राने त्या मस्तकाचा सर्वत्र तपास केला. शेवटी ते अश्वमस्तक शारण्यावतमध्ये सापडले."

शारण्याच्या अनुयायांत प्रचलित असलेल्या या दंतकथेचा उल्लेख करून सायणाचार्य म्हणतात : "शारण्यावत हे एका सरोवराचे नाव असून हे सरोवर कुरुक्षेत्रात आहे. इंद्राने मस्तकातील (अश्वाच्या) हाडे काढली आणि त्यांच्या द्वारे असुरांचा संहार केला."

इंद्राने वृत्राचा संहार सरस्वती नदीच्या काठावर केला. अद्यापही कुरुक्षेत्रात दधीचि तीर्थ नावाचे एक तीर्थ आहे.

शारण्यावत सरोवराभोवती अनेक यज्ञयागादी कर्मे होत असत, असे उल्लेख वेदवाङ्मयात मिळतात. हे नुसते ऋग्वेदातच आहेत असे नाही, तर सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद यांतूनही आहेत. शतपथ ब्राह्मण, कृष्णयजुर्वेदाची मैत्रायणी संहिता यांतही हे उल्लेख आहेत. पुढील वाङ्मयात मात्र शारण्यावत हे नाव मागे पडून ब्रह्मवेदी, ब्रह्मयोनी, ब्रह्मसत्सर, ब्रह्मसरोवर, कुरुक्षेत्र ही नावे प्रचारात आली. कुरुक्षेत्र हे पवित्र क्षेत्र आहे आणि यज्ञयागादिकांचे दिव्य केंद्र आहे, असा उल्लेख मैत्रायणी संहितेत येतो.

कुरुक्षेत्रात असलेले शारण्यावत हेच आजचे प्रख्यात तीर्थ असलेले ब्रह्मसरोवर आहे. येथेच सूर्य, चंद्र, ग्रहणे, कुंभमेळा आदींच्या निमित्ताने लाखो यात्रेकरूंची गर्दी होत असते.

सरस्वती आणि दृशद्वती या दोन नद्यांच्या मध्ये असलेल्या नद्यांतील प्रदेशाला कुरुक्षेत्र म्हणतात. भारतीय परंपरेत या सरस्वती नदीचे महत्त्व फार मोठे आहे.

आज कुरुक्षेत्राजवळून वाहत जाणारी सरसूती नावाची नदी म्हणजेच सरस्वती होय. आज तिला नदी काय ओढा म्हटले तरी चालेल अशी तिची गत आहे. हिमालयातील सिरमुर पर्वतरांगांतून उगम पावून ही नदी अंबाला, कुरुक्षेत्र, पहोवा आणि शिरसा या गावांवरून वाहत पुढे जाते आणि भाटनेरच्या वाळवंटात लुप्त होते. वेदकाळात ती नदी प्रचंड होती आणि अरबी महासमुद्राला जाऊन मिळत होती. वेदकाळातल्या सरस्वती नदीचे वर्णन काय करावे? तिच्याच काठावर अनेक वैदिक ऋचांची रचना झाली. तिला सप्तसिंधूंपैकी एक नदी असे समजले जाते. तिच्या काठावर विपुल धान्य पिकत असे. वरील भागात ऋषिमुनींचे अनेक आश्रम असत. कुरुक्षेत्राची पूर्वसीमा म्हणजे दृशद्वती नदी. सरस्वती आणि दृशद्वती या दोन नद्यांमधील कुरुक्षेत्राच्या प्रदेशाचे क्षेत्रफळ पाच योजने (४० मैल) सांगण्यात आले आहे.

तैतरीय अरण्यकात त्याच्या सीमा दाखविण्यात आल्या आहेत. कुरुक्षेत्राच्या दक्षिणेस खांडव व उत्तरेस तुरघ्न (अंबाला जिल्ह्यातील सुघ हे गाव) अशा याच्या सीमा होत्या. कुरुक्षेत्राला समंतपंचक असेही महाभारतात म्हटले आहे.

कुरुक्षेत्र या नावाची व्याप्ती विस्तारित प्रदेशाला लागू करण्यात येत असली तरी मूळ अर्थाने सरस्वती आणि दृशद्वती या दोन नद्यांमधील सुमारे चाळीस चौरस मैलांचे कुरुक्षेत्र हेच मूळ कुरुक्षेत्र असावे असे दिसते.

या प्रदेशात वसाहत केलेले आर्य भरत कुळातील दिसतात. श्री. फडके यांनी ऋग्वेदावरून त्या काळातील भरत कुळाशी संबंध असलेली इतर आर्य कुळे आणि स्थळे यांची माहिती दिलेली आहे. ती मोठी मनोरंजक वाटेल. ती पुढीलप्रमाणे आहे :

१) भरत कुळाचे आर्य हे सरस्वती आणि यमुना या नद्यांतील प्रदेशात राहत.

२) भरत कुळाशी निकट संबंध असलेले म्हणजे पुरु आर्य हे सरस्वती नदीच्या दोन्ही काठांवरील प्रदेशात राहत.

३) भरताशी निकट असलेले आणखी एक कुळ म्हणजे त्रित्सु कुळ.

४) क्रीवी कुळांतील आर्य हे पूर्वी सिंधू आणि आरीक्री (चिनाब) नदीच्या प्रदेशात राहत. ते पुढे यमुनेच्या पलीकडे जाऊन वसले, तेव्हा त्यांना पांचाल म्हणू लागले. त्या भागात पूर्वी श्रिंजय हे आर्यकुळ राहत होते.

५) भरत आणि पुरु या कुळांतील आर्यांत झालेल्या युद्धांत पुरूच्या साहाय्यासाठी आलेली आर्यकुळे अनु.

६) द्रह्यु

७) तुर्वश

ही कुळे आरीक्री (चिनाब) आणि पुरुष्णी (राधी या नद्यांच्या प्रदेशात राहत होती.

८) ऋग्वेदात यदु आणि तुर्वश यांची नावे एकत्र येतात. ही दोन्ही कुळे दक्षिण पंजाबात राहत असावीत.

९) आर्यांचे मत्स्यकुळ हे सध्याच्या अलवार, भरतपूर आणि जयपूर या भागात राहत होते.

१०) अज

११) शिग्रू

१२) यक्षी; यांना पूर्वेकडील कुळे म्हणतात.

१३) भलानस.

१४) विशानिनी, १५) अलीन आणि १६) गांधार ही वायव्य सीमा भागात राहत होती.

१७) शिव हे कुळ सिंधू आणि वितस्ता (झेलम) या नद्यांच्या प्रदेशात होते.

१८) चेदि वंशातील आर्य हे यमुना नदी आणि विंध्य पर्वत यांच्यामधील प्रदेशात राहत. अतिपूर्वेकडील प्रदेशात काकिटांची वस्ती होती.

ऋग्वेदात दिवोदास या त्रित्सु कुळातील राजाने पुरूचा, यदूचा आणि तुर्वशांचा युद्धात पराजय केला असे वर्णन आहे. याच कुळातील सुदास या राजाने दहा राजांचा पराजय केला. या युद्धाची कारणे सांगताना श्री. फडके आपल्याला सांगतात की, सुदास राजाने आपला पुरोहित विश्वामित्र (हा भरत कुळातील होता.) याला पुरोहित पदावरून हटविले, आणि त्याच्या जागी वसिष्ठांची नेमणूक केली. त्यामुळे चिडून विश्वामित्राने दहा राजांना एकत्र आणून सुदासवर त्यांना चाल करून जाण्यास लावले. हे युद्ध पुरुष्णी (रावी) नदीच्या काठावर झाले. या युद्धात भरत कुळातील सुदास याने या राजांचा दणदणीत पराजय केला, असे झाले तरी पुरुवंशातील राजे सरस्वतीच्या काठावरील कुरुक्षेत्रात ठाण मांडून राहिलेले दिसतात. पुरुवंशातील अनेक राजांची नावे ऋग्वेदात आली आहेत. दाशराज्ञ युद्धात मारल्या गेलेल्या पुरुकच्छ राजाच्या राणीने पतीच्या मृत्यूनंतर एका पुत्राला जन्म दिला. त्याचे संगोपन राजपुरोहित भृगू याने केले. हा राजपुत्र त्रसदस्यु. याने मोठा झाल्यावर भरत कुळावर दणदणीत विजय मिळविला. यानंतर पुरु, कुरुक्षेत्रात राहणारे कुरु आणि भरत ही तिन्ही कुळे एकत्र झालेली दिसतात. त्या काळच्या वाङ्मयात आणि पुराणादी ग्रंथांत या तिन्ही कुळांचा संमिश्र

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
निबंध
ग्रा. क्र. ३५३३
२६८२३
२६।११।०३

असा उल्लेख येतो, इतकेच नव्हे तर या तिन्ही कुळांतील राजे जणू एकाच वंशातील आहेत असे उल्लेख मिळतात. यावरून पुरु, कुरु आणि भरत ही तिन्ही कुळे कशी एकजीव झाली होती याची कल्पना येईल. कौरवांचा भारत असा महाभारतातील उल्लेख याचे उदाहरण आहे. कुरूच्या वंशावळीत भरत व पुरु यांची नावे येतात आणि या तिन्ही कुळांतील राजांची कामगिरी मुक्त कंठाने वर्णन केलेली आपल्याला आढळते. भरत राजाचे वर्णन करताना शतपथ ब्राह्मणांनी म्हटले आहे : ''मर्त्य माणूस आपल्या हाताने आकाशाला कधी स्पर्श करू शकेल काय? तसेच भरताचे महत्त्व त्याच्या पूर्वी झालेले किंवा नंतर आलेले कोणीही गाठू शकले नाहीत.''

कुरुराजाविषयी एक मोठी दंतकथा वामनपुराणात सांगितली आहे. या कथेतून कुरुक्षेत्राच्या उत्पत्तीसंबंधीही आपल्याला माहिती मिळते. ती कथा अशी :

कुरुराजाने अनेक वर्षे राज्य केले. यानंतर आपण आपल्या मागे काही शाश्वत स्मारक ठेवावे असे त्याला वाटू लागले. तो तीर्थयात्रेला निघाला. यात्रा करीत करीत तो कुरुक्षेत्रातील द्वैतवनात आला. तेथे पवित्र अशी सरस्वती नदी वाहत असून एक मोठे सरोवर निर्माण झाले आहे. ते पवित्र सरोवर पाहून राजाला मोठा आनंद झाला. त्याने सरोवरात स्नान केले. यानंतर तो ब्रह्मदेवाने यज्ञ केलेल्या समंतपंचक नावाच्या स्थळी उत्तर वेदीला गेला. सरस्वती नदीच्या काठावर त्याने शेतीयोग्य अशी जागा निवडली. सद्धर्माचे पीक तेथे काढावे अशी त्याला इच्छा झाली. तो आपल्या उत्कृष्ट रथातून खाली उतरला. त्याने एक सोन्याचा नांगर हाती धरला. नांगराला त्याने शिवाचा नंदी (बैल) आणि यमाचा रेडा हे जोडले आणि तो जमीन नांगरू लागला. या जमिनीचे क्षेत्रफळ चौदा चौरस मैलांचे होते. या प्रसंगी इंद्र तेथे आला. त्याने राजाला विचारले, ''हे राजन, तू हे काय करीत आहेस?'' राजा म्हणाला, ''मी तप, यज्ञ, दया, क्षमा, शौच, दान, योग आणि ब्रह्मचर्य यांची या भूमीत पिके काढणार आहे.'' इंद्राने विचारले, ''अरे, पण याचे बी कुठे मिळेल?'' असे म्हणून उत्तराची वाट न पाहता इंद्र हसत हसत तेथून निघून गेला. राजाने जमिनीचे नांगरणे चालू ठेवले. यानंतर श्रीविष्णू तेथे आले. त्यांनी राजाला वरीलप्रमाणेच प्रश्न विचारला, ''तुझ्या पिकाला बी कुठे मिळेल?'' राजा म्हणाला, ''महाधर्माच्या बिया माझ्या शरीरात आहेत.'' विष्णू म्हणाले, ''त्या बिया मला दे. तू जमीन नांगरू लाग, मी बिया पेरीन.'' यावर राजाने आपला उजवा हात पुढे केला. विष्णूने आपल्या चक्राने त्या हाताचे हजार तुकडे केले व जमिनीवर पसरून दिले. नंतर राजाने आपला डावा हात आणि दोन मांड्या देऊन टाकल्या. त्यांचेही हजारो तुकडे झाले आणि जमिनीवर पसरविण्यात आले. असे करता करता राजापाशी फक्त मस्तक राहिले. कुरुराजाच्या या महान त्यागाने विष्णू प्रसन्न झाला. त्याने म्हटले, ''राजा, तू वर माग.'' कुरु म्हणाला, ''भगवन, ही भूमी मी जी

नांगरली आहे हिला यापुढे धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र हे नाव देण्यात यावे. ही पुण्यभूमी ठरावी. परमात्म्याच्या प्राप्तीसाठी भटकणाऱ्या आत्म्यांना येथे शांती मिळावी.'' ''तथास्तु'' भगवान विष्णू म्हणाले. त्या दिवसापासून त्या पुण्यभूमीचे नाव धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र असे पडले.

कौरव आणि भारत कुळांप्रमाणे कुरुवंशही ब्रह्मसरोवर आणि कुरुक्षेत्र यांच्याशी निगडित झाला आहे. ऋग्वेदात पुरुरवा आणि उर्वशी यांची कथा आली आहे. शतपथ ब्राह्मणात ही कथा कुरुक्षेत्रात घडली असे म्हटले आहे. त्यातील एक उतारा पाहा. (पत्नीच्या विरहाने पोळलेला) सतत अश्रू ढाळणारा पुरुरवा हा कुरुक्षेत्रात भटकू लागला. तेथे कमलपुष्पांनी भरलेले असे एक सरोवर आहे. त्या सरोवराच्या काठावर तो फिरत होता. स्वर्गातून उतरलेल्या अप्सरा त्या सरोवरात हंसरूपाने क्रीडा करीत होत्या. उर्वशीने पुरुरव्याला पाहिले. ती आपल्या सख्यांना म्हणाली, ''हा तो मनुष्य. याच्याबरोबर मी राहत होते.'' सख्या म्हणाल्या, ''आपण त्याच्यासमोर प्रगट होऊ या.'' उर्वशी म्हणाली, ''बरे आहे.'' आणि मग त्या अप्सरा पुरुरव्यासमोर आल्या. उर्वशीने आपल्याबरोबर राहावे म्हणून पुरुरव्याने तिचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. ती स्वर्गाला परत जाऊ इच्छित होती. शेवटी तिने पुरुरव्याचा त्याग केला आणि ती स्वर्गाला निघून गेली.

ही कथा पुढे अतिशय लोकप्रिय झाली. या कथेचे उल्लेख मत्स्य, विष्णू, वायू, ब्रह्म, ब्रह्मांड, भागवत, हरिवंश इत्यादी पुराण-ग्रंथांतून येतात. कथा सरित्सागर यातही या कथेचा उल्लेख आहे. या कथेवर विक्रमोर्वशीयम् हे नाटक लिहून कविकुलगुरु कालिदास याने ही कथा अमर केली आहे. वेद आणि ब्राह्मण या काळात हा कुरुक्षेत्राचा प्रदेश यज्ञयाग आणि धार्मिक वाङ्मय यांच्या निर्मितीमुळे भारतभर प्रसिद्ध होता. कुरुक्षेत्रात प्रत्यक्ष देवतांनी यज्ञ केले अशा आख्यायिका शतपथ ब्राह्मणात येते. ती अशी : ''अग्नी, इंद्र, मरुत्, विष्णू आणि विश्वदेव या सर्वांनी एक अश्विनीकुमार सोडून कुरुक्षेत्रात यज्ञ केले.'' यामुळे लोक म्हणतात 'कुरुक्षेत्र ही देवांची यज्ञभूमी होय.' ब्राह्मण वाङ्मयात पुढील मनोरंजक कथा आहे : यज्ञ संपल्यानंतर देवतांनी प्राशन केलेला सोमरस पात्र लवंडल्यामुळे थोडासा गळून पडला. या रसातूनच कुरुक्षेत्रात न्यग्रोधाची (वड) झाडे विपुल संख्येने वाढली. त्यांना न्यूज म्हणत (लवंडलेले-सांडलेले). वरील वाङ्मयावरून कुरुक्षेत्रात सोमवल्ली आणि वडाची झाडे विपुल असावी असे दिसते. अशा या समृद्ध आणि धर्मसंस्थांनी गजबजलेल्या प्रदेशातून वाहणारी सरस्वती ही वेदकाळाच्या अखेरीस हिमाचल प्रदेशातील बदल, भूकंपादी आपत्ती आणि हवामान यांमुळे हळूहळू क्षीण होऊ लागली असे दिसते. सरस्वती सुकून जाऊ नये, देशात दुष्काळ पडू नये, सरस्वतीची कृपा सर्वांवर असावी

अशा प्रकारची अनेक आवाहने तत्कालीन वाङ्मयात आढळतात. पुराणात सरस्वतीला प्राची सरस्वती असे म्हटले आहे. या नदीच्या काठावर ब्राह्मणे रचिली गेली. या काठांवरील तत्त्वज्ञानविषयक चर्चांनी उपनिषदे समृद्ध झाली. वेदमंत्रांच्या घोषांनी हा प्रदेश गजबजून गेला होता. **वरील कारणांनी जनमानसात ही सरस्वती म्हणजेच विद्येचे आगर आणि ज्ञानाची देवता समजली जाऊ लागली.** सरस्वतीला समांतर वाहणारी दृशद्वती ही कुरुक्षेत्राच्या पूर्व सीमेवर आहे. दृशद्वतीच्या काठांवरही यज्ञयाग होत असत असे उल्लेख आढळतात. याच नदीच्या एका काठावर कौरवांचा तळ पडला होता. या दोन नद्यांच्या मधला प्रदेश म्हणजे कुरुक्षेत्र. हा सुमारे चाळीस चौरस मैलांचा प्रदेश आहे. या दोन्ही नद्यांच्या मध्ये एक आपया नावाची नदी वाहते. तिचा उलेख ऋग्वेदात आहे.

श्री. फडके यांनी कुरुक्षेत्रात ज्या अनेक घटना घडल्या व ज्या कथा आणि दंतकथांच्या रूपाने वाङ्मयात येतात त्यांची आपल्याला माहिती करून दिली आहे. ते आपल्याला सांगतात :

सुदास राजाचे पराक्रम येथेच घडले. वृत्रासुराचा वधही या ठिकाणीच झाला. कुरुवंशातील चित्रांगद आणि गंधर्व चित्रांगद यांचे युद्ध आणि कौरव चित्रांगदाचा मृत्यू येथेच झाले. सुंद आणि उपसुंद यांची सत्ता या भागात चालत होती असे म्हणतात. क्षत्रियांच्या पराजयानंतर भार्गव परशुराम याने त्या प्रसंगाने येथे पाच कुंड निर्माण केले म्हणून कुरुक्षेत्राचे दुसरे नाव समंतपंचक असे पडले. येथे असलेल्या रामह्रद या सरोवराचा संबंध भार्गव परशुरामाशी सांगण्यात येतो. परशुराम आणि भीष्म यांचे युद्धही कुरुक्षेत्रात झाले होते. पुरवा आणि उर्वशी, दधीचि इत्यादींचा उल्लेख आलाच आहे. यानंतर श्री. फडके यांनी आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात कौरव-पांडवांच्या युद्धाची सूक्ष्म छाननी केली आहे. महाभारत हे काव्य आहे, त्यात इतिहास नाही, हे युद्ध झालेच नाही, अशा ससमजुती बाळगणाऱ्यांचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला आहे. त्यांचे म्हणणे काय आहे हे सारांशाने का होईना महाराष्ट्रातील वाचकांना समजणे आवश्यक आहे. ते म्हणतात :

''महाभारताच्या सुरुवातीस व्यासांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या हकीकतीवरून जय नावाचे ऐतिहासिक काव्य लिहिले असे म्हटले आहे. आणखी एके ठिकाणी व्यासांच्या सांगण्यावरून, त्यांच्या उपस्थितीत वैशंपायनाने जनमेजयाला महाभारत सांगितले असे म्हटले आहे. जय हा मूळ ग्रंथ आज सापडत नाही. परंतु तो एकेकाळी अस्तित्वात असला पाहिजे हे महाभारतावरून कळते.'' सुरुवातीच्या वैदिक वाङ्मयात पुरु, कुरु आणि भरत या वंशातील अनेक राजांची नावे सर्रास आली आहेत. पुरुरवस, ऐल, आयु, ययाती, नहुष, पुरु, भरत, दुष्यंत, अजामिळ, रिक्ष, संवरण, प्रतीप, बाल्हिक,

प्रातीतीय, शंतनु, धृतराष्ट्र, विचित्रवीर्य, इत्यादी नावांचा उल्लेख श्री. फडके यांनी केला आहे. भारतीय युद्धात भाग घेणाऱ्या इतर वीरांचेही उल्लेख आहेत. त्यांत देवकीपुत्र कृष्ण आणि शिखंडित यज्ञसेन ही नावे आढळतात. सांख्यायन आणि अश्वलायन या दोन सूत्रकारांना भरतीय युद्धाची माहिती होती हे त्यांच्या ग्रंथावरून आढळते. अश्वलायनाने व्यासशिष्य वैशंपायन याचा उल्लेख भारताचार्य म्हणून केला आहे.

पाणिनीच्या ग्रंथातही वासुदेव, अर्जुन, भीष्म, युधिष्ठिर, कुंती आणि कुरु यांची नावे आली आहेत. पाणिनीला व्यासांचे शिष्य पैल आणि वैशंपायन यांची माहिती होती असे दिसते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही दुर्योधन आणि पांडव यांचे उल्लेख आहेत. पातंजलीने भीम, नकुल आणि सहदेव यांचा उल्लेख केला आहे. याचा अर्थच असा की वाङ्मयीन परंपरेने भारतीय युद्धाची स्मृती शेकडो वर्षे जागृत ठेवण्यात आली आहे हे निश्चित आहे. अलीकडे उत्खननांतून जी माहिती मिळू शकली तिचाही उपयोग श्री. फडके यांनी केला आहे. हस्तिनापूर, बर्नव (वारणावत), बैराट (विराट), पानिपत (पाणिप्रस्थ), सोनपत (सोलाप्रस्थ), इंद्रपत (इंद्रप्रस्थ), बागपत (वृक्प्रस्थ), तिलपत (तिलप्रस्थ) आणि कुरुक्षेत्र येथे जे अवशेष सापडले आहेत त्यांचा काळ ख्रिस्तपूर्व अकराव्या शतकापर्यंत जातो. हस्तिनापुराच्या उत्खननात घोड्याची हाडे सापडली आहेत. ती बहुधा अश्वमेधाची असावीत असे समजले जाते. निचक्षूंच्या काळात हस्तिनापूर पुराने वाहून गेले आणि त्यामुळे पांडवांच्या वंशजांना हस्तिनापूर सोडून आपली राजधानी कौसोंबी येथे न्यावी लागली. या पुराणातील कथेला उत्खननातून पुष्टी मिळते.

निचक्षूंचा काळ ठरविताना श्री. फडके हे सांगतात की, भारतीय युद्ध केव्हा झाले हे पाहण्यासाठी शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यक उपनिषद आणि सांख्यायन आरण्यक ही उपयोगी पडतील. सूत्रकार गुणाख्य सांख्यायन हा परीक्षितापासून सात किंवा आठ पिढ्यांनंतर झाला असे दिसून येते. सांख्यायन हा अश्वलायन या दुसऱ्या सूत्रकाराचा समकालीन होय. माध्यमिकाय या बौद्ध ग्रंथात आलेला बुद्धांचा समकालीन अश्वलायन तो हाच असावा असे निश्चितपणे जरी सांगता आले नाही तरी ख्रिस्तपूर्व आठशे ते सहाशे या काळात होऊन गेलेल्या या दोघा सूत्रकारांनी ज्याअर्थी भारतीय युद्धाचा उल्लेख केला आहे त्याअर्थी ते युद्ध ख्रिस्तपूर्व आठशेच्या पूर्वी झाले हे निश्चित आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात शंतनूचा उल्लेख आहे. आणि काठक संहितेत आलेले धृतराष्ट्र, वैचित्र्यवीर्य ह्यांचे उल्लेख या गोष्टी भारतीय युद्धाचा काळ ठरविताना निश्चितच उपयोगी पडतील. ऋग्वेदातील भाषेवरून श्री. फडके यांनी त्यांचा काळ ख्रिस्तपूर्व चौदाशे ते एक हजार ठरविला आहे. उत्खननात मिळालेल्या माहितीवरूनही वरील विधानांना पुष्टी मिळते असे त्यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात, ''उत्तरकालीन हरप्पा

संस्कृती ही ख्रिस्तपूर्व पंधराशेच्या सुमारास नाहीशी झाली हे हरियाना आणि इतर प्रदेश यांतील उत्खननावरून सिद्ध झाले आहे.''

त्यानंतर वैदिक संस्कृती कुरुक्षेत्राच्या भागात वाढली ती पूर्णपणे समृद्ध होण्यास दोन-तीन शतके तरी गेली असली पाहिजेत. त्या हिशेबाने महाभारताचा काळ हा सामान्यपणे ख्रिस्तपूर्व एक हजारच्या सुमाराचा असावा असे त्यांनी आपले मत मांडले आहे. अर्थात त्यांनी इतर विद्वानांच्या मतांचीही चर्चा केली आहे. पार्जिटर, मुजुमदार, प्रधान, पुसाळकर, इत्यादींची मतेही त्यांनी जमेस धरली आहेत. ज्योतिषशास्त्रावरून भारतीय युद्धाचा काळ ठरविण्याचे प्रयत्न आर्यभट्टाच्या वेळेपासून झाले आहेत. त्यांचीही चर्चा त्यांनी केली आहे.

भारतीय युद्ध झालेच नाही असे म्हणणाऱ्यांना श्री. फडके यांनी कुरुक्षेत्रातील अनेक स्थळांची आणि त्या घटनांची आठवण करून दिली आहे. पांडव हे उपप्लव्य गावाहून निघाले आणि कुरुक्षेत्राकडे आले. कनिंगहॅमच्या मते पांडवांच्या सैन्याची डावी फळी सरस्वतीच्या काठावर होती आणि उजवी फळी किरमच (कुलतारण तीर्थ) या स्थानेश्वराच्या दक्षिणेस साडेसात मैलांवर असलेल्या गावापाशी टेकली होती. कौरवांचे सैन्य पश्चिमाभिमुख होते. त्या सैन्याची उजवी फळी सरस्वतीवर तर डावी फळी अमीन या गावाशी होती. अमीन या गावालाच अभिमन्यू खेड असे म्हणतात. येथेच अभिमन्यू मारला गेला. महाभारतातील वर्णनाप्रमाणे उभय दळांची सैन्ये पाच योजने म्हणजे चौसष्ट किलोमीटर (चाळीस मैल) या प्रदेशात पसरली होती. यात थोडीशी अतिशयोक्ती असावी, पण ही सैन्ये कैठाल, पेहोवा, अमीन आणि थानेश्वर या भागात पसरली होती असे निश्चितपणे म्हणता येईल. कुरुक्षेत्रातील काही स्थळांवरून युद्धातील काही घटनांची आठवण व्हावी. अर्जुनाने जेथे विजयासाठी प्रार्थना केली ते दुर्गाकूप अगर दुर्गातीर्थ. चक्रतीर्थ येथे श्रीकृष्णाने भीष्मावर चालून जाण्यासाठी चक्र धारण केले. बाणगंगा येथे अर्जुनाने भीष्मासाठी पृथ्वीत बाण मारून जलधारा निर्माण केली. भीष्मकुंड या कुंडाच्या काठावर भीष्माच्या शरीराला अग्नी देण्यात आला. अमीन हे अभिमन्यू क्षेत्र. येथे अभिमन्यू मारला गेला. राजा कर्ण का टिला येथे रथचक्राचा उद्धार करीत असता कर्णाचा मृत्यू झाला. पेहोवा येथे दुर्योधनाचा मुकुट खाली पडला. कुरुक्षेत्रातील सरोवराचा दक्षिणकाठ येथे भीम आणि दुर्योधन यांचे गदायुद्ध झाले आणि अस्थिपूर येथे युद्धातील मृतांचे दहन करण्यात आले. श्रीकृष्णाने भगवद्गीता याच कुरुक्षेत्रावर सांगितली.

डॉ. राधाकृष्णन् म्हणतात : ''जनमनावर असलेल्या विलक्षण पकडीवरून ग्रंथाच्या महत्तेची कल्पना करायची झाल्यास भगवद्गीता हा ग्रंथ भारतीय विचारांच्या आणि तत्त्वज्ञानाच्या इतिहासात सर्वश्रेष्ठ आणि सर्वाधिक महत्त्वाचा ग्रंथ आहे असे म्हणता

येईल. भारतीय जीवनावर या ग्रंथाचा विलक्षण प्रभाव पडला आहे. या ग्रंथाने राजकीय, सामाजिक आणि धार्मिक अशा सर्वच सुधारकांना स्फूर्ती मिळाली आहे.''

लोकमान्य टिळक यांना भगवद्गीतेतून कर्ममार्गाचा मंत्र मिळाला. महात्मा गांधींचे जीवन म्हणजे भगवद्गीतेवरील भाष्यच असे म्हणावे लागेल. ज्योतिसर हे सरोवर थानेश्वराच्या पश्चिमेस अडीच मैलांवर आहे. तेथे श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली अशी कथा आहे. लाखो यात्रेकरू या ठिकाणी दर वर्षी येतात. ही दंतकथा असू शकेल. ब्रह्मसरोवराच्या जवळपास युद्ध झाले हे महाभारतातील उल्लेखावरून स्पष्ट आहे. त्यालाच (सरोवराला) समंतपंचक म्हणत. कदाचित ब्रह्मसरोवराच्या काठावर गीता सांगितली गेली असावी. पण ब्रह्मसरोवर काय आणि ज्योती सरोवर काय, परिसर एकच आहे. त्यामुळे विशेष फरक पडत नाही.

असे हे कुरुक्षेत्र. श्री. फडके यांनी आपल्याला त्याचे दर्शन घडविले आहे. ते म्हणतात, ''जोवर हिंदू संस्कृती जिवंत आहे तोवर कुरुक्षेत्राचे नाव आदराने घेतले जाईल. कुरुक्षेत्र म्हणजे वैदिक संस्कृतीची जन्मभूमी, महाभारताची रणभूमी आणि भगवद्गीतेचे उगमस्थान. येथेच भारतीय संस्कृतीची मुळे प्रथम जीव धरू लागली.'' कुरुक्षेत्र हे भारतीय संस्कृतीचे सर्वार्थाने उगमस्थान म्हणून अतिशय महत्त्वाचे आहे यात शंका नाही.

❋ ❋

# द्वारका-मथुरा

इतिहासाच्या अभ्यासात आलेल्या स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन ती पाहिली नाहीत तर अभ्यासाचे निष्कर्ष एक आणि त्या त्या स्थळासंबंधी मनात तयार झालेल्या प्रतिमा भलत्याच असा अनवस्था प्रसंग ओढवतो. शिवचरित्रावरील व्याख्यानांच्या निमित्ताने द्वारका आणि मिठापूर आणि पुढे प्रेक्षणीय स्थळांची सहल म्हणून पोरबंदर, सोमनाथ, प्रभासपट्टण इत्यादी स्थळे पाहण्याचा योग आला, तेव्हा वरील गोंधळाचा मला पुरेपूर अनुभव आला.

काय कारण असेल ते असो, सौराष्ट्र म्हणजे बरेचसे वाळवंट असलेला, डोंगर अजिबात नसलेला, आणि असलीच तर अगदी तुरळक अशी हिरवळ आणि झाडी असलेला प्रदेश अशी माझी समजूत होती. प्रत्यक्षात माझी समजूत अगदीच चुकीची ठरली. सौराष्ट्राची लांबी दोनशे वीस मैल, रुंदी एकशे पासष्ट मैल आणि क्षेत्रफळ तेवीस हजार चारशे पंचेचाळीस मैल आहे. आपल्या मराठवाड्याइतके म्हणा ना. वाळवंटाचा तर मला पत्ता लागला नाही. पोरबंदर ते सोमनाथ आणि सोमनाथ ते जुनागड हा प्रदेश फळाफुलांनी बहरलेला दिसला. पोरबंदर व सोमनाथ येथील प्रदेश पाहून मला कित्येक वेळा गोवे-कारवारची आठवण झाली. गीरचे घनदाट जंगल तीस चौरस मैलांवर पसरले आहे. डोंगरांविषयी म्हणाल तर गिरनार : तीन हजार सहाशे सहासष्ट फूट, गीर : दोन हजार एकशे दहा, शत्रंजय : सोळाशे चौतीस, सनोसरा : अकराशे सतरा, बर्डा : दोन हजार नव्वद फूट असे उंच उंच डोंगर सौराष्ट्रात आहेत.

काटक माणसे, धष्टपुष्ट गायी-बैल, बाजरी, भुईमूग यांनी व्यापलेली मैलच्या मैल शेते, दहीदुधाची चंगळ हे सौराष्ट्राचे विलोभनीय रूप पाहून मी स्तिमित झालो.

पण मला ओढ लागली होती ती द्वारका पाहण्याची. भगवान श्रीकृष्णाची द्वारका नक्की कोठे आहे याबद्दल विद्वानांची उलट-सुलट मते वाचून मीही गोंधळात पडलो होतो. सौराष्ट्राच्या दक्षिण टोकाला सोमनाथजवळ कोडिनार म्हणून एक गाव आहे, ती मूळ द्वारका आहे असा एकाने शोध लावला, तर दुसऱ्याच्या मते ओखा बंदराजवळचे (द्वारकेपासून बावीस मैलांवर) कच्छ खाडीतील शंखोद्धार बेट हीच मूळ द्वारका. तिसऱ्याने तर गिरनारच्या पायथ्याशी असलेले जुनागड म्हणजेच द्वारका असा शोध

लावला. काहींनी तर हेही सांगून टाकले की द्वारका आहे कुठे? ती तर पाण्यात बुडाली. आता समुद्रकाठावरील द्वारका म्हणजे श्रद्धेतून निर्माण झालेली नगरी आहे!

मी द्वारकेला पोहोचताच प्रथम द्वारकाधीश मंदिराचे दर्शन घेतले आणि संशोधनाकडे वळलो. द्वारकेत फार मोठी सिमेंट फॅक्टरी आहे. तेथील महाराष्ट्रीय नोकरवर्गाच्या प्रयत्नाने महाराष्ट्र मंडळ स्थापन झाले असून त्यांचे कार्यक्रम होत असतात. महाराष्ट्र मंडळाचे चिटणीस श्री. फणसे हे फार उत्साही गृहस्थ आहेत. आणखी एक फणसे इंजिनियर आहेत. फणसे इंजिनियर यांच्याकडे आमचा मुक्काम होता. ही फणसे मंडळी बडोद्याची. इ.स. १७०० मध्ये साताराचा वेढा शर्थीने लढविणारा प्रागजी प्रभू फणसे आणि पेशवाईतील गायकवाडांचे दिवाण रावजी अप्पाजी यांचे हे वंशज. १९४८ पर्यंत द्वारका, ओखा ही स्थळे गायकवाडांच्या राज्यात असल्यामुळे या मंडळींचा संबंध द्वारका, ओखा (अनिरुद्धाची उषा) या प्रदेशाशी आला.

श्री. फणसे यांनी माझी गाठ द्वारकेतील डॉक्टर व संशोधक डॉक्टर जयंतीलाल ठाकर यांच्याशी घालून दिली. श्री. ठाकर हे व्यवसायाने डॉक्टर. द्वारकेचे रहिवासी. आपण द्वारकेच्या संशोधनाकडे कसे वळलात असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले, ''योगायोग पाहा. एके रात्री मला कोणी तरी पुन्हा पुन्हा म्हणू लागले, 'खरी द्वारका हीच. तू विष्णुपुराण, हरिवंश व भागवत वाच. ते ग्रंथ तुला अहमदाबादेत नारायणभाईकडे मिळतील.' जागा झाल्यावर मी कमालीचा अस्वस्थ झालो. पण मी नारायणभाई हे फक्त नाव लिहून अहमदाबादकडे ग्रंथाची मागणी केली. ते पत्र त्यांना कसे आणि कधी मिळाले हे कळले नाही. पण तिसऱ्या दिवशी ग्रंथ माझ्या येथे येऊन पडले. त्यांचा मी काळजीपूर्वक अभ्यास केला तेव्हा माझी खात्री झाली की खरी द्वारका ती हीच. इतकेच नव्हे तर द्वारकाधीशाच्या मंदिराच्या जागेवरच श्रीकृष्णाचे निवासस्थान होते. (डॉक्टर जयंतीलाल यांचे घर देवळाच्या अगदी जवळ आहे.) डॉ. जयंतीलाल यांनी आपले गुजराती पुस्तक 'द्वारका-दर्शन' हे मला वाचायला दिले.

जिला आज आपण कच्छची खाडी म्हणतो, तिला मध्ययुगात जगतची खाडी म्हणत. द्वारकेचा उल्लेख फारसी कागदपत्रात जगत असाच येतो. ग्रीक साधनांत बराकची खाडी असा उल्लेख आहे. कच्छच्या खाडीचा एक भाग पूर्वी नैऋत्येकडे येऊन समुद्राला मिळे. त्यामुळे एक मोठे (ठाण्याच्या खाडीमुळे साष्टीचे बेट बनले त्याप्रमाणे) बेट झाले. या बेटाला कुशस्थळी म्हणत. या कुशस्थळीच्या एका कोपऱ्यात समुद्राच्या किनाऱ्यालगतच्या तळात (चौपाटीवरील किंवा नरीमन पॉइंटवरील समुद्राच्या मूळ जागेवरील घरांप्रमाणे) द्वारका वसले आहे. आज कुशस्थळीचे बेट करणारी कच्छ खाडीची शाखा अस्तित्वात नाही. खुद्द द्वारकाधीशाचे देऊळ हे

समुद्रसपाटीपासून उंच आहे. समुद्राकडून (त्याला येथे गोमती म्हणतात) देवळात जाण्यास छप्पन्न पायऱ्या चढाव्या लागतात. त्यामुळे द्वारका ही समुद्रकिनाऱ्यावरील उंचवट्यावर वसली आहे असा भास होतो. पण तसे नाही. श्रीकृष्णाने समुद्राच्या तळाचाच भाग (किनाऱ्यालगतचा) घेऊन तेथे आपला राजवाडा व इतर यादवांचे वाडे बांधले. गोमतीचे (समुद्र) पाणी भरतीच्या वेळी या निवासस्थानाभोवती पसरे. त्यामुळे आपोआप वाड्याभोवती खंदक तयार झाला आणि द्वारकेच्या संरक्षणाची सोय झाली.

**ततः कृष्णस्य वचनं श्रुत्वा नदनदीपति।**
**समारुतेन योगेन उत्सर्ज जलाशयम्॥**

याचा अर्थच हा की श्रीकृष्णाने समुद्राचा एक भाग निवासस्थानासाठी म्हणून घेतला. ('रिक्लेम' केला!)

श्रीकृष्णाच्या मृत्यूनंतर भूकंपामुळे अगर इतर काही कारणांनी समुद्राच्या प्रचंड लाटा निर्माण झाल्या आणि त्यात कृष्णनिर्मित द्वारका बुडाली. पुढे श्रीकृष्णाचा पणतू वज्र याने श्रीकृष्णाचा वाडा होता त्या ठिकाणी हरिगृह बांधले, अशी आख्यायिका स्कंदपुराणात वर्णिली आहे.

पण समुद्राच्या थैमानामुळे बुडून जाण्याची आपत्ती द्वारकेवर अनेक वेळा आली असावी. प्रत्येक वेळेस द्वारका बुडावी, पाणी मागे हटल्यावर वाळूचे थर जमावे, ते घट्ट व्हावे, त्यावर पुन्हा गाव वसावे, पण त्यातही श्रीकृष्णाच्या निवासस्थानाच्या जागेवर एखादे मंदिर उभे राहावे, असे पाच-सहा वेळा तरी घडल्याचे डॉक्टर संकलिया यांना तेथील उत्खननात आढळून आले. सर्वांत जुनी द्वारका वाळूखाली वीस फूट दबलेली दिसते. त्यावर जी द्वारका उभी राहिली तीही वाळूखाली (समुद्रसपाटीखाली) सहा फूट गेली. तिसऱ्या द्वारकेच्या वेळी या जागेची चोवीस फूट उंच टेकडी झाली. ही द्वारका पाचव्या-सहाव्या शतकाच्या वेळची असावी. यानंतर गुप्त सम्राटांच्या काळात विष्णूचे रामकृष्णादी अवतार यांच्या आराधनेला उठाव मिळाला आणि द्वारकेला प्रसिद्धी मिळाली, असा डॉक्टर संकलिया यांचा निष्कर्ष आहे.

श्रीकृष्णकालीन द्वारकेच्या हद्दीचे निदर्शक म्हणून द्वारकेभोवती ब्रह्म, वरुण (समुद्रनारायण), अग्नी (यज्ञनारायण) आणि इंद्र यांची मंदिरे आहेत. आजची ही मंदिरे जुनी नसतील. पण पूर्वीच्या मंदिरांच्या जागेवरचीच ही मंदिरे आहेत असे म्हणण्यास हरकत नसावी. हरिवंशातच याचा उल्लेख आहे.

स्कंदपुराण हे इ.स.च्या चौथ्या-पाचव्या शतकातील असावे. गुप्त सम्राट स्कंदगुप्त याच्या नावाचा या पुराणाच्या नावात उल्लेख असावा, असे विद्वानांचे मत आहे. या पुराणात ब्रह्म, वरुण, अग्नी, इंद्र इत्यादींच्या मंदिरांची वर्णने आहेत. इंद्राचे देऊळ

द्वारकेच्या उत्तरेला तीन मैलांवर आहे. यावरून श्रीकृष्णनिर्मित द्वारकेच्या विस्ताराची कल्पना यावी.

गिरनार या मध्य सौराष्ट्रातील पर्वताला रैवतक समजून जुनागडला द्वारका मानणाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली नाही. गिरनारला रैवतक असे कुठेच म्हटलेले नाही. जुनागडला लागून असलेल्या गिरनार खडकावर सम्राट अशोक (इ.स.पूर्व चौथे शतक), रुद्रदामन (इ.स. दुसरे शतक) व सम्राट स्कंदगुप्त (इ.स. पाचवे शतक) असे लेख कोरले आहेत. या लेखांत गिरनार पर्वताला उज्जवंत असे म्हटले आहे. रैवतक नाही. हा कोरीव लेख मी सौराष्ट्राच्या प्रवासात पाहून आलो. पुराणातील वर्णनाप्रमाणे रैवतक पर्वत हा द्वारकेपासून फार दूर नव्हता. हे वर्णन गिरनारला लागू पडत नाही. हरिवंशातील वर्णनाप्रमाणे द्वारकेच्या पूर्व दिशेला रैवतक पर्वत होता.

**रैवतं च गिरिश्रेष्ठं कुरुदेव सुराहयम्।**
**नंदनं प्रतिमं दिव्यं पुरद्वारस्य भूषणम्॥**
**तं च रैवतको नाम पर्वतो नातिदूरतः।**
**मंदरोदार शिखरः सर्वतोभिर्विराजते॥**

प्रभास क्षेत्रात विहार करून श्रीकृष्ण व अर्जुन हे दोघे रैवतक पर्वतावर गेले. नंतर श्रीकृष्ण द्वारकेला गेला असे महाभारत म्हणते.

**तौ विहृत्य यथाकामं प्रभासे कृष्णपाण्डवौ।**
**महीश्वरं रैवतकं वासायैवाभि जग्मतुः॥**
**यतिरूपधरं पार्थं विसृज्य सहसा हरिः।**
**रथेन कांचनांगेन द्वारकामभिजग्मवान्॥**
**कृष्णः स्वभवनं रम्यं प्रविवेश महाबलः।**
**प्रभासादागतं देव्यः सर्वाः कृष्णमपूजयन्॥**

अर्जुनाने सुभद्राहरण केले ते रैवतक क्षेत्र आहे तरी कोठे? द्वारकेहून चाळीस मैलांच्या आत व पोरबंदरपासून सात मैलांवर बरडाजवळ रैवतेश्वर महादेव व रेवतीकुंड ही स्थळे आहेत. बड्याचे डोंगर म्हणजेच रैवतक पर्वत.

द्वारकेतील मंदिराला जगतमंदिर अशीही संज्ञा आहे. देवालय भव्य आणि प्रशस्त आहे. देवाल्यातून समुद्राचे मोठे मनोहारी दर्शन घडते. देवालयातील श्रीकृष्णाची मूर्तीही अत्यंत देखणी अशीच आहे.

देवाल्याचे शिल्प मला तरी चालुक्य पद्धतीचे वाटले. आहे त्या स्थितीत हे देवालय माझ्या मते आठशे वर्षांहून अधिक जुने नसावे. त्यापूर्वीचे एखादे लहानसे मंदिर त्या जागी असले पाहिजे.

पण श्रीकृष्णाच्या वास्तूची हीच ती जागा आहे, हे आद्य शंकराचार्य यांनी देवालयाच्या परिसरातच द्वारकामठाची स्थापना करून दाखवून दिले. मध्ययुगीन भारतात श्रीवल्लभाचार्य, चैतन्यमहाप्रभू, नरसी मेहता, मीराबाई इत्यादी थोर थोर साधुसंत द्वारकेला येऊन गेले. द्वारकाधीशाच्या देवालयाच्या नशिबी सोमनाथाप्रमाणे आक्रमकांकडून पडझड आली असेल काय? उपसर्गामुळे देवालयातील मूर्ती हलविण्यात आली असावी. बेट द्वारका येथे जी मूर्ती आहे, ती मूळ द्वारकेतील आहे. ती लपविण्यात आली होती. श्रीवल्लभाचार्य यांच्यामुळे तिची बेट द्वारका येथे स्थापना करण्यात आली, अशी आख्यायिका आहे.

सौराष्ट्रात लहानमोठे स्थानिक राजे बरेच होते. दबणारी पण नष्ट न होणारी लव्हाळीच म्हणा ना! महंमद बेगडा याने १४७२ मध्ये जुनागडचे राज्य संपुष्टात आणले. द्वारकेकडे सैन्य पाठवून त्याने तेथील राजाला पकडून ठार मारले. पण १५३४ मध्ये बहादुरशहाच्या काळात जगत (द्वारका) येथे हिंदू राजा असल्याचा पुरावा मिळतो. त्याच्यावर स्वारी करण्याचा बहादुरशहाचा बेत होता. पण पोर्तुगिजांनी आश्वासनपूर्ती न केल्यामुळे तो सिद्धीस गेला नाही.

गुजरातचा अरबी भाषेतून इतिहास लिहिणारा हाजी दबीर हा १५५४ मध्ये मक्केहून येताना द्वारकेला उतरला होता. त्याने लिहून ठेवले आहे की, येथे मुसलमानांचे राज्य नाही. राणा संग नावाच्या राजाचे राज्य आहे. १५७२ मध्ये गुजरातेत मोगलांचे राज्य स्थापन झाले. पुढे शंभर वर्षे तरी देवळाला उपसर्ग पोहोचला नाही. सौराष्ट्रातील स्थानिक राजेरजवाड्यांमुळे द्वारकाधीशाचे देवालय मध्ययुगात बरेच सुरक्षित राहिले असावे.

डॉक्टर जयंतीलाल यांच्याशी मी बराच वेळ बोलत होतो. खिडकीतून समोर देवालयावरील प्रचंड ध्वज मोठ्या डौलाने फडकत असताना दिसत होता. त्याकडे पाहत जयंतीलाल म्हणाले,

''सात सप्टेंबर १९६५, भाद्रपद शुद्ध द्वादशी, वामनद्वादशी, मंगळवार रोजी पाकिस्तानी जहाजाने रात्री बारा वाजून पन्नास मिनिटांनी द्वारकेवर गोळ्यांची वृष्टी केली. द्वारकेत त्या वेळी आपले लष्कर नाही की लढाऊ नौका नाहीत. पोलिस दलही पुरेसे नाही. विमानविरोधी तोफा सोडा, साधी मशीनगन पण नव्हती. पण अर्धा तासपर्यंत तोफांचा मारा झाला तरी एकही मनुष्य दगावला नाही.'' जयंतीलाल म्हणाले, ''या वेळी द्वारकेचा रक्षणकर्ता होता श्रीकृष्ण – श्रीद्वारकाधीश.''

मी स्तब्ध झालेला पाहून जयंतीलाल यांनी संस्कृत वचन म्हणून दाखवले. या श्रद्धेपुढे मी नतमस्तक झालो!

द्वारकेच्या आमच्या प्रवासात जेथे डॉक्टर जयंतीलाल यांच्यासारखे तज्ञ आम्हांला भेटले तेथे रुक्मिणीच्या देवळातील पुराण सांगणारे वाटाडेही भेटले. द्वारका शहराच्या बाहेर एक मैलाच्या अंतरावर ओखा बंदरला जाण्याच्या वाटेवर रुक्मिणीचे एक सुबक देऊळ आहे. देवळाच्या बांधणीवरून ते बरेच जुने, निदान पाच-सहाशे वर्षांचे तरी जुने असावे. देवळाच्या एका बाजूने समुद्राचे पाणी आले असल्याने आणि देऊळ काहीसे उंचावर असल्याने देवळाभोवती झाडी अगर हिरवळ नसली तरी भोवतालचा देखावा मोठा आकर्षक वाटतो. वृंदावनाची राधा तशी रुक्मिणी ही द्वारकेची अधिष्ठात्री देवता समजली जाते.

रुक्मिणीचे देऊळ द्वारकेच्या बाहेर का? या प्रश्नाचे उत्तर रुक्मिणीच्या पुजाऱ्याने काय द्यावे? आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या या दिवसांत आम्हांला रुक्मिणीच्या हालअपेष्टेच्या कथा ऐकाव्या लागल्या. त्या अशा :

पुजारी आम्हांला प्रसन्न वदनाने म्हणाले, ''रुक्मिणी ही जगन्माता खरी; पण तिला गर्व झाला की आपल्यावर भाळून श्रीकृष्ण हे कौंडिण्यपुराहून आपल्याला नेण्यासाठी धावून आले; आपण आहोतच तशा! हे हेरून भगवंतांनी तिचे गर्वहरण करण्याचे ठरविले. बाहेरच्या प्रवासावरून परत येत असताना वाटेत श्रीकृष्ण व रुक्मिणी यांनी दुर्वास ऋषींच्या आश्रमाला भेट दिली आणि त्यांनी द्वारकेस येऊन आपला पाहुणचार स्वीकारावा अशी विनंती केली. यावर तो शीघ्रकोपी ऋषी म्हणता झाला, 'श्रीकृष्णा, आम्ही स्वारीसाठी घोडे किंवा बैल अशी वाहने वापरीत नाही. आम्ही द्वारकेस यावे असे तुम्हांला वाटत असेल तर तुम्ही आणि रुक्मिणी यांनी आमचा रथ स्वतः ओढला पाहिजे.' श्रीकृष्णांनी दुर्वासाची आज्ञा मान्य केली. श्रीकृष्ण आणि रुक्मिणी ही दोघे रथ ओढू लागली. वाटेत रुक्मिणीला तहान लागली. धापा टाकीत ती भगवंताला म्हणाली, 'देवाधिदेवा, मी तहानेने व्याकुळ झाले आहे. कुठे पाणी मिळेल काय?' भगवंतांनी ताबडतोब आपल्या पायाचा आंगठा जमिनीवर दाबला. जमिनीतून पाण्याचे कारंजे उडू लागले. रुक्मिणी तहानेने व्याकुळ झाली होती. ती अधाशासारखे गटगट पाणी पिऊ लागली. इतक्यात दुर्वास ऋषी गर्जले, 'अतिथीला न विचारता पाणी पीत आहात. माझा शाप आहे, यापुढे येथे पाणीच मिळणार नाही.' ''

येथे आमचे पुराणिकबुवा म्हणाले, ''येथे रुक्मिणीच्या देवळाभोवती पिण्याच्या पाण्याचा एक थेंब आढळत नाही. महिना पंधरा रुपयांवर आम्ही द्वारकेहून गाडीने पाणी मागवितो.'' मी म्हटले, ''द्वारका नगरपालिका आहे. तिने या देवळापर्यंत नळ का टाकू नये?'' पुराणिकबुवा गंभीर झाले. थोड्या वेळाने ते म्हणाले, ''तशी बुद्धी तरी कशी व्हावी? दुर्वासाचा शाप आहे ना?''

आपली कथा पुढे चालू करीत ते म्हणाले, "दुर्वासाच्या शापाने रुक्मिणी गडबडून गेली. तिने म्हटले, 'महाराज, माझ्या हातून काय घोर अपराध घडला आहे? याला काही प्रायश्चित्त आहे काय?' दुर्वास म्हणाले, 'या येथेच थांबून तुला बारा वर्षेपर्यंत कडक तपश्चर्या करावी लागेल.'

"झाले. रुक्मिणी द्वारकेच्या बाहेर थांबली. तिची अशी अवस्था पाहून तिच्या बापाने, भीमक राजाने तिला वैभवात ठेवण्याचा प्रयत्न केला. तिच्यासाठी त्याने प्रशस्त प्रासाद बांधण्यास सुरुवात केली. या गोष्टीलाही दुर्वासाने आक्षेप घेतला. पण नंतर रुक्मिणीचे पुरते गर्वहरण झालेले पाहून श्रीकृष्णांनी तिच्यावर कृपा केली. रुक्मिणी द्वारकेला परत आली. त्या घटनेची आठवण म्हणून हे मंदिर येथे उभे आहे."

रुक्मिणीच्या देवळात वरील घटना दाखविणारी मोठमोठी चित्रे तयार करून ठेवली आहेत. रुक्मिणी आणि श्रीकृष्ण दुर्वासाचा रथ ओढीत आहेत, एका चित्रात रुक्मिणी तहानेने व्याकुळ झाली आहे, तर दुसऱ्या चित्रात ती दीनवाणी होऊन तपश्चर्या करीत आहे, अशी ती दृश्ये होती. मला ती पाहवेनात. आपण कृष्णाला आवडलो याचा रुक्मिणीला अभिमान वाटला किंवा गर्वही वाटला तर त्यात अक्षम्य असे काय होते? आणि त्यासाठी इतकी खडतर शिक्षा?

पूजेअर्चेसाठी व राजभोग म्हणून काही ना काही दक्षिणा दिल्यावरच आमची सुटका झाली.

दुसऱ्या दिवशी आम्ही द्वारका सोडली. वेळ सकाळची होती. बस पोरबंदरकडे धावत होती. द्वारकाधीशाच्या मंदिराचे शिखर व त्यावर डौलाने फडकणारा ध्वज बऱ्याच लांब अंतरापर्यंत दिसत होता. रैवतक पर्वताच्या भागात आमची बस जात होती त्या वेळी मला सुभद्राहरणाची आठवण झाली. मनात सहज एक कल्पना आली की मुंबईच्या ब्राह्मणसभेने याच भागात किंवा द्वारका अगर पोरबंदर येथे संस्कृत 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग करून दाखविला तर काय बहार होईल?

पोरबंदरचे महत्त्व पौराणिक दृष्टीने सुदाम्याचे नगर म्हणून आणि आधुनिक दृष्टीने महात्मा गांधींचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. महात्माजींचे घर हे त्यांचे वडिलार्जित. त्यांच्या पणजोबांनी १७७९ मध्ये ते विकत घेतले. खरेदीचा कागद जवळच्या कीर्तिमंदिरात सुरक्षित ठेवलेला आहे. दोनशे-अडीचशे वर्षांपूर्वीची सौराष्ट्रातील सुखवस्तू लोकांचीही घरे कशी अरुंद व बंदिस्त असत याची कल्पना महात्माजींच्या जन्माची जागा पाहून येते. घर अगदी स्वच्छ ठेवण्यात आले आहे. जवळील कीर्तिमंदिरात महात्माजींच्या जीवनातील अनेक घटनांची चित्रे तसेच महात्माजींची वचनेही ठिकठिकाणी आढळून येतात.

सुदाम्याचे मंदिर प्रशस्त व प्रेक्षणीय आहे. तेथील प्रसादाचे पोहे घेऊन आम्ही पोरबंदर सोडले.

पोरबंदर ते सोमनाथ सुमारे साडेतीन तासांचा बसचा प्रवास आहे. अंतर साठ-सत्तर मैलांहून थोडे कमीच असावे. बसमार्गापासून समुद्र लांब नव्हताच. हिरवीगार शेते, गर्द झाडी, नारळाची उंच झाडे अशी दृश्ये पाहून अनेक वेळा कोकणपट्टीची आठवण झाली.

संध्याकाळी पाचच्या सुमारास आम्ही वेरावळला आलो. वेरावळ, प्रभासपट्टण आणि सोमनाथ ही एकाला एक लागूनच आहेत. वेरावळहून सोमनाथ हे अंतर फार झाले तर दोन-अडीच मैलांचे आहे. वेरावळ गावच्या बाहेर पडून सोमनाथाच्या वाटेला लागले की प्रभासपट्टण आणि त्यातील भाल्लुकतीर्थ ही स्थळे लागतात.

यादवांचे क्रीडास्थान ते हेच प्रभासक्षेत्र. रैवतक पर्वतावर मुक्काम करण्यापूर्वी कृष्ण व अर्जुन हे प्रभासपट्टणातच क्रीडा करीत होते. आज प्रभासपट्टणातील जुनी घरे, अरुंद गल्लीबोळ आणि असंख्य कबरी पाहून श्रीकृष्णकाळच्या प्रभासक्षेत्राची कल्पना येणे कठीण आहे. पण यादवांना प्रभासक्षेत्राकडे चलण्यासाठी श्रीकृष्णाने सांगितले आणि तेथील उत्सवानंतर मदिरापानाने उन्मत्त होऊन सर्व यादवकुळ कसे नष्ट झाले याची हकीकत भागवतात आली आहे. भागवताची रचना हजार-बाराशे वर्षांची तरी जुनी असल्यामुळे मध्ययुगीन प्रभासक्षेत्राच्या पूर्वीचे, प्राचीन प्रभासचे चित्र थोडेबहुत तरी कल्पिता येण्यासारखे आहे.

भाल्लुकतीर्थ म्हणजे श्रीकृष्णाला व्याधाचा बाण लागला ते स्थल. आज त्या जागेवर एक भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. श्रीकृष्णाची मूर्ती प्रेक्षणीय आहे. त्याच्या पायाला बाण लागल्यामुळे रक्ताने पाय लाल झाले आहेत. जवळच पश्चात्ताप पावलेला व्याध उभा आहे. श्रीकृष्णाचा चेहरा प्रसन्न आणि शांत असा दाखविला आहे.

त्या मूर्तीकडे पाहत मी श्रीकृष्णाच्या त्या अंतिम क्षणाचे चित्र कसे असेल याची कल्पना करण्यात गुंगलो होतो. यादवांच्या संहारानंतर बलराम समुद्रतीरी एका एकांतस्थानी गेला आणि तेथे त्याने आपला मानवी देह टाकून दिला. श्रीकृष्ण अश्वत्थ वृक्षाखाली समाधी लावून बसला. भागवतकारांनी श्रीकृष्णाचे जे वर्णन भारावलेल्या शब्दांत केले आहे त्यात भर घालणे कठीण आहे. ते म्हणतात, ''श्रीवत्साने अलंकृत असे ते वक्षस्थळ, जलपूर्ण नभासारखा तो श्यामसुंदर वर्ण, तावून काढलेल्या सुवर्णाप्रमाणे ती मनोहर अंगकांती, नेसलेल्या व पांघरलेल्या झगझगीत पीतांबराची ती जोडी ही सारी कृष्णस्वरूपाला मांगल्य देत होती. ते कमलवदन सुहास्य करीत होते. नीलवर्ण कुरळे केस भुरभुर उडून मस्तकाला शोभा देत होते. ते पुंडरीक कमलाप्रमाणे

रमणीय नेत्रयुगुल प्रेक्षकांचे चित्त हरण करीत होते व कर्णातील मकरकुंडलांच्या प्रभेने त्याचे सुंदर वदन अधिकच मनोरम दिसत होते. तो कमरेचा सुंदर करगोटा, ते स्वच्छ यज्ञोपवीत, तो तेजस्वी मुकुट, ती कुंडले, ती रुणझुणणारी कडी, ती लखलखीत पोची, तो मोठा थोरला तुळशीचा हार, ते क्वणन् करणारे नुपूर, तो तेजस्वी कौस्तुभ, यांनी विराजलेले ते श्रीबालकृष्णाचे अभिनव सुंदर रूप वनमाळांनी जास्तच खुलून दिसत होते. त्या वेळी भगवंताने आपला आरक्त वामचरण उजव्या मांडीवर ठेवला होता व तो त्या अश्वत्थ वृक्षास टेकून ध्यानस्थ बसला होता. तो श्रीकृष्णाचा झगझगणारा पादतरू मृगनेत्रच होय असा भास होऊन जरा नामक व्याधाने आपला बाण त्यावर सोडला.''

पश्चात्तापाने पोळलेल्या व्याधाचे समाधान श्रीकृष्णांनी ''लुब्धका, भिऊ नको, ऊठ! मला जे हवे होते तेच तू केले आहेस. तू पातकी नाहीस.'' या शब्दांत केले. आपला सारथी दारुक समोर येत असलेला श्रीकृष्णांनी पाहिला. दारुकाने रथाखाली उडी घेतली मात्र, तोच तो गरुडांकित रथ, त्याचे घोडे, त्याची शस्त्रास्त्रे ही सर्व आकाशात वर उडून लुप्त झाली. श्रीकृणाने दारुकाचे समाधान करून त्याला द्वारकेस पाठविले. ''बलरामदादा स्वर्गाला गेला आणि घायाळ झालेला मीही क्षणभराने निजधामास जाणार आहे'' असे सांगून त्यानंतर श्रीकृष्णाचे निर्याण झाले. भागवतात तर तो सदेह निजधामास गेला असे सूचित केले आहे. पण प्रत्यक्षात भाल्लुकतीर्थाहून जवळच एक मैलाच्या अंतरावर असलेल्या नदीच्या काठावर त्याचे अंत्यसंस्कार झाले असले पाहिजेत, कारण ती जागा देहोत्सर्ग म्हणून प्रसिद्ध आहे. पायाशीच हिरण्य नदी वाहत आहे. पलीकडच्या तीरावर गर्द झाडी, खुद्द देहोत्सर्गाच्या ठिकाणी पार, वृक्ष, भोवती लक्ष्मी-नारायण, श्रीकृष्ण व बलराम यांची मंदिरे, बलरामाने देहत्याग केला ती गुंफा, असा एकंदर परिसरच रमणीय बनला आहे. श्रीकृष्णाच्या अंतिम क्षणाचे ते दृश्य आठवत मी किती वेळ तरी तेथे बसून राहिलो. तेथून उठावेसे मला वाटले नाही.

पण श्रीकृष्णचरित्राशी निगडित अशी अनेक स्थळे मी पाहिली. मथुरा, वृंदावन, कुरुक्षेत्र, द्वारका आणि भाल्लुकतीर्थ व देहोत्सर्ग. पण या युगंधर राष्ट्रपुरुषाची आठवण ज्या पद्धतीने जपून ठेवायला हवी तशी ठेवलेली मला कोठेच आढळली नाही.

मथुरेत कृष्णजन्म झाला त्या जागेवर आता सुंदर देवालय उभे राहिले आहे. समोरच लक्ष्मीनारायणाचे भव्य मंदिर, एक अतिथिगृह, दवाखाना या इमारती आहेत. पण भोवतालचा परिसर, जुनाट व पडकी घरे, धुळीने भरलेले रस्ते, ठिकठिकाणी साचलेली डबकी इत्यादींमुळे मन विषण्ण करणारा बनला आहे. श्रीकृष्णचरित्रावर संशोधन करणारी एखादी संस्था, संदर्भ-ग्रंथालय, यांची मोठी आवश्यकता आहे. तेथे जाऊन चौकशी करा, कृष्णमाहात्म्याची चार-आठ आण्यांची चोपडी तुम्हांला

मिळतील. त्याने तुमची भूक भागणार नाही. मथुरेचा तो प्राचीन भाग. त्याला 'केशवजी कठडा' म्हणतात. तेथे उत्खनन झाले, त्यावरून इसवी सनाच्या पहिल्या शतकात त्या ठिकाणी शोडष नावाच्या राजाच्या कारकीर्दीत वसुदेवमंदिर होते इतपत आपल्याला उत्खनन खाते माहिती देते. त्यापलीकडे जात नाही. इ.स.पूर्वी चौथ्या शतकात मेगॅस्थिनिस याने ''मथुरेत शौरसेनी असून ते तीस पिढ्यांपूर्वी होऊन गेलेल्या हरीचा उत्सव करतात,'' असे लिहून ठेवले आहे. म्हणजे श्रीकृष्णाचा काळ ख्रिस्तपूर्व तेरावे शतक हा सिद्ध होतो. श्रीकृष्ण मंदिराभोवती विशाल उपवन, यमुनेपर्यंत रुंद रस्ता, इत्यादी सोयी होणे आवश्यक आहे. तीनशे वर्षांपूर्वीपर्यंत मथुरेभोवती दाट अरण्ये होती. आता झाडी झपाट्याने नाहीशी होत आहे. दिल्लीची वाढ मथुरेपर्यंत येऊ लागली आहे. मथुरेचे स्वरूप बकाली बनत आहे. एक विश्रामघाट व द्वारकाधीशाचे देऊळ ही स्थळे सोडली तर मथुरेत श्रीकृष्णाची परंपरा शोधून काढावी लागते.

वृंदावनाचे स्वरूप त्या मानाने बरे आहे. पण वृंदावनाचा संशोधित इतिहास एकत्र मिळत नाही. सध्याचे वृंदावन हे चैतन्य महाप्रभूंनी शोधून काढलेले, आणि तेही साक्षात्काराच्या बळावर. या ठिकाणी मोठमोठी देवळे आहेत, पण भाविकांची वर्दळ नाही. राधाकृष्णाच्या रासक्रीडेचे सेवाकुंज म्हणजे काही झाडेझुडपे असलेली, भिंतीच्या आत बंदोबस्त केलेली एक अगदी लहानशी बाग. कालिया डोहाचा परिसर अतिशय घाणेरडा आहे. यमुनेचे पात्र तर काय, तेथे वृंदावन नगरपालिकेने सांडपाण्याचे गटार सोडले होते. वृंदावनचा इतिहास कोठे मिळेल म्हणून मी चौकशी केली तर ''हाथरसवालों के धर्मशाले में जाव, शायद कुछ जानकारी मिलेगी,'' असे उत्तर मला मिळाले. वृंदावनमधला आमचा वाटाड्या लट्टूसिंग हा आम्हांला विचारीत होता, ''आप मीनाकुमारी को देखा है क्या?'' ''मी तिच्याशी हस्तांदोलन केले आहे'' असे माझ्या पत्नीने सांगताच त्याला त्याचे कोण कौतुक! असे हे वृंदावन.

आणि कुरुक्षेत्र. असे म्हणतात की आद्य शंकराचार्य कुरुक्षेत्रात आले. एके ठिकाणी त्यांना एक समाधी दिसली आणि घणाचे घाव पडावे तसे त्यांच्या कानांत पुन्हा पुन्हा असे शब्द पडले : ''येथेच, अगदी याच ठिकाणी मी अर्जुनाला गीता सांगितली.'' आद्य शंकराचार्यांनी तेथे एक मठ स्थापन केला. जवळच ज्योतिसर (ज्योती सरोवर) आहे. पण मठाची व्यवस्था खालावलेली, ज्योतिसरला जाण्याचा रस्ता धुळीने भरलेला. शेजारच्या चहाच्या हॉटेलाशिवाय दुसऱ्या सोयी नाहीत अशी परिस्थिती आहे.

आणि द्वारकेत तरी काय पाहिले? स्टेशनवर एखादे हॉटेल नाही की धर्मशाळा नाही. गावात फक्त तीन ऑटोरिक्शा आणि आठ-दहा टांगे. गावातही उतरण्याची नीट व्यवस्था नाही. द्वारकेत डॉक्टर जयंतीलालसारखा संशोधक भेटला नसता तर मीही

द्वारकामाहात्म्याचे चोपडे आणि द्वारकाधीशांचे चार-आठ आण्यांचे चित्र घेऊन परत आलो असतो.

श्रीकृष्णाच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या स्थळांचे स्वरूप नयनरम्य व प्रभावी करणे हे भगवान श्रीकृष्णाचा वारसा सांगणाऱ्या व गीतेची जपणूक करणाऱ्या आम्हा भारतीयांना अशक्य आहे काय?

❃ ❃

# सोमनाथ

अठ्ठावीस सप्टेंबर १९७५ रोजी संध्याकाळी मला प्रथम सोमनाथच्या प्रसिद्ध देवालयाचे दर्शन घडले. पण त्याचे खरे वैभव पाहायला मिळाले ते दुसऱ्या दिवशी सकाळी. ऐन समुद्राच्या तीरावर उभे राहिलेले हे देवालय गेल्या पंचवीस वर्षांतच उभे करण्यात आले आहे, हे मनाला पटत नाही. देवालयाची बांधणी ही मध्ययुगीन भारतातील चालुक्य शैलीस अनुसरून करण्यात आली आहे. पण तरीही देऊळ जुनाट वाटत नाही. पांढऱ्या दगडाचे बांधकाम असल्यामुळे देऊळ संगमरवरी असल्याचा दुरून भास होतो. देवळाचे आवार प्रशस्त, सभामंडप भव्य आणि शिखर उंच, यामुळे समुद्रावरून येणाऱ्या प्रवाशाला देवळाचे दर्शन दहा-पाच मैलांवरून तरी सहजच घडते. सौराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर द्वारकाधीश व दक्षिण किनाऱ्यावर सोमनाथ ही दोन मंदिरे म्हणजे सौराष्ट्राचे मोठे वैभव आहे.

सोमनाथला लागूनच समुद्र आहे. हे अंतर म्हणजे मुंबईच्या महालक्ष्मीचे देऊळ आणि समुद्र यांतील अंतर म्हणा ना.

असे हे स्वच्छ पांढरेशुभ्र व डौलाने उभे राहिलेले सोमनाथ मंदिर पाहून मी भारावून गेलो. भारतात मी अनेक देवालये पाहिली आहेत. पण सोमनाथ मंदिर इतिहासात जितके गाजले आहे तितके क्वचितच दुसरे देवालय आपल्या देशात आढळून येईल.

उर्दू आणि फारसी या साहित्यात तर भारतीय संस्कृती व सोमनाथ यांचे समीकरण झालेले आढळून येते. मग एखादा इक्बाल ''मी वंशाने व परंपरेने सोमनाथी आहे'' असे अभिमानाचे उद्‌गार काढतो. तर स्वत:विषयी लिहिताना गालिब भारतीय संकेतांचा पुढीलप्रमाणे उपयोग करतो : ''माझ्या अंतरंगाच्या सोमनाथात तुम्ही डोकावून पाहाल तर तुम्हांला माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या खांद्यावर यज्ञोपवीत आढळून येईल!'' तर जफरअलीखान कवी आपल्या प्रार्थनागीतात म्हणतो, ''हे परमेश्वरा, अरब व बिगर अरब यांच्यावर तुझी कृपा आहे. तुझ्यामुळे मक्केला प्रतिष्ठा लाभली. सोमनाथ तुझ्या चरणांपाशी आहे.''

**है अरब व अजम तिरे, दोनों पे है करम तिरे**
**तुझसे हरम की आबरू तेरे कदम से सोमनाथ.**

सोमनाथ, कपाळाला चंदनाचा टिळा व गळ्यात यज्ञोपवीत या तीन प्रतिमा-खुणांचा भारतीय संस्कृतीचे प्रतीक म्हणून उर्दू व फारसी साहित्यांतून ठिकठिकाणी वापर झाला आहे. अरबांची भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील वर्दळ व गझनीच्या मुहंमदाने केलेले ६ जानेवारी १०२६ चे सोमनाथावरील आक्रमण यांमुळे फारसी व अरबी साहित्यात सोमनाथाला अतिशय प्रसिद्धी मिळाली. आज भारतात अशोकचक्र आणि सिंह यांना जे स्थान आहे तेच स्थान फारसी साहित्यात सोमनाथाला देण्यात आले आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

सोमनाथाचा इतिहास हा एक विलक्षण रोमांचकारी इतिहास आहे. ज्या चालुक्यकालीन देवळाच्या जागी आजचे भव्य मंदिर उभे आहे ते गुजराथचा राजा कुमारपाल याने इ.स. ११६८ मध्ये बांधले होते. पण सोमनाथाच्या मंदिराचा इतिहास ख्रिस्तशतक पाचशेच्या मागे नेणे कठीण आहे. भागवतात प्रभासक्षेत्र, समुद्रस्नाने आणि विविध मंदिरे यांचा उल्लेख आहे. पण सोमनाथ मंदिराचा उल्लेख केलेला आढळत नाही.

शिवपुराणातील एका आख्यायिकेच्या आधारे कै. कन्हैयालाल मुन्शी यांनी असा मुद्दा मांडला की सोमशर्मा याने दुसऱ्या ख्रिस्तशतकाच्या सुमारास, पण लकुलीशाच्या (पाशुपतांचा प्रसिद्ध आचार्य) पूर्वी प्रभास क्षेत्रात सोमनाथाची स्थापना केली असावी. सोमनाथाचे पहिले मंदिर त्या काळातील असावे. पण उत्खननात अशा प्रकारचा पुरावा आढळला नाही. सैंधवराज द्वितीय अग्गुळ याच्या इ.स. ८३१ च्या ताम्रपटात देणगी मिळालेल्या माधव नावाच्या व्यक्तीचा उल्लेख सोमेश्वरनिवासी असा करण्यात आला आहे. यावरून त्यापूर्वी सोमनाथाचे एखादे मंदिर अस्तित्वात असावे असे म्हणता येईल. त्या शतकातील अनेक मंदिरे सौराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. मैतृक घराण्यातील चतुर्थ धारसेन (वल्लभीचा राजा, इ.स. ६४२-६४९) याने सोमनाथाचे पहिले मंदिर बांधले असण्याची शक्यता आहे. मात्र आठव्या शतकाच्या मध्यात अरबांनी हे देऊळ नष्ट केले हा मुन्शींचा तर्क खरा नाही. तशा प्रकारचा कोणताच पुरावा पुढे आलेला नाही. हे देऊळ अगदी साधे असावे. पुढे या देवळाच्या जागी चालुक्य मूलराज हा इ.स. ९४२ मध्ये गादीवर आला. याने इ.स. ९५०-९६० च्या दरम्यान सोमनाथाचे मंदिर बांधलेले दिसते. याच मंदिराला इ.स. १०२६ मध्ये गजनीच्या मुहंमदाची झळ लागली.

संशोधकांनी समकालीन वाङ्मय, उत्खनन आणि अवशेष यांच्या अभ्यासावरून त्या मंदिराची कल्पना आपल्याला करून दिली आहे. इतकेच नव्हे तर १०२६ मध्ये ज्या मूर्ती व इतर शिल्पे यांच्यावर घणाचे घाव बसले त्यांचाही शोध लावला आहे. त्या शिल्पाकृती सोमनाथाच्या पदार्थसंग्रहालयात ठेवण्यात आल्या आहेत. सोमनाथाचा

मंडप लांबीत व रुंदीत छप्पन्न फूट असावा. मंडपातील दगडी खांबांची रुंदी तळापाशी दोन फूट सात इंच व उंची साडेचौदा फूट असावी. छताच्या मध्याचा परीघ साडेबावीस फूट असावा. देवळाला शिखर असावे.

६ जानेवारी १०२६ रोजी गजनीच्या मुहंमदाच्या हातून या देवळाला फार मोठी झळ पोहोचली. त्याचा तपशील इतिहासाच्या अभ्यासकांस माहीत आहे. पण लक्षणीय गोष्ट अशी की मुहंमदाची पाठ फिरताच चालुक्य भीम (१०२२-१०६५) याने १०२७-३० मध्ये सोमनाथाचे मंदिर पुन्हा बांधून काढले. या कामात परमार भोज (१०२२-१०६५) व लाट देशाचा त्रिलोचनपाल चालुक्य यांनी सढळ हातांनी मदत केली. याच देवळाचा जीर्णोद्धार ११६९ मध्ये सोळंकी कुमारपालाने केला. त्याला जीर्णोद्धार म्हणण्यापेक्षा नवनिर्मिती म्हणणे जास्त सयुक्तिक दिसेल. मूळ मंदिर बहात्तर फूट रुंद, सभागृह एकशे अठरा फूट रुंद व एकशे चाळीस फूट लांब असा त्याचा विस्तार होता. याशिवाय देवळाच्या प्रवेशद्वाराच्या पूर्वेकडे अडीचशे फूट अंतरावर एक मोठे सभागृह बांधण्यात आले.

या देवळासंबंधीची माहिती आपल्याला भावबृहस्पतीच्या शिलालेखात मिळते. हा शिलालेख प्रभासपट्टणच्या भद्रकाली मंदिरात आहे. भावबृहस्पती हा माळव्यातील धारानगरीचा. गुजरातचा सोळंकीसम्राट जयसिंह सिद्धराज याने ११३७ च्या सुमारास माळवा जिंकून घेतला होता. या निमित्ताने प्रथम भीमदेव चालुक्य (१०२२-१०६६) याने बांधलेले सोमनाथ मंदिर व्यवस्थेसाठी भावबृहस्पती याजकडे देण्यात आले. कुमारपालाने जुलै ११६९ मध्ये सोमनाथाचे भव्य देऊळ बांधून काढल्यावर भावबृहस्पतीला देवळाचा गंड म्हणजे प्रमुख पुरोहित म्हणून नेमण्यात आले.

या देवळाला जोडून चालुक्य भीमदेव द्वितीय याने इ.स. १२१७ मध्ये मेघनाद मंडप बांधला. १२८७ मध्ये गंडत्रिपुरांतक याने पाच लहान शिवमंदिरे बांधली.

सोमनाथ मंदिराला मध्ययुगात चार वेळा झळ लागली. १२९८ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीचा भाऊ अलमखान, १३९४ मध्ये गुजराथचा सुभेदार मुजफ्फरखान, १४१३ मध्ये गुजराथचा सुल्तान अहमदशाहा आणि १४६९ मध्ये महमूद बेगडा अशा चार राज्यकर्त्यांनी या देवाल्याला उपसर्ग केला. पण लोक चिकाटीने देवळात पुन्हा पुन्हा पिंडीची स्थापना करीत आणि पूजा चालवीत. औरंगजेबाच्या कारकीर्दीत मात्र १६६९ मध्ये देवळाला मोठी झळ लागली. इ.स. १७०२ मध्ये औरंगजेबाने विचारणा केली की सोमनाथ मंदिर नष्ट करावे अशी मी पूर्वी आज्ञा केली होती. सध्या परिस्थिती काय आहे? हिंदूंनी तेथे पुन्हा पूजा चालू केली असेल तर देवालय संपूर्णपणे नष्ट करण्यात यावे!

यानंतर मात्र देवळात पूजा बंद पडली. देऊळ मोडकळीस आले. १७९० च्या सुमारास अहिल्याबाई होळकर या साध्वीने या भग्नावशेषांजवळच एक लहानसे सोमनाथ मंदिर बांधले. तेथेच पुढे दीडशे-पावणेदोनशे वर्षे लोक पूजा करीत आले.

अशी ही सोमनाथ मंदिराची विलक्षण कथा आहे. समुद्रकाठावर बसून आता या नव्याने उभ्या राहिलेल्या भव्य मंदिराकडे पाहत असताना मला उत्खनन-तज्ञांचे तळमळीचे उद्‌गार पाहून हसू आले. 'सोमनाथ मंदिराचे रहस्य' या आपल्या माहितीपूर्ण ग्रंथात (प्रस्तुत लेखातील बरीचशी माहिती त्या ग्रंथातूनच घेतली आहे.) लेखकद्वय ढाकी व शास्त्री जे म्हणतात त्याचा संक्षेप असा :

"आज सोमनाथ मंदिराच्याच जागेवर प्रचंड असे नवे देवालय उभे राहात आहे. पण जुन्या मंदिराचे अवशेष आता कुठे दिसणार, याची उत्खनन-तज्ञांना हुरहूर वाटल्याशिवाय राहील काय? ती जुनी वास्तू उद्ध्वस्त असूनही रुबाबात उभी होती. आता ती वास्तू जुन्या व जीर्ण झालेल्या चित्रातूनच आढळून येईल. समुद्रच्या लाटा धक्क्याच्या भिंतीवरून उडून त्या देवळाच्या पायापाशी पोहोचण्याची सदैव धडपड करीत. समुद्राच्या दाट व उष्ण वाऱ्यांनी देवळाच्या अवशिष्ट भिंती काळ्या पडत, सोळंकी शिल्पकारांनी देवालयावर केलेल्या सुंदर कोरीव कामावर समुद्राच्या वाऱ्यापावसामुळे नवनवीन आकृत्या निर्माण होत. देऊळ काय, त्याकडे पाहिले तर एका खडबडीत अशा समुद्रकाठच्या खडकाचा भास व्हायचा. देवळाच्या उघड्या पडलेल्या आणि पाऊसवाऱ्याच्या माऱ्याने जीर्ण झालेल्या सज्ज्यामुळे देवळाला एक गंभीर शान प्राप्त झाली होती. आम्हांला वाटे, किती परिपूर्ण, किती अद्वितीय आहेत हे अवशेष? ॲन इनकंपेरेबल, पर्फेक्ट रुइन!"

सोमनाथाहून जुनागड हे ईशान्य दिशेला अवघ्या बावन्न मैलांवर आहे. आम्ही एकोणतीस सप्टेंबरला संध्याकाळी पाच वाजता तेथे पोहोचलो. जुनागड म्हणजे सौराष्ट्राच्या अगदी मधोमध वसलेले, १९४८ पर्यंत नबाबाची राजधानी असलेले शहर. गावाची वस्ती लाख-दीड लाखाच्या वर नाही. पण शहर कसे आखल्यासारखे वाटते. गावाभोवतीचा जुना तट अद्याप शाबूत आहे. सौराष्ट्राचा सुप्रसिद्ध गिरनार पर्वत (दत्तात्रेयाचे स्थान) जुनागडाला लागूनच उभा आहे. जुनागड गाव हे १४७२ मध्ये महमूद बेगडा याने स्थानिक मांडलिक राजा चुडासामा याच्याकडून जिंकून घेतले. त्या वेळेपासून १९४८ पर्यंत जुनागडला गुजराथचे सुलतान मोगल व बाबीपठाण हे राज्य करून गेले. शहराच्या मधोमध उंच टेकडीवर किल्ला आहे. तेथून जुनागडभोवतालची हिरवीगार वनश्री व पर्वतराजी नजरेला पडते.

जुनागडला आम्ही प्रसिद्ध संत नरसी मेहता याचे घर व मंदिर ही पहिली. नरसी मेहताचा काळ म्हणजे इ.स. १४०९ ते १४८८. याच्या 'वैष्णव जन तो तेने कहिये,

पीड पराई जाने रे' या गीताने भारतातील आबालवृद्धांच्या तोंडी त्याचे नाव खेळू लागले. सौराष्ट्र-गुजराथेतील कृष्णभक्तीच्या प्रचारात नरसी मेहताचा फार मोठा वाटा आहे.

३० सप्टेंबर १९७५ रोजी आम्ही जुनागडमधील किल्ला, दामोदरकुंड, प्राणिसंग्रहालय व पदार्थसंग्रहालय, स्वामीनारायणाचे मंदिर ही स्थळे पाहिली. गिरनार पर्वतावर जावे अशी आमची इच्छा होती. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध संत राघवचैतन्य यांचा जन्म गिरनारचा. महमूद बेगडाच्या आक्रमणात त्यांच्या कुटुंबाची वाताहत होऊन (१४७२) ते दक्षिणेत आले. शिवाय दत्तात्रेयाचे स्थान म्हणून गिरनारला आगळे महत्त्व आहे ते आहेच. पर्वतावर चढण्यासाठी दहा हजार पायऱ्या आहेत हे ऐकून आमची हिंमत खचली. आम्ही दुरूनच श्रीदत्तात्रेयाला नमस्कार केला.

पण मला जुनागडची यात्रा सफल झाल्याचे समाधान वाटले ते गिरनारचे शिलालेख पाहून. नागड गावाला लागूनच एका भव्य खडकावर तीन भिन्न भिन्न लेख कोरले गेले आहेत. एक ख्रिस्तपूर्व अडीचशेच्या सुमाराचा सम्राट अशोक याचा, दुसरा सोळा नोव्हेंबर इ.स. १५० चा शकक्षत्रप रुद्रदामन याचा आणि तिसरा इ.स. ४५५ चा गुप्त सम्राट स्कंदगुप्त याचा. या लेखांचा शोध इ.स. १८३८ मध्ये प्रिन्सेप याने लावला. अशोकाचे आदेश तर प्रसिद्धच आहेत. रुद्रदामनाच्या लेखावरून जुनागडला लागूनच असलेल्या सुदर्शन धरणाची माहिती आपल्याला मिळते. उर्जयत डोंगरावरून वाहत येणाऱ्या सुवर्णसिकता, पलसिनी इत्यादी नद्यांना बांध घालून सुदर्शन नावाचे धरण चंद्रगुप्त मौर्याच्या काळात त्याचा अधिकारी वैश्य पुष्यगुप्त याने बांधले. त्याची दुरुस्ती सम्राट अशोक याच्या काळात यवनराजा तुषास्प याने केली. चारशे वर्षांनंतर शकक्षत्रप रुद्रदामन याच्या काळात सततच्या पावसामुळे सुदर्शन धरण फुटले. धरणातील सर्व पाणी वाहून गेले. हे पाहून रुद्रदामन याने पुन्हा धरण बांधून काढण्याची आज्ञा केली. त्याचा अमात्य पहलव वंशाचा, कुलैपाचा मुलगा सुविशाख (पहलवेन कुलैपपुत्रेन अमात्येन सुविशाखेन) याने अपार खर्च करून धरण बांधले.

या गोष्टीलाही तीनशे वर्षे लोटली. इ.स. ४५५ मध्ये प्रतापी गुप्तसम्राट स्कंदगुप्त (ज़गति भुजबलाढ्यो गुप्तवंशैक वीरः प्रथित विपुलधामा नामतः स्कंदगुप्तः) याच्या कारकीर्दीत सुदर्शन धरण पुनः फुटले त्या वेळी स्कंदगुप्तातर्फे पर्णदत्त हा सौराष्ट्राचा प्रशासक होता. तो आणि त्याचा मुलगा चक्रपालित याने धरण पुनः बांधून काढले. ते सर्वच वर्णन मोठे सुंदर आहे. ''अथ क्रमेणाम्बुद काल आगतेनिदाघं कालं प्रविदार्य तो यदैः ववर्ष तोयं बहु संततं चिरं सुदर्शनं येन विभेद चत्वारात.''

आणि स्कंदगुप्ताचे काय सांगावे? गुप्त साम्राज्यावर हूणांची आक्रमणे सुरू झाली. मोहीम जोरात असतानाच स्कंदाचा पिता सम्राट कुमारगुप्त मरण पावला. हूणांशी निकराचा लढा चालू झाला त्या वेळी त्या प्रखर युद्धामुळे पृथ्वी कंपित झाली.

पित्याच्या मृत्यूमुळे वंशलक्ष्मी नाहीशी होण्याची वेळ आली. त्या वेळी वैऱ्यांना जिंकून मी जिंकलो असे म्हणताना स्कंद साश्रू नयनांनी वाट पाहत असलेल्या आपल्या मातेला देवकीला कृष्ण भेटावा त्याप्रमाणे भेटला.

पितरि दिवमुपेते विप्लुतांवंशलक्ष्मी।
भुजबलविजितारि यः प्रतिष्ठाप्य मूयः॥
जितमिति परितोषान्मातरं साश्रुनेत्रां।
हतरिपुरिव कृष्णोदेवकीमभ्युपेतः॥

हा वरील मजकूर मिटारी (जिल्हा गाजीपूर, उत्तर प्रदेश) शिलालेखात असला तरी गिरनार लेखातील स्कंदगुप्ताची प्रशस्ती काही कमी नाही. द्वारकाधीश श्रीकृष्ण, सोमनाथ, दत्तात्रेय, अशोक, रुद्रदामन, स्कंदगुप्त, नरसी मेहता, स्वामी दयानंद, महात्मा गांधी – सौराष्ट्राचे हे वैभव केवळ अमूल्य आहे.

❉ ❉

# ‘शैले शैले न माणिक्यम्’

मध्ययुगीन महाराष्ट्रातील राजकीय आणि सांस्कृतिक संघर्षाचा अभ्यास करीत असताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवू लागली. ती ही की, महाराष्ट्रातील सर्व भागांत तुर्कांचे राज्य अल्पावधीत स्थापन झाले, आणि प्रतिकार असा झाला नाही आणि झाला तरी थोडा झाला अशी जी समजूत आहे ती वस्तुस्थितीवर आधारलेली नाही. दिल्लीच्या सुलतानांची राजवट महाराष्ट्रात प्रथम चालू झाली ती खिल्जीच्याच काळात. प्रथम दिल्लीचे खिल्जी घराणे (१३०७ ते १३२०), नंतर तुघलक घराणे (१३२० ते १३५०) आणि नंतर बहामनी घराणे (१३४७ ते १५०९) अशी ही महाराष्ट्रातील तुर्क सत्तेची परंपरा आहे. पश्चिम विदर्भ, सध्याचा मराठवाडा आणि कोकणची एक-दोन बंदरे व घाटावरील जुन्नर प्रांत हे बहामनींच्या ताब्यात होते. पण पूर्व विदर्भ (नागपूर-चंद्रपूर भाग), दक्षिण कोकण आणि दक्षिण महाराष्ट्र हे पंधराव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्यांच्या ताब्यात आले नव्हते. बहामनी सत्तेला आव्हानेही काही कमी नव्हती. राजघराण्यातील कलह, दक्षिणी आणि परदेशी मुसलमानांतील सततचे संघर्ष, दक्षिणेकडे विजयनगर, उत्तरेकडे माळवा, वायव्येकडे खानदेश आणि गुजरात इत्यादी राज्यांची आव्हाने आणि आक्रमणे यांमुळे बहामनींच्या शक्तीला आणि संघटनेला मर्यादा पडल्या.

तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील प्रदेश तर सोडूनच द्या, बहामनींना पूर्वेकडे सरकून समुद्रकिनाऱ्यापर्यंत पोहोचणेही अतिशय अवघड गेले. महाराष्ट्रात बहामनींची काय किंवा त्यापूर्वीच्या तुर्क सुलतानांची काय, सत्ता चालू झाली तरी पूर्वेकडील म्हणजे आजच्या आंध्र प्रदेशातील जनतेकडून तुर्कांना सतत तीनशे वर्षे प्रतिकार होत होता. आणि त्या काळात कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या प्रदेशात आंध्राची प्रबळ राज्ये उभी राहिली होती, ही गोष्ट इतिहासाच्या अभ्यासकांनी लक्षात ठेवण्यासारखी आहे. आज हैदराबाद शहरात असलेला गोवळकोंड्याचा किल्ला तुर्कांच्या ताब्यात आला तोच मुळी इ.स. १३६९ मध्ये. वरंगल पडले ते १४२२ मध्ये. संपूर्ण तेलंगण हाती येण्यास सन १५४६ उजाडावे लागले. तोपर्यंत बहामनी घराणे इतिहासजमा झाले होते, आणि त्याची जागा गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याने (१४८५ ते १६८७) घेतली होती. किनारपट्टीवरील राजे विजयनगर साम्राज्यात समाविष्ट झाले होते. विजयनगरचा

पाडाव झाल्यानंतर (सन १५६५) पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्याचा भाग ओरिसाच्या सरहद्दीपर्यंत गोवळकोंड्याच्या तुर्कांच्या ताब्यात आला. त्यानंतरही तुर्कांना कृष्णेच्या दक्षिणेस आंध्र प्रदेशात प्रवेश करून तिरुपतीपर्यंत आपली सत्ता स्थापन करण्यासाठी इ.स.१६४० हे वर्ष उजाडावे लागले.

याचा अर्थच असा की, आंध्राचे स्वातंत्र्ययुद्ध हे १३२४ पासून १६४० पर्यंत म्हणजे तीनशे वर्षांच्या वर चालले होते. या दीर्घकालीन संघर्षाच्या पाठीमागील प्रेरणाशक्तींचा शोध घेत घेत मी नोव्हेंबर १९८४ च्या पहिल्या तारखेस श्रीशैल मल्लिकार्जुन ह्या सुप्रसिद्ध क्षेत्रस्थानावर जाऊन पोहोचलो. हैदराबादपासून १२० मैलांवर श्रीशैलचा पर्वत उभा आहे. येथे कृष्णा नदी ही दोन उत्तुंग डोंगरांच्या मधील खोल दरीतून वाहत जाते. नदीकाठावरून पर्वत चढून श्रीशैल मल्लिकार्जुनाचे देऊळ गाठण्यास १५०० फुटांची अवघड चढण आहे. देवळाचे शिखर जमेस धरता इमारतीची एकंदरीत उंची पावणेतीन हजार फुटांच्या वर जावी. भारतात मी अनेक क्षेत्रे पाहिली आहेत. पण श्रीशैलसारखे दुर्गम, पोहोचण्यास कठीण, डोंगरदऱ्यांनी वेढलेले आणि निबिड अरण्यांनी झाकलेले असे क्षेत्र मला इतरत्र फार कमी आढळले. श्रीशैल येथील मल्लिकार्जुनाचे देऊळ हे भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक समजले जाते. देवळाला जोडूनच देवी भ्रमरांबा हिचे देऊळ आहे. त्या देवळामुळे श्रीशैल हे भारतातील एक मोठे शक्तिपीठ म्हणून प्रसिद्ध झाले. शिव आणि शक्ती यांची उपासना या ठिकाणी अतिशय प्राचीन काळापासून चालत आली असली पाहिजे. आणि शक्तीची उपासना सर्वत्र पसरताच शिवशक्तीची ही देवळे म्हणजे शाक्त पंथाची फार मोठी केंद्रे बनली.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शैव, शाक्त, नाथपंथी इत्यादींनी तुर्क आक्रमणाच्या प्रारंभकाळात संघटनेची फार मोठी कामगिरी बजावली आहे. शैवांची आणि शाक्तांची शक्तिपीठे भारतात सर्वत्र पसरली होती. अशा अठरा शक्तिपीठांचे महत्त्व अद्याप टिकून आहे. त्यांतील काही शक्तिपीठे आणि तेथील शक्तिदेवीची नावे वाचकांना निश्चितच उद्‌बोधक वाटतील. महाराष्ट्रात कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची एकवीरा देवी, कर्नाटकातील चामुंडादेवी, उज्जैनीची महाकालीदेवी, गव्हाटीची कामरूपादेवी, बिहारमधील गया येथील सर्वमंगलादेवी, हिमाचल प्रदेशातील ज्वालामुखी, वैष्णवीदेवी, कांजीवरमची कामाक्षीदेवी, वाराणशीची विशालाक्षीदेवी अशी काही नावे आहेत. आंध्र प्रदेशात चार शक्तिपीठें आहेत. श्रीशैलचे भ्रमरांबेचे देऊळ हे त्यांपैकी एक. श्रीशैलपासून जवळच सुमारे साठ मैलांवर तुंगभद्रेच्या काठावर असलेले आलमपूरचे जोगुलांबाचे देऊळ हे आणखी एक शक्तिपीठ.

जुन्या हैदराबाद राज्यात मामलेदार म्हणून काम करीत असताना मी काही काळ आलमपूरला होतो. आलमपूरचे जुने नाव यल्लम्मापूर. तेलगूत आणि कन्नडमध्ये यल्लम्मा

हे नाव एकवीरा किंवा रेणुकादेवी यांना लावतात. यल्लम्मापूरचे स्वरूप पुढे बदलून आलमपूर असे झाले. आलमपूर येथे असलेल्या शक्तिपीठातून फार मोठ्या प्रमाणात धर्मशास्त्रांचा अभ्यास चालत असावा असे दिसते. तेथे धर्मपीठांच्या आचार्यांची नावे आणि मूर्ती मला देवालयातील वास्तूत दिसल्या. आचार्यांचे पुतळे अगर नावे ही भारतात इतरत्र सहसा आढळत नाहीत.

आंध्रातील दुसरे शक्तिपीठ म्हणजे पिठापूरम् येथील देवीचे. महाराष्ट्रातील दत्तसंप्रदायाचे जनक श्रीपाद श्रीवल्लभ हे आंध्र प्रदेशातील पिठापूरम्चे. ही घटना या संदर्भात सूचक म्हणावी लागेल.

मध्ययुगीन दक्षिणेत तुर्कांचे आक्रमण होण्यापूर्वी महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक या तिन्ही प्रदेशांत शैव आणि शाक्त यांच्या प्रबळ संघटना पसरल्या असल्याचे मला आढळून आले. श्रीशैल येथे मल्लिकार्जुन आणि भ्रमरांबा यांच्या उपासकांचे अनेक मठ बांधण्यात आले होते. शैवांचे आणि शाक्तांचे महत्त्वाचे असे चार-पाच पंथ महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक या तिन्ही प्रदेशांत रूढ झालेले दिसतात. आज ही नावे कदाचित अपरिचित वाटतील, पण तुर्कांच्या आक्रमणाच्या काळात दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि आंध्र प्रदेशांत जो मोठा उठाव झाला आणि तुर्कांच्या आक्रमणाला कृष्णाकाठावर आणि पूर्वेकडे जो पायबंद बसला त्यामागे या शैव, शाक्त व नाथपंथी संघटनांची शक्ती काम करीत असल्याचे जाणवते. दक्षिणेचा भूगोल यासाठी डोळ्यांसमोर आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रदेशांतून कृष्णा वाहत जाते. या प्रदेशात कृष्णा नदीच्या उत्तर आणि दक्षिण या दोन्ही काठांवर तुर्कांना दोनशे वर्षे तरी सतत प्रतिकार होत होता.

कर्नाटकातील रायचूर जिल्हा सोडून कृष्णा पूर्वेकडे सरकली की आंध्रात आलमपूरजवळ तुंगभद्रा ही कृष्णेला येऊन मिळते. यापुढे काही मैलांवरच अतिशय दुर्गम भागात श्रीशैल वसलेले आहे. रायचूर जिल्ह्यातील कृष्णेच्या दक्षिणेकडील भाग हा कधी तुर्कांच्या ताब्यात तर कधी विजयनगरच्या ताब्यात असा सारखा येत-जात होता. पण आंध्रातील कृष्णेच्या दक्षिणेकडील भाग हा इ.स. १६४० पर्यंत तुर्कांच्या ताब्यात आला नाही. श्रीशैल आणि आलमपूर येथील शिलालेख इ.स. १५६५ पर्यंत तरी विजयनगर सम्राटांचे निश्चितच आहेत. त्यानंतरचे थोडेबहुत शिलालेख हे मांडलिकांचे आहेत. चालुक्य, काकतीय ही आंध्र प्रदेशातील घराणी तर चालुक्य आणि यादव ही महाराष्ट्रातील घराणी. या काळातील शैव पंथोपपंथांना मिळालेला राजाश्रय ही एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. शैव आणि शाक्त पंथांतील पुढील उपपंथ तेराव्या आणि चौदाव्या शतकांत आपल्याला आंध्रात प्रामुख्याने आढळतात. तसेच ते महाराष्ट्रातही आढळतात.

हे उपपंथ कोणते? त्यांची नावेही आमच्या सर्वसामान्य वाचकाला गमतीची वाटतील. ती अशी आहेत : कापालिक, कालामुख, लकुलीश, पाशुपत, आराध्य, वीरशैव. महत्त्वाची गोष्ट अशी की तेराव्या आणि चौदाव्या शतकात महाराष्ट्रात श्रीशैलच्या मल्लिकार्जुनाची उपासना चालू असल्याचे हवे तितके दाखले आपल्याला मिळतात. इतकेच नव्हे तर अशा देवळांचे पुजारी कालामुख संप्रदायाचे होते, असाही उल्लेख आपल्याला आढळतो. इ.स. ११९२ मध्ये लिहिला गेलेला नांदेड तालुक्यातील अर्धापूर (आराध्यपूर) चा शिलालेख पाहा. अर्धापूर येथे मल्लिनाथ म्हणजे मल्लिकार्जुन या देवतेची स्थापना करण्यात आली. देवालयातील पूजाअर्चा करण्याचे काम आणि येथील मठ चालविण्याचे काम ब्रह्मराशीदेव या कालामुख संप्रदायाच्या आचार्याकडे देण्यात आले. महाराष्ट्रात लाकुलीश पंथाची देवळे वेरूळ, पैठण इत्यादी भागांतही आढळून आली आहेत. तुर्कांचे आक्रमण गोदावरीच्या दक्षिणेकडे जसजसे पसरू लागले तसतसे प्रतिकाराचे मोर्चे हे पूर्व महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश येथे उभे राहू लागले.

महम्मद तुघलक याने इ.स. १३२४ मध्ये वरंगलचे काकतीय घराण्याचे राज्य बुडविले. महाराष्ट्रातील नांदेडला लागून असलेल्या बोधन या निजामाबाद जिल्ह्यातील शहरात असलेले इंद्रनारायणाचे देऊळ पाडून त्या जागेवर इ.स. १३२४ मध्ये त्याने उभी केलेली मशीद ही कदाचित आंध्र प्रदेशातील पहिली मशीद असावी. नांदेड जिल्ह्यातील कंधार म्हणजे राष्ट्रकूटकालीन कन्हारपूर येथे उपलब्ध झालेल्या शिलालेखावरून आणि शिल्पावरून तेथे कालप्रियाचे मोठे देवालय असावे आणि त्याबरोबर कंधार हे मोठे शक्तिपीठ म्हणूनही प्रसिद्ध असावे असे दिसून येते. महम्मद तुघलकाच्या काळातच आंध्रांनी दिल्लीकरांची सत्ता पार झुगारून दिली. इतकेच नव्हे तर कृष्णेच्या दक्षिणेस अवघ्या बारा वर्षांत विजयनगरचे प्रचंड साम्राज्य उभे राहिले. विजयनगर सम्राटांचे उपास्यदैवत विरूपाक्ष पंपावती. पहिले सम्राट शैव हे श्रीशैलच्या मल्लिकार्जुनाचे भक्त. याची साक्ष म्हणजे श्रीशैल येथे विजयनरचे सम्राट हरिहर आणि कृष्णदेवराय यांनी बांधलेली भव्य प्रवेशद्वारे होत. तुर्कांच्या सत्तेच्या बाहेर असलेले श्रीशैल हे दक्षिण भागातील विरोधी संघटनांचे मोठे केंद्र झालेले दिसते. ज्याप्रमाणे कालामुख आदी संप्रदायांतील मठांतील मंडळे श्रीशैलमधून आंध्र आणि कर्नाटक व महाराष्ट्रातील रायचूर, नांदेड इत्यादी भागांत पसरली त्याप्रमाणे महाराष्ट्रातूनही श्रीशैल मल्लिकार्जुनाकडे संघटना आणि संघटक यांचा ओघ वाहू लागला असावा.

शिवपूर्व कालात होऊन गेलेला महाराष्ट्रातील सर्वश्रेष्ठ संघटक असे नरसिंह सरस्वती (जन्म इ.स. १३७८, समाप्ती इ.स. १४५८) यांचे व्यक्तिमत्त्व इतिहासात जाणवते. जन्म महाराष्ट्रात (कारंजा, जिल्हा अकोला), कर्मभूमी कर्नाटकात (गांडगापूर,

भीमा-अमरज संगमावर) आणि देहत्याग श्रीशैल मल्लिकार्जुन येथे असे हे त्यांचे चरित्र मध्ययुगीन महाराष्ट्रातील चळवळींविषयी बरेच काही सांगून जाते. १४५८ मध्ये नरसिंह सरस्वती हे गांडगापूर सोडून श्रीशैल येथे गेले.

**'शिष्यांतें निरोपिती अवधारा। पुष्पांचे आसन त्वरित करा।**
**जाणे असे पैलतीरा। ऐक्य व्हावें मल्लिकार्जुनी॥**
**निरोप देतां श्रीगुरुमूर्ती। आणिली पुष्पें सेवंती।**
**कमळ कल्हार मालती। कर्दळीपर्ण वेष्टोनि॥'**

गुरुचरित्र (अध्याय ५० वा)

दत्तात्रेयांचे अवतार श्रीपाद श्रीवल्लभ (आंध्र प्रदेशातील) हेच नरसिंह सरस्वती म्हणून जन्मले असे समजले जाते. दत्तावतारी नरसिंह सरस्वती यांनी 'ऐक्य व्हावे मल्लिकार्जुनी' असा आपला निश्चय करावा ही घटना मोठी अर्थपूर्ण आहे.

महाराष्ट्राला चटका लावून सोडणारी श्रीशैलसंबंधीची दुसरी घटना म्हणजे शिवाजी महाराजांनी श्रीशैलची यात्रा केली तो प्रसंग. इ.स. १६७७ मध्ये शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाचा संकल्प करून हैदराबादकडे कूच केले (मार्च १६७९). तो पूर्ण करून ते दक्षिणेकडे जाण्यास निघाले. एप्रिल महिन्यात ते श्रीशैल येथे पोहोचले. तेथे काय घडले हे सभासदाच्या बखरीत पुढीलप्रमाणे दिले आहे :

''९८. शिवाजीचे श्रीशैल्यवर्पतगमन व मल्लिकार्जुनदर्शन.

मग श्रीशैलास आले. नीळगंगेचे स्नान करून श्रीचे दर्शन जाले. तीर्थविधी जाला, राजियांना स्थळ देखोन परम आनंद जाला की, केवळ कैलास दुसरे, असे स्थळ वाटले. तेथे हे देह श्रीस अर्पण करावे शिरकमल वाहावे ऐसे योजिले. (ते) समयी श्रीभवानी अंगांत आविर्भवली आणि बोलली जे 'तुज ये गोष्टी मोक्ष नाही हे कर्म करू नको पुढे कर्तव्यहि उदंड तुझे हाते करणे आहे.' असे सांगून श्री गेली. हे वर्तमान सावध जाल्यावरि राजियास कारकुनांनी सांगितले. मग श्रीस शिरकमल वाहावे हा विचार राहिला.' (सभासद याची बखर, चित्रशाळा प्रकाशन, पुणे-२; पान-८७)

एक्याणवकलमी बखरीत (व्हीनस प्रकाशन, पान-५२) याच घटनेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे : ''८०. वैराग्य : त्याउपर कर्नोल तुंगभद्रा तीर तेथे जाऊन पाच लक्ष होन घेतले. अनंदराऊ कर्नोळकर देशमुख येऊन भेटले. त्याउपर निवृत्ति संगमावरून श्रीशैल्यास गेले. अनंतपुरी लष्कर कुल ठेऊन तेथून गायेमुखापासून पर्वत वेधावा. भीमकुंड उतर चढ मिळोन तीन कोस साडेतीन गावे कुल पर्वत चढ आहे. दो दिवसां श्रीशैल्यास राजे गेले. त्या स्थली नव दिवस होते. जाताच वैराग्य प्राप्त जाले. विभूतिचर्चन सहस्र रुद्राक्ष परिधान करून बसले. श्रीदेवापुढे सभामंडपी बसले. शिरकमल श्रीशैल्यास वाहावे यैसा निश्चये करून बसले. शस्त्रे पेलीवली. रघुनाथ

नारायेण व सेनापति कुल रात्रींदिवस भोवताले राखण बसले. राज्यांती नर्क आहे. रघुनाथपंतास म्हणो लागले जे माघारे देशास जावे; दोघे पुत्र आहे त्यांस येकास राजी बसवणे. चित्तास येईल ते करणे. यैसा हट करून बसले. त्याउपर नानाप्रकारे शास्त्रांतील पुराणांतील साक्षी रघुनाथपंती सांगोन नवे दिवशी सावध जाले. नीलगंगेस संध्यामठ चिरेबंदी बांधविला. धर्म बहुत केला. ब्राह्मणभोजन करून यात्रा सांग समस्त लष्करास जाली. लक्ष ब्राह्मणाचा संकल्प करविला. त्याउपर मजल दरमजल चंदी प्रांतास गेले.''

बखरीतील काहीशी अतिशयोक्ती वगळूनही शिवरायाची ही श्रीशैल भेट अतिशय रोमांचकारी वाटते. तितकीच ती अर्थपूर्णही आहे. महाराष्ट्र आणि श्रीशैल यांच्यामध्ये या भेटीच्या रूपाने आणखी एक दुवा जोडला गेला. श्रीशैल येथे शिवाजी महाराज ज्या ठिकाणी राहिले होते त्या ठिकाणी दोन बुरूज, एक मोठे प्रवेशद्वार, प्रवेशद्वारावरील लहानसा मंडप ही अद्याप शिल्लक आहेत. श्रीशैल येथील दंतकथा अशी की शिवाजी महाराजांनी भ्रमरांबा देवीला आपले शिर अर्पण करण्याचा निश्चय केला. त्या वेळी देवीने प्रसन्न होऊन त्यांना या निश्चयापासून परावृत्त केले आणि महाराजांना शत्रूवर विजय मिळावा म्हणून खड्ग प्रदान केले. शिवाजी महाराजांनी श्रीशैल येथे नीलगंगेवर घाट बांधला आणि देवळाच्या उत्तर बाजूस भव्य असे प्रवेशद्वार बांधले. 'शिवाजी गोपुरम्' या नावाने ते अद्यापही प्रसिद्ध असून उत्तम स्थितीत आहे. देवळाला एकूण चार मोठी प्रवेशद्वारे आहेत. कृष्णदेवराय गोपूर, हरिहर गोपूर, शिवाजी महाराज गोपूर ही तीन प्रवेशद्वारे कृष्णदेवराय आणि शिवाजी महाराज यांच्या नावांवर असून चौथे प्रवेशद्वार हे अंबा गोपूर असे ओळखले जाते. या अंबा गोपुरम्लाच म्हणजे पश्चिमेकडील प्रवेशद्वाराला ब्रह्मानंदराय गोपुरम् असे म्हणतात.

श्रीशैल हे कर्नूल जिल्ह्यातील गाव आहे. कर्नूल हा जिल्हा विजापूरच्या आदिलशाही राज्यात मोडत होता. पन्हाळगड येथे शिवाजी महाराजांवर इ.स. १६६३ मध्ये चालून जाणारा सिद्धी जौहर हा विजापूरकरांचा कर्नूल येथील प्रशासक होता हे प्रसिद्ध आहे. विजापूरच्या आदिलशहाने कर्नूल जिल्हा इ.स. १६३८ च्या सुमारास जिंकलेला दिसतो. इ.स. १६८८ मध्ये विजापूरचे राज्य मोगलांनी जिंकून घेतले. त्याबरोबर हा जिल्हा त्यांच्या ताब्यात आला. औरंगजेबातर्फे कर्नूल येथे एका अफगाण सरदाराला अधिकारी म्हणून नेमण्यात आले. मोगल-मराठा संघर्षात प्रसिद्धीस आलेला सुप्रसिद्ध पठाण सरदार दाऊदखान पन्नी याचे हे घराणे.

हे घराणे पुढे निजामाचे मांडलिक म्हणून कर्नूल येथे नांदू लागले. हा जिल्हा काही दिवस टिपू सुलतानाच्या ताब्यात होता. कर्नूलच्या पठाण नबाबांच्या काळात श्रीशैल येथील पूजाअर्चा, उत्सव आदी कार्यक्रम बरीच वर्षे बंद पडले होते. औरंगजेबाच्या ताब्यात हा जिल्हा आल्यानंतर या गोष्टी घडून आल्या. टिपूने हा जिल्हा निजामाकडून

जिंकून घेतला होता. टिपूचा पाडाव झाल्यानंतर इंग्रजांनी इ.स. १७९२ मध्ये हा जिल्हा निजामाला परत दिला. पण लगेच तैनाती फौजेच्या खर्चासाठी म्हणून इंग्रजांनी हा जिल्हा आपल्याकडे परत घेतला (इ.स. १८००). कर्नूलचे पठाण नबाब हे इंग्रजांचे मांडलिक बनले. पुढे १८४० च्या सुमारास कर्नूलच्या नबाबाने कारस्थाने केली म्हणून इंग्रजांनी त्याच्यावर चढाई केली आणि ते राज्य खालसा केले. १८४० पासून कर्नूल जिल्हा हा इंग्रजी राज्याचा एक भाग बनला.

पठाण नबाबांच्या कारकीर्दीत श्रीशैल मंदिराची बरीच नासधूस झाली. देवालयातील पुजाऱ्यांची आणि सेवेकऱ्यांची इनामे जप्त झाली. पुढे काही प्रमाणात पूजाअर्चा, उत्सव इत्यादींना परवानगी मिळाली असावी असे दिसते. देवळाच्या उत्सवाच्या उत्पन्नाचा काही भाग कर्नूलच्या नबाबाकडे जमा होत असे. उत्सव चालू ठेवण्याचे ते एक आकर्षण असावे. श्रीशैल येथील देवळाच्या जीर्णोद्धाराचा अहिल्याबाई होळकर हिनेही प्रयत्न केला होता. त्यासाठी तिने इ.स. १७९५ मध्ये निजामाशी पत्रव्यवहार केला होता असे कागदोपत्री नमूद आहे (श्री वासुदेव ठाकूरकृत देवी अहिल्याबाई होळकर यांचे इंग्रजी भाषेतील चरित्र, पान ३४). याच ग्रंथातील पान ६९ वर होळकरांचा निजाम दरबारातील वकील माधवराव लक्ष्मण याने अहिल्याबाईंना १६ एप्रिल १७९१ रोजी लिहिलेले पत्र देण्यात आले आहे. त्यावरून इ.स. १७९१ मध्ये देवालयाचे वार्षिक उत्पन्न ५०००० रुपये असून ते कर्नूलचे नबाब घेत असत असे दिसते.

श्रीशैल मल्लिकार्जुन येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके हे काही दिवस राहिले होते. महाराष्ट्र आणि श्रीशैल यांचे असे हे नाते आहे आणि आता तर श्रीशैल येथे शिवाजी महाराजांचे स्मारक म्हणून आंध्र सरकारच्या मदतीने एक भव्य इमारत आणि महाराजांचा पुतळाही उभा राहत आहे. अनेक डोंगरांवर अनेक तीर्थे आहेत, पण श्रीशैल मल्लिकार्जुनाचे महाराष्ट्राला विशेष आकर्षण दिसते.

'शैले शैले न माणिक्यम्' हेच खरे.

# मन विचलित करणारे अचलपूर

विदर्भातील अचलपूरला पूर्वी एलिचपूर म्हणत. हे एक प्राचीन आणि इतिहासप्रसिद्ध शहर आहे. त्याला लागूनच परतवाडा हे गाव आहे. परतवाडा म्हणजे इंग्रजांच्या काळातील अचलपूरची लष्करी छावणी. अद्यापही परतवाड्याचा पोस्टाचा पत्ता अचलपूर कँप असाच आहे. ही गावे एकमेकाला लागून असली तरी त्यांच्या दोन भिन्न नगरपालिका आहेत.

१९७७ वर्षीच्या डिसेंबर महिन्यात परतवाडा व अचलपूर या दोन्ही शहरांतून भाषणे देण्याचा योग आला. परतवाड्यात पांगारकर आणि अचलपुरात राजाभाऊ, अप्पासाहेब आणि सुरेश ही देशमुख मंडळी यांचा परिचय झाला. दिलदार पाहुणचाराचा उत्कृष्ट आदर्श पाहायचा असेल तर वऱ्हाडचा अनुभव घ्यावा. पांगारकर हे वकील. त्यांच्या पाहुणचाराने भारावून गेलो, तर अचलपूरच्या देशमुख मंडळींच्या पाहुणचारामुळे मला अचलपूरला लागून असलेला गाविलगडचा किल्ला व चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण ही स्थळे पाहण्यास मिळाली.

विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर अनेक लेख लिहिले गेले. अनेक शिलालेख व ताम्रपट यांचे वाचन झाले. कौंडिण्यपूर वगैरे ठिकाणी उत्खनन झाले. कालिदास, भारवी, दंडी, राजशेखर इत्यादींच्या ग्रंथांतून विदर्भाचे उल्लेख शोधून काढण्यात आले. जैन साहित्यातील अचलपूरचा उल्लेख हा तर नवव्या शतकापर्यंत जातो. ताम्रपटांमुळे वाकाटक, मुंड, राष्ट्रकूट इत्यादी घराण्यांची विदर्भातील राजवट कशी होती याची कल्पना आली. या कामगिरीचे फार मोठे श्रेय डॉक्टर वा. वि. मिराशी यांना आहे. महानुभाव साहित्यातील वैदर्भी जीवनाचे चित्रण हे नेने, भवाळकर, डॉक्टर कोलते, तुळपुळे इत्यादींच्या परिश्रमाचे फळ आहे.

परतवाड्याला काही दिवसांपूर्वी विदर्भ साहित्य संमेलन झाले. त्यासंबंधी एक मनोरंजक चुटका माझे मित्र आणि विदर्भातील थोर साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर हे सांगतात. संमेलनाला जोडून एखादे कविसंमेलन भरवावे अशी बोलणी चालू होती. परंतु अचलपूरला पुरेसे कवी मिळतील किंवा नाही याबद्दल कार्यकर्ते सचिंत दिसले. यावर अचलपूरची कविपरंपरा जुनी आहे हे दाखविण्यासाठी राम शेवाळकर बोलून गेले, "अहो, भारवी हा अचलपूरचा." कार्यकर्त्यांना वाटले, अचलपूरला बरेच कवी

दिसतात. त्यातच भारवी नावाचा कवी असावा. ते शेवाळकरांना म्हणाले, ''मग होऊ द्या कविसंमेलन. आणि त्यासाठी भारवीला आमंत्रण पाठवू या.'' आता थक्क होण्याची पाळी शेवाळकरांवर आली. ते कार्यकर्त्यांना म्हणाले, ''अहो, भारवीला बोलावण्यात थोडी तांत्रिक अडचण आहे. 'किरातार्जुनीय'चा कर्ता भारवी याचे घराणे काही वर्षे अचलपूरला होते. तो मरून अकराशे वर्षे झाली आहेत!''

वास्तविक पाहता महाराष्ट्रात कोकण, खानदेश, याप्रमाणेच विदर्भ हा एक खासा घटक आहे. मोगलकालीन विदर्भात – त्यावेळी सुभे वऱ्हाड म्हणत – आजच्या विदर्भाचे आठ जिल्हे, मराठवाड्यातील जवळजवळ सर्व परभणी जिल्हा, नांदेड जिल्ह्याचे दोन-तीन तालुके आणि औरंगाबाद जिल्हयाचा उत्तरेकडील भाग यांचा समावेश होतो. म्हणजे आजच्या महाराष्ट्राच्या एक लक्ष अठरा हजार चौरस मैलांच्या क्षेत्रफळात मोगलकालीन विदर्भाची व्याप्ती सुमारे पन्नास हजार चौरस मैलांवर होती असे म्हटले पाहिजे.

यादवांच्या नंतर विदर्भात बहमनी, इमादशाही, मोगल आणि निजाम या राजवटी नांदून गेल्या. १५७२ मध्ये अहमदनगरच्या निजामशहाने इमादशहाचा निकाल लावून विदर्भ जिंकून घेतला, पण तो काही वीस-पंचवीस वर्षांच्यावर त्यांना राखता आला नाही.

१४ मार्च १५९६ च्या तहाने चांदबिबीने विदर्भ मोगलांना दिला. विदर्भात मोगलांची राजवट १५९६ पासून १७२४ पर्यंत म्हणजे निजाम स्वतंत्र होईपर्यंत टिकली.

चांदबिबीने विदर्भ मोगलांना दिला खरा, पण अहमदनगरचा महान मुत्सद्दी आणि योद्धा मलिकंबर याने मरेपर्यंत (१४ मे १६२६) वऱ्हाड काही मोगलांना पचू दिला नाही. ऐदी जहांगीर आणि कर्तबगार मलिकंबर. मग मोगलांचा पाय पुढे सरकावा कसा? या काळात भल्या भल्या मोगल सरदारांची अब्रू धुळीला मिळाली. कित्येक मोगल सरदार लाचलुचपतीला बळी पडले. अकबराची मुले मुराद (याने वसविलेले शहापूर हे अकोल्याजवळ आहे.) व दानियाल हे अति मदिरापानाने मेले. दानियालला तर दारू पुरवू नये अशी अकबराने सक्त ताकीद दिली होती. पण त्याने पहारेकऱ्यांना लाच देऊन बंदुकीच्या नळीतून पिण्याची दारू भरून घेतली! ती प्याल्यामुळे मृत्यू ओढवला.

अकबराचा सेनापती राजा मानसिंग हा १६१२ मध्ये अचलपूरला वारला. त्याच्याबरोबर साठ स्त्रिया सती गेल्या अशी इतिहासात नोंद आहे. अबुल फजल, अब्दुलरहीम खानंखाना, राजा मानसिंग, राजपुत्र मुराद, दानियाल, परवेज, खुर्रम (भावी शहाजहान) इत्यादी प्रसिद्ध नावे त्या काळच्या विदर्भाशी निगडित आहेत. जाधवराव व उदाराम हे मराठे सरदार मोगलांचे सहकारी म्हणून याच काळात पुढे आले आणि मलिकंबरच्या बाजूने शहाजीराजे भोसले यांचे नाव गाजू लागले.

शहाजहानच्या काळात मोगलांनी निजामशाही संपूर्णपणे संपवली (१६३६). विदर्भावरील धोका टळला आणि १६३६ पासून १६७० पर्यंत त्या प्रांतात स्थिर राजवट नांदू लागली.

१६७० पासून शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्यानंतर आलेल्या संभाजी राजांच्या आक्रमणांनी विदर्भ म्हणजे मोगल सुभेदारांना सुळावरची पोळी वाटू लागली. विदर्भाच्या काही मोगल सुभेदारांची नावे पाहिली तरी मातबर माणसे विदर्भावर नेमण्यात मोगल बादशहा किती दक्ष असत याची कल्पना येईल. खानजमान हा औरंगजेबाच्या मावशीचा नवरा वऱ्हाडच्या सुभ्यावर नेमण्यात आला होता (१६७५-७६). हा पुढे माळव्याच्या सुभेदारीवर असताना १६८४ मध्ये मरण पावला.

ईरजखान हा इराणी. याचा बाप किजलबाश खान हा इराणहून आला. 'टेक्निकल नोहाऊ'ची त्या काळात बरीच आयात होत असावी! ईरजखान हा वऱ्हाडच्या सुभ्यावर तीन वेळा नेमला गेला. त्याचा मृत्यू तेरा ऑगस्ट १६८५ चा. त्याच्या वाड्याच्या जागेवर सध्या अचलपूरचे जगदंब महाविद्यालय आहे.

नजाबतखान रुमी हा एक सुभेदार तुर्क जमातीचा. जन्म बगदाद येथे. 'टेक्निकल नोहाऊ'च्या आयातीचे हे आणखी एक उदाहरण. १६९४-९५ मध्ये याने हवापाणी मानवत नाही या सबबीखाली आपली बदली उत्तरेत करून घेतली.

अलीमर्दानखान हा इराणी गोवळकोंड्याचा माजी अधिकारी होता. कांचीच्या युद्धात संताजी घोरपडे याने त्याला पकडले होते (१३ डिसेंबर १६९२). जबर खंडणी भरून अलीमर्दानखानाने आपली सुटका करून घेतली. औरंगजेबाने त्याला १६९५ नंतर वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमले. मराठ्यांची त्याने किती धास्ती घेतली होती याचे एक मौजेचे उदाहरण समकालीन इतिहासकार भीमसेन सक्सेना याने दिले आहे. १७०१ मध्ये तो जुल्फिकारखानाच्या सैन्यात होता. भीमसेन म्हणतो, ''आम्ही वऱ्हाडात दाखल झालो. खानदेश आणि वऱ्हाड येथे मराठे पसरले होते. ते त्या भागातील जमीनदारांना मिळाले. त्या सर्वांची मिळून जवळजवळ साठ हजार फौज तयार झाली. वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान हा मराठ्यांच्या भीतीमुळे एलिचपुरातून बाहेर निघेना. नुस्रतजंग जुल्फिकारखान हा कूच करीत एलिचपुराहून दोन कोसांवर पोहोचला. त्याने अलीमर्दानखान यास बोलावणे पाठविले. तो येऊन मोगल सैन्यात दाखल झाला खरा. पण आपल्याला परत जाऊ द्यावे म्हणून तो जुल्फिकारखानाची रोज विनवणी करी. शेवटी नांदेडला पोहोचल्यावर जुल्फिकारखानाने त्याला एलिचपुरास परत जाण्यास रजा दिली.''

१७०२ मध्ये औरंगजेबाने अलीमर्दानखान याची उचलबांगडी करून वऱ्हाड व नांदेड या दोन्ही सुभ्यांवर गाजीउद्दीन फिरोजजंग (निजामुल्मुल्काचा बाप) याची नेमणूक

केली. फिरोजजंग हा नांदेडजवळ राही. वऱ्हाडवर त्याचा नायब म्हणून रुस्तमखान काम पाही. या रुस्तमखानालाही संताजी घोरपड्याने १६९० मध्ये पकडले होते आणि जबर खंडणी घेऊन सोडले होते. पुढे तो दुसऱ्यांदा नेमाजी शिंदे याच्या तावडीत सापडला. पुन्हा एकदा जबर खंडणी भरून त्याला आपली सुटका करून घ्यावी लागली.

निजामी राजवटीतही वऱ्हाडचे निजामी सुभेदार हे मराठ्यांमुळे कायमचे धोक्यात असत. १७३७ मध्ये वऱ्हाडचा सुभेदार शुजाअतखान याच्यावर रघूजी भोसले चालून आला. शुजाअतखानाने आपल्याजवळ असलेल्या कवी हाफिज याचा कवितासंग्रह उघडला. त्यातील एका ओळीवर त्याची नजर स्थिरावली. ती ओळ अशी : ''अय कबूतर निगरान बाश के शाहीन आमद.'' म्हणजे हे कबुतरा, सावध, बहिरी ससाणा येत आहे. शुजाअतखानाला वाटले, शकुन चांगला आहे. आपल्याला जय मिळणार. त्याच्या दुर्दैवाने रघूजी भोसले हा बहिरी ससाणा निघाला आणि शुजाअतखान हा कबूतर. लढाईत शुजाअतखान मारला गेला.

ज्याला आज एलिचपूरच्या नबाबाचे घराणे म्हणतात त्याचा संस्थापक इस्माइलखान पन्नी हा पठाण सरदार निजामाच्या पदरी होता. याच्या घराण्यात इस्माइलखान, नामदारखान इत्यादींना सुभेदाऱ्या मिळाल्या, पण लष्करी सरंजाम गेला. सुभेदारीवर इतर माणसे नेमली गेली आणि हे घराणे नामशेष झाले. इस्माइलखानाला मराठ्यांनी राक्षसभुवनच्या युद्धात (१७६३) कैद केले होते. तो स्वत: निजामाविरुद्ध बंड करताना मारला गेला (१७७५). त्याचा मुलगा सलाबतखान याने ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या नेतृत्वाखाली मराठ्यांशी झालेल्या युद्धात आपली कर्तबगारी दाखविली.

अचलपूर हे अतिशय अस्वच्छ आणि खालावलेले शहर आहे. शहराच्या दोन बाजूंनी दोन नद्या वाहतात. त्याची रचना आकर्षक असायला हवी, पण त्यावर दारिद्र्याची भीषण कळा आहे. महानुभावांची बरीच स्थळे आहेत. त्यांपैकी काही स्थळांचे तरी मध्ययुगात रूपांतर झाले असावे. अचलपूरची मंडळी मला म्हणाली, ''पगडीसाहेब, आमच्या अचलपुरात काही स्थळे अशी आहेत की तेथे नमाज व भजने दोन्ही होतात. सर्व काही गुण्यागोविंदाने चालते.'' महानुभावस्थान पोथीतील ओळी अशा आहेत : ''पश्चिमेची दुर्गा, ती तो तुरुकाचे आवरातू पडली, पूर्वेची दुर्गा, तियेचा घुमट केला. जगतीचे आतू रिघता रेणुकेचे स्थान, तियेची मशीद केली.'' यांचा आजच्या अचलपूरकरांना पत्ताच नव्हता.

अचलपुराबाहेर मोठा दर्गा आहे. पाच हुतात्म्यांचा तो दर्गा आहे असे म्हणतात. गजनीच्या मुहंमदाच्या काळात (इ.स. १०२०) त्याचे भाचे किंवा पुतण्ये हे अचलपूरला येऊन लढून धर्मासाठी हुतात्मे झाले अशी आख्यायिका आहे. दर वर्षी येथे मोठा उरूस भरतो. अर्थात ही आख्यायिका म्हणजे भ्रमाचा भोपळा आहे.

# मन विचलित करणारे अचलपूर

विदर्भातील अचलपूरला पूर्वी एलिचपूर म्हणत. हे एक प्राचीन आणि इतिहासप्रसिद्ध शहर आहे. त्याला लागूनच परतवाडा हे गाव आहे. परतवाडा म्हणजे इंग्रजांच्या काळातील अचलपूरची लष्करी छावणी. अद्यापही परतवाड्याचा पोस्टाचा पत्ता अचलपूर कँप असाच आहे. ही गावे एकमेकाला लागून असली तरी त्यांच्या दोन भिन्न नगरपालिका आहेत.

१९७७ वर्षीच्या डिसेंबर महिन्यात परतवाडा व अचलपूर या दोन्ही शहरांतून भाषणे देण्याचा योग आला. परतवाड्यात पांगारकर आणि अचलपुरात राजाभाऊ, अप्पासाहेब आणि सुरेश ही देशमुख मंडळी यांचा परिचय झाला. दिलदार पाहुणचाराचा उत्कृष्ट आदर्श पाहायचा असेल तर वऱ्हाडचा अनुभव घ्यावा. पांगारकर हे वकील. त्यांच्या पाहुणचाराने भारावून गेलो, तर अचलपूरच्या देशमुख मंडळींच्या पाहुणचारामुळे मला अचलपूरला लागून असलेला गाविलगडचा किल्ला व चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण ही स्थळे पाहण्यास मिळाली.

विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर अनेक लेख लिहिले गेले. अनेक शिलालेख व ताम्रपट यांचे वाचन झाले. कौंडिण्यपूर वगैरे ठिकाणी उत्खनन झाले. कालिदास, भारवी, दंडी, राजशेखर इत्यादींच्या ग्रंथांतून विदर्भाचे उल्लेख शोधून काढण्यात आले. जैन साहित्यातील अचलपूरचा उल्लेख हा तर नवव्या शतकापर्यंत जातो. ताम्रपटांमुळे वाकाटक, मुंड, राष्ट्रकूट इत्यादी घराण्यांची विदर्भातील राजवट कशी होती याची कल्पना आली. या कामगिरीचे फार मोठे श्रेय डॉक्टर वा. वि. मिराशी यांना आहे. महानुभाव साहित्यातील वैदर्भी जीवनाचे चित्रण हे नेने, भवाळकर, डॉक्टर कोलते, तुळपुळे इत्यादींच्या परिश्रमाचे फळ आहे.

परतवाड्याला काही दिवसांपूर्वी विदर्भ साहित्य संमेलन झाले. त्यासंबंधी एक मनोरंजक चुटका माझे मित्र आणि विदर्भातील थोर साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर हे सांगतात. संमेलनाला जोडून एखादे कविसंमेलन भरवावे अशी बोलणी चालू होती. परंतु अचलपूरला पुरेसे कवी मिळतील किंवा नाही याबद्दल कार्यकर्ते सचिंत दिसले. यावर अचलपूरची कविपरंपरा जुनी आहे हे दाखविण्यासाठी राम शेवाळकर बोलून गेले, "अहो, भारवी हा अचलपूरचा." कार्यकर्त्यांना वाटले, अचलपूरला बरेच कवी

दिसतात. त्यातच भारवी नावाचा कवी असावा. ते शेवाळकरांना म्हणाले, ''मग होऊ द्या कविसंमेलन. आणि त्यासाठी भारवीला आमंत्रण पाठवू या.'' आता थक्क होण्याची पाळी शेवाळकरांवर आली. ते कार्यकर्त्यांना म्हणाले, ''अहो, भारवीला बोलावण्यात थोडी तांत्रिक अडचण आहे. 'किरातार्जुनीय'चा कर्ता भारवी याचे घराणे काही वर्षे अचलपूरला होते. तो मरून अकराशे वर्षे झाली आहेत!''

वास्तविक पाहता महाराष्ट्रात कोकण, खानदेश, याप्रमाणेच विदर्भ हा एक खासा घटक आहे. मोगलकालीन विदर्भात – त्यावेळी सुभे वऱ्हाड म्हणत – आजच्या विदर्भाचे आठ जिल्हे, मराठवाड्यातील जवळजवळ सर्व परभणी जिल्हा, नांदेड जिल्ह्याचे दोन-तीन तालुके आणि औरंगाबाद जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग यांचा समावेश होतो. म्हणजे आजच्या महाराष्ट्राच्या एक लक्ष अठरा हजार चौरस मैलांच्या क्षेत्रफळात मोगलकालीन विदर्भाची व्याप्ती सुमारे पन्नास हजार चौरस मैलांवर होती असे म्हटले पाहिजे.

यादवांच्या नंतर विदर्भात बहमनी, इमादशाही, मोगल आणि निजाम या राजवटी नांदून गेल्या. १५७२ मध्ये अहमदनगरच्या निजामशहाने इमादशहाचा निकाल लावून विदर्भ जिंकून घेतला, पण तो काही वीस-पंचवीस वर्षांच्यावर त्यांना राखता आला नाही.

१४ मार्च १५९६ च्या तहाने चांदबिबीने विदर्भ मोगलांना दिला. विदर्भात मोगलांची राजवट १५९६ पासून १७२४ पर्यंत म्हणजे निजाम स्वतंत्र होईपर्यंत टिकली.

चांदबिबीने विदर्भ मोगलांना दिला खरा, पण अहमदनगरचा महान मुत्सद्दी आणि योद्धा मलिकंबर याने मरेपर्यंत (१४ मे १६२६) वऱ्हाड काही मोगलांना पचू दिला नाही. ऐदी जहांगीर आणि कर्तबगार मलिकंबर. मग मोगलांचा पाय पुढे सरकावा कसा? या काळात भल्या भल्या मोगल सरदारांची अब्रू धुळीला मिळाली. कित्येक मोगल सरदार लाचलुचपतीला बळी पडले. अकबराची मुले मुराद (याने वसविलेले शहापूर हे अकोल्याजवळ आहे.) व दानियाल हे अति मदिरापानाने मेले. दानियालला तर दारू पुरवू नये अशी अकबराने सक्त ताकीद दिली होती. पण त्याने पहारेकऱ्यांना लाच देऊन बंदुकीच्या नळीतून पिण्याची दारू भरून घेतली! ती प्याल्यामुळे मृत्यू ओढवला.

अकबराचा सेनापती राजा मानसिंग हा १६१२ मध्ये अचलपूरला वारला. त्याच्याबरोबर साठ स्त्रिया सती गेल्या अशी इतिहासात नोंद आहे. अबुल फजल, अब्दुलरहीम खानखाना, राजा मानसिंग, राजपुत्र मुराद, दानियाल, परवेज, खुर्रम (भावी शहाजहान) इत्यादी प्रसिद्ध नावे त्या काळच्या विदर्भाशी निगडित आहेत. जाधवराव व उदाराम हे मराठे सरदार मोगलांचे सहकारी म्हणून याच काळात पुढे आले आणि मलिकंबरच्या बाजूने शहाजीराजे भोसले यांचे नाव गाजू लागले.

चौदाव्या शतकाच्या शवटी बहमनी व खेडल्याचा (बेतूलपासून चार मैलांवर) गोंडराजा नरसिंगदेव यांच्या युद्धात मारले गेलेले ते सैनिक होते.

इस्माइलखानाने शहराभोवती भक्कम तटबंदी बांधली ती अद्याप शाबूत आहे. त्याच्या दरबाराची जागा आणि त्याने बांधलेला आइनेमहालही पाहायला आम्ही गेलो. माझ्याबरोबर राजाभाऊ देशमुख होते. मी त्यांना म्हटले, ''अहो, समकालीन ग्रंथात मी आइनेमहालाचा उल्लेख बिहिश्त का म्हणजे स्वर्गाचा तुकडा म्हणून वाचला आहे.''

राजाभाऊ म्हणाले, ''अहो, माझे प्राथमिक शिक्षण आइनेमहालातच झाले. आता समोरच्या हौदात कारंजे नाही. सर्वत्र पडझड झाली आहे.'' आइनेमहालाच्या कमानीतून आत जाताना चिखल, माती आणि घाण यांतून मार्ग काढावा लागला. इस्माइलखानाचा दरबार हॉल म्हणजे सार्वजनिक संडास बनला होता. आम्ही आइनेमहालापाशी पोहोचलो. त्या पडक्या इमारतीत काय असणार? पण जवळच एक खानसाहेब बहिर्दिशेला बसले होते. ते हलता हलेनात. शेवटी मलाच संकोच वाटला. मी त्यांना अस्खलित उर्दूत म्हटले, ''किब्ला, कोई कबाहत नहीं. आप इतमिनानसे फारिग हो जाइये. (आपण सावकाशीने मोकळे व्हा.) उस वक्त तक हम पर्दानशीन होते हैं.''

स्कॉच कवी एडविन म्यूर याच्या आत्मचरित्रात पुढील प्रसंग आहे. स्कॉटलंडचे एक मोठे लॉर्ड आपल्या कुटुंबासहित एका तुरळक वस्तीच्या अगदी लहान बेटावर सहलीला गेले होते. बेटावर त्यांना घाईची शौचाला लागली (''ही वेन्ट शॉर्ट''' असे इंग्रजी वाक्य आहे). जवळपासच्या घरांत संडास (क्लोजेट) आहे काय म्हणून लॉर्डची मंडळी चौकशी करू लागली. इतक्यात समोरच्या घरातून एक शेतकरी आला आणि विनयाने व अदबीने आपल्या डोक्यावरची टोपी काढून लॉर्ड महाशयांना म्हणाला, ''माय लॉर्ड, द होल आयलंड इज अ क्लोजेट!''

अचलपूरला इस्माइलखान पन्नीच्या इतिहासप्रसिद्ध वाड्याचाही सर्व परिसर म्हणजे एक क्लोजेट (शौचकूप) बनला आहे.

इस्माइलखानाच्या आसनाच्या ओट्यापर्यंत आम्ही पोहोचूच शकलो नाही. मध्ये विलक्षण चिखल पसरला होता. त्यातूनच एक प्रचंड डुक्कर उभा राहिला. त्याच्या डोळ्यांतील क्रौर्य पाहून मी हादरून गेलो. मी राजाभाऊंना म्हटले, ''राजाभाऊ, अचलपूरचे नवाबी अवशेष पाहून हौस फिटली. आता घरी चला.''

❉ ❉

# पानिपतची माती

१९७४ मध्ये १८ ते २५ नोव्हेंबरपर्यंत माझी मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध (१६५७ ते १७०७) या विषयावर ग्वाल्हेर येथे हिंदीतून सात भाषणे झाली. विजयाराजे शिंदे या ही माला आपले श्वशुर माधव महाराज यांच्या स्मृत्यर्थ दर वर्षी आयोजित करीत असतात.

ग्वाल्हेरला त्यांचा पाहुणचार घेतल्यावर मी व माझी पत्नी दोघे कुरुक्षेत्र व पानिपत पाहावे या विचारात होतो. विजयाराजे यांचे चिटणीस श्री. भार्गव यांनी कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना तार करून विद्यापीठाच्या अतिथिगृहात आमची व्यवस्था करविली होती. कुरुक्षेत्रात एखादा दिवस घालवावा, तेथील विद्यापीठाच्या इतिहास विभागातील प्राध्यापकांशी चर्चा करावी, कुरुक्षेत्रातील स्थळे पाहावी व तेथून पानिपतला जावे असा आमचा बेत होता.

२६ नोव्हेंबर १९७४ रोजी आम्ही कुरुक्षेत्राला पोहोचलो. विद्यापीठाच्या अतिथिगृहात सामान लावल्यावर मी विद्यापीठात पोहोचलो. योगायोग असा की तेथील इतिहास शाखेचे प्रमुख डॉक्टर दत्त हे माझे परिचित निघाले. कुरुक्षेत्र विद्यापीठात येण्यापूर्वी ते दिल्लीच्या केंद्रीय गॅझेटियरच्या संपादक मंडळात काम करीत होते. मीही महाराष्ट्र गॅझेटियरचा संपादक असल्यामुळे आमच्या दोघांच्या दिल्लीला अनेक वेळा गाठी पडल्या होत्या. त्या रात्री आम्ही त्यांच्याकडे रात्रीचे जेवण घेतले.

पण जितके अनपेक्षित तितकेच सुखद असे घडले ते म्हणजे कुरुक्षेत्र विद्यापीठातील प्राध्यापक हरी अनंत फडके यांच्याशी परिचय झाला. प्रा. फडके हे बनारसचे. त्यांचे वडील अनंतशास्त्री हे संस्कृतचे मोठे पंडित. माझे श्वशुर स्व. वा. प्राध्यापक श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर यांचा आणि अनंतशास्त्र्यांचा गाढा स्नेह. प्राध्यापक फडके हे कुरुक्षेत्र विद्यापीठात इतिहास विभागात आहेत. कुरुक्षेत्राच्या प्राचीन इतिहासावर त्यांच्याइतकी अधिकारवाणीने बोलणारी माणसे क्वचितच भेटतील. वेद, महाभारत, पुराणे, फार काय, पाणिनीच्या सूत्रांतील कुरुक्षेत्रासंबंधीचा भौगोलिक उल्लेख इत्यादीसंबंधीची त्यांची माहिती थक्क करून सोडणारी आहे. योगायोगाने फडक्यांची आणि माझी गाठ विद्यापीठात पडली. फडके पतिपत्नींचे सौजन्य वाखाणण्यासारखे होते. दुपारचे जेवण आम्ही त्यांच्याकडे घेतले. संध्याकाळी

फडक्यांनी आम्हांला कुरुक्षेत्रातील महत्त्वाची स्थळे दाखविली. ब्रह्मसरोवर येथे लाखोंनी यात्रा भरते. हरियाणा सरकारने नदीच्या कालव्याद्वारे या स्थळाला मोठे रमणीय रूप दिले आहे. ज्योती सरोवर व शंकराचार्यांचा मठ येथे श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली. राजा कर्ण का टिला येथे कर्णाचा रथ चिखलात रुतून पडला होता. अशी अनेक स्थळे फडक्यांमुळे आम्हांला पाहायला मिळाली. फडके पतिपत्नींचा पाहुणचार पाहून मला रघुवंशातील यजमान कोण आणि पाहुणे कोण या पंक्तीची आठवण झाली. हरियाणाचा समग्र इतिहास लिहिण्याचे काम फडक्यांकडे देण्यात आले आहे.

सत्तावीस नोव्हेंबर १९७४ ला आम्ही पानिपतला पोहोचलो. स्टेशनवरचा अनुभव आम्हांला धक्का देणारा मिळाला. मी स्टेशनवर विचारले, ''भाई, यहाँ जंग हुई थी वह जगह कहाँ है?'' तिकीटचेकर म्हणाला, ''कौनसी जंग? कहाँकी जंग? यहाँ तो सब अमन (शांती) है.'' मी त्याला १७६१ च्या संग्रामासंबंधी सांगितले तेव्हा तो क्षणभर विचारात पडला. थोड्या वेळाने तो म्हणाला, ''हां हां, अब आया समझमें. येथून अडीच मैलांवर काला आम म्हणून एक जागा आहे. तेथे तुम्ही जा. तेथे एक स्मारकही उभे केले आहे.''

पानिपत संग्रामाच्या काळी व १९४७ पर्यंत या शहरात दोन तृतीयांश लोकसंख्या मुसलमानांची होती. सुप्रसिद्ध उर्दू कवी अल्ताफ हुसेन हाली, उर्दूचे समीक्षक बहीदुद्दीन सलीम व आजचे गाजलेले साहित्यिक ख्वाजा अहमद अब्बास हे पानिपतचे. पण १९४७ नंतर शहराचे स्वरूप पार बदलले. मुसलमानांची वस्ती फार तर शेकडा चार-पाच टक्के उरली होती. पंजाबचे हिंदू निर्वासित भरपूर प्रमाणात येथे आले.

आम्ही रिक्षात बसून 'काला आम'च्या वाटेला लागलो. सायकलरिक्षा चालविणारा हनीफ नावाचा तरुण होता.

वाटेत पानिपतच्या आठवणींनी माझ्या मनात केवढे तरी काहूर उठले. या पानिपत प्रसंगाबद्दल तरी मराठी जनमानसात जे ग्रह अद्यापपर्यंत घट्ट बसले आहेत ते तरी बरोबर आहेत काय?

पानिपतवर आपल्याकडे वाचनात येणाऱ्या तीन बखरी प्रमुख आहेत. भाऊसाहेब कैफियत, भाऊसाहेब बखर व रघुनाथ यादवाची बखर. होळकर थैली व बुंदेले यांची बखर यांचाही काही जण अभ्यास करतात. त्या काळी संग्रामात हजर असलेल्यांची अस्सल पत्रे वाचण्याचे श्रम कोणी घेत नाही.

त्यातल्या त्यात भाऊसाहेबांची बखर हा ग्रंथ वाङ्मयाच्या दृष्टीने अप्रतिम असल्यामुळे मराठीत पदवी परीक्षेसाठी किंवा पदव्युत्तर अभ्यासासाठी हा ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचावा लागतो. त्याचा परिणाम असा झाला आहे की, वाङ्मयीन गुणांबरोबरच विकृत माहितीचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होत जातात. विद्यार्थ्यांनी

ऐतिहासिक माहितीविषयी सावधगिरी बाळगावी यासाठी मराठीच्या प्राध्यापकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता काय, अशी भूमिका सर्वत्र दिसते.

बखरीतून आलेले भाऊसाहेब पेशव्यांचे चित्रण इतिहासाला धरून नाही. बखरीतील भाऊसाहेब हा गर्विष्ठ, उद्दाम प्रवृत्तीचा, तापट असा दाखविला आहे. नानासाहेबांना पानिपतवर अडकलेल्या भाऊसाहेबांबद्दल आस्था नव्हती; भाऊसाहेबांनी दिल्लीचे तख्त फोडले, सूरजमल जाटाला विनाकारण दुखविले, त्याची बोलणी धुडकावून लावली, अभिमानाला बळी पडून आपली दुःस्थिती नानासाहेबांस कळविली नाही, इत्यादी भारुडाला प्रत्यक्ष पत्रे पाहता काही आधार दिसत नाही. दुर्दैवाने शेजवलकरांच्या चिकित्सक ग्रंथात पेशवे, भाऊसाहेब, मराठ्यांची राजनीती इत्यादीसंबंधी वेळोवेळी निष्ठुर कोरडे ओढण्यात आले आहेत. हा शेजवलकरांचा खास दृष्टिकोण. वस्तुस्थिती नजरेआड करणे व विपर्यास सुचविणे अशा आशयाच्या लॅटिन भाषेतील म्हणीची येथे आठवण होते.

कधी कधी आमच्या कवींना असे विषय महाराष्ट्राच्या इतिहासाला स्फूर्तिदायक ठरतील असे वाटून या विषयावर कविता करण्यात येतात. पण वस्तुस्थिती तशी नाही. रोहिले व त्यांचा पाठीराखा अहमदशहा अब्दाली यांच्यापासून दिल्लीची पातशाही वाचवावी व तिचा कारभार (मुखत्यारी हा शब्द तत्कालीन कागदपत्रांत आहे) आपल्याकडे असावा यासाठी तर मराठ्यांनी पानिपत गाजविले. ते तख्त कशाला फोडतील ? दिल्लीत मराठ्यांना पैशाची चणचण वाटू लागली तसे त्यांनी दिवाणे छताचे उरलेले चांदी-सोने (पूर्वी इतरांनी काढले होते) काढले.

१७६० सप्टेंबर २७ चे सदाशिवरावभाऊंचे स्वतःचे पत्र पाहा :

"आत बंदोबस्त आमच्या हातास. आतील आम खासाचा छत आठ नव लाखाचा, त्यात काही वजीराने (गाजीउद्दीन इमादुल्मुल्क) काढली. बाकी आम्ही सरदारांच्या (शिंदे-होळकर) मते काढिली. काही सरदारांस खर्चास दिले. वरकड सध्या पोटास कामास आले."

हा तख्त फोडण्याचा भ्रमाचा भोपळा. तख्त फुटले नाही. भोपळा मात्र फुटला !

ऐतिहासिक घटनांचे परिणाम किती अनपेक्षित असे होतात हे पाहिले म्हणजे विस्मय वाटतो. मोगलांनी पठाणांचा पाडाव करून आपले साम्राज्य स्थापन केले. पठाणांवर त्यांची सक्त नजर असे. पण औरंगजेब दक्षिणेत सत्तावीस वर्षे अडकला आणि उत्तर भारतातील शिथिल शासनाची संधी साधून हजारो पठाण कुटुंबे वायव्य प्रांतातून येऊन गंगा-यमुनेच्या खोऱ्यात पसरली. (आपले दिवगंत राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे घराणे त्यापैकीच एक. पण ते पंतोजीचे, शिपायाचे नव्हे.) पठाण, रोहिले (रोह म्हणजे डोंगर, डोंगराळ भाग), अफगाण ही एकाच जातीची नावे आहेत. रोहिले

वसले त्या वस्तीला पूर्वी कटेहर म्हणत. आता रोहिलखंड म्हणतात. हळूहळू त्यांची सत्तास्थाने निर्माण झाली. बरेलीचा हाफिज रहमतखान, पिलिभितचा इंदेखान, रामपूरचा अली महंमद खान, फरुखाबादचा महंमद बंगश, नजीबगडचा नजीबखान हे रोहिलेच. मोगल बादशाहीत त्यांचे वर्चस्व वाढू लागले. हा धोका ओळखूनच मराठ्यांनी अयोध्येच्या नबाबाला त्यांच्याविरुद्ध मदत केली. रोहिले हे अफगाण व कट्टर सुन्नी तर लखनौचे सफदरजंग शुजाउद्दौला हे इराणी व शिया. दोघांतून विस्तव जात नव्हता.

नजीबखानाचे बळ वाढत होते. त्यात भर म्हणून की काय, अफगाणिस्तान हा नादिरशहाच्या इराणी साम्राज्यातून फुटून निघाला. १७४७ मध्ये अहमदशहा अब्दाली याने स्वतंत्र अफगाण राज्याची स्थापना केली. १७५३ मध्ये त्याने पंजाब घेतला. मराठ्यांनी २३ मे १७५२ रोजी मोगल बादशाहतीचे रक्षण करण्याची जबाबदारी घेतली. पठाण हे स्वतंत्रपणे अगर बहादुरशहाच्या पाठिंब्याने मोगल बादशाहत बळकावतील असा रंग दिसू लागला.

शिवाजी महाराज म्हणतात, ''दक्षणाचे पातशहास (विजापुरातील पठाण वर्चस्व) पठाण जाला हे गोष्टी बरी नव्हे. पठाण बळावला म्हणजे एक उपरी एक कुळी दक्षिणीयांची घरे बुडवील. कोणास तगो देणार नाही.''

नादिरशहाच्या स्वारीस उद्देशून बाजीराव पेशव्यांचे उद्‌गार होते : 'अप्पा परराज्य राहिले तरी सर्वांवरच आहे.'

आणि भाऊसाहेबांचे पुढील उद्‌गार पाहा :

''अब्दालीची जड हिंदुस्थानचे पातशाहीत रुतो देणे हे अयोग्य. सांप्रत तैमूरची पातशाही अबदालीने गारत केली म्हणजे अमीर रजपूत आहे याची पातशाहात घ्यावयाची राहील की काय? हिंदुधर्म व तैमूर याचे काहीच नाही असे होणे हे आमचे पहिल्यात कसे येईल? पातशाहात दिल्लीस कायम करून परकी शत्रू नाहीसा करावा मग घरचा बंदोबस्त सहजात होईल.''

''शुजाउद्दौल्याला पत्र : ''अफगाण हे हिंदुस्थानी लोक, मानमरातब व अब्रू ह्यांचे शत्रू होत. हिंदुस्थानातील मुसलमानांना ते हिंदूंपेक्षाही वाईट लेखतात. तैमूरचे घराण्याचे मिठाला जागावे.''

भारतात परकी हस्तक्षेप नको, ही सतराव्या व अठराव्या शतकातील महाराष्ट्रीय नेतृत्वाची राजनीती आहे. मग बखरी काहीही म्हणोत. महाराष्ट्राचे नेते काय धोरणाने वागत होते याला पुरावा म्हणजे शिवाजी महाराज, संभाजीराजे (दोन दिवसांचे तुर्क, त्यांना जाऊन मिळालात!), राजाराम महाराज (ताम्रांचे राज्यात बहुत कष्ट पडले. हे महाराष्ट्र राज्य देवाधर्माचे), बाळाजी विश्वनाथ (मराठा आज कुल रक्षिता तरच तुमचे

राहाणे या मुलुकात होऊन सर्वही अनुकूल होते. हे जिवावरचे खेळ असत) अशी ही परंपरा आहे.

कुंजपुरा घेऊन पूर्वी ठरल्याप्रमाणे भाऊसाहेब दिल्लीला ताबडतोब परतले असते तर अब्दाली यमुनापार होऊन त्यांना अडवील असा संभव राहिला नसता. अब्दालीला यमुनेला उतार सापडला (२५ ऑक्टोबर १७६०) आणि कुंजपुरा मराठ्यांच्या हाती पडला १६ ऑक्टोबरला.

पानिपतवर मराठ्यांना रसद येण्याची थांबली. त्यांची उपासमार झाली. पण १४ जानेवारीला त्यांनी दाखविलेल्या पराक्रमाने शत्रूही स्तिमित झाला.

अहमदशहा अब्दालीने जयपूरचा सवाई माधवसिंह याला पाठवलेले पत्र पाहा :

''हां हां म्हणता सिंहासारखे शूर वीर आणि शक्तिशाली शिपाई विजेप्रमाणे एकमेकावर तुटून पडले. त्यांनी गाजविलेले शौर्य यापूर्वी कधीच दृष्टीस पडले नव्हते. रुस्तम आणि इस्फिंदारसारख्या वीरांनी हे युद्ध पाहिले असते तर त्यांनी आश्चर्याने आपली बोटे चावली असती. शत्रूंनी इतके शौर्य दाखविले आणि लढण्याची इतकी शर्थ केली की इतरांकडून होणे अशक्य होते... शूर आणि क्रूर शत्रूने शौर्याने लढण्यात कोणतीच कसूर केली नाही.''

रामपूरच्या नबाबाचा कारभारी शिवप्रसाद हा पानिपतवर हजर होता. त्याचे शब्द ''मराठ्यांनी जे शौर्य गाजविले त्याचे वर्णन शक्तीच्या बाहेरचे आहे,'' असे होते.

काशिराज हाही पानिपतावर हजर होता. तो म्हणतो, ''या निकराच्या युद्धात रोहिल्यांची आठ-नऊ हजार माणसे ठार अगर जखमी झाली... शहावलीखानबरोबर दहा-बारा हजार स्वार, सात-आठ हजार विलायती आणि काबुली शेरबच्च्यांची पथके, पायदळ आणि स्वार, आणि एक हजार जंबूरकचे स्वार होते. धो धो वाहणाऱ्या जलौघाप्रमाणे मराठ्यांनी त्यांना गिळून टाकले.''

'काला आम' या स्थळाकडे जाताना माझे देहभान हरपल्यासारखे झाले. भारतीय युद्धानंतर एक दिवसासाठी वीरगती पावलेले सर्व योद्धे पुन्हा जिवंत झाले होते असा प्रसंग वर्णिला आहे. माझ्या डोळ्यांसमोर १४ जानेवारी १९६१ चे दृश्य संपूर्णपणे उभे राहिले.

आम्ही 'काला आम' पाशी पोहोचलो. तेथे भाऊसाहेबांचा तंबू होता असे दिसते. भोवती गव्हाची शेते पसरली आहेत. बाग-बागाईत व भाजीपालाही भरपूर आहे. 'काला आम'च्या जागेवर एक खांब उभा आहे. खांबावर इंग्रजी व उर्दू या भाषांतून लिहिले आहे : ''येथे १४ जानेवारी १७६१ रोजी अहमदशहा अब्दाली व मराठे यांचे युद्ध झाले.'' अक्षरे पुसट होऊ लागली आहेत. याशिवाय इतर कोणतेही स्मारक नाही. लक्ष्मीबाई मेहेंदळे सती गेली (७ डिसेंबर १७६०) ती जागा शोधण्याचा मी प्रयत्न

केला. नाना फडणिसांचे २८ डिसेंबरचे पत्र आहे : ''ते दिवशी बळवंतराव गणपत यांस छातीत गोळा लागून तसेच घोड्याखाली पडले. तो त्याकडील माणसे धावली. त्याने एकाने तोंडावर तरवारेचा वार केला. दुसऱ्याने गळा कापून शीर नेऊ लागले तो पाच सात राऊत धाऊन सोडविले. गळा अर्धा कापला होता. तसेच आणून दहन केले. समागमे स्त्री अग्निप्रवेश केली.''

मला ती जागा सापडली नाही. आम्ही त्या स्मारकासमोर बराच वेळ उभे होतो. एकाएकी माझ्या पत्नीने तेथील माती स्वत:च्या कपाळाला लावली. थोडीशी माती माझ्या कपाळाला लावीत ती म्हणाली, ''ही माती लावा. ही पानिपतची माती आहे.''

आमचा रिक्षा चालविणारा हनीफ हे पाहत होता. तो म्हणाला, ''आप मरहटे हैं क्या ?'' मी म्हटले, ''हो.'' तो म्हणाला, ''इस जंग में बहोत मरहटे मारे गये.'' मी म्हटले, ''दूसरे मुल्क का बादशहा अपने सबको, हिंदू-मुसलमानोंको लूटने आया था. उसको मुल्कसे निकालने के लिए मरहटे यहाँ आये थे.'' मी बी पेरले. जमीन बरड आहे की काय याची काळजी मी कशाला करावी ?

❖ ❖

# आमची पानिपत मोहीम

इसवी सन १९८१ ची गोष्ट. हरियाणा सरकारतर्फे मला एक पत्र आले. पानिपतचे स्मारक व्हावे म्हणून हरियाणा शासनाने एक योजना आखली होती. ही योजना कशी असावी याचा विचार करण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची एक समिती नेमली. समितीवर मला घेण्यात आले. इ.स. १९७४ च्या २६ नोव्हेंबर रोजी मी पानिपतला जाऊन रणक्षेत्राची बारकाईने पाहणी केली होती. कुरुक्षेत्र विद्यापीठात पानिपतवर माझे दोन-अडीच तास भाषण झाले. विद्यापीठातील माझे मित्र आणि गाढे इतिहास संशोधक प्रा. हरी अनंत फडके यांच्यामुळे हा योग जुळून आला. श्री. फडके यांनी कुरुक्षेत्राचा इतिहास, हरियाणा राज्याचा इतिहास असे दोन संशोधनात्मक ग्रंथ लिहिले आहेत. सध्या ते पानिपतच्या अफगाण-मराठा युद्धासंबंधी मिळतील तितके संदर्भ एकत्र आणून एक बृहत् ग्रंथ लिहिण्याच्या कामात गुंतले आहेत. पानिपतवरील माझ्या निरीक्षणाचा आणि भाषणाचा हरियाणात बराच गवगवा झाला असावा. तज्ज्ञांच्या समितीवर माझी नेमणूक होण्यास ते एक कारण घडले असावे.

समितीची बैठक चंदीगड येथे होणार होती. हरियाणाचे त्या वेळचे राज्यपाल श्री. तपासे यांचे पाहुणे म्हणून आम्ही जाणार होतो. या आमंत्रणाने मला मोठा आनंद झाला. चंदीगडहून सिमला हे जवळ आहे. या निमित्ताने सिमल्याला जाऊन यावे असे आम्ही (मी आणि माझी पत्नी) ठरविले. कार्यक्रम योजला तो असा : बैठकीच्या तीन-चार दिवस आधी निघावे, सरळ सिमल्याला जावे, तेथे एक-दोन दिवस काढून कुरुक्षेत्रास यावे. प्रा. फडके यांच्या सहवासात दोन दिवस घालवावे आणि तेथून निघून चंदीगडला बैठकीस हजर राहावे.

कुरुक्षेत्र स्थानकावर प्रा. फडके हे आम्हांला भेटण्यास आले होते. त्यांना आम्ही हा बेत सांगितला आणि सिमल्याची भेट आटोपून कुरुक्षेत्राला दोन दिवसांसाठी येऊ असे त्यांना कळविले. मुंबईहून निघणारी अमृतसर एक्सप्रेस छत्तीस तासांनंतर सकाळी अकरा-साडेअकरापर्यंत कुरुक्षेत्राला पोहोचते. तेथून पुढे साठ मैलांवर अंबाला स्टेशन आहे. हे हरियाणाचे शेवटचे मोठे स्टेशन. याच्यापुढील स्टेशन म्हणजे पंजाबातील जालंदर. त्याच्या उलट दिशेने अंबाल्यापासून तेवीस मैलांवर चंदीगड हे पंजाब आणि हरियाणा या दोन्ही राज्यांच्या राजधानीचे शहर आहे. अंबाल्याहून आम्ही बसने

निघालो. तेथून चंदीगड पार करून आम्ही पुढे सिमल्याला गेलो. एप्रिल महिन्याच्या मध्यात संध्याकाळी आम्ही सिमल्याला पोहोचलो. सिमल्याला आम्ही चौकशी करून गुलमोहर नावाच्या हॉटेलात मुक्काम केला. पुढील दोन दिवस सिमल्याला आम्ही आनंदात घालविले.

याच आठवड्यात शिवजयंतीचा उत्सव महाराष्ट्रभर साजरा होणार होता. महाराष्ट्राबाहेरही अनेक ठिकाणी स्वतंत्रपणे अगर शासनातर्फे शिवजयंतीचे कार्यक्रम साजरे होत असतात. महाराष्ट्र शासनातर्फे दिल्ली येथे 'माहिती व संपर्क' यांचे केंद्र आहे. शासनाच्या सूचनेवरून त्या वर्षी दिल्लीचा शिवजयंतीचा कार्यक्रम भव्य प्रमाणात करण्याचे ठरले असावे. उणीव होती ती शिवचरित्रावर हिंदीतून बोलणाऱ्या एका तज्ञ वक्त्याची. माझा शिवचरित्राचा अभ्यास कित्येक वर्षांपासून होता. इ.स. १७७४ मध्ये माझे इंग्रजीतील 'शिवचरित्र' छापून शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी समारंभाच्या प्रसंगी रायगड येथे प्रकाशित झाले होते. तेही यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते. ते पुस्तक लोकप्रिय झाले. शिवचरित्रावर माझी अडीचशेच्यावर व्याख्याने महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर झाली होती. तीही मराठी, हिंदी, उर्दू, कन्नड, इंग्रजी इत्यादी भाषांतून. ग्वाल्हेरला तर हिंदीतून माझी सलग अशी शिवचरित्रावर सतत सात-आठ भाषणे झाली. माझ्या हिंदी भाषणाला दोन दोन हजार श्रोते जमत. इ.स. १९७५ च्या जानेवारीत दिल्ली येथे भरलेल्या 'शिवचरित्रा'वरील चर्चासत्रात मी भाग घेतला हाता. माझ्या भाषणांचा आणि लेखनाचा इतका बोलबाला झाला असला तरी महाराष्ट्राच्या प्रस्थापनात याची जाणीव होण्यास बराच काळ जावा लागला. अशा स्थितीत इ.स. १९८१ च्या एप्रिलमध्ये दिल्ली येथील 'शिवजयंती' उत्सवात मला वक्ता म्हणून बोलावण्याचे ठरले. हे निमंत्रण दिल्लीच्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती केंद्राचे होते, की महाराष्ट्रातील प्रस्थापनेचे होते हे सांगता येत नाही. बहुधा प्रस्थापनाच्या आदेशावरूनच हे निमंत्रण निघाले असावे. कार्यक्रम ऐन तोंडावर आला आणि मग त्यासाठी मला बोलावण्याची सर्वांना एकच घाई झाली.

दिल्लीच्या महाराष्ट्र माहिती केंद्राने माझ्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण माझा पत्ता कसा लागावा? मी चंदीगडच्या बैठकीस हजर राहण्यासाठी गेलो असल्याचे या केंद्राला कळले असावे. त्यांनी चंदीगड येथे चौकशी केली असे दिसते. 'पानिपत स्मारक समिती'च्या बैठकीस हजर राहण्यासाठी सेतुमाधवराव येणार आहेत हे नक्की. पण ते अद्याप आलेले नाहीत, असे चंदीगडहून कळविण्यात आले. मी कदाचित कुरुक्षेत्री विद्यापीठात असेन असेही माहिती केंद्राला कळविण्यात आले असावे. माहिती केंद्राने प्रा. ह. अ. फडके यांच्याशी संपर्क साधला. यावर फडक्यांनी त्यांना सांगितले

की, सेतुमाधवराव हे कुरुक्षेत्रावरून पुढे सिमल्याला गेले. दोन-तीन दिवसांनी येतील. सिमल्याला ते कोठे उतरले आहेत याची मला कल्पना नाही.

दिल्लीच्या माहिती केंद्राने माझ्याशी संपर्क साधण्याचा खूप प्रयत्न केला. त्यांनी ठिकठिकाणी विचारणा केली. पण त्यांना आमचा पत्ता लागला नाही. ''यांना आपण पाहिलेत काय ?'' असाच प्रश्न जणू माहिती खाते भेटेल त्याला विचारीत होते!

१५ एप्रिल इ.स. १९८१ रोजी आम्ही सिमल्यात गुलमोहर हॉटेलमध्ये होतो. आमचा हा पत्ता चंदीगड किंवा कुरुक्षेत्र येथे कोणालाही माहीत असणे शक्य नव्हते, आणि दिल्ली येथील शिवजयंतीच्या कार्यक्रमासाठी ऐन वेळी हे लोक माझ्या पाठीवर आहेत याचा पत्ता आम्हांलाही सिमल्यात लागणे शक्य नव्हते.

सिमल्यातील आमचे दोन-तीन दिवस मोठ्या आनंदात गेले. भारतातील थंड हवेची अनेक स्थळे मी पाहिली. सध्या पाकिस्तानात असलेले रावळपिंडीजवळील 'मदी' हे थंड हवेचे ठिकाण, उत्तर प्रदेशातील मसूरी, बंगालमधील दार्जिलिंग, आसाममधील (मेघालय राज्यातील) शिलाँग व दक्षिणेतील उटकमंड, महाराष्ट्रातील महाबळेश्वर व मेळघाट (चिखलदरा) इत्यादी स्थळे आम्ही दोघांनी पाहिली होती. सिमला प्रथमच पाहत होतो.

सिमल्याची गोष्ट काही वेगळीच आहे. इंग्रजांच्या काळात साहेबाच्या सोयीसाठी सिमल्याला दुय्यम राजधानीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे अनेक खात्यांच्या आणि संस्थांच्या इमारती तेथे उभ्या राहिल्या होत्या. आजही हिमाचल प्रदेशाची राजधानी म्हणून सिमल्याचे महत्त्व कायम राहिले आहे. राज्यपालांचे निवासस्थान, विधिमंडळाची इमारत, भारतीय इतिहास आणि समाजशास्त्र केंद्राची इमारत, बँडस्टँडचे मैदान, भव्य चर्च इत्यादी प्रेक्षणीय स्थळे सिमल्यात आहेत. सिमल्याचे रेल्वे स्टेशनही आल्हाददायक स्थळी बांधण्यात आले आहे. माल रोडवरील वर्दळ पाहता हिवाळ्यात सगळे गाव बर्फाने झाकले जाते हे लक्षात येत नाही. सिमल्याभोवतीची वस्ती जवळपासच्या डोंगरदऱ्यांतून पंधरावीस मैलपर्यंत पसरली आहे. सिमल्यातील अंतरे लांब लांब आहेत. चढउतार बरेच आहेत. सिमल्यात कुठेही जा, एक चढावे तरी लागते नाही तर उतरावे तरी लागते!

गुलमोहर हॉटेलमध्ये आम्हांला निर्भेळ एकांत लाभला. इ.स. १९८१ मध्ये मी सत्तरी ओलांडली होती. माझी पत्नी माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान. पण सिमल्याच्या मुक्कामात आम्ही जणू काय 'मधुचंद्रा'चा नव्याने अनुभव घेत होतो. हा आमचा तिसरा मधुचंद्र म्हणावा लागेल. ३ डिसेंबर इ.स. १९३३ विवाहानंतर पंढरपुरास चंद्रभागेच्या वाळवंटात, ३० ऑगस्ट १९४३ मध्ये श्रीनगरच्या दाल तलावाच्या परिसरात माझ्या

पत्नीच्या वाढदिवशी आणि आता सिमल्याच्या गुलमोहर हॉटेलमध्ये. हे तिन्ही मधुचंद्र हृदयावर कायमचे कोरले गेले आहेत.

''तोच चंद्रमा नभात'' या शांता शेळके यांच्या गीतातील ओळी मी ऐकल्या होत्या. पण त्यातील पुढील अर्थ मात्र आम्हांला जाणवला नाही. आमच्या जीवनात फुले वाळली नव्हती. पहिल्यावहिल्या प्रीतीच्या खुणा शोधून काढण्याची आम्हांला गरज नव्हती. फुलांचा सुगंध तितकाच मादक आणि प्रीत पहिलीवहिलीच. ती रात्र आम्ही चालून आलेल्या जीवनाच्या भल्याबुऱ्या आठवणींची उजळणी करीत आणि त्यांचा आस्वाद घेत घालविली. गेलेले दिवस परत येत नाहीत हे खरे. पण रम्य आठवणी, सुखदुःखाची भागीदारी, मुलाबाळांच्या संगतीत मांडलेला प्रसन्न संसार यांचा भरपूर आस्वाद घेणे हे तर जीवनाच्या उतरलेल्या उन्हात कुणालाही शक्य व्हावे. एकमेकांच्या सहवासात आणि गप्पागोष्टीत रात्र संपली, पण गोष्टी संपल्या नाहीत.

''अविदित गत यामा'' अशी आमची स्थिती झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही माल रोडवर मनसोक्त हिंडलो. त्या दिवशी चित्रपटगृहात राजेश खन्ना आणि हेमामालिनी यांचा 'कुदरत' हा चित्रपट चालू होता. चित्रपटात सिमल्याचीच दृश्ये होती. इतकेच नव्हे तर ज्या चर्चमधील एक प्रसंग चित्रपटात दाखवला होता ते चर्च चित्रपटगृहाच्या मागेच होते. ही दृश्ये पाहून माझी पत्नी मुग्ध झाली. अशी दृश्ये पाहिल्यावर मधूनच ती म्हणे, ''अहो, ते चर्च पाहा. आपण आत्ताच पाहून आलो ना, तो बँडस्टँड पाहा... ते हॉटेल पाहा...'' चित्रपट आणि वस्तुस्थिती या दोन्हींचा ती मनमुराद आनंद घेत होती. चित्रपट आटोपल्यानंतर आम्ही बँडस्टँडवर थोडा वेळ बसलो, आणि रस्त्यावरील हॉटेलमध्ये जेवण घेऊन गुलमोहरकडे परतलो.

शेवटी प्रसन्न मनाने आम्ही सिमल्याहून कुरुक्षेत्राकडे प्रयाण केले. कुरुक्षेत्राला आम्ही परत आल्यानंतर प्रा. फडके आम्हांला म्हणाले, ''अहो, तुमच्याबद्दल दिल्लीहून सारखी चौकशी होत होती. उद्या-परवा शिवजयंतीचा कार्यक्रम आहे. तुम्हांला मान्य असल्यास दिल्लीहून तुम्हांला नेण्यासाठी मोटार येईल. आणि कार्यक्रम आटोपल्यावर तुम्हांला चंदीगडला पोहचविण्यात येईल, असे माहिती केंद्राचे म्हणणे आहे.''

मी विचार केला. कुरुक्षेत्रावरून दिल्ली शहाण्णव मैल आणि कुरुक्षेत्राच्या उत्तरेकडे अंबालामार्गे चंदीगड नव्वद मैल. ही दगदग आपल्याला झेपणार नाही. चर्चा पानिपतची आणि अडकून पडायचे दिल्लीत हा काही शहाणपणा नव्हे. मी म्हटले, ''मला उशिराने आणि ऐन वेळी बोलावणाऱ्यांनी शिवजयंती अन्य कुणाला बोलावून साजरी करावी. मी येथून सरळ चंदीगडलाच जाईन.''

ठरल्याप्रमाणे आम्ही चंदीगडला पोहोचलो. हरियाणाचे राज्यपाल श्री. तपासे यांच्याकडे आमचा मुक्काम होता. श्री. तपासे यांच्या धार्मिक आणि सौजन्यशील वृत्तीमुळे आम्ही भारावून गेलो. तपासे कुटुंब हे मोठ्या धार्मिक वृत्तीचे. त्यांच्या वाड्यात रोज भजनाचे सुंदर कार्यक्रम होत. त्यात आम्ही सहभागी झालो. त्यापूर्वी चंदीगडजवळील अतिशय रमणीय अशा 'पिंजोर गार्डन' नावाच्या बागेत आम्ही फेरफटका मारला. राज्यपालांच्या सहा फूट उंचीच्या बॉडीगार्डासमवेत मोठ्या राजेशाही थाटात आमची मोटार पिंजोरच्या दिशेने निघाली. माझी पत्नी म्हणाली, ''आपण गव्हर्नर आहोत की काय ?'' मी हसून म्हटले, ''नाही, आपण केवळ ज्ञानाचे उपासक आहोत.''

पिंजोर गार्डन म्हणजे मोगल पद्धतीच्या बागेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. भारतातील एक सुप्रसिद्ध सौंदर्यस्थळ असे त्याचे वर्णन करण्यास हरकत नाही. नेताजी पालकरला अनन्वितपणे वागवून त्याचे धर्मांतर घडवून आणणारा फिदाईखान (बहादुरखानाचा भाऊ आणि औरंगजेबाचा दूधभाऊ) हा पंजाबचा सुभेदार असताना त्याने निर्माण केलेली बाग म्हणजे 'पिंजोर गार्डन'. बाग पाहत असताना फिदाईखानाचा इतिहास मला आठवल्यावाचून राहिला नाही.

दुसऱ्या दिवशी झालेल्या बैठकीत पानिपतच्या स्मारकाच्या चर्चेची बैठक झाली. बैठकीस तज्ज्ञ मंडळी हजर होती. पानिपतच्या शेवटच्या युद्धाचे हे स्मारक असावे, आणि तेही भाऊसाहेबांचा तळ पडला होता (त्या जागेला आता 'काला आम' असे म्हणतात.) त्या ठिकाणी स्मारक बांधले जावे असे मी सुचविले. पराजय झाला तरी परकीय आक्रमण परतवून लावण्याची प्रेरणा तेथे आहे. रणांगणावर मराठ्यांनी अतुल शौर्य गाजविले. त्यामुळे शत्रूही थक्क होऊन गेला. स्मारकाच्या स्तंभाखाली चित्रे कोरलेली असावीत, चित्रात विश्वासराव, भाऊसाहेब, बळवंतराव मेहेंदळे, जनकोजी शिंदे, इब्राहिमखान गार्दी, यशवंतराव पवार इत्यादींचे पराक्रम दाखविण्यात यावेत. भारताला परकीय आक्रमणाची झळ नको म्हणून पाऊण लाख मराठ्यांनी जेथे आपले बलिदान केले आणि त्याबरोबरच अफगाणांचे सत्ता स्थापण्याचे स्वप्न कायमचे नाहीसे केले ते पानिपत. पानिपतचा असा तपशील मी बराच वेळ सांगत होतो.

बैठकीतील चर्चेत मात्र सूर उमटला तो असा की, पानिपतला तीन युद्धे झाली. पहिले युद्ध बाबर आणि इब्राहिम लोदी यांच्यात (इ.स. १५२६), दुसरे युद्ध अकबर आणि हिंमतबहादूर ऊर्फ हेमू यांच्यात (५ नोव्हेंबर इ.स. १५५६) आणि तिसरे युद्ध अब्दाली आणि मराठे यांच्यात (१४ जानेवारी इ.स. १७६१). या तिन्हींचे एकच स्मारक करावे की वेगवेगळे यावर चर्चा झाली. या तिन्ही युद्धांची रणांगणे एकमेकांपासून जवळच आणि एकाच भूप्रदेशातील होती. शिवाय पानिपतच्या दुसऱ्या

युद्धात अकबरशी लढणारा वीर पुरुष हेमू हा हरियाणाचा. तीन वेगवेगळ्या स्मारकांची कल्पना कुणालाच पटली नाही. मग मी एकाच भव्य स्मारकाची योजना सुचविली. नाही तरी बाबर, अकबर आणि अब्दाली हे तिघेही भारताच्या दृष्टीने आक्रमकच. अशा युद्धात पराजय जरी झाले तरी प्रतिकाराची जिद्द ही महत्त्वाची. या तिन्ही युद्धांत प्रतिकार करणाऱ्यांत हिंदू-मुसलमान आदी जमाती एकत्र आल्या होत्या. म्हणून तिन्ही युद्धांचे एक योग्य स्मारक होणे शक्य होते. मी सुचविले की, स्मारक म्हणून एक स्मृतिस्तंभ उभारावा. स्तंभावर हाताचे दोन पंजे (हात उभारलेले) एकात एक अडकलेले असे दाखवावे, आणि खाली एक वाक्य लिहावे : ''परकीय आक्रमणाच्या विरुद्ध आम्ही एक आहोत. बचेंगे तो और भी लढेंगे.'' स्तंभाच्या खाली तिन्ही युद्धांतील प्रसंग कोरले जावेत. पानिपतला एक पदार्थसंग्रहालय, एक संरक्षण प्रशिक्षणालय (डिफेन्स ॲकॅडेमी) ही स्थापण्यात यावीत. युद्धशास्त्रविषयक साहित्याचे एक उत्तम ग्रंथालयही चालू करण्यात यावे. अशाही काही सूचना मी मांडल्या. बैठकीतील मंडळींना त्या आवडल्या. एक आराखडा तयार करण्यात येऊन तपशील ठरवावा असाही बैठकीत विचार मांडण्यात आला.

दुसऱ्या दिवशी आम्ही चंदीगड सोडले. त्यानंतर श्री. तपासे यांची मुदत संपली. हरियाणात मंत्रिमंडळे आली आणि गेली. स्मारकाची योजना धूळ खात पडली आहे.

गेल्या वर्षी आकस्मिकपणे ग्वाल्हेरचे सरदार आंग्रे यांचे पत्र मला आले : ''हरियाणा शासनाने पानिपत स्मारकाची योजना पुन्हा हाती घेतली असून ती योजना अमलात आणण्याचे काम श्रीमंत विजयाराजे शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. या योजनेसाठी हरियाणा शासन वीस-बावीस लाख रुपये खर्च करण्यास तयार आहे. एकदा तुमच्याशी स्मारकासंबंधी चर्चा करायची आहे.'' अशा अर्थाचे ते पत्र होते. त्यालाही एक वर्ष होऊन गेले. स्मारकाची चर्चा करण्याची वेळ केव्हा येणार कळत नाही. हे पानिपतचे स्मारक म्हणावे की स्मारकाचे पानिपत म्हणावे?

''तिफली गयी अलामते पीरी अयां हुई
हम मुन्तजिर ही रह गये अहले शबाब के!''

– बालपण सरले. आता वार्धक्याची लक्षणे दिसू लागली. हा सर्व काळ मैफिलीतील सुंदर युवतींची वाट पाहण्यातच गेला. हाती मात्र वार्धक्य पडले!

अशी ही आमची इ.स. १९८१ ची पानिपतची मोहीम. आज वय त्र्याऐंशी – बचेंगे तो और लढेंगे!

❉ ❉

# कोस्लरच्या जीवनातील स्त्रिया

ऑर्थर कोस्लरचे आयुष्य म्हणजे विसाव्या शतकातील युरोपच्या प्रचंड घडामोडींचा आलेखच होय. कोस्लरचा आजा हा रशियन ज्यू. शंभर वर्षांपूर्वी तो हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे येऊन स्थायिक झाला. कोस्लरचा बाप हा लहानसहान धंदे चालवून आपले 'मध्यमवर्गाचे' जीवन जगत असे. कोस्लरचा जन्म १९०५ मधील. पहिले महायुद्ध, ऑस्ट्रियन साम्राज्याचा नाश आणि त्यामुळे व्हिएन्ना शहरावर आलेली अवकळा, हंगेरीतील मध्यमवर्गाची दयनीय स्थिती आणि त्याहूनही दयनीय व उपासमारीच्या तडाख्यात सापडलेले साहित्यिक हे कोस्लरच्या विद्यार्थिदशेतील अनुभव.

हंगेरीचा सुप्रसिद्ध साहित्यिक अटिला जोसेफ हा असाच उपासमारीत वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी वारला (१९३७). तोही गाडीखाली आत्महत्या करून. त्याची पुढील एकच कविता कशी क्षुब्ध करणारी आहे पाहा :

''माझा परमेश्वर नाही, माझा राजा नाही, माझ्या आईने कधी लग्न केले नाही. मला पाळणाही माहीत नाही आणि शवपेटीही नाही. मला प्रेम ठाऊक नाही. खायला काहीच नसल्यामुळे मी गेले तीन दिवस आपला अंगठा चघळत बसलो आहे. आता मी वीस वर्षांचा निरोगी आणि तगडा असा तरुण असलो तरी मी माझी वीस वर्षे कुणालाही विकत देण्यास तयार आहे. कुणी मला विकत घेण्यास तयार नसेल तर सैतानाने मला विकत घ्यावे. सैतानाच्या आहारी गेल्यावर मी माझी अक्कल वापरून निष्पापपणे कुणाला तरी लुबाडीन आणि खून करीन. आणि मग शेवटी मला फासावर लटकवण्यात येईल. मी जमिनीत पुरला जाईन. आणि मग माझ्या साध्या आणि पवित्र हृदयातून समृद्ध पण विषारी गवताचे उदंड पीक येईल.

**टिल, ऑन ए रोप, दे हँग मी हाय,**
**अँड इन द ब्लेसेड अर्थ् आय लाय**
**अँड लश अँड पॉइझन्ड ग्रासेस स्टार्ट**
**रँक फ्रॉम माय प्युअर ॲण्ड सिंपल हार्ट...**

कोस्लर हा व्हिएन्ना येथे इंजिनिअरिंग कॉलेजचा विद्यार्थी. पण पॅलेस्टाइनमधील ज्यू वसाहतींची त्याला अनिवार ओढ लागल्यामुळे कोस्लरने इंजिनियरिंगचा अभ्यास

मध्येच सोडून दिला आणि त्याने पॅलेस्टाइनला जाऊन तेथील चळवळीचा अभ्यास केला.

पॅलेस्टाइनमध्ये कोस्लर हा दोन वर्षेच होता. ज्यू लोकांच्या धडपडीचे त्याला कौतुक वाटले. पण तो हाडाचा युरोपियन असल्यामुळे झिओनिझममध्ये त्याला विशेष रस वाटला नाही. या ज्यू राज्याचे युरोपीय संस्कार हळूहळू गळत जाणार, हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन होणार, मद्यपानावर बंधने येणार, जुन्या धार्मिक रूढी पुन्हा चालू करण्यावर भर दिला जाणार. या गोष्टी कोस्लरच्या युरोपियन जडणीघडणीत बसणाऱ्या नव्हत्या. तो युरोपमध्ये परत आला आणि त्याने जर्मनीतील प्रसिद्ध उलस्टिन ट्रस्टच्या उदारमतवादी वर्तमानपत्र समूहात सहसंपादक म्हणून नोकरी पत्करली.

जर्मनीवर हिटलरची छाया पडू लागली होती. जर्मन तरुण आणि तरुणी हिटलरच्या वेडाने भारावून गेली होती. कोस्लरने आपल्या चार खंडात्मक आत्मचरित्रात ('ॲरो इन द ब्लू', 'द इन्व्हिजिबल रायटिंग', 'डायलॉग विथ डेथ' आणि 'स्कम ऑफ द अर्थ') एक मोठी मजेदार गोष्ट दिली आहे. ती अशी :

कोस्लरचा एक मित्र एहरेन्डार्फ हा १९३२ मध्ये एका नाचाच्या कार्यक्रमाला गेला होता. तेथे त्याला एक सुरेख तरुणी भेटली. तिने आपल्या वक्षस्थळावर नाझींचे प्रतीक म्हणून स्वस्तिकाच्या आकाराचे ब्रूच धारण केले होते. नाचानंतर तो तिला आपल्या खोलीवर घेऊन गेला. ऐन मीलनाच्या वेळी ती तरुणी एका कुशीवरून अर्धवट उठली आणि रोमन पद्धतीने तिने दुसरा हात पुढे आणला आणि म्हटले, 'हेल हिटलर.' या भलत्या प्रकाराने एहरेन्डार्फ अक्षरशः चाट पडला. नंतर ती तरुणी त्याला म्हणाली, ''मी आणि माझ्या मैत्रिणींनी गंभीर शपथ घेतली आहे आणि ती म्हणजे स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत नाजुक प्रसंगी हिटलरची आठवण करायची!''

१९३१ मध्ये डिसेंबरच्या एकतीस तारखेस कोस्लरने कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. तेथे हिटलरसारख्यांचे वेड हा प्रकार नव्हता. पण पक्ष आपल्यावर तुटून पडेल ही सारखी भीती असे. याचे उदाहरण म्हणून कॉम्रेड हिल्डाची हकीकत त्याने दिली आहे. एका बैठकीत कॉम्रेड हिल्डा आली. ती फार काळजीत दिसत होती. ती म्हणाली, ''अहो, जरा खिडकीतून पाहा तो तेथे आहे का?'' आम्ही म्हटले, ''तेथे कोणी नाही. कोणी पोलिस मागे लागला आहे का?'' ती म्हणाली, ''पोलिसबिलिस नाही. तो आहे आमच्या पक्षाच्या जिल्हा समितीचा सभासद. त्याला माझ्याबरोबर झोपायचे आहे. मी नकार दिला आणि आता तो सगळीकडे सांगत सुटला आहे की, मी पक्षशिस्तीचा भंग केला आहे. पक्ष माझ्यावर तुटून पडणार. आता मी काय करू?'' असे म्हणतानाच हिल्डाचा चेहरा एका मुखवट्याप्रमाणे अचल झाला. तिचे डोळे म्हणजे काचा बनल्याप्रमाणे झाले. तिचे ओठ वर दुमडले गेले. मेलेल्या सशाचे

तोंड तिरसटपणे ओढलेले वाटावे (कोस्लरने स्नार्ल हा शब्द वापरला आहे.) तसे तिचे झाले. ती वेडाची लक्षणे होती. कोस्लर आणि त्याचे सहकारी यांनी तिला ताबडतोब दवाखान्यात पोहोचविले.

नाझींच्या प्रभावाखाली उलस्टिन वर्तमानपत्रसमूहात बदल होऊ लागला. जुन्या कर्मचाऱ्यांना काटकसरीच्या नावाखाली हळूहळू काढण्यात येऊ लागले. पण मुख्य कारण नाझींचा प्रभाव हे कोणी सांगत नसे. कोस्लर आणि त्याचे सहकारी एकमेकांना म्हणत, ''आज कुणाच्या नशिबी वांगलून आहे?''

हा वांगलून कोण? चीनमध्ये पूर्वी मिंग घराण्याची राजवट चालू होती. गुन्हेगारांचा शिरच्छेद करण्याचे काम वांगलून याच्याकडे देण्यात येई. अत्यंत कुशलतेने तो शिरच्छेद करतो अशी त्याची ख्याती होती. गुन्हेगारांचा वध करताना त्यांना फासावर लटकवायचे असे सरकार जाहीर करी. पण फासाच्या फळ्यांच्या पायथ्याशी वांगलून उभा असे. गुन्हेगार फासाच्या चौथऱ्याच्या पायऱ्या चढू लागला की वांगलून त्याच्यावर सफाईने वार करी. त्या गुन्हेगाराचे शिर धडापासून वेगळे होऊन जमिनीवर पडे. तज्ञ शिरच्छेदक म्हणून वांगलूनची कीर्ती झाली खरी, पण त्याला एका गोष्टीची मोठी रुखरुख असे. आपल्या वाराने डोके धडावरून खाली कोसळते खरे, पण डोके तर कापले जावे आणि धडावरून तर खाली पडू नये यात खरी सफाई आहे असे त्याला वाटे. पण ते त्याला जमत नव्हते.

वांगलूनने शेकडो माणसे मारली आणि शेवटी त्याच्या भाग्याचा दिवस आला. एक गुन्हेगार चौथऱ्याच्या पायऱ्या चढू लागला. या खेपेचा वांगलूनचा वार इतका सफाईचा होता की गुन्हेगाराचे डोके कापले गेले तरी ते धडावर जसेच्या तसेच होते. तो इसम त्याच स्थितीत पायऱ्या चढला आणि वांगलूनला म्हणाला, ''अरे, मला तरवारीने मारायचे, फासावर का पाठवतोस?'' वांगलूनला धन्य धन्य वाटले. ''अरे, हा मेला असून याला माहीत नाही!'' तो म्हणाला, ''अरे, माझी कला कशी आहे? मान तरी डोलावशील की नाही?'' त्या माणसाने मान डोलावली. लागलीच त्याचे डोके धडावरून खाली कोसळले. वांगलूनच्या कलेला यशाची पावती मिळाली! सफाईने गळा कापणे ही ती कला.

कोस्लर हा कम्युनिस्ट झाला खरा. पण त्या पक्षाची जर्मनीतील कारस्थाने, धावपळी, धरपकडीची भीती इत्यादी सर्व त्याला झेपले नसावे. नाझी दहशतवाद हा या पक्षाला जड जाऊ लागला होता. पक्षाला केव्हा बेकायदेशीर ठरविले जाईल याचा नेम नव्हता. असे झाल्यास पाच-पाचांचे गट भूमिगत राहून काम करतील असा निर्णय घेण्यात आला.

या काळात कोस्लर हा पक्का कम्युनिस्ट होण्याच्या मार्गावर होता. भूतकाळ, मध्यमवर्गाचे संस्कार, उच्च शिक्षण इत्यादींची आठवणही त्याला काढायची नव्हती. हा भूतकाळ म्हणजे आपले पापकर्म (ओरिजिनल सिन) असे त्याला वाटू लागले. फक्त स्त्रियांच्या बाबतीत मात्र तो म्हणतो, ''वर्गसंघर्षाच्या बाबतीत आपण पूर्वीचे गुन्हेगार आहोत असे मला वाटत असले तरी प्रेमप्रकरणात ती भावना मला शिवलीदेखील नाही. अँग्लोसॅक्सन देशात सेक्स म्हणजे पापकर्म आणि अस्वस्थ करणारी घटना (गिल्ट अँड अँक्झायटी) असे समजले जाते. पण स्त्रियांच्या बाबतीत माझा दृष्टिकोन हा गंडविरहित (नेव) आणि रोमँटिक होता. प्रणयाची प्रत्येक घटना ही अद्‌भुतच आणि त्या घटनेचे पावित्र्यही त्याच्या अद्वितीयत्वात आहे. नुसत्या विषयसुखाच्या मागे लागलेली माणसे प्रत्येक प्रणयप्रकरणात मागील प्रकरणांशी आणि तरुणींशी मनातल्या मनात तुलना करू पाहतात. त्यामुळे अशा स्वैराचाराला एक प्रकारचा दुर्गंध येतो. ऐन मीलनाच्या वेळी आपला प्रियकर आपली इतर तरुणींशी तुलना करीत आहे या जाणिवेने प्रत्येक स्त्रीला ही आपली विटंबना आहे असे वाटते. त्याउलट आमच्यासारख्या कल्पनांच्या मागे धावणाऱ्यांना (फँटम चेसर्स) प्रणयप्रसंगी प्रत्येक स्त्री अप्सरा (हेलेन) असल्याची जाणीव असते. आम्ही तुलना करण्याच्या भानगडीत पडत नाही. ही भावना उभयपक्षी होत असते. त्यामुळे प्रत्येक मीलनाच्या भोवती निष्पापपणाचे वातावरण बनते. भ्रमनिरास झाला तरी खंत वाटेल, पण चीड वाटणार नाही.''

कोस्लर म्हणतो, ''बर्लिनमधील माझ्या वास्तव्यात माझा अनेक स्त्रियांशी संबंध आला. काहींची मैत्री कायम टिकली. दोन मैत्रिणी विमानहल्ल्यात ठार झाल्या. दोघींचा मृत्यू हिटलरच्या कॉन्सेंट्रेशन कँपमध्ये झाला. एक क्षयाने मेली आणि एकीने नवरा म्हणून एक दंतवैद्य पत्करला.''

प्रणयाचे विश्व प्रियकर आणि प्रेयसी यांनाच व्यापून असते. दुसऱ्यांना अशा कथांत रस वाटेलच असे नाही. कोस्लर म्हणतो, ''असे असले तरी एका फ्रेंच लेखकाने म्हटल्याप्रमाणे, ग्रंथवाचनाने माणूस विचार करायला शिकतो आणि स्त्रियांमुळे जगायला (वन लर्न्स टु थिंक थ्रू बुक्स, अँड टु लिव्ह थ्रू वुमेन). कोस्लरने उलस्टिन वृत्तपत्रसमूहाची नोकरी सोडली. तो कम्युनिस्ट झाला आहे हे कळल्यामुळे समूहाच्या संचालकांनी त्याला काढून टाकले. पण त्याने रशियातील पंचवार्षिक योजनांचा अभ्यास करून युरोपच्या उदारमतवादी वर्तमानपत्रात आपले निष्कर्ष प्रसिद्ध करावे असे ठरवून कम्युनिस्टांनी कोस्लरला सोव्हिएट संघराज्यात पाठविले. या संधीचा लाभ घेऊन तो युक्रेन, मॉस्को, कॉकेशस, अजरबयजान, तुर्कमेनिस्तान व उजबेकिस्तान या घटक राज्यांत फिरून आला. त्या वेळी युक्रेनमध्ये दुष्काळाने कहर उडविला होता. औद्योगिक कार्यक्रमाचे अवास्तव केंद्रीकरण आणि शेतीचे सामुदायिकीकरण यांतूनच

हा दुष्काळ उद्‌भवला. कोस्लरने आपल्या 'योगी अँड द कोमिस्सार' या ग्रंथात रशियावरील या संकटाची आणि कम्युनिस्ट नोकरशाहीची चर्चा केली आहे.

कोस्लरने १९३२ मध्ये मॉस्कोहून कॉकेशसमधील आर्कोनीकिडसे या गावापर्यंत रेल्वेने प्रवास केला. हा प्रवास चार दिवस आणि तीन रात्री असा दीर्घ होता. योगायोगाने या प्रवासात त्याला एक महिला भेटली. तिची गमतीदार हकीकत कोस्लरने दिली आहे. तो म्हणतो :

''वेराचे वय पंचेचाळीसच्या सुमाराचे असावे. लेनिनग्राडमध्ये एखाद्या लहानशा ऑफिसात ती कारकून असावी. कॉकेशसमध्ये सुट्टी घालवावी म्हणून तिला रजा मिळाली होती. तिची आर्थिक परिस्थिती चांगली नसावी. ती वरच्या बर्थवर पडून राही. मात्र कोस्लरकडे तिचे बारीक लक्ष असावे. कोस्लरला त्या प्रौढेकडे लक्ष देण्याचे काहीच कारण नव्हते.

प्रवासात पहिला दिवस कोस्लरने आपले प्रवासवृत्त टाइप करण्यात घालविला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो पाहतो तो त्याच्या बर्थवर एक चिठ्ठी आढळली. तीत मजकूर होता : 'आतापर्यंत तुम्ही पुरेसं काम केलं आहे. आता कुमारी वेरा म्याक्झिमोवनाकडे थोडं लक्ष (लिटल कोर्टशिप) द्यावं.'

ती वयस्क बाई. आपले तारुण्य टिकवण्यासाठी तिची केविलवाणी धडपड होती. तिच्या केसांना लावलेला कलप मध्ये मध्ये उडून गेलेला होता. त्यामुळे तिच्या केसांचे विविध रंग दृष्टीस पडत. कोस्लरशी तिने लाडीगोडी लावायला सुरुवात केली. कोस्लर म्हणतो, ''वेरा वृत्तीने रोमँटिक असावी. ती नेहमी आपल्या आत्म्याचा उल्लेख करी. मधूनमधून ती माझ्याही आत्म्याचा उल्लेख करी. रात्री ती बर्थवरून आपला रोड हात खाली सोडी आणि बोटे हलवी. आणि हे सगळे झोपेत चालले आहे असे भासवी. मी तिचा हात धरीन आणि प्रेमाच्या गोष्टी बोलेन असे तिला वाटत असावे. मला तिची चीड येऊ लागली. मला एकदा वाटले की आपण तिच्या बर्थवर चढावे आणि आपण बेभान झाल्याचे सोंग घेऊन तिला बुकलून काढावे. पण ती ओरडली तर ? या विचाराने मी थांबलो.''

शेवटी आर्कानीकिडसे स्टेशनवर वेरा उतरली. तिला कोस्लरने सहज विचारले, ''रशियन क्रांतीपूर्वी तुम्ही काय करीत होता ?''

ती काहीशा संकोचाने म्हणाली, ''वयाची पंचवीस वर्षेपर्यंत मी मठात जोगीण होते (नन् इन द कॉन्व्हेंट ॲट यारोमीर). बोल्शेव्हिकांनी सगळे मठ आणि कॉन्व्हेंट बंद करून टाकले.''

कोस्लर सूचकपणे म्हणतो, 'मी तिला प्रार्थना म्हणताना कधीच पाहिले नाही. ती बोल्शेव्हिकांचा द्वेष करी. पण कोठे तरी तिला वाटत असावे की बोल्शेव्हिकांमुळे जोगिणीच्या जीवनातून आपल्याला मुक्ती मिळाली.''

कोस्लरच्या आत्मचरित्रातील सर्वांत मोठी घटना म्हणजे कम्युनिस्ट म्हणून त्या पक्षाचा त्याला आलेला अनुभव. त्याच्या या ग्रंथामुळे कम्युनिझम, समाजवाद, नाझींचा उदय, स्पेनमधील अंतर्गत यादवी, स्टॅलिनकालीन रशियातील आणि हिटलरकालीन जर्मनीतील भीषण हत्याकांडे यांची त्याने केलेली वर्णने वाचली तर अंगावर काटा उभा राहिल्याशिवाय राहत नाही. वरील ज्वलंत प्रश्न समजण्यासाठी डझनांनी पुस्तके वाचून जे होत नाही ते त्याचे आत्मचरित्र वाचून होते.

पण स्वत:च्या जीवनाविषयी त्याने किती मोकळेपणाने लिहावे? आता हेच पाहा. टिफ्लिस ते एरिवान (जॉर्जिया ते आर्मेनिया) या रेल्वेप्रवासात कोस्लरच्या प्रयत्नामुळे एका गरिबीत दिवस काढणाऱ्या तरुणीला कोस्लरच्या 'कूपे'मध्ये जागा मिळाली. तिचा बाप, आजा हे सर्फ (जवळजवळ दासच) असावेत आणि जमीनदारांच्या विलासाची त्यांना सवय असावी. आपल्याला प्रथम वर्गातून आरामाने प्रवास करायला मिळाला, यामुळे ती खूष होती. याचा मोबदला कोस्लरला दिला पाहिजे असे तिला वाटले असावे. कोस्लरने तिला समजावण्याचा प्रयत्न केला. आपण कम्युनिस्ट आहोत आणि तुला मी कॉम्रेड समजतो असे तो तिला म्हणाला. मग तर तिला वाटले की हा अतिशय मूर्ख मनुष्य असावा. आणि मग काय घडले हे त्याच्याच शब्दांत वाचा :

''ही विचित्र परिस्थिती संपवावी म्हणून मी प्रयत्न केला. आपण काही तरी गुन्हा करीत आहोत या भावनेचा परिणाम माझ्या पौरुषावर झाला. मी आणखी मूर्ख ठरलो. त्या तरुणीनं माझी उघड उघड टिंगल केली. मला तर एका निरोगी कामकऱ्याने एका बुद्धिवादी बूर्ज्वाचा (इंटलेक्चुएल) केलेला तिरस्कारच या टिंगलीत आढळला. शेतकरी उपाशी मरत आहेत आणि नोकरशाही पुष्ट होते आहे. माझी विटंबना म्हणजे कृषिवलांनी नोकरशाहीवर लादलेली प्रतीकात्म शिक्षा (सिंबॉलिक पनिशमेंट) आणि उगवलेला सूड असे मला वाटू लागले. मी कायमचा षंढ झालो की काय असा माझ्या मनात विचार आला.

''सकाळ झाली. आमची गाडी लेनिनाखान स्टेशनवर थांबली. ती तरुणी उठली. तिने आपले सामान बांधले. जाताना तिने निरोपही घेतला नाही. त्यापूर्वीच ती म्हणून गेली होती, तुमचं काय बाई, तुम्हाला छान छान बायकांची सवय! कम्युनिस्ट पक्षातील माझी गुंतवणूक किती भयानक आणि माझ्या शरीरातील नाड्या आखडून टाकणारी होती याची प्रखर जाणीव मला त्या पौरुषहीनतेच्या क्षणी झाली.''

– आणि हे आंधळे प्रेम पाहा :

टिफ्लिसहून कोस्लर हा बाकूकडे जाण्यास निघाला. बाकू ही अजरबयजानची राजधानी. या गाडीत त्याचा एका अत्यंत सुंदर आणि देखण्या तरुणीशी परिचय झाला. नादेश्दा स्मिर्नोवा हे तिचे नाव. तिचे त्याने किती वर्णन करावे? उंच बांधा,

भव्य कपाळ, सरळ नाक, एखाद्या ग्रीक शिल्पात घडविल्याप्रमाणे ओठ, चेहऱ्यावरचा निरागस भाव. ती पण बाकूला चालली होती. कोस्लर म्हणतो, ''मी नादेश्दाच्या प्रेमात एकदम सापडलो. तिच्या हातांची सहज हालचाल पाहिली किंवा चहाच्या पेल्यावर ती वाकलेली दिसली की मला अमर्याद आनंद होई. माझी इच्छा एकच. तिचा हात आपल्या हातात घ्यायला मिळावा. तिच्यासाठी मृत्यू पत्करण्याचीही माझी तयारी होती.''

नादेश्दा ही बाकूच्या पाणी-पुरवठा बोर्डात कारकून म्हणून काम करीत होती. तिचे आई-वडील वारले होते. तिची एक काकू तिच्याबरोबर राहत असे. बाकू येथे कोस्लर आणि नादेश्दा यांचे एकत्र गेलेले दिवस त्यांना स्वर्गसुखासारखे वाटले. दुर्दैवाने ती आणि तिची काकू यांच्यावर रशियन सरकारने पाळत ठेवली होती. आणि यासाठी त्यांनी वर्नर नावाचा मनुष्य निवडला. त्याने कोस्लरशी मैत्री केली. आणि कोस्लरने साधेपणाने त्याची आणि नादेश्दाची ओळख करून दिली. नादेश्दाला हा मनुष्य आपल्यावर पाळत ठेवतो असा संशय आला. ती घाबरली आणि अबोल झाली. ती कोस्लरला टाळू लागली. असे आठ-दहा दिवस चालले. नंतर पुन्हा ती दोघे भेटू लागली. पण संशयाचे वातावरण शिल्लक होतेच.

एकदा कोस्लरला बर्लिनच्या त्याच्या एजंटाकडून तार आली. छापण्यासाठी त्याने आणखी मजकूर पाठवावा अशी ती तार होती. मजकूर संदिग्ध होता : ''स्टॉकहोमचे व म्याड्रिडचे निश्चित झाले आहे. झ्यूरिक आणि वॉर्साचे संशयास्पद आहे. दौऱ्याचा कार्यक्रम कळवा आणि माल पाठवा.'' अशी ती तार होती.

ही तार नादेश्दाने काढून घेतली. त्यात तिचा हेतू कोस्लरची एखादी प्रेयसी आहे काय हे पाहण्याचा होता. पण कोस्लरने मूर्खपणाने ही हकीकत रशियन हेर वर्नर याला सांगितली.

'डिनन्सिएशन' म्हणजे चहाडी-चुगली करणे यापायी ट्रॉटस्की, बुखारिन यांच्यापासून किरोव वगैरेपर्यंत लाखो लोकांचे बळी पडले. कोस्लर म्हणतो, ''काय घटना पाहा. सात वर्षे मी कम्युनिस्ट पार्टीत होतो. या सात वर्षांत मी एकाच माणसाची चुगली केली आणि ती व्यक्ती म्हणजे मला प्राणाहून प्रिय असलेली नादेश्दा होती. इतका मी पक्षाशी एकरूप झालो होतो.''

एकदा वर्नरने कोस्लरला विचारले, ''तुम्ही मध्य आशियाच्या दौऱ्यावर जात आहात. तिला दुभाषी म्हणून का नेत नाही? म्हणाल तर तशी व्यवस्था करता येईल.'' कोस्लरने तोच मजकूर नादेश्दाला सांगितला. यावर ती म्हणाली, ''कुणाकडून ही व्यवस्था होत आहे?'' पर्यटन खात्याकडून असे त्याने तिला सांगितले तरी तिचा त्याच्यावर विश्वास बसणे शक्य नव्हते. बोल्शेव्हिक गुप्त पोलिसांचा तिने धसका घेतला

होता हे उघड होते. तिला मदत करावी म्हणून वर्नरने कोस्लरला सांगितले की तिने बाकू सोडावे आणि लेनिनग्राडमध्ये नोकरी धरावी. हेतू हा की यामुळे ती बाकूच्या पोलिसांच्या नजरेत राहणार नाही. कोस्लरने तिला लेनिनग्राडमध्ये नोकरी शोधण्यास सांगितले. ''पण का ?'' तिने विचारले. कोस्लरला उत्तर देता येईना.

भट्टी बिघडली होती. कोस्लरने बाकू सोडले. ती त्याला निरोप देण्यासाठी बंदरावर आली होती. बोलण्यासारखे काही नव्हते. कोस्लर जहाजात चढला तेव्हा तो आजारीच होता.

येथे कोस्लरने मोकळेपणाची कमाल केली आहे. कारण तो आजार होता गनोरिया म्हणजे गरमी आणि तो त्याला झाला होता नादेश्दाकडून.

कोस्लर म्हणतो, ''हे सांगावे किंवा नाही याबद्दल मी बराच काळ विचार करीत होतो. पण दोन कारणांनी मी त्याचा उल्लेख करण्याचे ठरविले. त्या काळात मानवाचे जे अवमूल्यन झाले, व्यक्तित्वाची जी विटंबना झाली आणि मानवांच्या परस्परसंबंधात जे विषारी वातावरण निर्माण झाले त्याचे प्रतीक म्हणून ही हकीकत सांगावी लागली. दुसरे कारण म्हणजे निष्पाप माणसांचा छळ करण्यात देवादिकांना आनंद वाटत असला पाहिजे असे मला वाटले.

''नादेश्दाची हकीकत पुढे काहीच कळली नाही. ती बाकूतच राहिली असेल तर दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील हत्याकांडात तिचा निकाल लागला असला पाहिजे. कारण ती ताठ मानेची होती. अशांचे नशीब त्यांच्या मानेला आवळून बसते हे काय सांगायला हवे ?''

मध्य आशियातील दौरा आटोपल्यावर कोस्लरने सोव्हिएट रशियाचा निरोप घेतला. ते १९३३ साल होते. हिटलरने रिश्टाग (जर्मन पार्लमेंट) भवन जाळून टाकले आणि कम्युनिस्टांनी ते कृत्य केले असा खोटा आरोप करून विरोधी पक्ष बेकायदेशीर ठरविले. ज्यूंचा छळ सुरू झाला होता. कोस्लर हा सप्टेंबर १९३३ मध्ये पॅरिसला गेला. तेथे त्याने कम्युनिस्ट पार्टीत चार वर्षे काम केले. नाझीविरोधी प्रचार, वर्तमानपत्रांचे संपादन अशी ही कामे होती. या काळात त्याने आपली सुप्रसिद्ध कादंबरी 'द ग्लॅडिएटर्स' ही लिहून काढली. १९३५ मध्ये त्याने डोरोथी या कम्युनिस्ट कार्य करणाऱ्या महिलेशी लग्न केले.

याच वर्षी रशियात लेनिनग्राडचा कम्युनिस्ट प्रमुख सर्जी किरोव याचा खून झाला. त्याच म्हणजे डिसेंबर महिन्यात एकशेचार माणसांना किरोवच्या खुनाच्या आरोपाखाली ठार मारण्यात आले. १९३५ च्या जानेवारीत झिनोवेव, कामेनेव, स्मिर्नोव इत्यादींच्यावर खटला भरण्यात आला. त्यांच्यावर त्याच वर्षी दोनदा खटले भरण्यात आले. तिसऱ्या खटल्यात म्हणजे १९३६ च्या ऑगस्टमध्ये त्यांना किरोवच्या खुनात

सहभागी होण्याच्या आरोपाखाली शिक्षा देण्यात येऊन ठार मारण्यात आले. स्टॅलिनची दहशतीची राजवट आता लाखो लोकांचा बळी घेण्यासाठी सज्ज झाली होती.

डोरोथी आणि कोस्लर यांचा विवाह म्हणजे प्रेमविवाह नव्हे. स्वित्झरलंडमध्ये पासपोर्ट व व्हिसा यांची अडचण होऊ लागली. ती दूर करण्यासाठी हा विवाह उरकून घेण्यात आला. काही महिन्यांतच ती दोघे वेगळी झाली.

१८ जुलै १९३६ रोजी जनरल फ्रँको याने स्पेनमध्ये बंडाचा झेंडा उभारला. या युद्धात जनरल फ्रँको याला इटली व जर्मनी यांनी मदत केली. तर स्पेनच्या डाव्या सरकारला रशियाने. याशिवाय इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांतील तरुण मोठ्या संख्येने स्पॅनिश सरकारच्या मदतीला धावून गेले. या विषयावर प्रचंड साहित्य निर्माण झाले आहे. अमेरिकेचा जगद्विख्यात साहित्यिक अर्नेस्ट हेमिंग्वे याचे 'फॉर हूम द बेल्स टोल' हे पुस्तक आणि त्यावर आधारलेला बोलपट ही अनेकांच्या वाचण्यात आणि पाहण्यात आली असतील. फ्रेंच साहित्यिक आंद्रे माल्रो याचा ग्रंथ 'लास्पोआ' हाही असाच गाजला. आंद्रे माल्रो याने तर स्वयंसेवकांचे विमानदलच तयार करून दिले होते आणि हे दल फ्रँकोविरुद्ध स्पेनमध्ये लढत होते. या ग्रंथावरही बोलपट निघाला आहे.

कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून कोस्लर याने स्पेनला तीनदा भेट दिली. पहिल्या भेटीच्या वेळीच तो पकडला जायचा, पण ऐन वेळी तो जिब्राल्टरला पळून गेला म्हणून वाचला.

२२ जानेवारी १९३७ रोजी कोस्लर हा स्पेनमध्ये होता. त्या दिवशी कम्युनिस्ट कार्यकर्ता कोल्झोव याने कोस्लर आणि त्याचे सहकारी यांना सांगितले, "ऐका, उद्या मॉस्को येथे पिटाकोव, रादेक, सोकोलनिकोव, मुरालोव व त्याचे सहकारी यांच्यावरील खटला सुरू होत आहे. स्पेनच्या कामगारवर्गाची काय प्रतिक्रिया आहे हे आम्हांला समजून घ्यायचे आहे."

इथूनच कोस्लरच्या कम्युनिझवरील श्रद्धेला तडे जाऊ लागले. ९ फेब्रुवारी १९३७ रोजी मलागा हे गाव जनरल फ्रँको याच्या सैन्याने घेतले. त्यातच कोस्लर कैदेत सापडला.

कोस्लर हा तीन महिने तुरुंगात होता. त्या तुरुंगातील अनेक जणांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले. खुद्द कोस्लरला केव्हा मारण्यात येईल याचा नेम नव्हता. अशा वेळी त्याच्या मदतीला धावून गेली ती डोरोथी.

डोरोथी आणि कोस्लर ही वेगळी झाली असली तरी कायद्याने ती अद्याप त्याची पत्नी होती.

कोस्लरच्या धरपकडीची बातमी ऐकताच डोरोथी इंग्लंडला गेली. कोस्लरच्या बाजूने लोकमत तयार करून फ्रँकोवर दडपण आणावे यासाठी तिने आकाशपाताळ एक केले. कोस्लर म्हणतो, "डोरोथी म्हणजे एक संकोच करणारी आणि भिडस्त अशी माझी समजूत होती. पण माझ्या सुटकेसाठी तिने जे प्रयत्न केले त्यात तिच्या लढाऊ वृत्तीची मला कल्पना आली. थकवा कसा तो तिला जाणवला नाही. ती चतुर आणि चिकाटीची होती. राजकारणी, साहित्यिक यांच्या सह्या गोळा करणे, पार्लमेंटमध्ये सभासदांच्या खनपटीला बसणे, लॉर्ड आणि आर्चबिशप यांच्या मुलाखती घेणे, अर्ज, निषेधपत्रके शेकडोंनी तयार करविणे... डोरोथीने माझ्यासाठी काय काय केले नाही? ती रोज सोळासोळा तास काम करी. कुणाच्या वक्तृत्वाने पडला नसता इतका प्रभाव तिच्या अबोल व्यक्तिमत्त्वाने पडे. तिच्या नि:स्वार्थी मोकळेपणामुळे लोक ताबडतोब तिच्यावर विश्वास ठेवीत. तुरुंगात खितपत पडलेल्या नवऱ्याची कष्टी बायको म्हणून तिने जे साधले ते कोणत्याही राजकीय संवादाने साधले नसते."

शेवटी फ्रँको राजवटीने आपल्या एका कैद्याच्या (एका सरदाराची तरुण आणि देखणी बायको) मोबदल्यात कोस्लरची सुटका केली. कार्य संपल्यावर डोरोथी ही कोस्लरच्या आयुष्यातून पूर्वीप्रमाणेच वेगळी झाली. कोस्लर म्हणतो, "मला साहाय्य अनेकांचं झालं. पण माझे प्राण वाचले ते डोरोथीमुळेच."

कोस्लर हा मूळचा हंगेरीचा. त्याचे आयुष्य मोठे कष्टात गेले. पुढे तो कम्युनिस्ट पक्षात सामील झाला. आणि ह्या निमित्ताने तो पूर्व युरोप, रशिया, मध्य आशिया, इत्यादी देशांतून फिरला. हा काळ म्हणजे स्टॅलिनच्या राजवटीचा काळ होय. त्या वेळी कोस्लरचे वय पंचवीस किंवा तीसहून अधिक नव्हते. त्याचा जन्म इ.स. १९०५ मध्ये झाला.

कोस्लर हा पुढे इंग्लंडमध्ये स्थायिक झाला. त्याने आपले सर्व लिखाण इंग्रजीतूनच केले. इंग्रजी साहित्यिकांत त्याला फार मोठे मानाचे स्थान मिळाले. साहित्याचे नोबेल प्राइझ त्याला मिळेल अशीही अफवा मध्ये आली. पण अशा गोष्टीत गुणवत्ता आणि पारितोषिक ह्यांचा मेळ बसतोच असे नाही. आणि तसेच त्याच्या बाबतीत झाले.

साहित्याच्या बरोबरीने कोस्लरला विज्ञानात आणि आपल्या दृष्टीने आश्चर्याची गोष्ट म्हणजे आधिभौतिकात रस होता. त्या आधिभौतिकातूनच त्याचे लक्ष अद्वैत वेदांताकडे वळले असे दिसते. साधारणपणे त्याची भूमिका अशी असावी : जीवन म्हणजे एक नदी आहे. मृत्यूनंतर ही नदी एका महान शक्तीच्या विशाल समुद्रात जाऊन मिळते. आणि मृत्यूमुळे ही गोष्ट शक्य होते. पण समुद्रात ही जीवनसरिता विलीन झाली तरी तिचा प्रत्येक जलबिंदू स्वच्छ अशा प्रकाशाने न्हाऊन निघत असला

पाहिजे. त्याला आशा वाटे की कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपण जीवन जगलो ह्याचे काही तरी चिन्ह त्या परिस्थितीतून सापडू शकेल.

कोस्लरचे वरील विचार पाहता तो अद्वैतापासून फार लांब आहे असे वाटत नाही. सरिता आणि सागर ह्यांची उपमा जीवन आणि जीवनोत्तर दशा ह्यांना लावलेली सर्व साहित्यातून आढळते. गालिब हा कवी म्हणतो :

**इश्रते कतरा है दर्या में फना हो जीना**
**दर्द का हद से गुजरना है दवा हो जाना**

अर्थ : जलबिंदूचे परमोच्च वैभव समुद्रात विलीन होण्यातच आहे. व्यथा हद्दीबाहेर झाली म्हणजे तिचे रूपांतर औषधातच होते असे म्हणावे लागेल. आपल्याकडेही अनंतात विलीन होणे ही परिभाषा सर्वांनाच माहीत आहे.

कोस्लरचे जीवनही विलक्षण म्हटले पाहिजे. पहिल्या महायुद्धानंतरच्या अशांततेच्या काळात तो वाढला. जर्मनीचा पराजय, ऑस्ट्रेलियन साम्राज्याचा नाश, रशियातील प्रचंड क्रांती आणि तिचे जगभर झालेले परिणाम ह्या घटना घडत होत्या त्या काळातच कोस्लर वाढला. तोही हंगेरीसारख्या मध्ययुरोपीय लहान देशात अनेक ठिकाणी समाजांची पुनर्रचना घडत होती. जुनी सामाजिक आणि राजकीय मूल्ये जाऊन त्यांच्या जागी नवी मूल्ये येत होती. जुन्या नीतीची आणि मूल्यांची पकड नव्या पिढीवर राहिली नव्हती. अस्थिर जीवन, भटके आयुष्य, राजकीय निर्बंध ही इतरांप्रमाणेच कोस्लरच्या वाट्याला आली. आपल्या ह्या आयुष्यात तो परिस्थितीप्रमाणे वागत गेला. आपले अनुभव त्याने आपल्या आत्मचरित्रात मोकळेपणाने सांगितले आहेत. रशिया आणि मध्य आशियातील भ्रमणातील त्याच्या स्वैर जीवनात अनेक स्त्रिया आल्या, तेही अनुभव त्याने सांगितले आहेत.

कम्युनिस्ट राजवटीसंबंधी कोस्लरचा भ्रमनिरास झाला, आणि त्याने तो पक्ष सोडून दिला. पुढे तो पश्चिम युरोपात पॅरिस, लंडन ह्या ठिकाणी राहू लागला. पॅरिसमध्ये कोस्लरचा अनेक मान्यवर व्यक्तींशी संबंध आला. आपल्या अलीकडील आत्मचरित्रात त्याने फ्रान्समधील सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ सार्त्र आणि त्याची सहचरी प्रसिद्ध लेखिका सीमॉन द बोऑए ह्यांची उत्कृष्ट वर्णने केली आहेत. ह्याच सुमारास त्याने लग्न केले. पॅरिसमध्ये त्याचे बरीच वर्षे वास्तव्य होते. ह्या काळात त्याचा संबंध सिंथिया नावाच्या मुलीशी आला. पुढे आयुष्यभर सिंथिया कोस्लरची सचिव आणि नंतर पत्नी म्हणून राहिली. त्यामुळे तिची माहिती सांगणे आवश्यक आहे. सिंथिया ही मूळची दक्षिण आफ्रिकेतील. लहानपणापासून तिला लेखनाचा नाद. पण आपल्या हातून चांगले लिखाण होईल असे तिला वाटेना. त्यामुळे युरोपमध्ये कोणत्या तरी प्रसिद्ध

लेखकाबरोबर आपण काम करावे, म्हणजे त्याच्या सहवासाने आपणाला लेखन अधिक चांगले जमेल असे तिला वाटले.

याच वेळी म्हणजे इ.स. १९४९ मध्ये हिचा आणि ऑर्थर कोस्लरचा संबंध आला. पुढील सहा वर्षे ती त्याची तात्पुरती सेक्रेटरी म्हणून फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिका येथे काम करीत होती. ह्या काळात कोस्लरने मामेन पाजेट ह्या नावाच्या मुलीशी लग्न केले होते. हे लग्न काही टिकले नाही. ती दोघे वेगळी झाली. इकडे सिंथियाने सुद्धा एक विवाह केला होता. पण तो विवाहही यशस्वी झाला नाही. ह्यानंतर काही काळ सिंथिया ही अमेरिकेत एका मोठ्या व्यक्तीबरोबर काम करीत होती. ही परिस्थिती १९५५ पर्यंत राहिली. १९५५ मध्ये ऑर्थर कोस्लरबरोबर तिची भेट पुन्हा लंडनमध्ये झाली. अमेरिकेहून ती अल्पकाळासाठी इंग्लंडला आली होती. ती ऑर्थरला भेटली. तोपर्यंत ऑर्थरचे आधीचे वैवाहिक जीवन संपुष्टात येऊन गेले होते. त्याचे आणि मामेनचे न पटल्यामुळे त्याने घटस्फोट घेतला होता आणि तो एकटाच राहत होता. सिंथियाने आपल्याबरोबर काम करावे आणि राहावे अशी त्याची इच्छा. त्याला हवी होती ती लग्नाची बायको नव्हे, तर चोवीस तास त्याच्या लेखनात आणि इतर कामात त्याला मन:पूर्वक साहाय्य करणारी मदतनीस.

कोस्लर हा कामाच्या बाबतीत कडकच म्हटला पाहिजे. तो स्वत: तर राबत असेच, पण त्याबरोबर त्याने सिंथियालही अक्षरश: चोवीस तास रात्रंदिवस राबविले. हे सर्व काही सिंथियाने कुरकुर न करता सहन केले. तिला ध्यास एकच. ऑर्थरच्या जीवनात आपल्याला स्थान मिळावे. आता तर १९५५ मध्ये ती त्याच्या कायम सहवासात राहू लागली. कोस्लरने तिच्यासाठी जवळच एक वेगळे घर बांधून दिले. ती तेथे रात्री झोपे, पण दिवसाचे बारा तास ती कोस्लरच्या घरी काम करी. विवाहाची कल्पना कोस्लरच्या डोक्यात येईना आणि तीही बोलेना. कोस्लर तिला म्हणे, "लाडके, माझे तुझ्यावर प्रेम आहे. माझी तुझ्यावर निष्ठा आहे. मी तुझ्यासाठी वाटेल ते करीन. पण एक गोष्ट मात्र विचारू नकोस. ती म्हणजे आपला विवाह. मी तशा बंधनाला अगदी अपात्र आहे. मी अत्यंत अस्थिर वृत्तींचा (न्युरोटिक) आहे. एकाच खोलीत दुसरे माणूस असले तरी मी अस्वस्थ होतो. मला झोप येत नाही."

सिंथियाने हे सारे सहन केले. तिची तपश्चर्याही काही कमी नव्हती. कोस्लरला जे काही लागे ते उत्कृष्टच असायला हवे. तिने चांगला स्वैपाक केला तर तो फक्त मान हलवून दाद देई. पण स्वैपाक बिघडला तर घर डोक्यावर घेई. एकदा तर त्याने तिला पाकशास्त्राच्या संस्थेत घालून पाकशास्त्राचे शिक्षण घेण्यास लावले. हे सर्व विवाहसंबंध नसताना!

पण शेवटी काळानेही ऑर्थरवर सूड उगवला. त्याचे असे झाले : ऑर्थर कोस्लरची विज्ञान आणि वैज्ञानिक ह्यांच्यावर महत्त्वाची पुस्तके बाहेर पडू लागली. त्यांचा बराच गवगवा झाला. कॅलिफोर्नियामधील स्टॅनफोर्ड विद्यापीठात त्याला फेलो म्हणून काम करण्याचे आमंत्रण देण्यात आले. हा मोठा मान होता. विद्यापीठाच्या परिसरात त्याची राहण्याची उत्कृष्ट सोय केली होती. पण सिंथियाशिवाय तो तेथे जाऊ इच्छीत नव्हता आणि विद्यापीठाला तर विवाहबाह्य संबंध वर्ज्य. या आपत्तीतून वाट काढण्यासाठी कोस्लरने तिच्याशी लग्न केले. वर्तमानपत्रातील बातम्यांवरून आणि जाहिरातीवरून त्यांच्या लग्नाची बातमी जगाला समजली.

सिंथियाच्या मनाची इच्छा पूर्ण झाली. ऑर्थर हा कायेने आणि मनाने तिचा पती होताच. आता वाचेनेही तो तिचा पती झाला. आपल्या कठोर सेवेने कोस्लरचे मन तिने जिंकून घेतले. हळूहळू तिच्याशिवाय त्याचे पानही हलेनासे झाले. स्वच्छंदी कोस्लरचा बाहेरख्यालीपणा हळूहळू कमी होऊ लागला. सिंथिया त्याबद्दल एक शब्दही बोलत नसे. एका महान साहित्यिकाच्या जीवनात आपण समरस झालो हाच तिचा आनंद. कोस्लरच्या यशाचे चढते-वाढते वैभव ती हर्षभरित होऊन पाहत होती. त्याच्या ग्रंथांची जगातील तिसांहून अधिक भाषांतून भाषांतरे झाली. विसाव्या शतकातील अतिश्रेष्ठ साहित्यिक म्हणून त्याचा गौरव होऊ लागला. पण आपण आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व ठेवावे असे सिंथियाच्या मनात आले नाही. कोस्लरची छाया म्हणूनच राहण्यात ती धन्यता मानीत होती. तिने आपले आत्मचरित्र लिहायला घेतले, तेव्हा कोस्लरने सुचविले, ''आपण दोघं मिळून लिहू या. एक प्रकरण तुझं आणि एक प्रकरण माझं.'' हे आत्मचरित्र अर्धवटच राहिले. ते नुकतेच 'स्ट्रेंजर ऑन द स्क्वेअर' ह्या नावाने प्रसिद्ध झाले आहे.

कोस्लरचे वय वाढू लागले तसे त्याला सिंथियावर विसंबून राहणे अधिकाधिक आवश्यक वाटू लागले. पुढे तर त्याला दोन दुर्धर दुखणी सुरू झाली. त्याचे हात थरथर कापत आणि त्याचे केस गळू लागले. आता तो कधी बाहेर एकट्याने जाईना. घरात सिंथियाचे त्याच्यावर सारखे लक्ष असे. ती दोघे एकमेकात अगदी समरस झाली होती. त्यांचा मित्रपरिवार मोजका, पण चांगला होता. त्यांच्या नजरेत कोस्लरचा स्वभाव आणि दुखणी जशी येत तशीच सिंथियाची आपल्या नवऱ्याबद्दलची अखंड निष्ठा आणि सेवावृत्ती त्यांच्या दृष्टीस पडे. इ.स. १९८२ त कोस्लरच्या डॉक्टरने त्याला सांगितले, ''तुम्हांला कॅन्सर होईल अशी मला भीती वाटते.'' त्या वेळी प्रथम कोस्लरच्या मनात आत्महत्येचे विचार आले. जून १९८२ मध्ये त्याने एक चिठी लिहून ठेवून आपल्या आत्महत्येचा विचार व्यक्त केला होता. त्यात त्याने आपले दुखणे हेच आपल्या आत्महत्येचे कारण आहे हे स्पष्ट केले होते. ह्या चिठीच्या

शेवटच्या दोन परिच्छेदांत त्याने म्हटले होते, ''माझ्या मित्रांनी हे जाणून घ्यावे की मी शांत वृत्तीने त्यांचा निरोप घेत आहे. मला एक दुबळी आशा आहे की मरणोत्तर जीवन असावे, पण ते अशरीरी असेल आणि ते अतर्क्य, अनंत आणि अगम्य असेल. विशाल सागराच्या (मरणोत्तर जीवनाच्या) कल्पनेने मला अनेक संकटप्रसंगी धीर दिला आहे आणि हे लिहीत असतानाही त्याचाच मला धीर आहे.

असे असूनही आत्महत्या प्रत्यक्षात आणण्याचा निर्णय घेताना मला एका गोष्टीमुळे फार अवघड वाटते. माझे काही मित्र तर व्यथित होतीलच. पण सिंथियावर किती मोठा आघात होईल ह्या विचाराने मी बेचैन आहे. माझ्या आयुष्याच्या शेवटच्या काही वर्षांत मला जे काही समाधान आणि शांती मिळाली ती पूर्वी कधीच मिळाली नव्हती. ह्या शांतीचे आणि समाधानाचे सर्व श्रेय सिंथियाला आहे.''

मंगळवार दि. १ मार्च १९८३ रोजी ऑर्थर कोस्लर आणि त्याची पत्नी सिंथिया यांनी विषप्राशन करून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी कोस्लरने कागदावर काही वाक्ये लिहून ठेवली होती. त्यांच्यापुढे सिंथियाचे एकच वाक्य होते : ''ऑर्थरशिवाय मी हे जीवन जगू शकत नाही.'' त्यांचा चरित्रकार जॉर्ज माइकरु म्हणतो : ''आयुष्याच्या शेवटच्या काळात कोस्लर याने एकट्याने बाहेर जाणे सोडून दिले होते. त्याला सोबत लागे. आयुष्यातून निघून जाताना त्याला सिंथियाची आणि सिंथियाला त्याची सोबत झाली असेच म्हटले पाहिजे, इतके त्यांचे जीवन एकरूप झाले होते.''

❖ ❖

# फ्रँक सिनाट्रा

अमेरिका या राष्ट्राची जडणघडणच अशी काही विलक्षण आहे की सखोल अभ्यासाशिवाय तिची कल्पना सहजपणे येत नाही. तीन-चारशे वर्षांपूर्वी युरोपीय राष्ट्रांतील शेकडो-हजारो लोक या नवीन देशात जाऊन वसाहती करू लागले. त्यात इंग्रजांची संख्या अधिक असल्यामुळे कालांतराने इंग्रजी हीच सर्वांची भाषा बनली. असे असले तरी इतर युरोपीय जमातीही मोठ्या संख्येने जाऊन अमेरिकेत वसलेल्या आहेत. या सर्व जमातींचे परस्परांत विवाहादी संबंध होऊन अमेरिकन राष्ट्रात एकजिनसीपणा आला असल्याचे दिसते. तरी पण अनेक गटांनी आपल्या मूळ देशाची आठवण उराशी बाळगून ठेवली आहे.

आज आपल्याला सगळे अमेरिकन सारखेच वाटतात. पण बारकाईने पाहिल्यास त्यांचे तपशील हळूहळू ध्यानात येऊ लागतात. अमेरिकन जीवनातील काही प्रमुख व्यक्ती घेतल्या तर याचा सुगावा लागतो. रूझवेल्ट कुटुंबाचे पूर्वज हॉलंड देशाचे, केनेडी कुटुंब हे आयर्लंडचे, जनरल मॅकॉर्थर यांचे घराणे स्कॉटलंडचे, तर जनरल आयसेनहॉवरचे घराणे पश्चिम जर्मनीचे. किसिंगर हा मूळचा झेकोस्लोव्हाकियाचा. ही नामावली वाढवता येण्यासारखी आहे पण त्याची आवश्यकता नाही. विविध राष्ट्रांतील जमातींनी आपले गुणधर्म आपल्याबरोबर अमेरिकेत नेले आणि आपल्या परीने त्या देशावर छाप पाडली. इंग्रज, आयरिश, डच, फ्रेंच, जर्मन या जमातींनी अमेरिकन समाजात राजकीय आणि आर्थिक दृष्टीने वरचढ स्थाने मिळविली. तर दक्षिण युरोपातील इटली, ग्रीस आदी देशांतील लोक गरीब आणि मागासलेले राहिले.

अमेरिकेतील शहरांतून जणू काही चार अलिखित वर्ण नांदत आहेत असेच वाटू लागते. इटली, ग्रीस आदी देशांतून अमेरिकेला गेलेल्या लोकांत गरिबांचा आणि निरक्षरांचा भरणा फार. व्यवस्थितपणा, वर येण्याची जिद्द, आपली परिस्थिती सुधारण्याची तळमळ, आणि यात भर म्हणून की काय, लहान कुटुंबे इत्यादींचा अभाव, त्यामुळे हे समाज गरिबीच्या रेषेच्या आसपास घुटमळत राहिले. इटालियन लोकांना डॅगो (शेळपट) आणि वॉप (विदाउट ऑफिशियल पेपर्स – बेकायदेशीर), असे संबोधण्यात येई. हमाली, मजुरी, लहानसहान हॉटेले चालवणे, किरकोळ वाहतुकीचे धंदे करणे अशी कामे हा समाज करीत असे. त्यांच्याबद्दल सामान्य

समाजात दरारा अगर वचक नसे. महायुद्ध सुरू झाल्यावर अमेरिकेतील जर्मन वंशातील लोकांना स्थानबद्ध करण्यात आले अगर त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली. पण इटालियन लोक निरुपद्रवी, गाणीबजावणी करणारे, त्यांची कसली भीती? असे तुच्छतेचे उद्‌गार एकदा रूझवेल्टनेही काढले होते. अशा या इटालियन समाजातून गुन्हेगारीची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढली, आणि तिने अमेरिकेत मोठी समस्या निर्माण केली. तस्करी, चोरट्या मालाचा व्यापार, अंमली आणि मादक पदार्थांची देवघेव, अत्याचार, गुंडगिरी इत्यादी धंद्यामुळे 'माफिया' नावाची कुप्रसिद्ध गुन्हेगार संघटना अमेरिकाभर पसरली. या संघटनेच्या यंत्रणेवर विदारक प्रकाश पाडणारा 'गॉडफादर' हा चित्रपट कित्येकांच्या स्मरणात असेल.

याच इटालियन समाजातून एक जगप्रसिद्ध गायक निर्माण झाला. त्याचे नाव 'फ्रँक सिनाट्रा'. इ.स. १९४० पासून पुढील चाळीस-बेचाळीस वर्षे आपले गायन आणि अभिनय या कलांमुळे फ्रँक सिनाट्राने अमेरिकेला मुग्ध करून सोडले. ''माझ्या गायनकलेमुळे मी वर आलो, नाही तर माझ्या श्रेणीतील इतर लोकांप्रमाणे माझ्याही नशिबी आजन्म कारावास किंवा फाशीची शिक्षाही आली असती,'' असे उद्‌गार फ्रँक सिनाट्राने काढले आहेत. न्यू जर्सी या राज्यात होबोकेन्स या गावात १२ डिसेंबर इ.स. १९१५ रोजी एका अगदी सामान्य कुटुंबात फ्रँक सिनाट्राचा जन्म झाला. त्याचा बाप मार्टी याने आयुष्यात विशेष काहीच केले नाही. त्याला मुष्टियुद्धाची मोठी आवड. सुरुवातीस त्याचे नाव चारचौघांत झाले. पण पुरेशी जिद्द नसल्यामुळे किंवा मुळातच फारशी पात्रता नसल्यामुळे तो मागे पडला. त्याची बायको डॉली ही मात्र धाडसी आणि जिद्दीची निघाली. हिचा व्यवसाय काय तर सुइणीचा. पण आडमार्गाने गर्भपात घडवून आणण्यासाठी तिने एक खाजगी आणि बेकायदेशीर सूतिकागृह चालविले होते. त्यातून ती कुटुंबाचा संसार चालवी. या व्यवसायामुळे तिचा अनेक थरांतील व्यक्तींशी संबंध आला. त्यामुळे कायद्याला सोडून चाललेल्या तिच्या कामाबद्दल कोर्टकचेऱ्यांतून तिला झळ लागली नाही. बायको कमावते आहे हे पाहून मार्टी हा निष्क्रियतेचे जीवन शेवटपर्यंत (२४ जानेवारी १९६९) जगला.

फ्रँक सिनाट्रा याला लहानपणी शाळेत जाण्याचा मनस्वी तिटकारा, आणि त्याला वाढवून खऱ्या अर्थाने मोठा करावा ही आईची जिद्द. मुलाने शिकावे म्हणून तिने सगळे उपाय केले. पण ते व्यर्थ गेले. शाळेत फ्रँक हा पाचवी-सहावीच्या पलीकडे गेला नाही. पण त्याला गाण्याची अतिशय आवड. त्याच्या गोड गळ्यावर सामान्य हॉटेलांतून, मदिरालयांतून जमणारे लोक लुब्ध होऊ लागले. मग आपले पोर शिकत नाही हे पाहून फ्रँकच्या आईने त्याच्या गायनाच्या शिक्षणाची व्यवस्था केली. सुरुवातीस फ्रँक हा चार-पाच समव्यावसायिकांचा संच करून लहान लहान कार्यक्रम

करू लागला. हे कार्यक्रम हॉटेले, नर्तनगृहे, संगीतगृहे, इत्यादी ठिकाणी होत. अशाच एका कार्यक्रमात रेडिओच्या संचालकांनी त्याला हेरले, आणि त्यामुळे रेडिओ गायक म्हणून फ्रँकला प्रसिद्धी मिळू लागली. यातूनच फ्रँकला हॉलिवुडमध्ये प्रवेश मिळाला.

गायनकला म्हणजे फ्रँकचा मोठा उपजत गुण. पण निकृष्ट सामाजिक वातावरणाच्या संस्कारांपासून तो वेगळा राहील हे अशक्य होते. नॅन्सी (बार्बारा) नावाच्या इटालियन मुलीशी त्याचा विवाह झाला. त्यापूर्वी त्याने एका तरुणीला फशी पाडले होते. त्याबद्दल त्याला अटकही झाली होती. (इ.स. १९३८). नॅन्सी ही घरगुती प्रवृत्तीची पोरगी. तिने तीन अपत्यांना जन्म दिला. पण फ्रँकच्या महत्त्वाकांक्षेला उत्तेजन मिळेल असे तिच्याजवळ काही नव्हते. त्याच वेळी फ्रँकला हॉलिवुडमध्ये प्रवेश मिळाला. गायक म्हणून फ्रँकची गीते अमेरिकेत लोकप्रिय होऊ लागली.

दुसऱ्या महायुद्धाचा तो काळ. हजारो अमेरिकन तरुण सैन्यात भरती होऊन अमेरिकेच्या बाहेर रणांगणावर पोहोचले होते. त्यांच्या प्रेयसी, मातापिते आणि आप्तेष्ट यांना त्यांचा विरह सोसावा लागत होता. अशा या काळात फ्रँक सिनाट्राच्या दर्दभऱ्या गीतांनी अमेरिकेला अक्षरशः वेड लावले. आपल्याकडील लता मंगेशकर, सुधीर फडके, आशा भोसले, अनुप जलोटा इत्यादींची आठवण या संदर्भात व्हावी. सिनाट्राची शेकडो गीते ही त्याची स्वरचित असत हेही लक्षात ठेवले पाहिजे. त्याच्या गाण्यांच्या रेकॉर्ड्स लाखोंनी खपू लागल्या. त्याच्या कार्यक्रमांना तुफान गर्दी उसळत असे. या गर्दीत तरुण मुलींचा मोठा भरणा असे. फ्रँक सिनाट्रा याचे नाव त्यामुळे सर्वांच्या तोंडी झाले.

हॉलिवुड येथे फ्रँकच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. मोहाचे प्रसंग भल्याभल्यांना टाळता येत नाहीत. चित्रपटांमुळे त्याला जगभर प्रसिद्धी मिळाली. उत्पन्नही अपेक्षेच्या बाहेर मिळू लागले. साहजिकच त्याच्याभोवती हॉलिवुडमधील सुंदर सुंदर नट्यांचा घोळका जमू लागला. फ्रँकचा पाय घसरायला काय वेळ लागणार? त्या काळात गाजलेली कोणतीही अमेरिकन नटी फ्रँकच्या हातातून सुटली नाही, असे म्हणतात. एलिझाबेथ टेलर, मार्लिन मन्रो, आवा गार्डनर, किम नोवॅक, शर्ली मॅक्लेन अशी ही यादी केली तर पानांवर पाने संपत जातील, पण यादी संपणार नाही.

फ्रँकचे गायन आणि अभिनय यांमुळे त्याचा राजकारणाशीही संबंध आला. रूझवेल्ट हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी पुन्हा उभे राहत होते. त्यांच्या माहिती आणि संपर्क खात्याच्या संचालकांनी प्रचार-कार्यासाठी हा गायक नट बरा म्हणून फ्रँकचा उपयोग करून घेतला. या निमित्ताने फ्रँकला राष्ट्राध्यक्ष भवनात (व्हाइट हाउस) जाऊन राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांची भेट घेण्याची संधी मिळाली. सामान्य कुटुंबातील हे पोर वयाच्या पंचविशीत व्हाइट हाउसमध्ये पोहोचले, ही कुणालाही स्तिमित करील अशी घटना होती.

पण रूझवेल्टशी बोलताना फ्रँकची जवळजवळ शुद्धच गेली. रूझवेल्टने स्मित करून म्हटले, "या अभिनयातही तुम्ही बाजी मारली असं दिसतं." तिथून हॉलिवुडला परतल्यानंतर तो चित्रपटात काम करू लागला. तसा तो बांध्याने किरकोळच. चित्रपटव्यवसायासाठी लागणारे आकर्षक व्यक्तिमत्त्व त्याच्यात नव्हते. गायनकलेतील प्रसिद्धीमुळे त्याला चित्रपटात कामे मिळू लागली. सिनाट्राची जिद्द मात्र विलक्षण. आपल्याला साजेसा एक चित्रपट मिळावा अशी त्याची धडपड चालू झाली. शेवटी त्याच्या मनासारखा चित्रपट त्याला मिळाला. दुसऱ्या महायुद्धातील एका प्रसंगावर 'फ्रॉम हिअर टु एटर्निटी' (येथून अनंतापर्यंत) या नावाची एक प्रसिद्ध कादंबरी होती, तिचे चित्रपटात रूपांतर झाले. त्यात एक भूमिका त्याला मिळाली. त्याची ही भूमिका इतकी गाजली की साहाय्यक नट म्हणून त्याला ऑस्कर पारितोषिक मिळाले. तो चित्रपट इतका लोकप्रिय झाला की एका न्यूयॉर्क शहरात सहा महिनेपर्यंत तो रात्रंदिवस चालू होता. फ्रँकचा दुसरा गाजलेला चित्रपट म्हणजे 'द मॅन विथ गोल्डन आर्म्स' (सोनेरी हाताचा माणूस). फ्रँकने आयुष्यात पंचावन्न चित्रपटांतून कामे केली. पण वरील दोन चित्रपट सोडता इतर चित्रपटांतील त्याची कामे फार मोठ्या पातळीवरची होती असे म्हणता येणार नाही.

फ्रँकला पैशाच्या दृष्टीने उत्पन्न चांगलेच येऊ लागले. स्त्रिया, मदिरापान आणि जुगार तिन्हींच्या आहारी तो जाऊ लागला. अनेक बायकांना त्याने नादी लावले आणि दूर सारले. पण शेवटी त्याच्या आयुष्यात एक स्वरूपसुंदर स्त्री आली आणि फ्रँक जवळजवळ तिचा बंदा गुलाम बनला. ही स्त्री म्हणजे सुप्रसिद्ध अभिनेत्री आवा गार्डनर. एका तंबाखूच्या शेतकऱ्याची पोर आवा ही केवळ असामान्य सौंदर्याच्या बळावर हॉलिवुडमध्ये कीर्तीच्या शिखरावर जाऊन बसली. फ्रँकची आणि तिची प्रणयकथा पाहिली की स्त्रीसाठी मनुष्य किती वेडापिसा होतो याची कल्पना येऊ शकेल. तिच्या पायी या छत्तीस वर्षांच्या अभिनेत्याने आणि तीन मुलांच्या बापाने आपल्या पत्नीशी (नॅन्सीशी) घटस्फोट घेतला. आवाच्या भोवती फिरताना फ्रँकची स्थिती अक्षरश: एका कुलुंग्या कुत्र्याची झाली होती. आफ्रिकेत 'मोगांबे' या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यासाठी आवा गार्डनर गेली होती, त्या वेळी तो तिच्यामागोमाग आफ्रिकेत गेला. तेथे तो अक्षरश: तिच्या चपराश्यासारखा वागत होता.

आवा गार्डनर आणि फ्रँक सिनाट्रा यांचा विवाह इ.स. १९५१ मध्ये झाला. तो विवाह काही फार दिवस टिकला नाही. स्पेनमधील एका बुलफायटरच्या (बैलाशी झुंजणारे वीर) प्रेमात ती सापडली, आणि तिने फ्रँकला हाकलून लावले. त्यावेळी फ्रँकने आत्महत्येचा प्रयत्न केला. केवळ योगायोगानेच तो वाचला. पैसा आणि प्रसिद्धी यांच्या मागे लागलेला तो माणूस. त्याच्या कलागुणांचा उपयोग करून समाजावर

आपली पकड बसवावी या विचाराने एका गुन्हेगार संघटनेने फ्रँक सिनाट्राच्या भोवती आपले जाळे पसरले. ही संघटना म्हणजे जगभर गाजलेली कुप्रसिद्ध 'माफिया' संघटना. ''मी स्वतंत्र माणूस, मी कुणाचे काय लागतो? मी आपल्या कलेच्या गुणावर जगासमोर ठामपणे उभा आहे.'' असे म्हणणाऱ्या फ्रँकवर 'माफिया' संघटनेने पैशांची बरसात केली. त्याचे गाण्याचे, अभिनयाचे कार्यक्रम, त्याच्या रेकॉर्ड्स, त्याचे जुगाराचे आणि स्त्रियांचे व्यसन इत्यादी गोष्टींवर 'माफिया' संघटनेने लाखो रुपये खर्च केले. हा कलेचा योग्य मोबदला नव्हे, ही आपल्याला विकत घेण्याची धडपड आहे हे सुरुवातीला फ्रँकच्या लक्षात आले नाही. आपल्याला मुक्त हस्ताने आपल्या कलेचा मोबदला मिळतो अशी त्याची समजूत. या संघटनेने जुगाराच्या अड्ड्यात त्याला भागीदारी दिली. लाखो रुपयांच्या किंमतीची घरे बांधण्यास साहाय्य केले. त्याला जगभर हिंडवून आणले. जुगारात एका वेळी तो एक लाख रुपये हरला तर ती भरपाई करण्यासाठी दोन लाख पुढे केले गेले. अशा रीतीने कुंटणखाने, जुगाराचे अड्डे, तस्करी, खून, मारामाऱ्या करणाऱ्या या संघटनेने फ्रँकला पुरते जाळ्यात अडकवले. ही माणसे वरकरणी हॉटेले, कॅबरे, जुगाराचे अड्डे, शर्यतीचे कार्यक्रम, आयात-निर्यातीचे व्यापार असे धंदे करीत असल्याचे दाखवीत. पण आतून अपहरण, पळवापळवी, पैसे घेऊन खून करणे हे त्यांचे नेहमीचे धंदे. फ्रँकचा या लोकांशी अतिशय जवळचा संबंध आला. या संघटनेच्या प्रमुखांची नावे शे-पन्नासावर जातील. ही माणसे फ्रँकला हवे तसे खेळवीत होती.

अशा परिस्थितीत दुर्दैवाने जॉन केनेडीशी फ्रँकचा संबंध आला. हा महत्त्वाकांक्षी तरुण त्या वेळी राष्ट्राध्यक्षपदासाठी निवडणूक लढवीत होता. केनेडी हा रोमन कॅथलिक. अमेरिकेत जितके राष्ट्राध्यक्ष झाले ते सगळे प्रोटेस्टंट. इटालियन हे रोमन कॅथलिक, आणि माफिया संघटनेने मूळ हे दक्षिण इटलीतील सिसिली बेट. फ्रँक सिनाट्रा हाही मूळचा इटालियन. त्याने केनेडीला पाठिंबा द्यायचे ठरविले. माफिया संघटनाही त्याच्या पाठीशी उभी राहिली. केनेडीने माफियाशी आपले संबंध होते हे कधीच दाखविले नाही. माफियाचा सॅम गियांकाना हा कोण, हे आपल्याला माहीत नाही असे त्याने भासविले. पण सॅम, फ्रँक आणि केनेडी या तिघांची प्रेयसी ज्यूडिश कॅंबेल हिने अलीकडेच एका नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीत गौप्यस्फोट केला आहे. २९ फेब्रुवारी १९८८च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या उपअग्रलेखात पुढील मजकूर आला आहे :

''माझी आणि सॅम गियांकानाची ओळख करून दे, असे एप्रिल १९६० मध्ये जॉन केनेडीने आपल्याला सांगितले. इ.स. १९६२च्या एप्रिल महिन्यात केनेडी आणि सॅम गियांकाना यांच्या निदान दहा भेटी झाल्या. त्यांचे लेखी पुरावे माझ्यापाशी आहेत.

अध्यक्ष निवडणुकीत सॅम गियांकाना याने केनेडीला भरपूर आर्थिक साहाय्य दिले." या मुलाखतीमुळे फ्रँकचा भावही वाढला. पण केनेडी सावधपणे वागत होता. त्याचा भाऊ बॉबी केनेडी हाच अमेरिकेचा ॲटर्नी जनरल झाला आणि त्याने माफिया संघटनेला धारेवर धरले. फ्रँकलाही फार मोठी झळ लागली. त्याच्यावर अमेरिकन पोलिसांची पाळत असे. त्याच्यावर अनेक वेळा खटले भरण्यात आले. कोर्टात अनेक वेळा जबान्या द्याव्या लागल्यामुळे त्याच्या लोकप्रियतेला धक्का बसला. केनेडीचा खून झाल्यानंतर फ्रँकने डेमोक्रॅटिक पक्ष सोडून रिपब्लिकन पक्षाशी आपले संबंध जोडले. त्यापूर्वी त्याने 'ह्यूबर्ट हंफ्रे' या डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता.

पण त्याचा उपयोग न होता निक्सन निवडून आला. माफियाशी जडलेले फ्रँकचे संबंध जन्मभर त्याला भोवले. एकीकडे गायनात प्रसिद्धी तर दुसरीकडे माफियामुळे बदनामी असे हे दुहेरी जीवन त्याला भोगावे लागत होते. त्याची व्यसने काही सुटत नव्हती. वयाच्या एकावन्नाव्या वर्षी त्याने एकोणीस वर्षाच्या मिया फॅरो नावाच्या एका सिनेमा डायरेक्टरच्या मुलीशी विवाह केला. पण आंबटशौकीपणा, उतारवयातील वैगुण्ये झाकण्यासाठी केलेला आक्रस्ताळेपणा यामुळे दोन वर्षांतच ती त्याला सोडून गेली. इ.स. १९७० नंतर त्याने चित्रपटात काम करणे सोडून दिले. पण ही उणीव त्याने दूरदर्शनवरील कार्यक्रम यशस्वीपणे करून भरून काढली. रोनाल्ड रेगनशी समव्यावसायिक अभिनेता आणि नट म्हणून त्याचे जिव्हाळ्याचे संबंध पूर्वीपासून होते. थोरामोठ्यांशी संबंध असल्यामुळे माफिया प्रकरणात त्याला प्रत्यक्ष तुरुंगात जावे लागले नाही हे खरे. पण बदनामीमुळे फ्रँकचे जीवन हे कलंकित झाले ते झालेच. 'गॉडफादर' या माफियावरील गाजलेल्या कादंबरीत जॉनी फॉन्टेन हे पात्र आहे. ते फ्रँक सिनाट्राच्या जीवनावरून रंगविलेले आहे. फ्रँकचे जीवन म्हणजे कला, गुन्हेगारी, आणि शासन या तिन्हींतील परस्पर-संबंधांवरील भाष्यच म्हणावे लागेल. इ.स. १९७३ मध्ये राष्ट्रपती निक्सन यांनी फ्रँकला व्हाइट हाउसमधे समारंभपूर्वक बोलावले.

इ.स. १९७६ मध्ये फ्रँक सिनाट्राने आपल्या वयाच्या साठाव्या वर्षी सेहेचाळीस वर्षांच्या बार्बाराशी लग्न केले. त्या वेळच्या समारंभात राष्ट्राध्यक्षपदासाठी उमेदवार म्हणून उभा राहिलेला रोनाल्ड रेगन हा हजर राहिला. १९८० च्या अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी फ्रँकने रोनाल्ड रेगन यांना आपला पूर्ण पाठिंबा दिला. फ्रँक आणि त्याची बायको बार्बारा यांनी यापुढील काळात समाजकार्य करीत असलेल्या शेकडो संस्थांवर लाखो रुपये खर्च केले. त्यामुळे अमेरिकेचा सर्वश्रेष्ठ कलावंत आणि दानशूर म्हणून फ्रँकची प्रतिमा नव्याने जगासमोर आली. आजच्या जगाला थोडेसे हास्य आणि थोडासा दिलासा यांची फार गरज आहे. ते पुरवणारा कलावंत म्हणून फ्रँक सिनाट्रा याचा गौरव रोनाल्ड रेगन यांनी १९८५ त केला. त्या वर्षीच्या २३ मे रोजी

अमेरिकेच्या राष्ट्रपती भवनात एक शानदार समारंभ झाला. रोनाल्ड रेगन यांनी फ्रँक सिनाट्राला अमेरिकेचे सर्वश्रेष्ठ असे सिव्हिलियन ॲवॉर्ड (मुलकी पुरस्कार) 'द प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडम' (स्वातंत्र्याचे अध्यक्षीय पदक) देऊन त्याचा सत्कार केला. त्या समारंभात फ्रँकच्या बरोबरीने इतर महत्त्वाच्या व्यक्तींनाही अशीच पदके देण्यात आली.

अशा व्यक्तींत 'मदर तेरेसा' होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. त्या दिवशीच्या समारंभानंतर फ्रँक सिनाट्रा हा आपल्या 'होबोकेन्स' या जन्मगावी त्या राज्यातील विद्यापीठाच्या आग्रहाच्या निमंत्रणावरून गेला. 'स्टीव्हन्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (तंत्रशास्त्र विद्यालय) हे त्या विद्यापीठाचे नाव. तेथे शिकणे फ्रँकला जमले नाही, पण त्याच विद्यापीठातर्फे गायनकलेचा सर्वश्रेष्ठ तज्ज्ञ आणि सत्कार्यासाठी अलोट संपत्ती खर्चणारा दानशूर म्हणून त्याला 'मानद डॉक्टरेट' ही पदवी देण्या आली. या सन्मानाच्या वेळी फ्रँक जुन्या आठवणींनी भारावून गेला. भावनांच्या आवेगामुळे त्याला बोलणेही अवघड होऊ लागले. गहिवरून तो श्रोत्यांना म्हणाला, ''या प्रसंगी मी काय बोलणार ? तुमच्या तरुण पिढीला मी हाच आशीर्वाद देतो की तुम्ही चारशे वर्षे जिवंत राहावे आणि त्याच्या शेवटी तुमच्या कानांवर माझे गीत पडत राहावे.''

❖ ❖

# इव्हलिन वॉ

सुप्रसिद्ध इंग्रजी कादंबरी-लेखक इव्हलिन वॉ (जन्म १९०३, मृत्यू १९६६) यांचे एक मोठे मार्मिक चरित्र त्यांचा स्नेही आणि साहित्यिक क्रिस्तोफर साइक्स याने लिहिले आहे. इव्हलिन वॉ हा व्यक्तिरेखा चितारण्यात अप्रतिम होता. विनोद आणि उपरोध या शस्त्रांचा वापर करून त्याने समाजातील विसंगती आणि व्यक्तींचा दांभिकपणा दाखविण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या महायुद्धात इव्हलिनने कलात्मक म्हणून इजिप्त, क्रेट, इत्यादी भागात कामगिरी केली. आपल्या युद्धकालीन अनुभवांवर त्याने त्रिखंडात्मक कादंबरी लिहिली ती चांगलीच गाजली. इव्हलिनने जगभर प्रवास केला. ॲबीसिनियाला (आजचे इथियोपिया) त्याने दोनदा भेट दिली. एकदा सम्राट हेलेसेलासी याच्या राज्यारोहणाच्या वेळी आणि दुसऱ्यांदा इटालीने तो देश जिंकून घेतला तेव्हा. अमेरिका, उत्तर आणि दक्षिण आफ्रिका, मध्यपूर्व, इराक, इराण, युरोपमधील अनेक राष्ट्रे त्याने पाहिली. भारतात तो गोव्याला येऊन गेला. इव्हलिनचे प्रवासवृत्तांत मोठे प्रत्ययकारी वाटतात.

अशा साहित्यिकाच्या जीवनात मनोरंजक घटना काही कमी आल्या नाहीत. आता हेच पाहा ना – १९२७ मध्ये इव्हलिनने 'कवी रोझेटी : जीवन आणि साहित्य' हा ग्रंथ प्रसिद्ध केला.

इव्हलिन वॉ याचे संपूर्ण नाव होते इव्हलिन ऑर्थर सेंट जॉन. पण लोकांत तो इव्हलिन एवढ्याच नावाने प्रसिद्ध होता. आता इव्हलिन हे नाव स्त्रिया आणि पुरुष या दोघांमध्येही आढळते. मराठीत अशी उदाहरणे काही कमी नाहीत. मधू, माणिक, किरण, गुलाब, शिरीष ही काही नावे सहज आठवतात.

इव्हलिनच्या या ग्रंथाचे प्रतिकूल परीक्षण इंग्रजी नियतकालिक 'टाइम्स लिटररी सप्लिमेंट'मध्ये आले. परीक्षणलेखकाची पहिली चूक झाली ती ही की रोझेटीवरील हा ग्रंथ एका स्त्रीने लिहिला असे तो समजला. ''रोझेटी हा कसला कवी? कविकामाठी. त्याचे परीक्षण मिस वॉ यांनी करावे म्हणजे एका दिमाखदार (डेंटी) स्त्रीने एखाद्या तुणतुणे वाजविणाऱ्याला एक आणा देऊ करण्यासारखे आहे.'' असे त्याने आपल्या लेखात म्हटले होते.

त्याला उत्तर देताना इव्हलिनने टीकाकारावर चौफेर हल्ला चढविला. त्याने लिहिले : ''टीकाकाराने माझ्या पुस्तकाचा अभ्यास करण्यापूर्वी त्याचे पहिले पान जरी उलटले असते तरी त्याला कळले असते की मी ती नसून तो आहे!''

१९३६ मध्ये इव्हलिन हा दुसऱ्या खेपेस इथिओपिया येथे गेला होता. तेथील प्रमुख इटालियन प्रशासक ग्राजियानी याने त्याची उत्तम बडदास्त ठेवली. आदिस अबाबा (राजधानी) येथून अस्माराकडे जाण्यास इव्हलिन निघाला तेव्हा त्याची उत्तम व्यवस्था ठेवावी असे ग्राजियानी याने अस्माराच्या स्थानिक अधिकाऱ्याला लिहिले. इव्हलिन आपल्या प्रवासवर्णनात लिहितो : ''इतरांप्रमाणे या अधिकाऱ्याचाही मी स्त्री असणार असा माझ्या नावावरून समज झाला. तो वृत्तीने काहीसा रंगेल होता. मला देण्यासाठी म्हणून तो मोठ्या कष्टाने त्या भागात दुर्मिळ असणारा लाल गुलाबांचा गुच्छ घेऊन आला. पण प्रत्यक्षात त्याला आमच्या गबाळ्या आणि दाढी वाढविलेल्या मूर्तीचे दर्शन घडले. त्याच्यावर झालेला हा आघात भयंकर असावा.''

नंतर इव्हलिन वॉ एकदा पॅरिसला गेला होता. तेव्हापर्यंत त्याची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली होती. पॅरिसच्या एका हॉटेलमधील प्रसंग. इव्हलिन लिहितो :

एक उत्तम पोषाख केलेली सुंदर स्त्री आमच्या जवळच्या टेबलापाशी येऊन बसली. तिच्याबरोबर एक देखणा आणि उमदा माणूस होता. तो बेल्जियमचा एक उमराव होता असे नंतर कळले. माझ्या सोबत्यांपैकी कुणाशी तरी तिची ओळख असावी. त्यामुळे माझे नाव तिच्या कानांवरून गेले. तिने विचारले, ''या तरुणाचे नाव काय म्हणालात?'' कोणीसे म्हटले, ''इव्हलिन वॉ.'' तिने विचारले, ''हे काय करतात?'' माझ्या भोवतालच्या मंडळींपैकी एकाने चाचरत सांगितले, ''माहीत नाही. पण लेखक असावेत.''

ती ताबडतोब म्हणाली, ''मला वाटलंच. यांना भेटण्याची माझी फार इच्छा होती. जरा पलीकडे सरका. मला त्यांना भेटायचं आहे.''

ती माझ्याजवळ येऊन बसली आणि बोलू लागली. ''अहो, तुमच्या फोटोवरून तरी तुम्ही इतके देखणे असाल असं वाटलं नव्हतं. गेल्या आठवड्यात मी तुमचा 'इव्हिनिंग स्टँडर्ड'मधला लेख वाचीत होते. उत्कृष्ट होता. मी त्याचे कात्रण काढून माझ्या आईकडे पाठविले.''

मी म्हटले, ''त्या लेखाबद्दल मला दहा गिनी मोबदल्याचे मिळाले.''

इतक्यात त्या बेल्जियन उमरावाने तिला आपल्याबरोबर नाच करण्यासाठी विनंती केली. तसे ती त्याला म्हणाली, ''छे, छे! ते शक्य नाही. मी या वेळी या अलौकिक प्रतिभासंपन्न माणसाच्या संगतीत रमले आहे.'' नंतर ती माझ्याकडे वळून म्हणाली, ''मला काहीसे अंतर्ज्ञान साधते. मी या खोलीत आले तो मला सारखे वाटू लागले की

या खोलीत कोणी तरी असामान्य व्यक्ती आहे आणि आज संध्याकाळ होईपर्यंत तिची आणि माझी गाठ पडणार आहे.'' प्रथितयश कादंबरीकारांना अशा प्रकारची वाक्ये ऐकणे अंगवळणी पडत असावे. पण मी पडलो नवखा. अवघी दोन पुस्तके लिहिलेला. तिचे बोलणे ऐकून मला आनंद झाला. ती म्हणाली, ''तुम्हांला माहीत आहे का, या युगात तुमच्या जोडीचा एकच प्रतिभाशाली माणूस आहे. त्याचं नाव ओळखा बरं.''

मी सुखावलो होतो. म्हटले, ''आइन्स्टीन का ?''

ती म्हणाली, ''नाही.''

मग म्हटले, ''चार्ली चॅप्लिन ?''

''नाही.''

''जेम्स जॉइस ?''

''नाही.''

शेवटी मी कबुली दिली, ''मग आपल्याला नाही सुचत बुवा !''

ती म्हणाली, ''मी सांगते. मॉरिस दकोब्रा. रिट्झ हॉटेलमध्ये मी त्याला पार्टी देणार आहे. तेथे मी तुमची व त्याची भेट घालून देईन. तुम्हा दोघा अलौकिक प्रतिभावंतांची मी भेट घडवून आणली तर माझ्या जीवनाचं सार्थक झालं असं मला वाटेल. जीवन सार्थकी लावण्यास काही तरी केलं पाहिजे, नाही का ?''

आमचे भाषण कसे सुरळीत चालले होते. इतक्यात ती म्हणाली, ''तुमची पुस्तकं मला किती आवडतात म्हणून सांगू ? मी प्रवासाला जाते ना, तेव्हा माझ्या बिछान्याशेजारी तुमची सगळी पुस्तकं ओळीनं लावून ठेवते.''

माझी पुस्तके आणि ओळीने लावून ठेवते ? माझी पुस्तकेच मुळी दोन. माझा भाऊ ॲलेक वॉ हा उत्तमपैकी लेखक होता. त्याने अनेक पुस्तके लिहिली होती. त्याच्याबद्दल तर ती बोलत नसेल ? मी विचारले,

''का हो, तुम्ही माझा भाऊ ॲलेक आणि मी यांत घोटाळा तर करत नाही ना ? त्यानं माझ्यापेक्षा किती तरी अधिक पुस्तकं लिहिली आहेत म्हणून विचारतो.''

''त्याचं नाव काय आहे म्हणालात ?''

''ॲलेक वॉ.''

''बरोबर. मग तुमचं नाव काय ?''

''इव्हलिन.''

''पण तुम्ही लेखक आहात असं कोणीसं म्हणालं ना ?''

''हो, मी थोडंसं लेखन करतो.''

तिच्या चेहऱ्यावर दिसणारी दारुण निराशा काय सांगावी ? माझ्याकडे पाहत ती म्हणाली, ''मोठं दुर्दैवच हे.''

यानंतर ती लगबगीने त्या बेल्जियन उमरावाबरोबर नाच करायला गेली. तेथून परत येऊन ती माझ्याजवळ न बसता, आपल्या स्वत:च्या पूर्वीच्या टेबलाजवळ बसली. जाताना माझ्याकडे वळून काहीशी उडवाउडवी करीत ती म्हणाली, "आपण पुन्हा भेटूच म्हणा." अर्थात ती पुन्हा कशाला भेटते?

स्वत: इव्हलिनच्या हातून चुका झाल्या नाहीत असे नाही. त्याचा मित्र व्हिक्टर म्यालेट हा इराणमध्ये राजदूत होता. तो आणि त्याची पत्नी यांनी इव्हलिनला इराणला भेट देण्याचे आमंत्रण दिले. ही गोष्ट त्याने लक्षात ठेवली. पण इराणच्याऐवजी त्याच्या डोक्यात बसला इराक. मध्यपूर्वेत तो गेला असताना त्याने इराकमधील ब्रिटिश राजदूताला तार केली : "आठवड्याचे शेवटचे दोन दिवस घालविण्यासाठी बगदादला येत आहे. हरकत नाही ना?" उत्तर आले, "सुस्वागतम्."

१९३५ साली इराकमध्ये क्लार्ककर हे ब्रिटिश राजदूत होते. इव्हलिनची पुस्तके त्यांनी वाचली होती. त्याचे नाव त्यांच्या परिचयाचे होते. पण तरी पूर्वीचा पत्रव्यवहार नसताना इव्हलिनची अशी तार यावी याचे त्यांना आश्चर्य वाटले. आणि त्यांनी औपचारिक स्वागताचे उत्तर पाठविले. इव्हलिन बगदादला पोहोचला. त्याला राजदूतावासामध्ये नेण्यासाठी विमानतळावर मोटार आली होती. राजदूतावासात पोहोचल्यावर एका तरुणीने त्याचे स्वागत केले. इव्हलिन तिला म्हणाला, "मला राजदूतांच्या पत्नीकडे घेऊन चला." ती हसून म्हणाली, "अहो, मीच राजदूतांची पत्नी आहे."

आपला मित्र म्यालेट हाच येथे राजदूत आहे या भ्रमात इव्हलिन होता. तो खळखळून हसला आणि मिसेस क्लार्ककर यांना म्हणाला, "अहो, हा काय प्रकार आहे? मी मिसेस म्यालेटना चांगलंच ओळखतो."

मिसेस क्लार्ककर म्हणाल्या, "कोण मिसेस म्यालेट? येथे तर त्या नावाचे कोणी नाही."

इतक्यात स्वत: क्लार्ककर तेथे आले. आणि मग सर्व गोष्टींचा खुलासा झाला. इराण आणि इराक या नावांमध्ये आपण किती घोटाळा करून ठेवला याची जाणीव होऊन इव्हलिन मोठा खजील झाला.

इव्हलिन हा विचाराने हुजूर पक्षाचा आणि वृत्तीने काहीसा सनातनी होता. इंग्लंडमध्ये हळूहळू डावी विचारसरणी, सामान्य माणसे, मजूर, किसान इत्यादींचा गलबला सुरू झाला होता. अनेक संधिसाधू बुद्धिवादी या दिंडीत सामील होऊन समतेच्या आरोळ्या ठोकीत होते. त्यांच्या दांभिकपणावर इव्हलिन सतत हल्ले करीत राहिला. याचे एक उदाहरण पुढीलप्रमाणे आहे :

त्या काळात इंग्लंडमध्ये आकाशवाणी हे प्रचाराचे व करमणुकीचे मोठे साधन बनले होते. दूरदर्शनचे माध्यम अद्याप पुढे होते. आकाशवाणीकडे अनेक हौसे, गवसे आणि नवसे ओढले गेले आणि रेडिओस्टार म्हणून मिरवू लागले. रोजचे विविध कार्यक्रम, संगीत, नाटके, चर्चासत्रे इत्यादींमुळे इंग्लंडची जनता भारावून गेली. आता आकाशवाणी ही वृत्तपत्रांना मागे टाकणार असा रंग दिसू लागला.

नभोवाणीच्या कार्यक्रमांत भाग घेणारी काही मंडळी निश्चितच मातबर होती. उदाहरणार्थ : रोज मेकॉले व ज्यूलियन हक्सले ही साहित्यिक मंडळी. पण काही तर येनकेन प्रकारेण प्रसिद्धी मिळवू पाहणारी व विद्वत्तेचा आव आणू पाहणारी माणसे असत. त्यांना घुश्ये अगर थातुरे-मातुरे म्हणणे योग्य होईल. अशा मंडळींत प्रोफेसर सीरिल जोड हे असत. नभोवाणीच्या चर्चासत्रात 'ब्रेन ट्रस्ट' म्हणून एक कार्यक्रम असे. यात स्वत:ला सर्वज्ञ समजणारी मंडळी एकत्र जमून विविध प्रश्नांवर आपली मते व्यक्त करीत. जोड हे अर्थात त्यात असतच. इव्हलिनचा चरित्रकार साइक्स म्हणतो :

जोड म्हणजे एक भंपक आणि तिसऱ्या श्रेणीचा राजकीय विषयावरील स्तंभलेखक. पण केवळ नभोवाणीमुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेला.

अशाच एका चर्चासत्रात इव्हलिनला भाग घेण्याची पाळी आली. या ब्रेन ट्रस्टमध्ये होते सुप्रसिद्ध समाजवादी विल्यम बेव्हरिज, सेंट पॉलचा डीन, एक लष्करी अधिकारी कॅंबेल आणि अर्थातच प्रोफेसर जोड. या विद्वानांना विचारलेले प्रश्न पुढील प्रकारचे असत :

''ज्ञानाने सुखाचा अंतिम लाभ होतो काय ?'', ''परमेश्वर कोण आहे असं तुमच्या मुलानं विचारलं तर तुम्ही त्याला काय आणि कसं सांगाल ?''

त्या दिवशीच्या चर्चेत जो प्रश्न आला तो सैनिक आणि मुलकी कर्मचारी यांची वेतनश्रेणी एकच असावी की नाही याबद्दलचा होता.

बेव्हरिज आणि कॅंबेल म्हणाले की दोघांनाही समान पगार मिळाला पाहिजे. इव्हलिन त्यांना म्हणाला, ''असं जर तुमचं मत आहे, तर आज आपल्या कार्यक्रमाचा जो मोबदला मिळणार आहे त्याचा एक तृतीयांश भागच आपण घ्यायला हवा.'' कार्यक्रम संपल्यानंतर त्याने पुन्हा ही सूचना मांडली. तो म्हणाला, ''आपल्या मोबदल्यापैकी वीस पौंड आपण युद्धनिधीला देऊ या.'' या सूचनेने त्यांना धक्काच बसला. बेव्हरिज म्हणाला, ''युद्धकार्याला आपली बांधिलकी किती आहे हे दाखविण्यासाठी ना ?'' इव्हलिन म्हणाला, ''नाही. समान वेतनश्रेणीच्या बाबतीत तुम्ही किती प्रामाणिक आहात हे दाखविण्यासाठी.'' कॅंबेल म्हणाला, ''अर्थात इतर तयार असले तर मी तयार आहे. पण नभोवाणीच्या तंत्रात हे बसत नसावं.'' यावर नभोवाणीचा अधिकारी मिस्किलपणे हसून म्हणाला, ''छे, छे ! ती तर अगदी सोपी गोष्ट आहे.''

यावर जोड जवळजवळ किंचाळलाच. तो म्हणाला, ''पण मी तर काहीच मत दिलेलं नाही.'' इव्हलिन त्याला म्हणाला, ''याचा अर्थ तुम्हांला माझी सूचना मान्य नाही असाच घ्यायचा का?'' जोड म्हणाले, ''नाही. इतरांना तुमची सूचना संमत असली तर मलाही आहे.''

तेथून निघताना इव्हलिन त्यांना म्हणाला, ''आज तुम्हांला पैसे हातात न पडता कार्यक्रम करावा लागला याचा मला खेद होतो.''

पण त्याला माहीत होते की समतेच्या गप्पा मारणारी ही मंडळी पैसे सोडायला तयार होणार नाहीत. झालेही तसेच. इव्हलिनची पाठ फिरण्याचा अवकाश, मोबदल्याचे पुरेपूर पैसे खिशात टाकून ही मंडळी चालती झाली!

दूरदर्शनवरील इव्हलिनचा अनुभव थोडा वेगळा, पण काहीसा विचित्रच होता. त्याला वाटले, आपल्याला इंग्रजी साहित्यावर, कथाकादंबरी तंत्रावर प्रश्न विचारण्यात येतील. पण मुलाखत घेणाऱ्याने इव्हलिनचे बालपण, जीवनातील खाजगी गोष्टी यांवरच प्रश्न विचारले. इव्हलिनला हा आचरटपणा मुळीच आवडला नाही. पण त्याने संयमाने उत्तरे दिली. शेवटी तर मुलाखत घेणाऱ्याने कमालच केली. त्याने विचारले, ''मिस्टर इव्हलिन, तुम्ही आपलं खाजगी जीवन हे खाजगीच राहावं हे तत्त्व पाळण्यात किती दक्ष आहात हे आम्हांला माहीत आहे. असं असताना तुम्ही आजच्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी कसे आलात? लाखो लोक हा दूरदर्शनचा कार्यक्रम पाहत आहेत.'' या मूर्ख प्रश्नाला इव्हलिनने काय उत्तर द्यावे? तो हळूच हसून म्हणाला, ''अहो, गरिबी. दुसरं काय? मला पैसे हवेत आणि अशा कार्यक्रमाच्या मोबदल्यात तुम्ही ते पुरविता म्हणून.'' प्रश्न विचारणाऱ्याची फजिती मात्र दूरदर्शनवर हजारोंनी पाहिली.

साहित्यिक आपल्या ललित कृतींतून पात्रे निर्माण करतात ती समाजात त्यांच्याभोवती वावरणाऱ्या जिवंत स्त्रीपुरुषांच्या, अगर नुकत्याच होऊन गेलेल्या लोकांच्या जीवनाच्या अभ्यासातून. पण याचा अर्थ अशी माणसे तंतोतंत ललित कृतीत येतात असे नव्हे. कलाकाराची प्रतिभा अनेक माणसांचे निरीक्षण करून त्यातून एखादे पात्र निर्माण करू पाहते. त्यामुळे अमके पात्र म्हणजे अमकीच व्यक्ती असे होत नाही. पण अनेकदा एखाद्या पात्रातील वैशिष्ट्ये अशी काही जाणवू लागतात की, कलाकाराने आपल्या लेखनात पूर्णांशाने नाही तरी बव्हंशाने एखादी समाजात वावरणारी व्यक्ती नजरेसमोर ठेवली असली पाहिजे असे वाटू लागते. अर्थात ती व्यक्ती सहजपणे ओळखू येऊ नये म्हणून तो आपल्या पात्रात अनेक इकडचे तिकडचे तपशील मिसळतो. मराठी साहित्यातही याची अनेक उदाहरणे सांगता येतील.

इव्हलिन वॉ यानेही हे तंत्र मुबलकपणे वापरले आहे. त्याच्या कथा-कादंबऱ्यांतून त्याचे आप्तेष्ट, मित्र-मैत्रिणी, व्यवसायातील सहकारी, त्याच्या लष्करी जीवनातील

अधिकारी, सैनिक अशी सर्व प्रकारची पात्रे नाव बदलून फिरताना दिसतात. इव्हलिनने यांपैकी अनेकांचे चित्रण हळुवारपणे केले आहे, तर काहींच्यावर निर्दयपणे प्रहार केले आहेत. आपल्याला इव्हलिनच्या कादंबऱ्यांत जागा मिळाली म्हणून डायना डफ कूपरसारख्या मैत्रिणी आणि बॉब लेकॉकसारखे मित्र सुखावले तर बीवर ब्रुकसारखे अनेक जण दुखावले गेले.

इंग्लंडचे महायुद्धकालीन पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्या माहितीमंत्र्याचे नाव ब्रेंडन ब्राकेन. हा स्वत:ला बुद्धिवाद्यांचा पुढारी समजे. याच्याद्वारे युद्धकार्यात इंग्लंडचे बुद्धिवादी (साहित्यिक आदी) गुंतवता येतील अशी चर्चिलची समजूत. ब्राकेनही चर्चिलला भलताच चिकटला. इकडे अधिकारविहीन साहित्यिकांतही त्याचा भाव वाढला. युद्ध-लेखकांचा सरकारी संघ ही कल्पना त्याचीच. त्याच्या सांगण्यावरून कोस्लर, स्पेंडर इत्यादी लेखकांनी जाहीर विनंतिपत्रक काढून साहित्यिकांना आवाहन केले : ''१९३९ मध्ये युद्ध झाले तेव्हा अनेक लेखकांना आपली भूमिका काय असावी याबद्दल संभ्रम पडला. पण आता (१९४१) रशियावर हल्ला झाला आहे. मती स्थिर झाली आहे. तेव्हा अजूनही हे युद्ध साम्राज्यवाद्यांचे आहे असे म्हणून अलग राहणे शक्य नाही.'' विनंतिपत्रक काढणारे लेखक डाव्या आणि अतिडाव्या विचारसरणीचे होते ही गोष्ट तर खरीच. पण त्यांच्या आवाहनाची टिंगल उडविताना इव्हलिनने लिहिले : ''इंग्रज लेखकांची केवढी ही क्रूर थट्टा. काय तर म्हणे सारा युरोप पादाक्रांत होत असताना हे लेखक मागे-पुढे करीत होते, आणि मग लुटीच्या वाटणीत शत्रूचे भागीदाराशी बिनसल्यावर आताच आमची मती स्थिर झाली काय ?'' या सरकारी लेखक योजनेला तो रॅकेट, ऑफिशियल रॅकेट म्हणे.

ब्रेंडन ब्राकेन याला चर्चिलने वृत्तपत्रसृष्टीतून ओढले होते. तो त्या सृष्टीत देशभक्तीच्या नावाखाली मिरवत होता. धडपड अर्थलाभाची. ब्राकेन हा काडीचाही अधिकार नसताना कला आणि साहित्य या क्षेत्रात धुडगूस घाली. सर्वज्ञतेचा आव आणी. प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञांसमोर मग ते लेखक असोत, कुशल शस्त्रवैद्य असोत, की स्थापत्यविशारद असोत, हा आपले अगाध ज्ञान दडपून ठोकून द्यायचा. बरे, हा चर्चिलच्या आपण किती जवळ आहोत हे दाखविताना अशा काही गप्पा मारी की त्या जगाशी अपरिचित असलेले साहित्यिक अगदी दबून जात. याच्या निर्लज्जपणाची सीमा पाहा. एक दिवस याने हळूच अफवा पसरून दिली की ''मी चर्चिलचा अनौरस मुलगा आहे!'' मग तर याचा भाव आणखीनच वाढला.

ही गोष्ट चर्चिलचा मुलगा रॅन्डॉल्फ चर्चिल याला आवडली नाही. ब्राकेनला बनविण्याची त्याला लवकरच संधी मिळाली. एका समारंभात ब्राकेन हा अध्यक्ष

रूझवेल्ट यांची आपल्या भाषणात वारेमाप स्तुती करू लागला. मध्येच रँडॉल्फ चर्चिल याने उठून त्याला विचारले, ''काय हो, रूझवेल्टनाही तुम्ही आपला बाप म्हणणार आहात काय?''

अशी ही व्यक्ती इव्हलिनने आपल्या 'ब्राइड्स हेड रीव्हिजिटेड' या प्रसिद्ध कादंबरीत रेक्स मोहाम या नावाचे पात्र म्हणून घातली आहे.

❉ ❉

# सत्तेच्या खुर्चीखालची प्रकरणे

चॅपमन पिंचर यांचा व्यवसाय पत्रकाराचा. दुसऱ्या महायुद्धात ते इंग्लंडच्या संरक्षणखात्यात विज्ञान विभागात होते. युद्धानंतर संरक्षणखात्यातील अनेक सहकारी मोठमोठ्या पदावर गेल्यामुळे त्यांच्या परिचयाचा लाभ पिंचर यांना झाला आणि राजकारणातील अंतरस्थ बातम्या काढण्यात त्यांना मोठे यश लाभले. आपल्या व्यवसायातील अनुभव त्यांनी 'इन्साइड स्टोरी' (अंदरकी बात) या नावाने १९७८ मध्ये प्रसिद्ध केले आहेत. त्यांत त्यांनी इंग्लंडमधील अनेक सनसनाटी बातम्यांची कसून छाननी केली आहे. इंग्लंडचे गुप्तचर खाते, परराष्ट्रीय सरकारांकडून इंग्लंडमध्ये सतत आणि मोठ्या प्रमाणात चालू असलेली हेरगिरी, इंग्लंडच्या राजकीय नेत्यांचे खाजगी आणि सार्वजनिक जीवन, इंग्लंड आणि अमेरिका यांचे संबंध, रशिया आणि पाश्चात्य राष्ट्रे यांच्यामधील शीतयुद्ध आणि त्याचे संभाव्य परिणाम असे अनेक विषय या ग्रंथात हाताळलेले आढळतील.

पिंचर म्हणतात, ''सत्तेचे मर्म एकच. दुसऱ्यावर प्रभाव आणि दबाव चालू ठेवण्याची धडपड. राजकीय नेत्यांचे ते तर जीवनच आहे. पण इतरांनाही सत्तेची बाधा झाल्याशिवाय राहत नाही.'' इंग्लंडचे पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांची सेक्रेटरी मार्सिया विल्यम्स ऊर्फ लेडी फार्केंडर हिच्या प्रभावाबद्दल पिंचर त्या काळातील विनोदी चुटका सांगतात, तो असा :

पंतप्रधानांना भेटण्यासाठी कोणी एक महत्त्वाचे गृहस्थ आले. पंतप्रधानांना भेटण्याची वेळ त्यांना ठरवून घ्यायची होती. यासाठी त्यांना पंतप्रधानांच्या सेक्रेटरी मार्सिया विल्यम्स म्हणजे लेडी फार्केंडर यांच्याशी संपर्क साधायचा होता. त्यांना उत्तर मिळाले, ''लेडी फार्केंडर कामात आहेत, पण पंतप्रधानांची तुम्ही गाठ घेऊ शकता!''.

इंग्लंडच्या राजकीय जीवनात एके काळी हॅरॉल्ड विल्सन आणि मार्सिया विल्यम्स यांच्या संबंधाचा फारच गवगवा झाला होता. पिंचर यांनी या प्रकरणाची कसून चौकशी केली. त्यांच्या मते या अफवांमध्ये काही तथ्य नव्हते. पण हॅरॉल्ड विल्सनना तिच्याबद्दल जिव्हाळा होता हे खरे.

मार्सिया विल्यम्सची हकीकत तरी काय? ती व्हाइट हॉलमध्ये एका अधिकाराच्या जागेवर होती. तिचा नवराही एक मोठा पगारदार माणूस होता. १९५९ मध्ये

विल्यम्सला सीटल (अमेरिका) येथे बोइंग कार्पोरेशनमध्ये मोठ्या पगाराची जागा मिळाली. पण मार्सिया ही आपली नोकरी सोडून त्याच्याबरोबर जाण्यास तयार होईना. तिने अत्यंत नाखुशीने त्याच्याशी घटस्फोट घेण्याचे ठरविले. मार्सियाचे म्हणणे असे की तिच्या नवऱ्यानेच ही इच्छा व्यक्त केली होती, कारण तो एका मुलीच्या प्रेमात सापडला होता. पुढे घटस्फोट मिळविल्यावर त्याने तिच्याशी लग्न केले.

कोर्टात घटस्फोटासाठी कारण द्यावे लागते. ते काल्पनिक असले तरी चालते. त्यामुळे मार्सियाने घटस्फोटाची मागणी करताना नवरा छळ करतो असे कोर्टात सांगितले.

मार्सियाला घटस्फोट मिळाला तो १९६० मध्ये. त्या वेळी हॅरॉल्ड विल्सन हे मजूर पक्षाचे पुढारी झाले नव्हते. त्यांना पंतप्रधानकी मिळाली आणि त्यानंतर ती त्यांची सेक्रेटरी म्हणून कामाला लागली. ती कामात तडफदार असल्यामुळे साहजिकच विल्सन यांच्यावर तिची छाप बसत गेली. ते तिची आस्थापूर्वक चौकशी करू लागले आणि तिच्या अडीअडचणीत तिला मदत करू लागले. विल्सन यांना बायको – मेरी – असून ती त्यांच्याबरोबरच राहत होती हे विसरता कामा नये.

मार्सियाचा प्रभाव विल्सन यांच्या सहकाऱ्यांना सहन होत नसावा. लॉर्ड विगने आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे : "पंतप्रधान विल्सन यांच्यावरील मार्सिया विल्यम्सचा प्रभाव वाढत होता. या बाबतीत ती म्हणजे विल्सनचे सहकारी आणि इतर अधिकारी यांना जबरदस्त आव्हान होते. पण हा प्रभाव तिने औचित्याने आणि शहाणपणाने वापरला असे दुर्दैवाने म्हणता येणार नाही."

मार्सिया ही तशी देखणी तरुणी. नवऱ्याकडून घटस्फोट घेतलेली. तिचे लक्ष इकडे तिकडे जाणे नैसर्गिक होते. तिची काही प्रकरणे तत्कालीन पुस्तकांतून नोंदली गेली आहेत. पण १९६७ मध्ये मात्र ती खऱ्या प्रेमवेडाने झपाटली गेली.

वॉल्टर हेरी हा एक प्रसिद्ध पत्रकार. मार्सियाचे त्याच्याशी संघटन वाढू लागले. हेरीचे लग्न झालेले असून त्याला बायको होती. तो तिच्याशी घटस्फोट घेणार होता. घटस्फोट घडून येईल या खात्रीने ती हेरीबरोबर राहू लागली. अशा वेळी तिने आपल्या सेक्रेटरीपदाचा राजीनामा तरी द्यावा? तोही तिने दिला नाही.

पिंचर म्हणतात : "मार्सियाने पस्तिशी ओलांडली होती. तिला मुले हवी होती. हेरीने आपल्या बायकोविरुद्ध घटस्फोटाचा दावा लावला होता. ते प्रकरण लवकर निकालात निघणार नव्हते. त्याची वाट पाहत बसण्यात काही अर्थ नव्हता."

एकोणीस महिन्यात मार्सियाला दोन मुले झाली. ती स्वतः म्हणाली, "मला नको असती तर ती मला झालीच नसती. मीच आता मुलांना वडिलांच्या ठिकाणी आहे, आणि मी सुखी आहे."

मंत्र्याला तिने सरळ धमकी दिली : ''मुकाट्याने माझ्याकडे परत या, नाही तर ही पत्रं पाहा, मी वर्तमानपत्रवाल्यांना देऊन टाकते.''

एडवर्ड हीथ यांच्या पंतप्रधानकीत असा हलकल्लोळ उडाला असता तर ते मंत्र्याचा राजीनामा घेऊन मोकळे झाले असते. पण विल्सननी गुपचुपपणे आणि खुबीने त्या बाईला पार्लमेंटमधून बाहेर काढले. त्यामुळे ते मंत्री मंत्रिमंडळात कायम राहिले.

पिंचर यांचा व्यवसायच मुळी पत्रकाराचा. एखाद्या घटनेचा सुगावा लागण्याचा अवकाश, पिंचर त्या घटनेचा तळापर्यंत जाऊन तपास करणारच. आता हेच पाहा. सुप्रसिद्ध इंग्रज सेनापती माँटगोमेरी याने रोमेलचा दणदणीत पराजय केला. आख्यायिका अशी की जर्मन सेनापती रोमेल आपल्यावर कुठे हल्ला करील हे माँटगोमेरी पूर्ण अभ्यास करून अगर नेपोलिययनप्रमाणे अलौकिक प्रतिभेने शोधून काढी. माँटगोमेरीच्या विलक्षण लोकप्रियतेचे रहस्य त्याच्या या तथाकथित अलौकिकत्वात होते.

पण हाय, वस्तुस्थिती वेगळीच होती. इंग्रजांच्या हेरखात्याने जर्मनांची सांकेतिक संदेश भाषा हुडकून काढली होती आणि रोमेलच्या युद्धविषयक हालचालींचा संपूर्ण आराखडा युद्धापूर्वीच माँटगोमेरीला पुरविण्यात आला होता.

त्याची हकीकत अशी : जर्मनांनी एक यंत्र तयार केले. इंग्रजांनी त्याला एनिग्मा (कोडे) असे नाव दिले. या यंत्राचा विशेष असा की कोणताही संदेश अगर मजकूर त्यात टाकला की त्याचे सांकेतिक लिपीत रूपांतर होई.

सुदैवाने त्यापैकीच एक यंत्र इंग्रजांच्या हाती पडले. इंग्रज गणिती, बुद्धिबळपटू आणि गुप्तचर खात्यातील तज्ञ यांनी त्याची तपासणी करून यंत्रातील सांकेतिक संदेश उलगडण्यासाठी एक अप्रतिम यंत्र तयार केले. त्यांनी त्या यंत्राचे नाव अल्ट्रा असे ठेवले. या यंत्रामुळे कोणताही संदेश कोणत्याही सांकेतिक भाषेत असला तरी तो उलगडणे सोपे झाले.

जर्मनांना या गोष्टीचा पत्ता नव्हता. इकडे इंग्रजांना जर्मनीच्या डावपेचांची माहिती आगाऊ मिळत होती, आणि इंग्रज ती माहिती अमेरिकनांना पुरवीत होते.

जर्मनांच्या डावपेचांची आगाऊ माहिती इंग्रजांना सतत पाच वर्षे मिळत होती. इंग्लंडवरील १९४० च्या वैमानिक हल्ल्यापासून हिटलरच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रत्येक बातमी काही मिनिटांतच इंग्रज आणि अमेरिकन यांच्या हाती पडे. यामुळे जर्मन वैमानिक हल्ला इंग्लंडच्या कोणत्याही भागात झाला की त्याचा प्रतिकार करण्यासाठी इंग्रजांची थोडीबहुत का होईना विमाने तयार असत. जर्मनांचे प्रचंड जहाज बिस्मार्क हे बुडवणे वरील यंत्रामुळे शक्य झाले.

माँटगोमेरीने सेनापतिपदाची सूत्रे हातात घेतली, तेव्हा आफ्रिकेमध्ये त्याचा प्रतिस्पर्धी होता जर्मन सेनापती रोमेल. रोमेलने युद्धाच्या डावपेचांचा जो आराखडा बर्लिनला पाठविला आणि आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना कळविला तो संपूर्ण मजकूर काही तासांतच माँटगोमेरीच्या टेबलावर येऊन पडला.

आल्मा हैफाच्या युद्धभूमीचा आणि जर्मन डावपेचांचा सगळा तपशील माँटगोमेरीला आधीच कळला होता. त्यामुळे आल्मा हैफाच्या टेकडीवर आपण आपले रणगाडे व्यवस्थितपणे उभे करून रोमेलची गाठ घेऊ शकू अशी माँटगोमेरीला खात्री होती.

इतकेच नव्हे तर युरोपवरील आक्रमणाबद्दल रोमेल आणि बर्लिन यांच्यातील संवादही दोस्त राष्ट्रांनी टिपला होता. रोमेलने म्हटले होते की दोस्त राष्ट्रे नॉर्मंडीत उतरतील (तसेच झाले). पण हिटलरने रोमेलला सांगितले की, ''नाही, दोस्त राष्ट्रे क्याले येथे उतरण्याचा संभव आहे.''

या संदर्भात आपल्या वर्तमानपत्राकडे रिपोर्ट पाठविताना पिंचरनी म्हटले, ''माँटगोमेरी दूरदर्शनवरून नेहमी सांगत असतात की 'रोमेलचे डावपेच काय असू शकतील हे मी माझ्या प्रतिभेने शोधून काढले आहे.' पण वरील बातमीने त्यांचे वस्त्रहरण करण्याची चांगलीच संधी चालून आली आहे.''

पण वर्तमानपत्राचे संचालक वीवर ब्रुक यांनी ती बातमी छापू दिली नाही. त्या वेळी माँटगोमेरी आपल्या शेवटच्या दुखण्याने आजारी होते. त्यांची प्रतिभा कमी होऊ नये अशी वीवर ब्रुकची इच्छा होती!

पत्राचा रिपोर्टर उत्साही पण संपादक मख्ख असेही प्रसंग पिंचरच्या जीवनात आले आहेत. याचे उदाहरण पाहा : क्लॉस फक्स हा ब्रिटिश ॲटमिक शास्त्रज्ञ १९४७ पासून रशियातर्फे हेरगिरी करीत होता. त्याची हेरगिरी शेवटी उघडकीस आली आणि तो पकडला गेला. ही अतिशय सनसनाटी बातमी सांगण्यासाठी पिंचर हे धावतच 'डेली एक्सप्रेस'च्या संपादकाकडे गेले आणि म्हणाले, ''मिस्टर क्रिश्चनसन, मी एक सनसनाटी बातमी आणली आहे. आपला एक अणुशास्त्रज्ञ रशियातर्फे हेरगिरी करीत असताना पकडला गेला आहे.''

मिस्टर क्रिश्चनसननी विचारले, ''त्याचे नाव काय?'' पिंचरनी म्हटले, ''फक्स (एफ् यू सी एच् एस).'' इंग्रजी उच्चारातून या शब्दाचा काय अश्लील अर्थ निघतो हे वाचकास सांगणे नको. बातमीचा सनसनाटीपणा राहिला बाजूला. संपादकमहाशय आनंदाने म्हणाले, ''वाहवा, तो शब्द आपल्या वर्तमानपत्राच्या शीर्षकात वापरावा अशी फार दिवसांपासून माझी इच्छा होती ती आज पूर्ण झाली.''

संपादकाची ही प्रतिक्रिया पाहून पिंचर कपाळावर हात मारून बसले.

भारतातील प्रचलित राजकारणातील जीवघेण्या आजारांनी हैराण झालेले पुढारी आणि वार्धक्याचे ओझे डोक्यावर बाळगून मंत्रिपद भूषविणारे राजकारणी हे डोळ्यांसमोर असल्यामुळे पिंचर यांच्या पुस्तकातील 'राजकीय पुढारी आणि आरोग्य' हे प्रकरण मी आवडीने वाचले. त्यात त्यांनी अनेक उद्‌बोधक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा :

प्रकृती ढासळली तरी राजीनामा न देता अधिकारपदाला चिकटून राहण्याचा सामाजिक गुन्हा अनेकांनी केला आहे. याल्टा येथे दोस्त राष्ट्रांनी रशियासमोर जवळजवळ शरणागती पत्करली आणि त्याच्या भरमसाठ मागण्या मान्य केल्या त्या वेळी रूझवेल्ट हे मरणाच्या दारी होते!

१९४० मध्ये इंग्रजांनी दुसऱ्या महायुद्धात नॉर्वेमध्ये उतरण्याचे ठरविले. या दुर्दैवी निर्णयाच्या वेळी पंतप्रधान नेव्हिल चेंबरलेन यांना दुर्धर असा कर्करोग जडलेला होता. परराष्ट्रमंत्री अर्नेस्ट बेव्हिन यांना तर हृदयविकाराचा रोग होता. आणि चर्चिल? पंतप्रधानकीच्या शेवटच्या कारकीर्दीत त्यांना अर्धांगवायूचे लहानमोठे झटके येत. ते इतके विकलांग झाले होते की हाउस ऑफ कॉमन्समध्ये ते आपल्या खुर्चीपर्यंत तरी धडपणे पोहोचू शकतील की नाही अशी शंका येई. अँथनी ईडन हे आपल्या पंतप्रधानकीच्या काळात सतत आजारीच होते. सुएझ प्रकरणाच्या वेळी तर ते लिव्हरच्या विकाराने हैराण होते. जनरल आयसेनहॉवर यांना तर ते अध्यक्ष असताना हृदयविकार आणि अर्धांगवायू या दोन्हींना तोंड द्यावे लागले.

यावर पिंचर यांचा निष्कर्ष असा की राजकारण्यांनी वेळीच निवृत्त व्हावे. पण सत्तेचा मोह राजकीय नेत्यांना सुटत नाही ही खरी शोकांतिका आहे.

❖ ❖

# अर्नाल्ड ब्रेख्टचे आत्मचरित्र

इतिहासाच्या जोडीने आत्मचरित्राचा अभ्यास हा माझा आवडीचा एक छंद आहे. आतापर्यंत मी इंग्रजी, मराठी, उर्दू या भाषांतून पावणेदोनशेच्या वर आत्मचरित्रे वाचून काढली आहेत. आत्मचरित्र वाङ्मयाचा विलोभनीय विशेष हा की लेखक आपल्या भोवतालच्या समाजाचे, देशस्थितीचे, व्यक्तींचे निरीक्षण तर करतोच, पण त्याबरोबरच या जगाचे संस्कार ग्रहण करीत आपण कसे वाढलो हे तो दाखवीत असतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हा वाचकांच्या दृष्टीने आत्मचरित्राचा गाभा ठरावा. वाचकही अशी आत्मचरित्रे वाचीत असताना अभावितपणे स्वत:ची तुलना आत्मचरित्रकारांशी करीत असतो.

गेल्या महिन्यात अर्नाल्ड ब्रेख्ट या जर्मन अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाचे आत्मचरित्र वाचताना हाच अनुभव आला. अर्नाल्ड ब्रेख्ट हा जर्मनीचा प्रख्यात कायदेपंडित. त्यातल्या त्यात घटनात्मक कायदा हा त्याचा मुख्य प्रांत. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत कैसरशाही नष्ट होऊन लोकशाही सुरू झाली. या लोकशाहीची राज्यघटना वीमार या गावात घटनात्मक मंडळाने तयार केल्यामुळे 'वीमार घटना' असे तिला नाव आहे. घटना तयार करण्यात ब्रेख्टचा भाग होता. यानंतर त्याने कायदेतज्ज्ञ म्हणून जर्मन संघराज्यात व नंतर प्रशियाच्या राज्ययंत्रणेत काम केले.

हिटलरचा उदय होऊन हुकूमशाहीच्या दिशेने जर्मनीची पावले पडू लागताच ब्रेख्ट हा जर्मनी सोडून अमेरिकेत गेला. तेथे त्याने एका संशोधनसंस्थेत प्राध्यापकाची जागा पत्करली. चाळीस वर्षे तो त्या संस्थेत होता. राज्यशास्त्राचा (पोलिटिकल सायन्स) तज्ज्ञ म्हणून त्याला आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली. राज्यशास्त्र, घटनात्मक कायदे, संघराज्य व राज्यसंबंध, सत्ता व मानवी प्रवृत्ती, राजकारण : कला की शास्त्र, व्यक्तिस्वातंत्र्य व सत्ता अशा अनेक विषयांवर त्याने ग्रंथलेखन केले. त्याच्या ग्रंथांची संख्या शंभरावर सहज जाईल. १९७० मध्ये ब्रेख्टने आपल्या वयाच्या ऐंशीव्या वर्षी आपले आत्मचरित्र लिहिले.

ब्रेख्टच्या आत्मचरित्रावरून आपल्याला जर्मन इतिहासातील व राजकारणातील काही महत्त्वाच्या गोष्टी कळतात. त्यांचे आपल्या भारतातील अलीकडच्या घटनांशी

विलक्षण साम्य आहे. म्हणून त्याचा अभ्यास राजनीतिशास्त्रज्ञ काय आणि सामान्य नागरिक काय, सर्वांनाच उपयुक्त ठरावा.

'वीमार राज्यघटने'त मतदानाच्या बाबतीत मतदार संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात आली होती. सुदैवाने भारतात तशी पद्धत नाही. तरी अल्पसंख्याक गट अधून-मधून अशा प्रकारची मागणी करीत असतात. पण अधिकाधिक लोकशाही प्रचलित व्हावी म्हणून या बाबतीत जर्मनीने फ्रान्सवरही आघाडी मारली. कोणत्याही मतदारसंघात एखाद्या पक्षाला कमीत कमी साठ हजार मते पडली की त्या पक्षाच्या प्रतिनिधीला विधिमंडळात जागा मिळालीच पाहिजे असा नियम घटनेतच करण्यात आला. त्यामुळे एकंदरीत देशात शेकडा चार-पाचच्या वर नसलेले नाझी शंभर-सव्वाशेच्या संख्येने विधिमंडळात जागा अडवून बसले. कोणत्याच पक्षाला बहुमत नाही, त्यामुळे संमिश्र सरकारे अस्तित्वात आली. पण त्यांना एकसंध सरकारचे बळ लाभणे शक्य नव्हते. त्यामुळे ख्रिश्चन डेमोक्रॅट, समाजवादी व कम्युनिस्ट यांच्यातील मतभेदांचा लाभ नाझी झुंडशाहीने घेतला आणि अगदी सनदशीर मार्गाने तो पक्ष सत्तेवर आला! अपक्ष अध्यक्ष हवा या भोळ्या समजुतीतून हिंडेनबुर्गसारखा गलितगात्र लष्करी अधिकारी निवडला गेला. त्याच्याकडून हवे तसे आदेश काढून घेऊन नाझींनी आपली सत्ता दृढ केली. समाजवादी व नाझी आपापसात भांडून नष्टप्राय होतील आणि मग आपण सत्ता घेऊ अशा स्वप्नात मश्गुल राहून कम्युनिस्ट हे बघ्याची भूमिका घेऊन बसले. नाझींनी या गोष्टीचाही उपयोग करून घेतला आणि अध्यक्षांकडून अगदी सनदशीर वटहुकूम जारी करवून घेऊन कम्युनिस्ट व समाजवादी यांचा नि:पात केला.

सनदशीर मार्गांनीच जर्मनीत हुकूमशाही आली ती ही अशी! पण अवैध मार्गांचा अवलंब हिटलरच्या पूर्वीपासूनच जर्मनीचे मुख्य मंत्री करू लागले होते. जर्मन संघराज्यात प्रशिया हे राज्य महत्त्वाचे गणले जाई. त्याचे पूर्वी असलेले अनेक अधिकार नाहीसे झाले होते. पण उरलेसुरले अधिकारही काढून घ्यावे असा बेत संघराज्याने केला. ब्रेख्टलाही प्रशियाचे काही अधिकार कमी व्हावे असे वाटत होते, पण संघराज्याच्या पंतप्रधानांनी (फॉन पापेन) वटहुकूम आणि बेकायदेशीर आदेश देऊन प्रशियन राज्याची कोंडीच करण्याचा प्रयत्न केला. हेतू योग्य असला तरी बेकायदेशीर आणि घटनाविरोधी मार्ग पत्करू नये, त्यातूनच हुकूमशाही निर्माण होते, असे ब्रेख्टने बजावून सांगितले. या संदर्भात त्याने प्राचीन रोमन इतिहासाचा दाखला दिला.

ख्रिस्तपूर्व त्रेसष्ट या वर्षी सुप्रसिद्ध रोमन मुत्सद्दी सिसेरो याची सत्ता गाजत होती. त्याने आपले विरोधी क्याटालाइन यांच्या पाच अनुयायांविरुद्ध कार्यवाही केली. ती

कायद्याच्या दृष्टीने आक्षेपार्ह होती. हा विषय जेव्हा चर्चेसाठी सिनेटमध्ये आला तेव्हा सिनेटच्या एका सभासदाने सिसेरोला पुढील शब्दांत बजावले :

''हा नवीन पायंडा पाडला जात आहे. उद्दिष्ट चांगले असेल, पण या पद्धतीची कार्यवाही आक्षेपार्ह आहे. समजा, उद्या एखाद्या मंद बुद्धीच्या किंवा अप्रामाणिक माणसाच्या हातात सत्ता आली तर तो चांगल्या उद्दिष्टाच्या ऐवजी दुष्कृत्ये करण्यासाठी अशा आक्षेपार्ह आणि बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करील. मार्क्स टुलियस (सिसेरो) असे करील याची मला भीती नाही. किंवा आपल्या काळात असे काही घडेल अशीही शंका मला नाही. पण आपल्या या एवढ्या मोठ्या राज्यात भिन्नभिन्न प्रवृत्तींची अनेक माणसे असू शकतात. पुढे एखादे वेळी एक सत्ताधीश नेमला गेला आणि सैन्याचे बळ त्याच्या पाठीशी असले, तो दुष्ट प्रवृत्तीचा निघाला तर तो अशाच आक्षेपार्ह व अवैध मार्गांचा अवलंब करील. त्यासाठी तो हत्यार उपशील आणि शस्त्रबळ वापरील. त्याला कोण आवरू शकेल ?''

इतिहासाचा चमत्कारिक योगायोग पाहा. सिसेरोवर परखड टीका करणारा हा सिनेटर (सिनेटचा सभासद) म्हणजे भावी काळात शस्त्रबळाचा वापर करून हुकूमशाहीकडे जाणारा ज्युलियस सीझर होता!

नाझींच्या हातात सत्ता आली, तेव्हा थोड्याच दिवसांनी जर्मनीच्या कायदेमंडळाच्या – राइशस्टागच्या – इमारतीला आग लागून ती भस्मसात झाली. या घटनेचा लाभ नाझींनी उठविला आणि वाटेल त्याला साध्या संशयावरून अटक करण्यात आली. १९१६ च्या कायद्यात (प्रोटेक्टिव्ह कस्टडी ॲक्ट) व्यक्तींचे हक्क तरी अबाधित होते. तेही १९३३ च्या मार्चमध्ये काढून घेण्यात आले. असे खटले न्यायालयाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले. १९३३ च्या १४ जुलैनंतर एक नाझी पक्ष सोडता इतर पक्षांना मनाई करण्यात आली.

मार्च १९३३ मध्ये राइशस्टागच्या सभेत सोशल डेमोक्रॅट पक्षाचा पुढारी ऑटो वेल्स याने हिटलरच्या तोंडावर पुढील उद्‌गार काढले होते, ''आमचे प्राण आणि आमचे स्वातंत्र्य ही हिरावून घेता येतील, पण आमचे स्वत्व कोणीही काढून घेऊ शकणार नाही. तुमच्या हातात सत्ता आली आहे ही वस्तुस्थिती आम्हांला प्रत्यक्ष दिसते आहे. पण लोकांची न्यायाची ओढ व जाणीव ही सुद्धा एक राजकीय शक्ती आहे. कोणताही कायदा तुम्हांला जनतेचे विचार व विचार-स्वातंत्र्य नष्ट करण्याची शक्ती देऊ शकणार नाही हे लक्षात ठेवा. ते विचार चिरकाल टिकणारे आहेत आणि अविनाशी आहेत.''

पण नाझी पक्षाने या विरोधाची पर्वा केली नाही. विरोधी पक्षांची कठोरपणे मुस्कटदाबी करण्यात आली. कायद्यानेच विरोधी पक्षांना बंदी घालण्यात आली. टीका,

विरोधी विचार, भाषणस्वातंत्र्य इत्यादी हक्कांना निपटून काढण्यात आले. न्यायालयांना नाझी पक्षाची बाहुली बनविण्यात आले. अर्नाल्ड ब्रेख्ट म्हणतो, ''द कर्टन हॅड फॉलन, द ग्रेट सायलेन्स हॅड बिगन.'' – पडदा पडला. स्मशानशांततेला सुरुवात झाली. बुद्धिवादी लोकांनी नाझी सत्तेच्या काळात आपले सर्वस्व पणाला लावून नाझी हुकूमशाहीचा प्रतिकार केला नाही. त्यांना आपले पोट-पाणी, आपली सुरक्षितता ही अधिक महत्त्वाची वाटली. हे नागडे सत्य ब्रेख्टने उघडे केले आहे.

सत्ता हाती आली की ती सोडण्यास सत्ताधारी राजी होत नाहीत, हा सर्वमान्य सिद्धांत आहे. हुकूमशाही हे तर या सिद्धान्ताचे मूळ. नुकतेच के. एम्. पणिक्कर यांचे आत्मचरित्र माझ्या वाचनात आले. पणिक्कर हे इजिप्तमध्ये भारताचे राजदूत होते, त्या वेळी फारुक राजा पदच्युत झाला होता आणि नजीब, नासेर इत्यादींनी सत्ता हाती घेतली होती. त्याच वेळी आपले उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् हे इजिप्तला भेट देण्यास गेले. त्यांनी जनरल नजीब याला जे सांगितले ते असे :

''जनरल, एक गोष्ट लक्षात ठेवा, आज तुम्ही आणि तुमची माणसे ही चारित्र्यवान व संयमी आहात. पण तुमच्या हातात सर्व सत्ता एकवटली आहे. आणि सत्तेचा मद विलक्षण असतो. त्याची बाधा तुम्ही होऊ दिली नाही तर त्यात तुमचे आणि तुमच्या देशाचे हित आहे. नाही तर उभयतांचेही नुकसान आहे.''

पणिक्कर यांनी याच संदर्भात सुप्रसिद्ध इंग्रज मुत्सद्दी ॲन्यूरिन बेवन यांची एक आठवण दिली आहे. त्या वेळी बेवन हे मंत्री नव्हते. विरोधी मजूर पक्षाचे नेते होते. ते इजिप्तला आले, पणिक्करांचे पाहुणे म्हणून ते कायरोत राहिले. पणिक्कर लिहितात :

''बेवनची आणि इजिप्तच्या सत्ताधाऱ्यांची गाठ घालून देण्याची मी सर्व व्यवस्था केली. रात्रीच्या भोजनाच्या वेळी मी बेवनचा नासेर, सालेम आणि क्रांतिमंडळाचे (रिव्होल्युशनरी काउन्सिल) इतर सभासद यांच्याशी परिचय करून दिला. त्यांची बोलणी मध्यरात्रीपर्यंत चालली होती. नासेरचे बोलणे गोड आणि प्रभावी खरे, पण बेवनशी बोलताना स्वतःच्या लष्करी हुकूमशाहीचे समर्थन करणे त्याला जमेना. बेवनने उभे राहून नासेरला विचारले, 'अशी नियंत्रित सत्ता किती दिवस तुम्ही आपल्या हातात ठेवू इच्छिता ?'

नासरने म्हटले, 'इजिप्तमधील भ्रष्टाचार आणि विषमता संपेपर्यंत.'

यावर बेवनने हसत हसत म्हटले, 'हे करणे परमेश्वराला देखील अद्याप जमलेले नाही !' ''

सनदशीर मार्गांनी हुकूमशाही आणणाऱ्या व्यक्ती अगर पक्ष इतिहासात काही कमी आढळत नाहीत. फ्रान्सचा तिसरा नेपोलियन हा कायदेमंडळाचा अध्यक्ष, मंत्री व राष्ट्रपती होत होत शेवटी बादशहा बनला. आणि हे सर्व त्याने केले सनदशीर मार्गाने.

गोंधळलेले फ्रेंच सरकार व अल्जीरियातील बंडखोर फ्रेंच सैन्य यांच्यात मी मध्यस्थी करतो, फक्त मला सर्वाधिकार द्या, असे म्हणत म्हणतच द गॉल हा फ्रान्सचा हुकूमशहा बनला. भुट्टोची कथा फारशी निराळी नाही.

जर्मनीत काय झाले? वीमारच्या राज्यघटनेत एक लहानसा दोष राहून गेला होता. त्यामुळे जर्मनीला फार मोठ्या दिव्यातून जावे लागले असे अर्नाल्ड ब्रेख्टने म्हटले आहे. अमेरिकन राज्यघटनेप्रमाणे अध्यक्षपदासाठी उभा राहणारा उमेदवार हा जन्मापासूनच अमेरिकन नागरिक हवा. जर्मन राज्यघटनेत अशा प्रकारची काळजी घेण्यात आली नव्हती. यातून केवढा अनर्थ झाला? ऑस्ट्रियाचा नागरिक हिटलर हा जर्मनीचा नाझी पुढारी म्हणून निवडून आला आणि राष्ट्राचा हुकूमशहा बनला.

हिटलरचे युग संपले, तेव्हा त्या कालखंडावर भाष्ये होऊ लागली. येथे ब्रेख्टने विज्ञाननिष्ठांच्या दृष्टिकोनाची हजेरी घेतली आहे. स्वत:ला विज्ञाननिष्ठ म्हणविणारे जेव्हा हिटलरला आणि हिटलरकालीन प्रवृत्तींना अनीतिकारक, दुष्ट आणि आसुरी म्हणतात तेव्हा तो म्हणतो,

''परमेश्वरावरील विश्वास आणि परमेश्वरी योजना व यंत्रणा ही दोन्ही श्रद्धेतून निर्माण झाली आहेत. नीती आणि अनीती या कल्पनाही परमेश्वरी योजनांसंबंधीच्या मनातील चित्रांतून निर्माण झाल्या आहेत. आणि विज्ञानाला तर श्रद्धेचे व परमेश्वरी अस्तित्वाच्या कल्पनेचे वावडे आहे. नीती-अनीतीच्या निकषावर हिटलरबद्दल विवेचन करणारे विज्ञाननिष्ठ हे एथिकल फिलॉसॉफर, नीतिशास्त्रज्ञ किंवा थिऑलॉजियन्स – अध्यात्मशास्त्रज्ञ – बनले आहेत.

त्यापेक्षा विज्ञाननिष्ठांनी ही भूमिका अजिबात टाकून द्यावी. नीती-अनीती यांचा काथ्याकूट करण्याऐवजी हुकूमशाही निर्माण का होते, ती थांबविण्याचा उपाय काय याचे विवेचन राज्यशास्त्रज्ञांना आवश्यक ठरेल.'' सध्याच्या भारतीय राजकारणाच्या अभ्यासकांना ही सूचना उपयुक्त वाटावी.

विज्ञानाची भूमिका स्वीकारल्यावर चिरंतन दैवी मूल्ये बाद ठरतात. पण जगाच्या इतिहासात सतत आढळणारी अशी एखादी मानवी प्रवृत्ती सांगा, असे कोणी विचारले तर त्याला काय उत्तर द्यावे? ब्रेख्ट म्हणतो :

''नीतीच्या कल्पना सापेक्ष आहेत हे उघड आहे. पण एक मानवी प्रवृत्ती मात्र सर्वव्यापी दिसते. ती म्हणजे न्यायाची ओढ. मानव हा सतत न्याय मागत आला आहे. या मागणीतच सत्याच्या आवश्यक घटकांचा अंतर्भाव होतो. हे घटक म्हणजे वस्तुनिष्ठ न्याय (ऑब्जेक्टिव्ह जस्टिस), वस्तुनिष्ठ सत्य (ऑब्जेक्टिव ट्रुथ), आत्मनिष्ठ न्याय (सब्जेक्टिव्ह जस्टिस) आणि आत्मनिष्ठ सत्य (सब्जेक्टिव्ह ट्रुथ).''

मग आपली जबाबदारी काय? विज्ञाननिष्ठेमुळे आपण नैतिक मूल्ये मानीत नाही. मग कोणते मूल्य आपल्याला महत्त्वाचे वाटते? ब्रेख्टचे उत्तर निःसंदिग्ध आहे. तो म्हणतो :

''विज्ञान हे उद्दिष्टे ठरवू शकत नाही. विज्ञान हे फक्त संशोधन आणि चिकित्सा करते. पण आपल्याला एक मोकळीक आहे. नैतिक जबाबदारी नव्हे, तर आपल्या कृत्याच्या परिणामाचा विचार करण्याची. पूर्वीच्या पिढ्यांनी जे केले त्याची फळे आम्ही भोगत आहोत. तसे पुढील पिढ्यांचे होऊ नये. हे जग सुंदर व राहण्यायोग्य बनावे यासाठी आपल्याला झटणे भाग आहे. ही केवळ नैतिक जबाबदारी नव्हे. ही आहे कारण, क्रिया व परिणाम यांची जबाबदारी.

आपल्या दीर्घ जीवनासंबंधी अर्नाल्ड ब्रेख्ट जे म्हणतो ते अनेकांना मार्गदर्शक ठरेल. त्याचे म्हणणे थोडक्यात असे :

''मी बराच बदललो असलो तरी माझे (आयडेंटिटी) स्वत्व जे आहे ते अबाधित राहिले आहे. माझ्या जीवनात सत्य, न्याय, स्वातंत्र्य यांसाठीचा लढा, संगीत आणि काव्य यांविषयी प्रेम ही अबाधित राहिली आहेत.

त्याचप्रमाणे कुतूहल आणि चिकित्सा, आपल्या कृत्याचे आपल्यावर व इतरांवर होणारे चांगले व वाईट परिणाम यांबद्दलचा विवेक हीही अबाधित आहेत.''

ब्रेख्टची ही विचारसरणी मला मोठी गंमतीची वाटली. तो म्हणतो, ''आम्ही दीर्घायुषी माणसे. तुम्ही पंचवीस वर्षांची एक पिढी म्हणून मोजता. पण आमचे मोजमाप मोठे आहे. त्यामुळे आम्हांला भूतकाळ फार मागे आहे असे वाटत नाही. आता हेच पाहा –

शास्त्रज्ञ गॅलिलियो आणि शेक्सपीयर हे एकाच वर्षी (१५६४ मध्ये) जन्मले. त्यांच्यात आणि माझ्यात दीर्घायुषी माणसाच्या तीनच पिढ्या झाल्या. गॅलिलियो वारला (१६४२), तेव्हा न्यूटनचा जन्म झाला (१६४२). न्यूटन वारला (१७२७), तेव्हा तत्त्वज्ञ कांट हा जन्मला होता (१७२४). आणि माझा जन्म झाला (१८८४) तेव्हा कांटला पाहिलेली मंडळी हयात होती.''

ब्रेख्टच्या या विवेचनाचा मी भारतीय संदर्भात विचार करू लागलो तेव्हा मला असे दिसून आले की, शिवाजी महाराजांच्या वेळेपासून मोजल्या तर दीर्घायुषी माणसांच्या तीन किंवा चारच पिढ्या झाल्या. शिवाजी महाराजांची सून राणी ताराबाई (जन्म १६७५) ही १७६१ च्या पानिपतच्या संग्रामानंतर वारली. दुसरे बाजीराव पेशवे यांचा जन्म १७७५ चा. ते १८५१ पर्यंत गेले. त्यांच्या मृत्यूच्या वेळी लोकहितवादी, फुले, जांभेकर, जगन्नाथ शंकरशेट, भांडारकर हे प्रगल्भ होते. न्यायमूर्ती रानडे हे नऊ

वर्षांचे होते. महर्षी अण्णासाहेब कर्वे (जन्म १८५८) हे तर अगदी अलीकडे वारले. म्हणजे शिवाजी महाराजांनंतर एकूण पाच किंवा सहा पिढ्या होतात.

ब्रेख्ट म्हणतो, "हे सर्व खरे असले आणि व्यक्ती म्हणून काहींनी लोकोत्तर कर्मे केली असली तरी पिढ्या म्हणून त्यांची कामगिरी यशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. जग काही सुधारलेले नाही. आमच्य पिढ्यांत आणि नवीन पिढीत हा मोठा फरक आहे. आम्ही काही इ.स. २००० पर्यंत जगत नाही. नवीन पिढीने त्या वर्षाला आमच्या शुभेच्छा पोहोचवाव्या."

विज्ञानाने श्रद्धेची हेटाळणी करून चालणार नाही. विज्ञानाच्याही मर्यादा आहेत. ब्रेख्ट लिहितो :

"काळ कुणासाठीही थांबत नाही, पण आता जे काही केले जाईल अगर जाणार नाही त्याचे भले अगर बुरे परिणाम भविष्यात होणार हे मला पूर्णपणे ठाऊक आहे. यावरून एकच सिद्धांत निघतो. या जगात आयुष्याचा जो काळ आम्हांला लाभला आहे, तो काही आमच्या स्वत:च्या मालकी हक्काचा काळ नाही. तो आमच्या एकट्या पिढीचा काळ नाही. या काळात आम्ही जे काही करू त्यावर जगाचे भलेबुरे भवितव्य अवलंबून आहे. ही जबाबदारी फार मोठी आहे."

ब्रेख्टच्या आत्मचरित्रात मला माझ्या भावनांचे व विचारांचे प्रतिबिंब दिसले. वाचकांना आपल्या व्यक्तिमत्त्वात गुंतविण्याचे कसब या पुस्तकात आहे. यशस्वी आत्मचरित्राचे हेच प्रमुख वैशिष्ट्य असते.

❉ ❉

# पाश्चात्य कादंबऱ्यांची झेप

जगातील कादंबरी वाङ्मय हे साहित्याचे अतिशय लोकप्रिय अंग आहे. या वाङ्मयाचा विकास हा तसे पाहू गेले असता गेल्या दोन-तीनशे वर्षांचाच. पण मनोरंजन आणि प्रबोधन यासाठी हे माध्यम किती प्रभावी, उपयुक्त आहे आणि या माध्यमाद्वारे आपल्यात उपजत असलेल्या प्रतिभेच्या आविष्काराचे किती तरी मोठे क्षेत्र आपल्या हाती आले आहे याची जाणीव लेखकांना होऊ लागली, तसे हे कादंबरी वाङ्मय सर्वव्यापी बनू लागले. उत्कृष्ट लेखकांच्याद्वारे जगाला चिरस्मरणीय अशा कादंबऱ्यांचा परिचय झाला. 'अंकल टॉम्स केबिन', 'टेल ऑफ टू सिटीज', 'ले मिजराब्ले', 'वॉर अँड पीस', 'क्राइम अँड पनिशमेंट' इत्यादी अप्रतिम कलाकृतींमुळे चार्ल्स डिकन्स, व्हिक्टर ह्यूगो, टॉलस्टॉय, डॉस्टोव्हस्की इत्यादी लेखक हे जागतिक वाङ्मयात अमर झाले. ही परंपरा आजतागायत चालू आहे. अर्नेस्ट हेमिंग्वे याच्या 'ओल्ड मॅन अँड द सी'सारख्या कादंबरीने हे सिद्ध केले आहे. प्रतिभेच्या आविष्कारात लेखकावर विषय, शैली, विवेचन इत्यादींची कोणतीच बंधने नसल्यामुळे कादंबऱ्यांचे विषयही मानवी जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून गेले. त्यामुळे समीक्षकांना कादंबरी क्षेत्रामध्ये वेगवेगळे विभाग करून त्यांचे स्वतंत्रपणे विवेचन करणे भाग पडू लागले. सामाजिक कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या, फार काय रहस्यकथात्मक कादंबऱ्या असे किती तरी स्वतंत्र विभाग या क्षेत्रात आढळून येऊ लागले. यापैकीच अलीकडचा एक प्रकार म्हणजे राजकीय कादंबऱ्या.

ऐतिहासिक कादंबऱ्या आणि राजकीय कादंबऱ्या हे प्रकार परस्परांना संलग्न असले तरी त्यांची धाटणी ही वेगळीच म्हणावी लागेल. ऐतिहासिक कादंबऱ्यांत लेखकाच्या पूर्वीचा काळ कल्पिलेला असतो. अशा कादंबऱ्यांतून कथानक, घटना, पात्रे इत्यादींचे विवेचन असले तरी निरीक्षकांना त्यातून आढळून येणारी समाज आणि वातावरण यासंबंधीची खोल जाण लेखकाला असल्याचे आढळून आल्याशिवाय राहत नाही. अशा कादंबऱ्या आणि कादंबरीकार यांची उदाहरणे आपल्याला टॉलस्टॉय, डिकन्स, व्हिक्टर ह्यूगो, हेमिंग्वे, अलेक्झांडर ड्युमास इत्यादींच्या कलाकृतींतून आढळून येतात. मराठीतील अशा कादंबरीकारांची उदाहरणे म्हणजे रणजित देसाई, ना. सं. इनामदार आणि गेल्या पिढीतील हरी नारायण आपटे, नाथमाधव ही होत. राजकीय जागृतीचा

आपल्या परीने आपल्या कादंबऱ्यांतून आविष्कार करणारे हरिभाऊ आपटे, निष्कलंक शिवचरित्र आपल्यासमोर ठेवून प्रचलित वातावरणाकडे आपले लक्ष वळवणारे रणजित देसाई किंवा नवीन दृष्टिकोनाच्या द्वारे ऐतिहासिक व्यक्तींचे मूल्यमापन करू पाहणारे ना. सं. इनामदार यांच्या कादंबऱ्या मोलाच्या तर खऱ्याच, पण राजकीय कादंबऱ्यांतील वातावरण अधिक आव्हानाचे असते हेही खरे.

अशा कादंबऱ्यांतील घटना काय किंवा पात्रे आपल्यासमोर घडत वा घडलेली असतात. त्यांची मांडणी करताना जिवंत राजकीय अगर सामाजिक पात्रांच्या बाबतीत किंवा घटनांच्या बाबतीत काय दृष्टिकोन स्वीकारावा हे कादंबरीकारला काळजीपूर्वक ठरवावे लागते. पात्रांची नावे जिवंत व्यक्तींचीच ठेवावीत काय? आणि घटना घडल्या त्यांची पार्श्वभूमी ही कल्पनाशक्तीने कितपत मांडता येईल? या गोष्टींचा विचार लेखकाला करावा लागतो. कल्पनाशक्ती लढवावी लागते.

सध्या अशा प्रकारच्या इतक्या कादंबऱ्या प्रसिद्ध होत आहेत की या युगाला राजकीय कादंबऱ्यांचे युग म्हणावे की काय असे वाटू लागते. मराठीत अशा राजकीय कादंबऱ्या वाढत्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'मुक्तात्मा', 'मुखवटा', 'दुहेरी जीवन', 'स्वप्नांतरिता', ना. सी. फडके यांचे 'सितारा मंझिल', मागच्या पिढीतील तुळजापूरकरांचे 'माझे रामायण' आणि भारताच्या फाळणीवरील अलीकडील कादंबऱ्या, 'मुंबई दिनांक' सारख्या कथाही उदाहरणे म्हणून देता येतील.

इंग्रजी किंवा अमेरिकन साहित्यातून तर मोकळेपणाने जिवंत व्यक्तींची नावे कथा-कादंबऱ्यांतून फिरवितात. या बाबतीत पूर्वी काही लेखक थोडासा आडपडदा बाळगीत. नावे काहीशी बदलून ठेवण्यात येत. मराठीतील लाला गजपतरायसारखी उदाहरणे आढळत नाहीत असे नाही. इंग्रजीत 'बर्नार्ड शॉ'च्या नाटकातून लॉर्ड किचनरच्या ऐवजी डिचनर, लॉइड जॉर्जच्या ऐवजी बॉइड जॉर्ज किंवा जॉर्ज बाइड अशी नावे कमी आढळत नाहीत. इंग्रजी वाङ्मयात सरळ सरळ नावे घेतलेली दिसतात. पण कथानकात मखलाशी करून त्या नावाच्या प्रत्यक्ष माणसाला कायदेशीरपणे काही करता येणार नाही याची खबरदारी घेतली जाते.

आणखी एक गमतीचा प्रकार आढळून येतो. कथा-कादंबऱ्यांतून स्थळकाळांच्या घटनांच्या संदर्भात काळ अचूक द्यायचा. त्याप्रमाणे घटनास्थळी कोणती व्यक्ती असू शकेल याची खात्री वाचकाला वाटेल. पण नेमके त्याच वेळी त्या व्यक्तीला नाव मात्र वेगळे द्यायचें. उदाहरणार्थ : अमेरिकेत अमक्या तारखेला अमका अमका राष्ट्राध्यक्ष हा आपल्या सचिवांची बैठक घेत होता, असे विधान असले तर कथेतील नोंदलेल्या तारखेवरून तो राष्ट्राध्यक्ष केनेडी असावा किंवा लिंडन जॉन्सन असावा हे आपण

ओळखू शकतो. अशा वेळी लेखक व्यक्तींची नावे बदलतात. काही जण त्याच्याही पुढे जाऊन नावे जशीच्या तशी ठेवतात.

मी अलीकडे वाचलेल्या कादंबऱ्यांत अशा किती तरी व्यक्तींची (जिवंत अगर नुकतेच दिवंगत) नावे खेळवलेली मला आढळली. ब्रेझनेव्ह, मॅलिनोस्की, आंद्रेय ग्रोमिको, लिंडन जॉन्सन, यासर अराफत, इराणचा शहा अशी किती तरी नावे सांगता येतील. रेगनचा उल्लेखही आढळतो, पण नावात थोडासा बदल करून.

या राजकीय कादंबऱ्यांची पार्श्वभूमीही विविध स्वरूपी आहे. वाढत्या संख्येने निघणाऱ्या कादंबऱ्या आपल्या विषयाच्या पार्श्वभूमीसाठी खलनायक म्हणून त्या त्या काळात प्रचलित असलेल्या विरोधी देशांचा, समाजाच्या गटांचा अगर व्यक्तींचा उपयोग करतात. ज्यू लोकांवरील अत्याचार, पॅलेस्टाइनमधील अरब-इस्रायलचा लढा, दक्षिण आफ्रिकेतील वर्णविद्वेष, मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील लहानमोठी राज्ये हे सगळेच विषय अशा कादंबऱ्यांतून हाताळले जातात. त्या त्या काळात ज्याच्यावर टीकेचा भर अधिक तो खलपुरुष अशी भूमिका त्या राजकीय कादंबऱ्यांची दिसते. गेली तीस-चाळीस वर्षे सगळे जग शीतयुद्धात गुरफटले होते. आरोप आणि प्रत्यारोप यांच्या फैरी झडत होत्या. हेरगिरी आणि कारस्थाने यांना ऊत आला होता. जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन उभे राहत होते. के.जी.बी., सी.बी.आय., एफ.बी.आय., स्कॉटलंड यार्ड, साबा, मोसाद, सी.आय.ए. इत्यादी गुप्तचर पोलिस संघटनांना ऊत आला होता. जेम्स बॉंडसारखी प्रख्यात पात्रे जगभर वावरत होतीच, पण लहानसहान रहस्यकथांतूनही निक कार्टरसारखे धाडसी वीर आणि अँजेलोसारखे खुनी जगभर वावरत होते. या शीतयुद्धासमोर इराणचा शहा, यासर अराफत, कर्नल गदाफी, फिडेल कॅस्ट्रो यांच्यासारखी पात्रे तुलनेने कमी महत्त्वाची म्हणावी लागतील.

हेरांच्या कथा, गुप्त पोलिसांच्या गोष्टी, तस्करीच्या कथा यांचे तंत्र वेगळे असते. राजकीय कादंबऱ्या या वरील रहस्यकथांच्या मानाने वरच्या दर्जाच्या आहेत, हे निःसंशय. त्यातल्या त्यात कालच्या राजकीय कादंबऱ्या या आजच्या कादंबऱ्यांपेक्षा अधिक सखोल, भरीव आणि जीवनाच्या तळापर्यंत शोध घेणाऱ्या वाटतात. डिकन्सची 'टेल ऑफ टू सिटीज', टॉलस्टॉयची 'युद्ध आणि शांतता', अमेरिकेत गाजलेली 'गॉन विथ द विंड', पर्ल बकची 'गुड अर्थ' इत्यादी कादंबऱ्या पाहा म्हणजे हा फरक तावडतोब लक्षात येईल. असे असले तरी अलीकडील 'एक्सोडस'सारख्या कादंबऱ्या अविस्मरणीय झाल्या आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. अशा कादंबऱ्या अपवादात्मक म्हणाव्या लागतील.

अलीकडच्या राजकीय कादंबरीकारांत इंग्लंडचा जेफ्री आर्चर याचे नाव चांगलेच गाजले. ऑइल, द डे ऑफ द जॅकाल, द नेकेड अँड द डेड, फॉर हूम द बेल टोल्स,

द बर्लिन ब्लॉकेड इत्यादींच्या लेखकांप्रमाणे जेफ्री आर्चर यांची कल्पनाशक्तीही अफाट आहे. कादंबरीलेखनाच्या तंत्रात त्यांना विलक्षण यश लाभले आहे. घटनांची जुळवाजुळव आणि पात्रांच्या हालचालींची प्रत्ययकारी वर्णने ही वाचकांच्या मनाचा वेध घेतात. घटनांच्या जवळात जवळ जाऊन सत्याचा आभास कसा निर्माण करायचा आणि वाचकाला थक्क कसे करून सोडायचे हे कसब ते उत्कृष्टपणे जाणतात. आर्चर यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या म्हणजे 'केन अँड एबल', 'द प्रॉडिगल्स डॉटर', 'शॅल वी टेल द प्रेसिडेंट ?', 'द फर्स्ट अमंग द ईक्वल्स' आणि 'मॅटर ऑफ ऑनर' या. कल्पनाशक्ती आणि कथातंत्र ही दोन आर्चरची वैशिष्टये दिसतात. उदाहरणादाखल त्यांची 'मॅटर ऑफ ऑनर' कादंबरीही पाहा.

एका करारनाम्याच्या शोधात अमेरिका आणि रशिया यांच्यात किती विलक्षण स्पर्धा लागली होती आणि तीत एक सामान्य नागरिक कसा अडकला होता याचे हे चित्रण आहे.

स्कॉट नावाचा इंग्लंडचा एक लष्करी अधिकारी. दुसऱ्या महायुद्धानंतर नाझी पुढाऱ्यांची धरपकड झाली, आणि त्यांच्यावर खटले भरण्यात येऊन त्यांना फाशीसारख्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. अशा पुढाऱ्यांपैकी हिटलरच्या वायुदलाचा सरसेनापती फील्ड मार्शल गोअरिंग हा होता. तो फाशीचे दिवस मोजीत असता त्याच्या बंदिस्त कोठडीवर रक्षक म्हणून स्कॉट काम करीत होता. आपण फासावर लटकावे असे गोअरिंगला मुळीच वाटत नव्हते. इतर कोणत्याही मार्गाने आपल्याला मरण आलेले चालेल, पण गळ्याला फास नको अशी त्याला तळमळ लागली होती. त्याने अन्य मार्गाने जहरी विष मिळविले. (पुढे असे सिद्ध झाले की एका रशियन माणसाने त्याला सायनाइड पुरविले होते, असे कादंबरीत सूचित केले आहे. अर्थात काहींच्या मते गोअरिंगच्या पत्नीने शेवटच्या चुंबनाच्या मिषाने आपल्या तोंडात धरलेला सायनाइडचा गोळा गोअरिंगच्या तोंडात घातला.) ते घेण्याच्या काही काळ पूर्वी त्याने स्कॉटला आपल्याजवळ बोलाविले. तुम्ही माझ्याशी चांगली वागणूक केली त्याचा हा अल्पसा मोबदला असे म्हणत एक पाकीट त्याने स्कॉटच्या हातात दिले. याचा तुम्हांला काही उपयोग झाल्यास पाहा असे तो म्हणाला. स्कॉटने ते पाकीट खिशात ठेवून दिले. पाकिटात काय आहे हे त्याने मरेपर्यंत पाहिले नाही.

पुढे गोअरिंग याला विष कोणी पुरविले इथपासून त्याला हवा असलेला विषप्रयोगाचा मृत्यू कसा आला या प्रकरणाची चौकशी सुरू झाली. स्कॉटने या प्रकरणात आपला अजिबात हात नाही असे आर्जवून सांगितले तरी ब्रिटिश लष्करी प्रमुखांचा आणि स्कॉटच्या इतर सहकाऱ्यांचा त्याच्यावर विश्वास बसेना. या बदनामीने हाय खाऊन स्कॉटने राजीनामा दिला. त्याचा मुलगा लष्करात होता. त्याचीही बढती

खुंटली आणि त्यालाही राजीनामा द्यावा लागला. आपल्या मागे हे किटाळ लागले याचा या दोघांनाही मनस्ताप होत होता. अशा परिस्थितीत बाप मरण पावला आणि त्याच्या मृत्युपत्राबरोबरच वरील पाकीट मुलगा ॲडम स्कॉट याजकडे आले. पाकिटात जर्मन भाषेतील पत्रे होती. ती तज्ञांच्याकडून स्कॉटने समजून घेतली. १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीनंतर झारने आपल्या राजवाड्यातील आपल्या काही अमूल्य वस्तू आपला नातेवाईक (माउंटबॅटनचा आजा) याला भेटीदाखल दिल्या. परंतु विमानाच्या दुर्घटनेत हे सामान जमिनीवर इतस्तत: पसरले. जर्मन सरकारने सामान गोळा करण्यासाठी जे अधिकारी पाठवले त्यांत गोअरिंग एक असावा. त्याच्या हाती ती कलाकृती पडलेली असावी. ती पुढे त्याने एका इसमाच्या मार्फत स्वित्झर्लंडच्या बँकेत ठेवली असावी. ज्या इसमाने बँकेत ती वस्तू ठेवून त्याची पावती घेतली होती तो पुढे मेला असावा. ती पावती गोअरिंगने पाकिटात ठेवली होती. स्कॉटने पावती दाखवून ती वस्तू विकून चार पैसे मिळवावे अशी गोअरिंगची सदिच्छा असावी.

ॲडम स्कॉटला त्या चित्राच्या मूल्याची कल्पना नव्हती. पण तज्ञाने त्या उत्कृष्ट कलाकृतीची किंमत वीस हजार पौंड सांगितली त्या वेळी त्याचे डोके गरगरू लागले, आणि लॉरेन्स नावाच्या आपल्या मित्राच्या बँकेतील मैत्रिणीला घेऊन स्कॉट हा स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा या शहरातील बँकेत गेला. त्याने पावती दाखवून ते चित्र मिळविले. थोड्याच वेळात रशियाचा सुप्रसिद्ध हेर रोमानोव्ह हा वेषांतर करून बँकेत पोहोचला. मागे चित्र ठेवून पावती घेणाऱ्या इसमाचा त्याने बेमालूम वेष केला होता. स्कॉटने ती वस्तू घेतली हे लक्षात आल्यावर त्याने पाठलाग करून त्याच्या मैत्रिणीचा खून केला. त्या वेळेपासून रोमानोव्ह आणि ॲडम स्कॉट यांच्यात पाठशिवणीचा खेळ सुरू झाला.

रशियाने ते चित्र मिळवण्यासाठी इतका आटापिटा का करावा याची ॲडम स्कॉटला काहीच कल्पना नव्हती. चित्राच्या मागील कप्प्यात करारनाम्याचा एक कागद दडला होता हे त्याला माहीत नव्हते.

इ.स. १८६७ मध्ये रशियाने अमेरिका खंडात असलेला आपला अलास्का नावाचा मोठा भूप्रदेश अमेरिकन संयुक्त राष्ट्राला (युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका) विकला होता. रशियन लोकांना हा प्रकार आवडला नाही याची रशियन सम्राट झार याला जाणीव होती. आपले कृत्य सौम्य दिसावे म्हणून झारने एक पुरवणी कागद लिहिला. त्यात असे म्हटले होते की मूळ करार हा नव्याण्णव वर्षांचा समजावा. या मुदतीत रशियाला हवे असल्यास तो किंमत मोजून अलास्का परत घेऊ शकेल. कराराची एक प्रत अमेरिकेत होती आणि दुसरी प्रत रशियात होती. ती प्रत त्या चित्रामागे दडवलेली होती, आणि ते चित्र हरवले होते. कराराची मुदत इ.स. १९६६ च्या जून महिन्यात

संपत होती. त्याला अवघे दोन महिने राहिलेले होते. कागद हाती येताच अमेरिकन बँकेत अलास्काच्या मूळ किंमतीच्या दहापट रक्कम भरावी आणि अमेरिकन खंडातील अलास्का भूप्रदेश परत घेऊन अमेरिकन राजकारणात आपला खंजीर खुपसून ठेवावा असा रशियाचा डाव होता. पण कराराची ती प्रत हरवली होती. पुढील दोन महिन्यांत ती मिळविणे आवश्यक होते. तसे न झाल्यास तो करार निरर्थक ठरणार होता. म्हणून रशियाने सबंध युरोपात हेरांचे जाळे पसरवले.

हा करार रशियाच्या हाती गेला आणि तोही मुदतीच्या आत तर आपल्याला अलास्का गमवावा लागणार, या काळजीने अमेरिकन अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांची झोप उडाली होती. युरोपमध्ये अमेरिकन हेरांचाही सुळसुळाट झाला. पण चित्र होते एका इंग्रजापाशी. म्हणून सगळे स्कॉटच्या मागे लागले. जिनिव्हा येथे रोमानोव्ह या रशियन हेराचा पाठलाग चुकवीत कॅप्टन स्कॉट हा फ्रान्सच्या सरहद्दीत पळून जाण्याच्या प्रयत्नात होता.

या धावपळीत रोमानोव्हच्या ऑफिसमधील फटाकडी सचिव ॲना पॅट्रोव्हा ही गोवली गेली. रोमानोव्ह हा झारशाहीतील एका श्रीमंत सरदाराचा नातू. त्याच्या आज्याने क्रांतीपूर्वी स्विस बँकेत कोट्यवधी रुपयांची संपत्ती दडवून ठेवली होती. तीतून रोमानोव्हने ॲना पॅट्रोव्हाला मूर्खपणाने सोन्याचा एक घसघशीत हार दिला. रशियन सरकारला याचा सुगावा लागताच रोमानोव्हने आपल्या मैत्रिणीचा खून केला व तिचे प्रेत पेटीत बंद करून बँकेत ठेवून दिले. ॲडम स्कॉटला स्वित्झर्लंडमधून फ्रान्सकडे जाण्याच्या धडपडीत रोमानोव्ह व त्याचे सहकारी यांच्या हल्ल्याला तोंड द्यावे लागले. यातच रॉबिन नावाच्या एका स्त्रीशी त्याची ओळख झाली. तिकडे रोमानोव्हला सतत माहिती पुरविणारा इंग्लंडचा एक विश्वासघातकी सनदी नोकर त्याच्या मागे होता. त्यामुळे स्कॉटवर अनेक आपत्ती आल्या. शेवटच्या क्षणी रोमानोव्हने स्कॉटच्या बापाचे निरपराधित्व सिद्ध करणारा कागद स्कॉटच्या हवाली केला, आणि स्कॉटकडून चित्र मिळविले. पण रॉबिनच्या हुशारीमुळे करारनाम्याची खरी प्रत रोमानोव्हच्या हाती पडली नाही. कादंबरीची शेवटची पाने वाचली तर रॉबिन ही व्यक्ती पुरुष असून स्त्री वेषधारी बनून हेरगिरी करणारा तो एक अमेरिकन किंवा इंग्रज गुप्तचर असावा असे वाटते. ॲडम स्कॉटचीही फसवणूक झालेली दिसते.

शेवटी वेळेवर कराराची अधिकृत प्रत दाखविणे रशियाला शक्य झाले नाही. कराराची मुदत संपून गेली आणि रशियाला हात चोळीत बसावे लागले. ॲडम स्कॉटच्या बापाचे निरपराधित्वही सिद्ध झाले. विश्वासघातकी सनदी नोकर हा रशियनांच्या हातूनच मारला गेला. ब्रिटिश परराष्ट्रखात्यातील एक रिकामी झालेली जागा ॲडम स्कॉटला देण्यात आली. इकडे रोमानोव्ह रशियात बेपत्ता झाला. कामगिरी

यशस्वी न केल्यामुळे त्याला प्राणाला मुकावे लागले, हे उघड आहे. रशियन गुप्त पोलिस खात्याच्या प्रमुखाला कम्युनिस्ट सरकारने बडतर्फ केले. कराराप्रमाणे रशियाला त्यांनी मागे दिलेला प्रदेश परत विकण्याची आपत्ती अमेरिकेवर आली होती, तीतून अमेरिकेची सुटका झाली.

चित्राचे काय झाले? उत्कृष्ट कलाकृती म्हणून त्या चित्राचा लिलाव झाला. त्याचे वीस हजार पौंड ॲडम स्कॉटला मिळाले. कथानकाचा एकंदरीत शेवट अशा रीतीने झाला.

जेफ्री आर्चरच्या यशस्वी कादंबरीचे हे कथानक आहे. या कादंबरीवरून इंग्रजीतील राजकीय कादंबऱ्यांच्या प्रेरणा, परिसर, विवेचन आणि विस्तार यांची कल्पना यावी, आणि ती गाठण्यासाठी आपल्या कादंबरीकारांना केवढे रान तुडवायचे आहे याचीही कल्पना यावी.

❖ ❖

# इबान्स्क देशातील नवलकथा

अलेक्झांडर झिनोविव हा सुप्रसिद्ध लेखक रशियातून निघून पश्चिम युरोपात स्थायिक झाला आहे. त्याचा ग्रंथ 'यॉनिंग हाइट्स' या नावाने इंग्रजीतूनही प्रसिद्ध झाला आहे. आठशे पानांच्या या प्रचंड ग्रंथात इबान्स्क नावाच्या एका काल्पनिक देशातील समाजजीवनाचे उपरोध आणि उपहास यांद्वारे अतिशय भेदक असे चित्रण झिनोवीवने केले आहे. या ग्रंथातील अनेक प्रसंग विनोदाने भरलेले आहेत. पुढे दिलेले काही प्रसंग मोठे खुमासदार वाटतील :

(१)

माझी पत्नी म्हणाली, ''इतका वेळ कुठे गेला होता ?'' मी म्हटले, ''दुकानावर रांग (क्यू) लावून उभा होतो.'' ती म्हणाली, ''त्या लोकांनी पुन्हा दोन फुटकी अंडी तुमच्या गळ्यात बांधलेली दिसतात. तुम्हांला यापुढे दुकानात पाठवायलाच नको. तुम्हांला पाहिले की कुणालाही तुम्हांला फसवावे असेच वाटेल. तुमचा चेहराच शंभर टक्के बावळट आहे.''

मी म्हटले, ''अग, जग युद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. केव्हा भडका उडेल नेम नाही. आणि तू तर फुटलेल्या अंड्याबद्दल वटवट करीत बसली आहेस.''

ती म्हणाली, ''मला युद्धाची काडीइतकीही पर्वा वाटत नाही. हे मोठमोठे मुत्सद्दी. दुकानांपुढे रांगा लावून उभे राहा म्हणावे म्हणजे कळेल.''

माझ्यातील साहित्यिक जागा झाला. माझ्या डोळ्यांसमोर एक चित्र तयार झाले. राष्ट्रसंघाचे (युनायटेड नेशन्स) दुकान लागले आहे. किसिंगर, सादत, पॉपिदू आणि इतर मुत्सद्दी अंडी-लोण्यासाठी रांगा लावून उभे आहेत. गोल्डा मायर ही सर्वांना सर्रास फसविते आहे. चर्चिल रांग तोडून पुढे सरकतो आहे आणि तोंडाने म्हणतो आहे, ''मला कामाला उशीर होणार आहे. शिवाय घरात तान्हे मूल रडत बसले आहे.''

असा मी आपल्याच तंद्रीत होतो. माझी पत्नी म्हणाली, ''आपल्या मुलाबद्दल तुम्ही 'जी'कडे शब्द टाकणार होता ना ? बुद्धिजीवी वर्गाच्या मुलांना यंदा कॉलेजांतून आणि शिक्षणपीठांतून प्रवेश मिळणे जवळजवळ अशक्यच होणार आहे हे विसरू नका. आपल्या मुलाला प्रवेश मिळाला नाही तर त्याला सैन्यात दाखल करतील.''

मी म्हटले, "त्यात काळजी करण्यासारखे काय आहे? जाऊ दे की त्याला काही दिवस सैन्यात."

"मी काही सैन्यभरतीच्या विरुद्ध नाही." माझी पत्नी म्हणाली, "पण मी म्हणते त्या लोकांच्या मुलांना कॉलेजप्रवेशात अडचणी कशा येत नाहीत? तुम्ही किसान अगर श्रमिक नाहीत हा काही तुमच्या मुलांचा गुन्हा नाही."

(२)

पुढारी येणार म्हणून सभा घेण्यात आली. सभेला हजर राहणे भागच होते. दुसरा पर्याय नव्हता. एकेका खुर्चीवर दोघे-तिघे बसले होते. गर्दी विलक्षण होती. श्वास घेण्यास वारा शिल्लक नव्हता. माणसे गुदमरून गेली असती. पण सुदैवाने असंख्य सभांतून हजर राहिल्यामुळे 'सल्फेटेड हायड्रोजन' आणि तुफान भाषणबाजी यांच्या मिश्रणाचा श्वास घेण्याची त्यांना सवय झाली आहे. पण पत्रकार (नाव बदलले आहे) हा जवळजवळ मूर्च्छित झाला होता.

इतक्यात पुढारी आले. गर्दीतून पुढे व्यासपीठाकडे येण्यास त्यांना वाट मिळेना. शेवटी ते श्रोत्यांच्या डोक्यावरून चालत गेले. एकाच्या गुळगुळीत टकलावर (काहींच्या मते ते थिंकरच्या डोक्याचे टक्कल होते, तर काहींच्या मते ते क्लेमंटचे नितंब होते.) पुढारी घसरून खाली आले. त्यांच्या मानेला लागले. आखडलेल्या मानेने ते भाषण करू लागले. म्हणजे श्रोत्यांकडे न पाहता बोलू लागले. आणि श्रोतेही माना अवघडल्यासारखे करून बसले; म्हणजे वक्त्याकडे न पाहता भाषण ऐकू लागले. श्रोत्यांना वाटले की पुढारी वक्त्याची लकब आपण उचलली पाहिजे. क्लेमंटच्या गुळगुळीत नितंबाला पुढाऱ्यांचा लत्ताप्रहार मिळाला. याचा मोबदला म्हणजे एका शिष्टमंडळाबरोबर परदेशात इटालीला जाण्याची त्याला परवानगी मिळाली.

परदेशांना भेटी देणे, आपले ज्ञान वाढविणे हा विसाव्या शतकात सामान्य नागरिकाच्या हक्काचा भाग आहे असे इबान्स्क देशात समजत नाहीत. मर्यादित आणि निवडक लोकांनाच अशी परवानगी देण्यात येते.

(३)

या देशात मुलाखती देणे आणि घेणे याचे सत्र फार वाढले आहे. गंमत अशी की, या मुलाखती परदेशी वृत्तपत्रकार कसे मिळवितात कोण जाणे? जो उठतो तो मुलाखत देत अगर घेत सुटतो.

एका पेन्शनर गृहस्थांना सार्वजनिक संडासात जायचे होते. त्याची वाट त्यांना सापडेना. मग त्यांनी काय करावे? ते येणाऱ्या-जाणाऱ्यांची मुलाखत घेऊ लागले. त्यांची अशी वागणूक पाहून लोक त्यांना चुकवू लागले. पोलिसांनी त्यांना पकडले. ते

पेन्शनर गृहस्थ सारखे म्हणत होते : "अहो, मी इंटेलेक्च्युअल, बुद्धिजीवी नाही. हे पाहा याचे प्रमाण." असे म्हणून त्यांनी निरक्षरतानिर्मूलन विद्यापीठाचे प्रमाणपत्र दाखविले. असे करूनही त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवला नाही. त्यांना पोलिस ठाण्यावर नेण्यात आले.

(४)

आमचा पुढारी एकदा भाषण करण्यासाठी उभा राहिला. 'इंटरकॉन्टिनेन्टल' हा शब्द त्याला उच्चारता येईना. तो उच्चारायला गेला आणि त्याचा जबडा फुटला. लगलीच बुद्धिजीवी (इंटलेक्च्युएल) वर्गात तऱ्हेतऱ्हेच्या अफवा पसरल्या. प्रत्येक जण माहीतगाररासारखे हसून दुसऱ्याला म्हणू लागला, "या खेपेला पुढाऱ्याची सुटका नाही. राजश्री गचकणार. नाही तरी हे फार दिवस जगले. आता यांना जायलाच हवे." पण हाय, बुद्धिजीवींच्या आशा धुळीला मिळाल्या. कारण पुढाऱ्याचा जबडाच मुळी कृत्रिम होता. तो मोडला तसा दुसरा बसविण्यात आला. हा जबडा चांगला होता. आणि अंतराळवीरांसाठी तो मुद्दाम बनविण्यात आला होता.

पुढारी मरणार ही आशा आता मावळली. "जाऊ द्या, त्यात काही फारसे बिघडले नाही. नाही तरी हा मृत्यू काहीसा अकालीच म्हणावा लागला असता." असे उद्‌गार सायंटिस्ट (एक पात्र) याने काढले. तो म्हणाला, "लवकरच आमचे हे पुढारी विज्ञानावर भाषण देणार आहेत. त्यात वंशशास्त्रावर (जिनेटिक्स) ते बोलतीलच. भाषणाच्या मसुद्यात आमचे वैज्ञानिक "डिओक्सीरिबो नूक्लिक ॲसिड' हा शब्द घुसडून देणार आहेत. आमचा पुढारी त्या शब्दाचा उच्चार करायला जाईल. त्याला हृदयविकाराचा झटका येईल आणि तो निश्चितच गचकेल."

करीयरिस्ट (दुसरे पात्र) म्हणाला, "पण काय रे, याच्यानंतर येणारा पुढारी तरी चांगला राहील का?"

न्युरस्थेनिक म्हणाला, "तो आणखी वाईट असण्याची शक्यता आहे. पण ते काहीही असले तरी आपला पुढारी मरणार यातच केवढे समाधान आहे?"

(५)

मूलत: 'बॉस' म्हणजे सामान्यातला सामान्य माणूस. इतरांपासून तो वेगळा असण्याचे एकच लक्षण होते, आणि ते म्हणजे इतरांवर पाळत ठेवून त्यांची सतत चुगली करीत राहणे. त्याचे बोलणेही सामान्यपणे एका सामान्य निरक्षर मुत्सद्द्यासारखे असे.

पुढे आपण पुढारी होणार हे त्याला दिसू लागले. पुढारीपणासाठी आवश्यक असलेला एक नियम त्याच्या लक्षात आला. लोकांना पुढारी केव्हा आवडतात? ते

बुद्धिमान आणि देखणे असतात म्हणून नव्हे, तर त्यांच्यात लंगडेपणा, तोतरेपणा, टक्कल पडलेले डोके असे काही व्यंग असेल तेव्हा. लोकांना तडफदार देखणी माणसे आवडत नाहीत. त्यांना कीव येईल अशी माणसे हवी असतात. असा एखादा पुढारी भाषणात म्हणून जातो, ''दोन आणि दोन – चार'' आणि उभ्या राष्ट्रात आनंदाच्या लहरी निर्माण होतात. लोक म्हणू लागतात, ''पाहा पाहा, आमचा पुढारी किती विद्वान आहे! तो दिसण्यात बावळट असेल, पण त्याची बुद्धी पाहा किती तीक्ष्ण आहे!''

आमच्या पुढाऱ्याने ठरवले की, आपल्याला साजेसे एखादे व्यंग आपल्याला हवे. त्यामुळे आपली कीर्ती चिरकाल टिकली पाहिजे. ते व्यंग काय असावे? बोलण्याची एक विशिष्ट लकब काढावी. सर्व शास्त्रज्ञ एके ठिकाणी गुप्तपणे जमले. त्यांनी ठरविले की पुढाऱ्याने भाषण करताना बबून माकडाची लकब उचलावी. बॉसने हां हां म्हणता ती धाटणी हस्तगत केली. अल्पकाळातच त्याची विशिष्ट वानरी लकब सर्वत्र प्रसिद्ध झाली. मध्यरात्री सुद्धा एकदम जागे होऊन लोक बॉसचा आवाज ओळखू लागले.

आपण या धाटणीत पूर्ण पारंगत झालो किंवा नाही हे पाहण्यसाठी बॉसने बबून वानर पालन केंद्राला भेट दिली. नर बबूनला त्याचे बोलणे ऐकून वाटले की बॉस म्हणजे मादी बबून आहे. त्याने त्याच्यावर झडप घालून त्याच्यावर सामुदायिक आणि पाशवी अत्याचार(?) केले. तेव्हापासून बॉस हा फेंगडे चालू लागला आहे. त्याच्या डाव्या हाताच्या शिरा दुखत असतात.

या सर्व गोष्टींनी बॉसच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडू लागला. यानंतर त्याने सभा बोलाविली. सर्व सहकारी आले. तो त्यांना म्हणाला, ''मी तुमचा फक्त पुढारी नाही. मी तुमचा प्रमुख आहे.'' त्याचे सहकारी गोंधळले. पण त्याच्या बबूनी बोलण्याचा प्रतिकार त्यांना जमला नाही. बॉसने त्यांची आणि शास्त्रज्ञांची कत्तल करण्याची आज्ञा केली. त्या दिवसापासून त्याच्या विशिष्ट बोलण्याचे रहस्य हे रहस्यच राहिले.

(६)

इवान्स्क देश कुठे आहे म्हणून काय विचारता? तेथे कसे जायचे हे विचारा. मी सांगतो. अगदी सोपे आहे. तुम्ही एक अर्ज केला पाहिजे, तुमच्या चारित्र्यासंबंधीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले पाहिजे. तुम्हांला एक प्रश्नप्रत्रिका देण्यात येईल; तिची उत्तरे भरली पाहिजेत. तुम्ही आपली संपूर्ण माहिती अर्जात दिली पाहिजे. त्यात तुमच्या सर्व मृत नातेवाइकांची नावे आली पाहिजेत. याशिवाय तुम्ही एक करारपत्र लिहून द्यावे. त्यात आम्ही आहोत तेथेच राहू आणि ही गोष्ट कुणालाच सांगणार नाही, असे आश्वासन द्यावे लागेल. अर्जाबरोबर प्रत्येकाला आपली देणी-घेणी मिटवावी लागतील. म्हाताऱ्या पेन्शनरांच्या चौकशीसमोर हजर व्हावे लागेल. स्वतःचे खिसे

उलटून दाखवावे लागतील आणि प्रत्येक मागणीला मान तुकवावी लागेल. हे सगळे झाले की इबान्स्क हे कुठे आहे हे समजून घेण्याची आवश्यकता राहणार नाही. कारण अर्जदार इबान्स्क देशातच आहे हे त्याला कळून चुकेल. खरी अडचण एकाच गोष्टीची आहे. इबान्स्कमध्ये न मिळणारी अशी वस्तू (स्वातंत्र्य?) कुठे मिळवावी? पण त्यासाठी कुणी तरी तुमची सतत निंदानालस्ती करीत राहणे भाग आहे.

इबान्स्क देशाच्या सरहद्दी जगातील सर्व देशांशी भिडल्या आहेत. इबान्स्क देशाच्या लोकांना या गोष्टीची मोठी चीड आहे. आपल्याला परदेशी जाऊ देत नाहीत म्हणून नव्हे. त्याची त्यांना इतकी सवय झाली आहे की, बाहेर पडण्याची त्यांची प्रवृत्तीच नष्ट झाली आहे. त्यांना राग येतो तो याचा की जगात काहीच पुण्यकर्म न करता इतक्या माणसांना परदेशात वास्तव्य करण्याचे भाग्य लाभते ते कसे? आपण मात्र येथे खितपत पडलो आहोत. ''व्हेअर इज इबान्स्क? नॉट हिअर. नॉट देअर. इट इज राइट अप युवर बिहाइंड (नितंब)!'

(७)

पूर्वी भांडवलवाल्यांनी प्रोत्साहन दिलेले तर्कशास्त्र होते. मध्यंतरी ते नष्ट करण्यात आले होते. हॉगच्या (वराह) कारकीर्दीत या तर्कशास्त्राचे पुनरुत्थान झाले. त्या उन्हाळ्यात समुद्रकाठच्या एका शहरात तर्कशास्त्रावर एक आंतरराष्ट्रीय संमेलन झाले. इबान्स्कमधून या संमलेनासाठी एक हजार माणसांचे शिष्टमंडळ गेले. स्थानिक कवी रायटर याने या प्रसंगाचे वर्णन केले आहे. इबान्स्कमधून अधिवेशनस्थळाकडे जाण्यास गाडी निघाली. आपल्या शहरात लाचखाऊ भरले आहेत तसे गाडीत प्रमुख शास्त्रज्ञ खचून भरले होते.

शिष्टमंडळाचे नेतृत्व स्त्यांडरने करावे असे त्याला आमंत्रण देण्यात आले. बरीच चर्चा झाल्यावर स्त्यांडरला शिष्टमंडळात तात्पुरती जागा देण्यात आली. पण ऐन वेळेला त्याचे नाव गाळण्यात आले. अकेडेमेशियन याने संमेलनाचा अहवाल स्वत: लिहिण्याचे ठरविले. शिष्टमंडळात पुढील माणसे होती : अकेडेमेशियन, क्लेमंट, सोशियॉलॉजिस्ट, थिंकर, त्याची बायको, आर्टिस्ट, कर्लिंग, इन्स्ट्रक्टर, या सर्वांचे जवळचे नातेवाईक आणि दूरचे ओळखीचे मित्र, संशोधन-केंद्रातील तरुण महिला साहाय्यिका. शिष्टमंडळात परकी भाषा जाणणारी मंडळीही होती. शिवाय मंडळावरील इतर सभासदांच्या वागणुकीवर डोळा ठेवण्यासाठी अनेकांना शिष्टमंडळात घेण्यात आले होते.

हे शिष्टमंडळ आपल्या मुक्कामावर पोहोचले तशी एक गोष्ट उघडकीस आली. सर्व शिष्टमंडळात थिंकर हा एकच माणूस असा होता की त्याला काही परकी भाषा येत

होत्या. दुर्दैवाने संमेलनात आवश्यक असलेली एकही परकी भाषा त्याला अवगत नव्हती. आता एवढे मात्र खरे की, तेथे अनावश्यक असलेल्या ज्या परभाषा त्याला येत होत्या त्यांवर मात्र त्याचे प्रभुत्व होते. अर्थात संमेलनात त्यांचा काही उपयोग नव्हता ही गोष्ट वेगळी.

प्रवासावर निघण्यापूर्वी शिष्टमंडळातील सर्व सभासदांची क्ष-किरणांनी तपासणी करण्यात आली. सर्वांना इनॉक्युलेशन (लस टोचणे) देण्यात आले. मैत्रीचे वातावरण असावे म्हणून सर्वांना व्होडका (रशियन मद्य) विकत घेऊन साठविण्याची मुभा देण्यात आली.

यानंतर शिष्टमंडळाचे दोन गट करण्यात आले. एका गटाने दुसऱ्या गटावर पाळत ठेवावी असे दोन्ही गटांना बजावण्यात आले. शिष्टमंडळाला शेवटच्या सूचना देताना असिस्टंट म्हणाला, "ही महत्त्वाची गोष्ट तुम्ही लक्षात ठेवा. जेवतांना काटे-सुऱ्या डाव्या हातात धरावे, आणि चॉप (खाद्यपदार्थ) उजव्या हातात असावा. परवानगीशिवाय कुणाशीही बोलू नका. पूर्वनियोजित करण्यात आलेली संभाषणे सोडून इतर संभाषणे करू नका. अरे म्हणून कोणी म्हटले की का रे म्हणत जा. आपण कोण आहोत, कोठून आले आहोत, कोठे आहोत आणि येथे का आहोत याची सतत जाणीव राहू द्या."

शिष्टमंडळाचे कार्य अपेक्षेबाहेर यशस्वी झाले. अधिवेशनात या शिष्टमंडळाने पाचशे डिनन्सिएशन (धिक्कार), आठशे भाषणे, पाच हजार मर्मग्राही टोमणे आणि वीस हजार टिंगलीचे उद्‌गार काढून प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा उडविला. प्रतिस्पर्धी शत्रुपक्षातील रांगेत एकच गोंधळ उडाला, त्यांनी मांडलेल्या मूलभूत सिद्धान्तांना तडे गेले, त्यांच्यात मतभेद निर्माण झाले, आणि शत्रूंचा संपूर्ण पराजय झाला.

शिष्टमंडळाने खाण्यापिण्यात काटकसर केली. यातून जे पैसे वाचले त्यातून शिष्टमंडळाने पुढील सामानाची खरेदी केली. पाचशे स्वीड इमिटेशन जाकिटे, स्कर्ट, कोट, पंधराशे पाटलोणी. मात्र स्वदेशात भाव वाढावा म्हणून प्रत्येक कापडावर परदेशात बनविलेले, मेड अब्रॉड हे लेबल चिकटलेले आहे ना आणि ते सहज निघणार नाही ना याची खात्री करून घेण्यात आली.

'थिंकर' म्हणजे या शिष्टमंडळातील जो व्ही. आय. पी. त्याने आपल्या स्थानाचा लाभ घेऊन अनेक वेश्यागृहांना भेटी दिल्या. येताना त्याने वाटेत पत्त्यांचे दोन जोड विकत आणले. पत्त्यांवर नग्न स्त्रियांची चित्रे होती. अर्थात ती चित्रे परदेशी स्त्रियांची होती. इबान्स्क देशातील स्त्रियांची नव्हती.

परतीच्या प्रवासात 'थिंकर'ने ती चित्रे शिष्टमंडळातील तरुण स्त्रियांना दाखविली. या तरुणींच्या मांड्यांवरून तो हळुवार आणि प्रेमळपणे हात चालवीत आणि

त्यांच्यावर आपली स्निग्ध नजर रोखून ठेवीत त्या तरुणींना म्हणाला, ''पाहा पाहा, ही चित्रे नीट पाहा. आपल्या देशात अशी वाईट चित्रे पाहायला तरी मिळतील काय?'' असे म्हणून त्याने एक दीर्घ उसासा टाकला. त्याच्या या कृतीचा त्या तरुणींवर भयंकर परिणाम झाला. (डिवास्टेटिंग)

यानंतर 'थिंकर'ने क्लेमंटच्या बायकोला त्या पत्त्यांचा एक जोड दिला.

(८)

या काळात इब्रांका (नदीवरून नाव देण्यात आले) रंगभूमी ही अतिशय लोकप्रिय होती. या रंगभूमीचे संपूर्ण नाव इब्रांका नदीवरील सत्य आणि आनंदपर्यवसायी नाटकांचे अर्धकलात्मक आणि बुद्धिहीन पण अलौकिक असे लहानसे थिएटर. गुप्त पोलिसांचे अभिनंदन म्हणून हे थिएटर सुरू करण्यात आले. लोक मात्र याला इब्रांका थिएटर या सुटसुटीत नावाने हाक मारीत. अद्यापही या थिएटरला बरेच महत्त्व आहे.

यानंतर इब्रान्स्कच्या सरकारने सर्व निष्पाप लोकांची आणि कबुलीजबाब न देणाऱ्यांची मुस्कटदाबी केली. हे पार पाडल्यावर सरकारने ठरविले की आम्ही बुद्धिजीवींचा (इंटेलेक्चुअल्स) कधी छळच केला नाही असे जगाला दाखवावे. त्यांनी रंगभूमीचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरविले. कलावंत कवी स्नॉटिह्यांकी यांना संस्कृती समितीत मोठी पदे देण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदावर एका विद्वान पण जख्खड म्हातारा असलेल्या इसमाची नेमणूक करण्यात आली. लोकांत बोलवा अशी की हा म्हातारा चारशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या सर आयझॅक न्यूटन याचा बालमित्र होता.

या थिएटरचा आत्मा म्हणजे निर्माता, मेंदू म्हणजे गुप्त पोलिस व नोकरशाही आणि सदसद्विवेकबुद्धी म्हणजे कवी स्नॉटिह्यांकी.

पूर्वी बॉसच्या काळात या इमारतीत गुप्त पोलिसांचे हौशी नाट्यमंडळ होते. नंतर तेथे सार्वजनिक नाट्यगृह बनले असले तरी बुद्धिजीवी कलाकारांचा गुप्त पोलिस खात्याशी संबंध राहिला. रायटरची बायको म्हणाली, ''या परिस्थितीत ही गोष्ट नैसर्गिकच म्हटली पाहिजे. नाही तरी गुप्त पोलिसांच्या सहकार्याशिवाय आपण संस्कृती मंत्रालयाच्या आघातासमोर कसे टिकणार? शेक्सपीयरची रंगभूमी राजाश्रयानेच वाढली ना? मोलिएरची रंगभूमी फ्रान्समध्ये अशीच वाढली. आमच्या बॅले नृत्यांना सम्राटांचा आश्रय होता. आमची प्रतिस्पर्धी असलेली नाट्यसंस्था पोलिस खात्याच्या आश्रयानेच चालली आहे ना?''

''अगदी बरोबर,'' गुप्त पोलिसप्रमुख म्हणाला. ''बोमार्शे हा इन्फॉर्मर (पाळत ठेवून पोलिसांना माहिती पुरविणारा ) होता. कवी मिल्टन तरी काय होता? इन्फॉर्मरच.

विपरीत व्यसनी ऑस्कर वाइल्ड, नाटककार बर्नार्ड शॉ...'' सारांश कलेला शक्तिमानांचा आश्रय पाहिजे. हे स्नॉटिझ्यांकीचे मत.

इवांका थिएटरने दोन नव्या गोष्टी केल्या. एक म्हणजे थिएरमध्ये कलाकार आणि नेपथ्य यांचे स्थान काहीच नाही. सगळे महत्त्व डायरेक्टर, संचालक याला. म्हणजे हे थिएटर डायरेक्टरचे. ॲक्टर-कलाकारांचे नव्हेच.

दुसरे नावीन्य म्हणजे नाटकात कथेला अजिबात महत्त्व नाही. महत्त्व भाष्याचे, इंटरप्रिटेशनचे. उदाहरणार्थ : थिएटरने शेक्सपीयरचे हॅम्लेट रंगभूमीवर आणले. शेक्सपीयर आणि डोस्टोव्हस्की यांच्या सहकार्याने हे नाटक लिहिण्यात आले. विज्ञान भवनातील भौतिकशास्त्र संशोधन खात्यातील एक विद्यार्थी म्हणजे हॅम्लेट याचे सुप्रसिद्ध स्वगत 'टु बी ऑर नॉट टु बी' हे या विद्यार्थी कलाकाराने पुढीलप्रमाणे म्हटले : ''टु बी ऑर नॉट टु बी ए सिली क्वेश्चन, कन्सिडर्ड इन द कॉंटेक्स्ट ऑफ इबान्स्क !'' – इबान्स्कच्या परिस्थितीत हा प्रश्न विचारणे म्हणजे मूर्खपणाच आहे !

या स्वगत भाषणाला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला आणि सगळे थिएटर डोक्यावर घेतले. या नाटकावर बंदी घालणार होता नाही का ? घालून तर पाहा. मग आम्ही दाखवितो, असे प्रेक्षक कुजबुजत (आणि कुजबुजतच) होते.

हा नवीन हॅम्लेट हा संशोधन केंद्रातील अयशस्वी विद्यार्थी होता. ''मी प्रतिभाशाली आहे, पण येथील संशोधन केंद्र म्हणजे भ्रष्टाचाराचे आगर आहे. अगदी हॅम्लेटकालीन डेन्मार्कच्या दरबारासारखे.'' असे त्याचे स्वगत भाषण होते. असे त्याने म्हणताच टाळ्यांचा कडकडाट झाला. स्वत: शेक्सपीयरला ही निर्मिती आवडली. हॅम्लेटची ही बाजू आपल्या लक्षात आली नव्हती हेही त्याने मान्य केले.

प्रेक्षागृह नेहमी तुडुंब भरलेले असे. अर्धे प्रेक्षक परदेशी असत. बाकीचे अर्धे गुप्त पोलिस किंवा इन्फॉर्मर असत. उरलेले इतर कोणीही असत. तिकिटे मिळण्याची मारामार होई. कारण ती पूर्वीच मंत्री, राजदूत वगैरेंना देण्यात आलेली असत.

(९)

इबान्स्कच्या या पुढाऱ्यांच्या चित्रणात झिनोविव याने कमालीचे स्वातंत्र्य घेतले आहे. श्लील आणि अश्लील हे भेदही त्याने पाळले नाहीत. कुठे अफवा, कुठे भित्तिपत्रकावर पाहिलेला मजकूर ही निमित्ते दाखवून त्याने आपली मळमळ बाहेर काढली आहे. बॉस काय आणि हॉग काय, त्यांच्या भाषणात नेहमी ग्राम्य आणि अश्लील कोट्या असत. त्यांचा उपयोग झिनोविव याने कसा केला आहे पाहा. हॉगच्या मृत्यूनंतर त्याच्या कबरीवर त्याचे ब्रीदवाक्य काय लिहावे याचा विचार चालू असताना झिनोविवचे एक पात्र म्हणते, ''याच पिढीत आपल्या तत्त्वज्ञानाचा विजय होईल अशी हॉगची खात्री होती ना ? मग पुढील उद्गार कबरीवर कोरा :

ॲडाम वॉज फ्याशन्ड आउट ऑफ क्ले
ईव फ्रॉम हिज रिब, सेज होली रिट
द ईडियट हू लाइज हिअर टुडे
वॉज मेड बाय थिंकर आउट ऑफ शिट.''

या ग्रंथाच्या शेवटच्या पानावर च्याटरर हा आपण होऊन मरण स्वीकारतो. मरणाचा एक मोठा लाभ हा आहे की, या जगात माणसाने माणसाला कसे वागविले हे त्याला दिसत नाही.

''देअर मेन ॲडव्हांटेज – दे कान्ट सी ऑर हिअर
हाऊ द लिव्हिंग आर ट्रीटिंग ईच अदर ऑन द अर्थ
ॲण्ड ही सीज्ड टु एक्झिस्ट.
ॲण्ड दॅट वॉज द एंड ऑफ एव्हरीथिंग!''

❉ ❉

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3433
निबंध
२६९२३
२६।४।०७
ग्रंथ शाखा (एक प्रत)

REFBK-0026923

# सेतुमाधवराव पगडी लिखित आमची प्रकाशने

इतिहास आणि कल्पित

नेसोनी शालू हिरवा

प्रीति परि

श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय

भारतीय मुसलमान शोध आणि बोध

काश्मीर एक ज्वालामुखी

महाराष्ट्र कर्नाटकातील सुवर्णकाल

एका माळेचे मणी

तू अशी जवळी रहा

सूफी संप्रदाय : तत्वज्ञान आणि कार्य

विडा रंगतो असा

सुंदरा मना मधि भरली

नयन तुझे जादुगार

श्री छत्रपती आणि त्यांची प्रभावळ


## परचुरे प्रकाशन मंदिर

२०३ / ४, मेहता भवन, ३११, राजा राममोहन रॉय मार्ग,

गिरगाव, मुंबई-४०० ००४.